
महाराष्ट्राचे

# शिल्पकार

## बाळशास्त्री जांभेकर



प्रा. (डॉ.) शिवकुमार सोनाळकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# महाराष्ट्राचे शिल्पकार

# बाळशास्त्री जांभेकर

लेखक

**प्रा. (डॉ.) शिवकुमार सोनाळकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

वाय ५६७-१

- **पुस्तकाचे नाव :** महाराष्ट्राचे शिल्पकार बाळशास्त्री जांभेकर

- **लेखक :** प्रा. (डॉ.) शिवकुमार सोनाळकर

- **प्रथमावृत्ती :** २७ फेब्रुवारी, २०२२

- **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-२०-०९

- **प्रकाशक :**

  सचिव,
  महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
  रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
  पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड,
  प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

- **© प्रकाशकाधीन :**

- **मुद्रक :**

  व्यवस्थापक,
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

- **किंमत : रु. ११०/-**

---

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

आमच्या सर्वस्वी सुखासाठी शेतामध्ये काबाडकष्ट करणारे
ज्येष्ठ बंधू श्री. केरबा सोनाळकर व वहिणी सौ. शालिनी
आणि
सामाजिक चळवळीत निःस्पृहपणे अविरत कार्य करणारे बंधू
ॲड. अरुण सोनाळकर व वहिणी सौ. मिनाक्षी
यांना अर्पण.

# निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने "महाराष्ट्राचे शिल्पकार" अशी ग्रंथमालिका सुरू केली आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांनी क्रांतीकारी कार्य केले आहे. अशा युगपुरुषांचे दर्शन नव्या पिढीला ज्ञात व्हावे हा मुख्य उद्देश आहे. शिवकुमार सोनाळकर यांनी महाराष्ट्राचे शिल्पकार बाळशास्त्री जांभेकर ग्रंथातून बाळशास्त्री जांभेकरांच्या समग्र कार्यकर्तृत्वाचा शोध घेतला आहे.

१९ व्या शतकाच्या पहिल्या दशकात इंग्रजी सत्ता स्थिरस्थावर झाल्यावर पश्चिम भारतामध्ये सर्व परिस्थितीचा धैर्याने आणि व्यापक दृष्टीने विचार करून समाजाला नवा मार्ग दाखवून जागृत करणारा, स्वदेशोन्नतीच्या विविध क्षेत्रात तळमळीने अखंड परिश्रम करणारा प्रज्ञावंत सुधारक म्हणजे बाळशास्त्री जांभेकर. मराठी भाषेतील पहिल्या वृत्तपत्राचा आणि आद्य पत्रकाराचा मान बाळशास्त्री जांभेकरांना दिला जातो.

शिवकुमार सोनाळकर यांनी बाळशास्त्री जांभेकरांच्या दर्पणचे दर्शन परिश्रमपूर्वक यथार्थ असे घडवले आहे. दर्पणमध्ये शिक्षणप्रसाराचे कार्य, सामाजिक सुधारणाविषयक विचार, रूढी, परंपरा, अंधविश्वास यांवर हल्ला, विज्ञानविषयक दृष्टिकोन, आर्थिक शोषणाविरुध्द आवाज, धर्मविषयक जागरूकता, शेतकऱ्यांच्या उन्नतीविषयी प्रयत्न, गुन्हेगारीचा बंदोबस्त, ज्वलंत प्रथांना स्थान याविषयक लेखनाला प्राधान्य दिले आहे. बाळशास्त्री जांभेकरांची अष्टपैलु बुध्दिमत्ता, समाजोध्दाराची दृष्टी, स्वदेशोन्नतीची कळकळ, पुरोगामी आणि प्रगल्भ दृष्टिकोन दिसून येतो. म्हणूनच बाळशास्त्री जांभेकरांना महाराष्ट्रातील आद्य पत्रकार, आद्य ज्ञानमहर्षि आणि आद्य समाजसुधारक म्हटले जाते.

**डॉ. सदानंद मोरे**

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# प्रस्तावना

६ जानेवारी, १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' वृत्तपत्र सुरू करून, मराठी वृत्तपत्रसृष्टीची मुहूर्तमेढ रोवली. मराठी भाषेतील प्रथम नियतकालिकाचा कर्ता, संपादक आणि पत्रकाराचा सन्मान बाळशास्त्री जांभेकरांनाच दिला जातो. 'दर्पण'ला, पर्यायाने मराठी वृत्तपत्रसृष्टीला १९० वर्षे पूर्ण झाली. ६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने बाळशास्त्री जांभेकरांचे स्मरण होतेच. समाजजीवनामध्ये उत्तुंग कार्य केलेल्या व्यक्तींची आपण जन्मशताब्दी साजरी करत असतो. दुर्दैवाने बाळशास्त्र्यांच्या जन्माविषयी विख्यात ग्रंथकारांनी इ. स. १८१० व इ. स. १८१२ असा वेगवेगळा उल्लेख केला आहे. महिना व तिथीचा उल्लेख कुठेच आढळत नाही. आपण बाळशास्त्री जांभेकरांची द्विजन्मशताब्दी साजरी केली. अखंड महाराष्ट्रातील चार-सहा नियतकालिकांमध्ये बाळशास्त्रींच्या जीवन कार्यावर फुटकळ स्वरूपाचे लेख हेच स्मरणाचे इतिकर्तव्य आपण पार पाडले. खरे तर बाळशास्त्री हे महाराष्ट्राचे आद्य ज्ञानमहर्षी, आद्य समाजसुधारक व आद्य पत्रकार म्हणून ओळखले जातात. त्यांचे समस्त कार्य, विचार नव्या पिढीसमोर आणावेत, त्यांच्या चतुरस्त्र संपन्न व्यक्तिमत्त्वाचे बहुविध पैलू आजच्या पिढीला ज्ञात व्हावेत म्हणून हा ग्रंथ प्रपंच आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या दशकात ब्रिटिश सत्ता स्थिरस्थावर झाल्यावर पश्चिम भारतामध्ये सर्व परिस्थितीचा धैर्याने आणि व्यापक दृष्टीने विचार करून समाजाला जागृत करणारा व नवा मार्ग दाखवणारा, स्वदेशोन्नतीच्या विविध क्षेत्रांत तळमळीने अखंड परिश्रम करणारा प्रज्ञावंत सुधारक आणि मराठी वृत्तपत्रांचा भरभक्कम पाया रोवणारा महाराष्ट्रातील आद्य पत्रकार म्हणजे बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर होय.

देवगड तालुक्यातील खारेपाटणनजीक पोंभुर्ले गावी १८१२ साली बाळशास्त्री जांभेकरांचा जन्म झाला. वडील गंगाधरशास्त्री व्युत्पन्न पुराणिक. शिक्षणाचा पिढीजात वारसा, सुशील आणि सुसंस्कारित घराणे यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुसंपन्न झाले. लहानपणीच संस्कृत भाषेशी नाळ जोडल्यामुळे आणि प्रख्यात ग्रंथकारांच्या ग्रंथांशी संबंध आल्यामुळे त्यांनी विद्येत खूपच प्रगती केली. बाळशास्त्री हे एकपाठी होते. त्यामुळे त्यांना लहानपणीच 'बालबृहस्पती' या नावाने ओळखले जाई. त्याकाळी पोंभुर्ल्यास शाळेची सोय नसल्यामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण वडिलांच्या सान्निध्यात घरगुती पद्धतीनेच झाले.

पेशवाईच्या अस्तानंतर एल्फिन्स्टनने शाळांची स्थापना केली. नवीन शाळांवर देखरेख करण्याच्या कामी त्यावेळचे विद्‌वान गृहस्थ सदाशिव काशीनाथ छत्रे व जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांची नेमणूक करण्यात आली. त्यांनी बाहेरगावांहून आपल्या ओळखीच्या तरुण मुलांना मुंबईत शिक्षणासाठी आणले, त्यात बाळशास्त्रीही होते.

बाळशास्त्री जात्याच उद्योगी व बुद्धिमान असल्याने, सर्व विद्यार्थ्यांत ते अग्रगण्य असत. भाषाज्ञान, गणित, इतिहास यांमध्ये त्यांनी चांगलेच प्राविण्य संपादले. पदार्थ विज्ञान, ज्योतिषशास्त्र, मानसशास्त्र, भूगर्भशास्त्र इ. विषय त्यांना फार आवडत. अत्यंत क्लिष्ट ग्रंथ वाचूनही त्यांत त्यांनी यशस्विता संपादली. मराठी, संस्कृत, इंग्रजी या भाषांबरोबरच त्यांनी तेरा भाषा आत्मसात केल्या. त्यामुळेच त्यांना एल्फिन्स्टन कॉलेजमधील प्रोफेसर पद चालून आले. महाराष्ट्रातील ते पहिले प्रोफेसर होते. तसेच बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सेक्रेटरीपदी, अक्कलकोटच्या युवराजाचे शिक्षक, गणित व ज्योतिषशास्त्राचे ॲक्टिंग प्रोफेसर आणि शेवटी 'जस्टिस ऑफ द पीस' अशी अत्यंत मानाची स्थाने त्यांनी भूषविली. त्यांनी बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या साहाय्याने अध्यापक वर्गाची स्थापना केली. अत्यल्प आयुमर्यादेत नानाविध सार्वजनिक जबाबदारीची कार्ये उत्तमरित्या सांभाळून त्यांनी विपुल ग्रंथरचना केली व मराठी गद्याच्या प्रारंभकाळी प्रचंड कामगिरी घडवून आणली.

पाश्चात्त्यांच्या संपर्काने आधुनिक विद्येशी संपर्क येऊन हिंदुस्थानी लोकांमध्ये जागृती झाली. वृत्तपत्राच्या अनुषंगाने स्वमतप्रकटन, ज्ञानदान, विचारस्वातंत्र्य, अन्यायाला वाचा फोडणे, जनतेचे प्रबोधन करून देशाला प्रगतिपथावर नेणे हे वृत्तपत्राचे सामर्थ्य एतद्देशियांच्या लक्षात येऊ लागले. नियतकालिकांच्या प्रचाराला मुद्रणसंस्थेने अधिक हातभार लावला. पाश्चात्त्य लोक इथे आले नसते, तर वृत्तपत्रे सुरू झाली नसती, असे म्हणता येत नाही, तर त्यांच्यामुळेच हिंदुस्थानात ती लवकर आली असे म्हटले, तर ते संयुक्तिक ठरेल.

२९ जानेवारी, १७८० रोजी जेम्स ऑगस्टस हिकी याने हिंदुस्थानातील पहिले वृत्तपत्र 'बेंगॉल गॅझेट' तथा 'कलकत्ता जनरल ॲडव्हर्टायझर' या नावाने सुरू केले. 'हिकीज गॅझेट' नावाने ते प्रसिद्ध आहे. कलकत्त्यामध्ये वृत्तपत्रसृष्टीचा पाया रोवणाऱ्या हिकीच्या प्रयत्नाने कलकत्ता, मद्रास, मुंबई येथेही वृत्तपत्रे निघू लागली. मुंबईतील पहिले वृत्तपत्र 'बाँबे हेरॉल्ड' १७८९ साली निघाले. प्रारंभीची वृत्तपत्रे ही इंग्रजी भाषेतील होती. शिक्षणाने वाचकवर्ग तयार झाल्यानंतर, म्हणजे ४० वर्षांनी विविध

भाषेतील हिंदुस्थानी वृत्तपत्रे निघू लागली. 'फर्दुनजी मर्झबान' या पारशी गृहस्थाने १८२२ साली 'मुंबईना समाचार' हे पारशी वृत्तपत्र सुरू केले. त्यावेळी मुंबई हे मराठी भाषिकांचे मोठे शहर असल्यामुळे मुंबईत गुजराती वृत्तपत्र निघाल्यावर लगेचच मराठी वृत्तपत्र निघाले. मुंबईत वृत्तपत्रास आवश्यक ते वातावरण व आधुनिकता असल्यामुळे नवे विचार समजून घेण्याची मानसिकता तेथे निर्माण झाली होती.

मराठी भाषेतील पहिल्या वृत्तपत्राचा मान आचार्य बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' वृत्तपत्राला दिला जातो. तथापि, 'दर्पण'च्या अगोदर एक मराठी वृत्तपत्र 'मुंबापूर वर्तमान' अस्तित्वात असल्याचा पुरावा मात्र मिळतो. २० जुलै, १८२८ रोजी त्याचा पहिला अंक निघाला होता. परंतु, त्याचा चालक कोण व ते किती काळ चालले, याचा पत्ता लागत नाही. २३ जुलै, १८२८ च्या बाँबे गॅझेटमध्ये 'एक विक्षिप्त' यांच्या लेखावरून त्याची माहिती मिळते. परंतु, 'मुंबापूर वर्तमान' या वृत्तपत्राला आद्य मराठी वृत्तपत्र म्हणावे, असा पुरावा सापडत नाही. म्हणून कालानुक्रमे 'दर्पण' हेच आद्य वृत्तपत्र आहे.

बाळशास्त्रींनी 'दर्पण' हे नाव जाणीवपूर्वक योजले असावे. 'दर्पण'मध्ये इंग्रजी व मराठी मजकूर देण्याची पद्धती होती. त्यामुळे 'समाचार दर्पण' या वृत्तपत्रावरून 'दर्पण' हे नाव सुचले असावे. 'दर्पण'चा पहिला अंक ६ जानेवारी, १८३२ रोजी निघाला. वृत्तपत्राचा आकार १९ X ११ इंच असून, त्याची आठ पाने होती. पानातील दोन स्तंभापैकी डावीकडे इंग्रजी व उजवीकडे मराठी मजकूर असे. त्रैमासिक वर्गणी रु. ६ होती. खपाची संख्या मात्र ३०० च्या वर गेली होती. 'दर्पण' काही महिने पाक्षिक होते. पण, अनेक विषय पंधरा दिवसांनी लिहायचे म्हणजे शिळे होत, म्हणून त्याचे साप्ताहिकात रूपांतर केले. बाळशास्त्रींबरोबर दर्पणचे काम रघुनाथ हरिश्चंद्रजी, वासुदेव जनार्दनजी पाहात असत. आर्थिक स्थिती बेताची असल्यामुळे ते साडेआठ वर्षे चालले व १ जुलै, १९४० पासून ते बंद केले. समर्थ अशी व्यावसायिक पाठराखण नसल्यामुळे ते बंद करावे लागले.

बाळशास्त्री जांभेकरांची अष्टपैलू बुद्धिमत्ता, समाजोद्धाराची दृष्टी आणि स्वदेशोन्नतीची आत्यंतिक कळकळ, त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक अशा विविध क्षेत्रांतील त्यांनी केलेल्या लेखनावरून स्पष्ट होते. जीवनविकासाचे आणि सामाजिक उन्नतीचे प्रमुख साधन म्हणजे शिक्षण, समाजाचा मुलभूत व आद्य प्रश्न जो शिक्षण, त्याच्या प्रवर्तक संस्थेपासूनच बाळशास्त्रींच्या आयुष्याचा प्रारंभ झाला. समाजजागृती आणि शिक्षणप्रसार यांसाठीच तर त्यांनी 'दर्पण'पत्राची

निर्मिती केली. पाश्चात्त्य विद्यांचा, नव्या ज्ञानाचा लोकांना परिचय करून द्यावा व त्यायोगे प्रबोधन करावे, देशाची उन्नती आणि कल्याण व्हावे या हेतूनेच बाळशास्त्र्यांनी लेखन केले. वृत्तपत्रांचा प्रसार फारसा झाला नसल्यामुळे बातम्यांपेक्षा लोकांना काहीतरी सांगण्याला, समजावून देण्याला, नव्या विचारांचे बिजारोपण करण्याला अधिक महत्त्व होते. जनता जुनी होती; पण राजवट नवी होती. तिने प्रज्वलित केलेले शिक्षण, कायदेकानून नवीन होते. म्हणून जनतेला मार्गदर्शनाची आवश्यकता होती. नियतकालिकाचा प्रकार आपल्याकडे नवीन असल्यामुळे त्याचे स्वरूप, पद्धती आणि सामर्थ्य यांची एत्द्देशियांना कल्पना यावी यासाठी ६ जानेवारी, १८३२ च्या पहिल्याच अंकात बाळशास्त्र्यांनी लिहिले होते, ''ज्या देशातून आपले सांप्रतचे शककर्ते एथे आले, त्या देशात ते एथे आल्याचे पूर्वी फार दिवसांपासून या आश्चर्यकारक छापयंत्राची कृत्ये चालू होती, त्यांपासून मनुष्यांचे मनांतील अज्ञानरूप अंधकार जाऊन त्यावर ज्ञानरूप प्रकाश पडला. ज्या ज्या देशांमध्ये अशा लेखांचा प्रसार झाला आहे, तेथे तेथे लोकांचे अंतर व्यवहारांमध्ये; तसेच बाह्यव्यवहारांमध्ये शाश्वत हित झाले आहें. यांपासून बहुत वेळ विद्यांची वृद्धि झाली आहे. लोकांमध्ये नीति रूपास आली आहे. केव्हा केव्हा प्रजांना राजाचे आज्ञेत वर्तावे आणि राजानीही त्यांवर जुलूम करू नये अशा गोष्टी यांपासून घडल्या आहेत. अलिकडे कित्येक देशांत धर्मनीति आणि राज्यनिती यांत जे चांगले आणि उपयोगी फेरफार झाले आहेत, त्यांसही थोडेबहुत हे लेख उपयोगी पडले आहेत.''

नियतकालिक हे ज्ञानप्रसाराचे अमोघ साधन आहे. त्यामुळे लोकांमध्ये आचारसंहिता वाढण्यासाठी, व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यासाठी, राजांच्या अन्यायाला पायबंध घालून जनतेचे कल्याण करण्यासाठी, विद्येच्या वृद्धीसाठी आणि समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी नियतकालिक उपयुक्त आहे, असे बाळशास्त्र्यांचे मत होते. 'लोकस्थिती, धर्मरीती आणि उपयोगी फेरफार घडवून आणणे', हे नियतकालिकांचे कर्तव्य आहे, अशी त्यांची धारणा होती. पाश्चात्त्य राष्ट्रांत नियतकालिकांनी बजावलेली भूमिका आणि बंगाल प्रांतात पाश्चात्त्य विद्येच्या व नियतकालिकांच्या योगाने झालेली जागृती बाळशास्त्र्यांच्या नजरेसमोर होती. म्हणूनच त्यांनी वृत्तपत्रनिर्मितीला महत्त्व दिले.

त्यावेळी पुस्तकांचा, वृत्तपत्रांचा आणि शाळांचा प्रसार झालेला नसल्यामुळे अल्प किंमतीत वृत्तपत्र देऊन, जी काही वाचणारी मंडळी आहेत, त्यांचा व त्यायोगे समाजाचे मतपरिवर्तन करण्याचा आणि त्यांना शिक्षणाभिमुख बनविण्याचा बाळशास्त्र्यांचा प्रयत्न होता. 'दर्पण'कार विद्याविषयक विचार पटवून देत असताना, मोठमोठ्या

विद्वानांची मते, त्यांच्या वक्तव्याचे दाखले देतात. 'विद्या हे बळ आहे' या लॉर्ड बेकनच्या उद्गारांचेच आपल्या लेखाला बाळशास्त्र्यांनी शीर्षक दिले आहे. ''विद्येच्या योगाने पाश्चात्त्यांनी खूप प्रगती केली. भौतिक विद्या आणि कलाकौशल्य यांमुळे त्यांची भरभराट झाली. आम्ही मात्र विद्या ही फक्त धर्माच्या उपयोगी आहे, असे समजून इतिहास, भूगोल, विज्ञान याकडे दुर्लक्ष केले. म्हणूनच आपली दुर्दशा झाली. आपल्यातील दोष काढून उन्नतीचे मार्ग शोधावेत'', असे त्यांनी लिहिले. बाळशास्त्र्यांनी एकूण शिक्षणालाच अनुलक्षून 'विद्या' हा शब्दप्रयोग केला होता. त्यामध्ये भूगोल, इतिहास, विज्ञान, भाषा आणि साहित्य इत्यादींचा समावेश होतो.

कलकत्त्यातील 'रिफॉर्मर' वृत्तपत्रातून विद्याविषयक स्पष्ट केलेले संपादकांचे मतही जांभेकरांनी 'दर्पण' मधून उद्धृत केले आहे. ''विलायतेतील ज्या चमत्कारिक यंत्रांनी द्रव्य मिळण्यास उपाय बहुत झाले आहेत, त्या यंत्रांस मूळ कलाकौशल्यांची वृद्धि, विलायतेसारिखे लहान आणि दूर देशचे लोकांनी येऊन विलायतेपेक्षाही मनुष्याचे संपत्तीविषयी चांगले हे राज्य घेतले आणि रक्षण केले, हे सामर्थ्य त्यांस विद्येने आले नव्हे? बरे असेच हिंदुस्थानचे लोक पुढे कोणत्या वेळेस विलायत घेतील? विलायत देश या देशापेक्षा, आणि दुसरे बहुत देशांपेक्षा श्रेष्ठता पावला आहे याचे कारण विद्येचे सामर्थ्य नव्हे काय?''

एतद्देशियांच्या मनात ज्ञानलालसा निर्माण व्हावी यासाठी बाळशास्त्री लिहितात, ''युरोपियन लोक असे विद्या व मनुष्याचे ज्ञान वाढविण्यासाठी आपली घरे सोडतात, समुद्रातून हजारो कोस जातात, परदेशच्या जमिनी शोधितात, स्वेच्छेने वियोग सोशितात व आपण संकटात पडतात असे जेव्हा आमचे दृष्टीस पडते, तेव्हा ज्ञानासाठीच त्यांना ईर्षा येते. त्यांचे परोपकारार्थ विद्या वाढविण्याचे उद्योग आणि नवे नवे शोध व युक्ति काढून मनुष्याचे सामर्थ्य वाढविण्याचे उद्योग चालतील असें करतात.'' एतद्देशियांचे मनोधैर्य वाढवून पाश्चात्त्य लोकांचे अनुकरण त्यांनी करावे, हाच बाळशास्त्र्यांचा उदात्त दृष्टिकोन होता.

बाळशास्त्र्यांनी 'दर्पण'मधून शिक्षणालाच अधिक महत्त्व दिले. त्या काळात नुकतीच शाळांची निर्मिती होत होती. बाकावर बसणे हे महापातक समजले जाई. मुले इंग्रजी शाळेत गेली, तर ख्रिस्ती बनतील हा गैरसमज होता. या काळात जनताच अडाणी होती असे नव्हे, तर विद्वान माणसेही प्रतिगामी आणि अनुदार वृत्तीची होती. शिक्षण म्हणजे काय असते, हे माहीत नसणाऱ्या अडाणी लोकांना समजावून

सांगणे गरजेचे होते. सामाजिक उन्नतीचे आणि व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचे साधन म्हणजे शिक्षण आहे, हे त्यांनी पटवून देण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिशांच्या उदार धोरणामुळे हिंदुस्थानात शाळा निघत होत्या, हे चित्र जांभेकरांच्या दृष्टीने उत्साहवर्धक होते. म्हणून शिक्षणाच्या चळवळीला धनिक लोकांनी आर्थिक साहाय्य करावे, यासाठी त्यांनी 'दर्पण'मधून आवाहनही केले होते. जग खूप मोठे आहे. इंग्रजी शिक्षण ही त्या जगाकडे पाहण्याची खिडकी आहे. तेव्हा इंग्रजी शिक्षण आत्मसात करा, असे सांगून समाजाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू हा शिक्षक आहे. त्यामुळे चांगली माणसे घडविण्यासाठी, नीतिमत्ता सुधारण्यासाठी देशाला प्रगतिपथावर नेण्यासाठी त्यांनी 'नॉर्मल स्कूलची' स्थापना केली.

हिंदुस्थानात त्याकाळी होत असलेल्या शैक्षणिक चळवळींचा आणि घडामोडींचा तपशील जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न 'दर्पण'ने केला. ठिकठिकाणी निघत असलेल्या शाळांची माहिती, सरकारकडून येणारे हुकूम व इतर शैक्षणिक वृत्तांत, खास करून 'दर्पण'मध्ये असत. ज्यावेळी सरकारकडून शिक्षणसंस्थांना मिळणारा पैसा कमी करण्यात आला, त्यावेळी जांभेकरांनी ते वृत्त आकडेवारीसह छापून नापसंती व्यक्त केली. मुंबईतील रिक्षा मंडळातील युरोपियन मुख्य पंतोजीस पगार न देता, त्यास नोकरीवरून कमी केले, तेव्हा आपला खेद आणि निषेध बाळशास्त्र्यांनी व्यक्त केला. त्या काळात ब्रिटिश सरकारवर टीका करणे किती अवघड होते? पण, जेथे प्रसंग पडला, तेथे मोठ्या भारदस्तपणे आणि प्रतिष्ठित भाषेत सरकारवर टीका करण्यास बाळशास्त्री मुळीच घाबरले नाहीत.

पाश्चात्त्य लोकांची जिज्ञासू वृत्ती, संशोधक दृष्टी, धाडस आणि ज्ञानलालसा एतद्देशियांनी घ्यावी आणि त्या देशांसारखे आपणही प्रगतिपथावर पोहोचावे, असे बाळशास्त्र्यांना वाटत होते. पाश्चात्त्य देशांत लागलेले शोध, प्रगत झालेले विज्ञान यांची जाणीव करून देण्याचा प्रयत्न 'दर्पण'कारांनी केला. छापखान्यांची माहिती आणि त्याचे फायदे, आणि त्यावेळी नुकत्याच सुरू झालेल्या वाफेच्या इंजिनाविषयीही त्यांनी स्वतंत्रपणे माहिती करून दिली. 'दर्पण'कारांच्या सूक्ष्म-संशोधक दृष्टीचे आकलन पुढील उताऱ्यावरून लक्षात येईल. ''इकडे मनुष्याच्याने जितके श्रम होतात तितके करून विद्वान ईश्वराचे कृत्यांचे गुन्ह्यांचा शोध करायास यत्न करितो, अंतरिक्षांतील जडांच्या गती ज्या नियमांप्रमाणे चालतात, ते नियम शोधून काढितो, विचार करून आणि अनुभव घेऊन तो सभोवतालच्या सृष्टीतील पदार्थातील कारणे आणि गुण समजतो, जे समजले म्हणजे तो आपले ज्ञान मनुष्याचे कल्याण करण्याचे उपयोगास लावितो, आणि सृष्टीतील मुलभूतेही त्या कामाला आणितो.''

एतद्देशिय लोक अफाट विश्वातील गुढांकडे लक्ष देत नाहीत. पाश्चात्त्य लोक मात्र त्यांचे संशोधन करतात. आपले दुबळेपण घालवून, आपणही विद्याभिलाषी बनून संशोधनक्षेत्राकडे वळावे, असे ते आवाहन करतात. बाळशास्त्र्यांचा दृष्टिकोन काळाच्या मानाने विशाल आणि अत्यंत प्रगल्भ होता, यात वादच नाही.

'दर्पण'मधून बाळशास्त्री जांभेकरांनी सामाजिक उन्नतीच्या दृष्टीने चौफेर लेखन केले. समाजातील दुष्ट चालीरीती, प्रचलित रूढी-परंपरा, ढोंगी प्रवृत्ती, अनिष्ट प्रथांवर आपली लेखणी चालवली. अंधश्रद्ध समाजाला पाश्चात्त्य ज्ञानाची, विज्ञानाची जाणीव करून देणे, भोळ्या समजुतींवरील विश्वास घातक आहे, हे समजावून देणे, समाजाची नीतिमत्ता सुधारून त्यांना सुसंस्कारित करून प्रगतिपथाकडे नेणे अशाच कामी 'दर्पण'ने पुढाकार घेतला. आपले मागासलेपण आणि पाश्चात्त्यांचे पुढारलेपण दाखवून दिले. हा समाजसुधारणेचा पहिलाच प्रयत्न होता. त्यामुळे 'दर्पण'च्या मार्गात अनंत अडचणी आल्या. परंतु, 'दर्पण' कोणाचे मिंधे नव्हते. समाजप्रबोधनाची कास त्याने अंगीकारली होती. या मार्गात येणाऱ्या सनातन्यांवरच नव्हे, तर सरकारवरही त्यांनी टीकास्त्र सोडले.

हिंदुस्थानात पुणे, मुंबई, सुरत यांसारख्या मोठ्या शहरांत त्या काळात 'नाच, तमाशासारख्या गुलामगिरी'च्या अनिष्ट प्रथा बोकाळल्या होत्या. खुद्द श्रीमंत लोकांनीच त्यांना आश्रय दिला होता. अशा या शौकीन, हौशी आणि अविचारी लोकांची निंदा करून वाईट चालीविरुद्ध बाळशास्त्र्यांनी आवाज उठविला. अशा नाच, तमाशांमध्ये विधवा स्त्रियांचा गैरफायदा घेऊन, निष्पाप अजाण गरीब मुलींना चोरून आणून यामध्ये ढकलले जाते व त्यांना शेवटी वाममार्गाला लावून धनिक लोक त्यांचा उपभोग घेतात. कारण, स्त्रियांना अशा कामी प्रवृत्त करणे म्हणजे गुलामगिरीत ढकलणे होय. समाजामध्ये चांगल्या चालीरीती चालू ठेवाव्यात, हे शहाणपणाचे लक्षण आहे; पण वाईट प्रथा पाडून त्या विकोपास घालवून आणि अघोरी निंद्य प्रकाराला चालना देणे, हे अमानवीपणाचे लक्षण आहे, असे त्यांनी सांगितले.

समाजसुधारणेचे व्रत स्वत:पासून सुरू केले तरच समाजसुधारणा शक्य आहे, अशी बाळशास्त्र्यांची धारणा होती. अशा दुष्ट चालीरीतींच्या मुळाशी जाऊन शोध घेण्याची वृत्तीही त्यांच्याकडे होती. गिरगावात एक कोंबडा माणसासारखे बोलतो आणि भविष्य सांगतो, अशी अफवा उठली होती. बाळशास्त्रींनी त्याचा स्वत: शोध घेऊन त्यातील फोलपणा जनतेच्या निदर्शनास आणला. मुंबईतील उमडीबाबाची भोंदूगिरी, ईश्वरी सामर्थ्याने चमत्कारातील भोंगळपणा, पोटासाठी लोकांनी चालवलेले

लबाड व धूर्त उद्योग यांचा त्यांनी समाचार घेतला. त्या काळात समुद्रपर्यटन करणे म्हणजे धर्म बुडविणे असा समज होता. एका ब्राह्मणाकडून समुद्रपर्यटन व्हावे ही आश्चर्याची, कौतुकाची बाब होती. बाळशास्त्र्यांनी त्यांचे कौतुक केले. त्या काळाचा विचार केल्यास, जनता अज्ञानाच्या अंधकारात एवढी बुडाली होती की, ती सहजासहजी बाहेर येणार नव्हती. तरीसुद्धा जांभेकरांनी ज्ञानाची, विज्ञानाची, पाश्चात्त्य राष्ट्रांची उदाहरणे देऊन समाजाला अंधविश्वासाच्या भोवऱ्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. बाळशास्त्री जांभेकरांना भविष्यकाळाच्या उज्ज्वल भवितव्याचे वेध लागले होते. म्हणूनच येथील दुष्ट चालीरीती, प्रथा, अंधश्रद्धा यांवर त्यांनी हल्ला चढवला.

बाळशास्त्री जांभेकर हे अभ्यासू व कर्तव्यदक्ष पत्रकार होते. जगात आणि आपल्या देशात काय चालले आहे, याचे भान लोकांना करून देणे त्यांनी महत्त्वाचे मानले. आज खेड्यापाड्यात बँकांची जाळी पसरली आहेत; पण त्याकाळी बँकेचे महत्त्व पटून आपल्या प्रांतातील लोकांच्या कल्याणासाठी बँकांची अपेक्षा करण्याबद्दल वृत्तपत्रातून सांगणारे बाळशास्त्री हे एकमेव म्हणावे लागतील. मद्रास व कलकत्ता येथे निघालेल्या पतपेढ्यांची सविस्तर माहिती देऊन, असे उपक्रम आपल्या मुंबई प्रांतात सुरू व्हावेत, असा बाळशास्त्र्यांचा प्रयत्न होता. व्यापाराचे महत्त्वही त्यांना पटले होते. ''व्यापार उद्योगामुळे लोकांना काम मिळेल, उत्पन्नात भर पडून राहणीमान उंचावेल आणि देशाची आर्थिक स्थिती भक्कम होईल'', असे त्यांनी लिहिले. व्यापाऱ्यांच्या मालावर सरकारने जेव्हा जकात आकारली, तेव्हा बाळशास्त्र्यांनी त्याविरुद्ध आवाज उठविला. विलायतचा माल जकातरहित व हिंदुस्थानी लोकांच्या मालावर प्रत्येक नाक्यावर जकात कर आकारला जातो, या दुटप्पी धोरणाचा समाचार बाळशास्त्र्यांनी घेतला. व्यापार वाढविणे, उद्योग वाढविणे, पडीक जमिनी लागवडीखाली आणणे आणि अर्थ मिळविणे व त्यातून देशहित साधणे यासाठी त्यांनी प्रसंगी सरकारवरही टीका केली व एतद्देशियांना उद्युक्त केले.

इंग्रजी राज्याबरोबर इंग्रजी शिक्षण आले; पण याच शिक्षणाचे बोट धरून इंग्रजांचा धर्म आणि संस्कृतीही येऊ लागली. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी सुरू केलेल्या धर्मप्रसारामुळे त्या काळात धर्मांतराचे मोठे संकट हिंदू समाजावर आले. धर्माकडे पाहण्याची बाळशास्त्र्यांची दृष्टी फार विशाल आणि संग्राहक होती. पाश्चात्त्य ज्ञानाचे आणि विज्ञानाचे ते कट्टे पुरस्कर्ते होते. पण, त्याचबरोबर हिंदू धर्माचा आणि संस्कृतीचा त्यांना प्रखर अभिमान होता. मात्र, या धर्माभिमानाला उदार भावनेची जोड मिळायला हवी, अशी त्यांची भूमिका होती. 'दर्पण'मध्ये धर्मांतराची बातमी ते अगदी कटाक्षाने देत. धर्मांतर केलेल्या

व्यक्तीचे स्वभावविशेष, व्यक्तिमत्त्व आणि त्यांची परिस्थिती यांचेसुद्धा वर्णन केले जाई. श्रीपाद शेषाद्री, गिरमाजी आप्पा, कलकत्त्यामधील बाबू कृष्णा मोहन बानरजी यांनी हिंदू धर्मातून ख्रिस्ती धर्मात प्रवेश केल्याच्या बातम्या छापल्या. श्रीपाद शेषाद्री याला ख्रिस्ती धर्मातून पुन्हा हिंदू धर्मात घेण्यासाठी सनातनी विरुद्ध बाळशास्त्री, असे दोन तट पडून हे प्रकरण खूपच चिघळले. बाळशास्त्र्यांवर त्यावेळी बहिष्कार टाकण्यात आला. आपल्या समाजात फूट पडू नये, यासाठी बाळशास्त्र्यांनी माघार घेतली.

धर्मांतराच्या प्रकरणांना आणि धार्मिक वादांना बाळशास्त्र्यांनी 'दर्पण'मध्ये खूपच स्थान दिले आहे. एकमेकांच्या धर्मग्रंथातील दोष दाखवून व आपल्या धर्मग्रंथांचे समर्थन करून आपलाच धर्म कसा श्रेष्ठ, हे पटवून देण्याच्या कार्याला ऊत आला होता. ग्रंथाचे परीक्षण, गुणदोष दाखवणे, धर्मग्रंथांची माहिती वाचकांपर्यंत पोहचवणे, वाचकांच्या आलेल्या प्रतिक्रियांनाही 'दर्पण'मध्ये त्यांनी स्थान दिले आहे. परमेश्वराचे अस्तित्व आहे की नाही ? पाप, पुण्य, जातिभेद कुणी निर्माण केले ? मूर्तिपूजा योग्य की अयोग्य ? यासंबंधाने हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्मांच्या अनुषंगाने 'दर्पण'मधील वाचकांनी पत्रे लिहून आणि बाळशास्त्र्यांनी ती छापून अक्षरश: धर्मविषयक मतांचा कीस पाडला आहे. हिंदू धर्माच्या चळवळीत 'दर्पण' वृत्तपत्राने नि:संशय मोठी कामगिरी केली आहे. या चळवळीतून हिंदू धर्माचे खरे स्वरूप बाहेर पडले. जिथे दोष असतील, तेथे प्रहार आणि जे योग्य असेल, त्याचा पुरस्कार ही वृत्ती 'दर्पण'ने प्रथमपासूनच जोपासली होती.

ज्यावेळी देशात ठकांचा, गुंडांचा सुळसुळाट वाढून, त्यांच्या निर्दयी कृत्यांना ऊत आला, त्यावेळी 'दर्पण'ने ही वृत्ते जनतेपर्यंत पोहचवली. गुन्हेगारी प्रवृत्तीचे ठक लोक निर्दयी, क्रूर असून, त्यांनी शेकडो लोकांना, वाटसरूंना ठार केले. अशा ठकांना ब्राह्मण, सरदार आश्रय देतात. सरकारने या ठकांचा बंदोबस्त करावा व जनतेला अभय द्यावे, मुंबईतील चोरांच्या टोळीचा प्रमुख पट्टावाग सोनार याला जन्मठेपेची शिक्षा होऊन त्याला काळ्या पाण्यावर पाठवले होते; पण तो तेथून पळून आला. त्याला मुंबईतील कित्येक लोकांनी पाहिले होते. म्हणूनच 'दर्पण'ने बातमी छापली. अशा क्रूर गुन्हेगारास पकडण्यासाठी सरकारने काहीच प्रयत्न केले नाहीत, याबद्दल बाळशास्त्र्यांनी टीका केली होती. सरकारी नोकरांच्या, अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेवर टीका करणे, लाचलुचपत, लांडीलबाडी यांवर टीकास्त्र सोडणे, अधिकाऱ्यांच्यावर बारीक लक्ष ठेवून त्यांच्या अधिकाराचा गैरवापर होऊ न देणे, अशा स्वरूपाचे कार्य 'दर्पण'कारांनी केले.

बाळशास्त्री हे जागरूक संपादक असल्यामुळे मुंबई प्रांतातील सर्वच समस्यांची जाण त्यांना होती. कलकत्त्यामधील वृत्तपत्रांमध्ये 'सरकारने शेतकऱ्यांना वीस हजार रुपयांची मदत करून कापूस, तंबाखू, रेशीम यांसारखी पिके काढणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षीस देण्याचे ठरविले आहे', अशी बातमी आली होती. हे वृत्त 'दर्पण'च्या निर्मितीनंतरच्या दुसऱ्याच अंकात २० जानेवारी, १८३२ च्या अंकात देऊन त्यांनी मुंबई इलाख्यातील शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी आवाज उठविला. शेतकऱ्यांचे होणारे हाल, सरकारची शेतकऱ्यांकडे पाहण्याची उदासीनता, शेतकऱ्यांनी पैसा मिळवून देणारी पीके घ्यावीत, नवे शेतीज्ञान आत्मसात करून, प्रसंगी अमेरिकेतील तंबाखू व मॉरिशस येथील कापसाचे बियाणे सरकार शेतकऱ्यांना मोफत वाटप करते आहे. शिवाय, सरकारने कापूस साफ करण्याची यंत्रे आणली आहेत, अशी माहितीही छापली. हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतीमध्ये प्रगती झाली पाहिजे, शास्त्रशुद्ध शेती करून आर्थिक उत्पादन देणाऱ्या पिकांना अग्रक्रम दिला पाहिजे, असे 'दर्पण'ने लिहिले.

'दर्पण'मध्ये सामाजिक अशा ज्वलंत प्रश्नांना अधिक महत्त्व दिलेले आढळते. सामाजिक समस्यांचा ऊहापोह करून, नव्या विचारांचा प्रसार करणे, चर्चा घडवून आणणे, वाचकांना या प्रश्नांवर पत्रे लिहिण्यास उद्युक्त करणे व ती अग्रक्रमाने छापणे या बाबतीत दर्पणकार कटाक्षाने लक्ष देत. तत्कालीन जातिभेदाचा प्रश्न, स्त्रीशिक्षणासाठी प्रयत्न, स्त्री-पुरुष समान हक्क, दुष्ट चालीरीतींवर हल्ला, विधवांच्या समस्येवर तोडगा, पुनर्विवाह अशा नानाविध विषयांवर 'दर्पण'मधून मन्वंतर घडल्याचे दिसून येते. यावरून तत्कालीन समाजमन आणि एकंदरीत सामाजिक परिस्थितीचे भानही लक्षात येते. सुधारकांचा सुधारक दृष्टिकोन कसा प्रबळ होत गेला आणि हिंदुस्थानातील सामाजिक परिस्थितीमध्ये बदल कसे कसे होत गेले याचे प्रत्यंतर इथल्या वाचकांच्या पत्रव्यवहारावरून दिसून येते. हिंदुस्थानी लोक आणि पाश्चात्त्य राज्यकर्ते यांच्या प्रयत्नांतून घडून येणारा नवा समाज आणि त्या विषयीचे जनतेचे मतप्रदर्शन या पत्रव्यवहारातून स्पष्ट होते.

तत्कालीन समाजातील भेडसावणारे प्रश्न, समाजाच्या गरजा आणि भविष्याचा मार्ग सुकर व्हावा यासाठी बाळशास्त्री जांभेकरांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून केलेले लेखन उपयुक्त ठरलेले आहे. वरील विषयाबरोबर 'एतद्देशियांना उच्चाधिकार हवे' या माध्यमातून 'जस्टिस ऑफ पीस' या पदवीसंदर्भात सरकारचा दुटप्पीपणा आणि दर्पणकारांचे परखड मतप्रदर्शन 'दर्पण'मधून प्रसिद्ध झाले होते. जगन्नाथजी शंकरशेट यांना मॅजिस्ट्रेट म्हणून नेमलेले पाहून, जांभेकरांनी व्यक्त केलेला आनंद वाखाणण्याजोगा

आहे. सरकारने हिंदुस्थानी लोकांच्या वरिष्ठ जागांवर नेमणुका केल्याने, आम्ही कुठेतरी कमी आहोत, हा न्यूनगंड जाऊन आत्मविश्वास वाढीस लागला. हक्कासाठी संघर्ष करण्याची धाडसी वृत्ती बाळशास्त्र्यांनी महाराष्ट्राला घालून दिली.

बाळशास्त्र्यांनी विद्येला महत्त्व दिले होतेच. तत्कालिन जे विविध ग्रंथ प्रकाशित होत, त्याची माहिती व रसभरीत वर्णने, ग्रंथकारांचा गौरव आणि वाचकांनी तो वाचावा असे आवाहन केल्याचे 'दर्पण'मधून दिसून येते. 'दर्पण'ने ग्रंथचळवळीला मदतच केली आहे.

'दर्पण'कारांनी सांस्कृतिक घडामोडींनाही स्थान दिलेले होते. कलकत्त्यामध्ये हिंदू नाटकाचे थिएटर सुरू झाल्यावर स्वागत केले व हिंदुस्थानी नाटकांची गौरवगाथा गाऊन परकीय नाटकांविषयीचे विवेचन खास करून केले आहे. मनोरंजनाची समाजाला असणारी आवश्यकताही प्रतिपादली आहे.

'दर्पण'ने राजकीय घडामोडी जनतेपर्यंत नेऊन, जनतेला काही गोष्टींची जाणीव करून दिली. इंग्लंडमध्ये पार्लमेंट आणि जनता यांच्यामध्ये झालेला संघर्ष आणि बदल पार्लमेंटचे हिंदुस्थानविषयक धोरण, ब्रिटिश अधिकाऱ्यांचे हिंदुस्थानविषयक विचार, सुधारणाविषयक पास होणारे कायदे अशा चौफेर बाजूंनी 'दर्पण'ने लिहिले. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर जगाच्या घडामोडीमध्ये होणारे बदल, फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिलेली देणगी म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता यांबरोबरच व्यक्तिवादाचा प्रभावी पुरस्कार, या सर्वांचे साद पडसाद 'दर्पण'मध्ये पाहायला मिळतात. जनतेला नेहमी जागरूक ठेवणे हा त्यांचा स्थायिभाव होता.

मोठमोठ्या विद्वान लोकांचा, साहित्यिकांचा, विचारवंतांचा परिचय करून देऊन, त्यांच्या कार्याचे गुणविशेष 'दर्पण'ने दाखवून दिले. एतद्देशियातील राजा राममोहन रॉय यांच्यासारख्या व्यक्तीवर गौरवपूर्ण लेख लिहून, त्यांचा परिचय घडवून आणला. तसेच, पुण्यातील सरकारी शाळेतील मुख्य बाळशास्त्री घगवे, चिमाजीराव आप्पासाहेब यांसारख्या व्यक्तींच्या निधनानंतर त्यांच्यावर मृत्यूलेखही लिहिले.

बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीचा श्रीगणेशा करून, दर्पण वृत्तपत्राला मानाचे स्थान मिळवून दिले. त्यातून त्यांची अष्टपैलू बुद्धिमत्ता, समाजोद्धाराची दृष्टी, स्वदेशोन्नतीची तळमळ आणि प्रगल्भ दृष्टिकोन दिसून येतो. 'दर्पण'मधील लेखनावरून समाजाच्या प्रगतीसाठी सामाजितकेचे भान ठेवून, सदैव जागरूक असलेला विचारवंत म्हणून बाळशास्त्र्यांकडे पाहिले पाहिजे.

राष्ट्रीय विचारांची ठोस बैठक त्यांच्या पाठीमागे होती. स्वातंत्र्याची जाणीव झालेला पहिलाच पुरुष म्हणजे बाळशास्त्री जांभेकर. इंग्लंडमधील स्वातंत्र्याची घटना, हिंदुस्थानी लोकांना सांगताना ते म्हणतात, ''ज्या गोष्टीपासून तेथे बरे वाईट होईल; तसेच येथे होवो.'' महात्मा फुले, लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधींच्याही अगोदर स्वातंत्र्याच्या हक्काचे प्रतिपादन करणारा, महाराष्ट्रालाच नव्हे, तर अवघ्या हिंदुस्थानाला प्रगतिपथाकडे नेण्याचे कार्य स्वत:च्या उक्तीने आणि कृतीने करणारा अग्रणी म्हणजे बाळशास्त्री जांभेकर. म्हणूनच त्यांना महाराष्ट्रातले आद्य पत्रकार, आद्य ज्ञानमहर्षी आणि आद्य समाजसुधारक म्हटले जाते. एवढेच नव्हे, तर त्यांना 'पश्चिम भारतातील नवयुगप्रवर्तक' आणि आधुनिक महाराष्ट्राचे जनक', असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये.

'दर्पणमधील लेखनाचा सामाजिक व वाङ्मयीन अभ्यास' हा एम्.फिलसाठी १९९० मध्ये शिवाजी विद्यापीठामध्ये सादर केलेला हा प्रबंध आहे. प्रस्तुत प्रबंधिकेचे मार्गदर्शक डॉ. ल. रा. नसिराबादकर यांचे अनमोल मार्गदर्शन केवळ माझ्या ह्या अभ्यासापुरतेच मर्यादित नसून ते मला शिक्षण क्षेत्रात यशोमंदिराकडे जाण्यास उपयुक्त ठरले आहे. नंतरच्या काळात संशोधन क्षेत्रामध्ये कार्य करण्यास गुरुवर्य डॉ. प्रकाश कुंभार, मित्र डॉ. अनिल गवळी यांचे सहकार्यही मोठेच आहे. माझ्या शिव-शाहू शिक्षण परिवाराचे आधारस्तंभ मा. बाबासाहेब पाटील, प्राचार्य आय. बी. तांबोळी, डॉ. पी. बी. पाटील, डॉ. जी. बी. पाटील यांचे प्रोत्साहन मला सदैव लाभले आहे. हा ग्रंथ प्रकाशित व्हावा यासाठी डॉ. सुनिलकुमार लवटे आणि डॉ. राजन गवस तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांचे सहकार्य महत्त्वाचे आहे.

माझ्या कर्तृत्वाला भरारी देणारी माझी आई अनुसया आज हयात नाही. ही वेदना सदैव ऊरात आहेच. आईबरोबर स्वत: अपार कष्ट करून माझे कर्तृत्व फुलवणारे माझे ज्येष्ठ बंधू केरबा आणि ॲड. अरुण यांचा त्याग मजसाठी आयुष्याचा ठेवा आहे. माझी बहीण कै. शांताबाई, वहिणी सौ. शालिनी, सौ. मिनाक्षी यांचे प्रेम आणि कष्टही माझ्या पाठीशी आहेत. मला सदैव प्रोत्साहित करणारी माझी कष्टाळू पत्नी सौभाग्यवती विद्या आणि माझा मुलगा चिरंजीव पृथ्वीराज यांचाही माझ्या यशात मोलाचा वाटा आहे.

**प्रा. (डॉ.) शिवकुमार सोनाळकर**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| निवेदन | .. | पाच |
| प्रस्तावना | .. | सात |
| एकोणीसावे शतक : समाज आणि नियतकालिके | .. | १ |
| बाळशास्त्री जांभेकर | .. | १५ |
| दर्पण : सामाजिक अभ्यास | .. | ३६ |
| दर्पण : वाङ्मयीन अभ्यास | .. | ९३ |
| संदर्भ ग्रंथ सूची | .. | ११९ |
| संदर्भ नियतकालिक सूची | .. | १२३ |
| **लेख** | | |
| १. महाराष्ट्राचे आद्य ज्ञानमहर्षी बाळशास्त्री जांभेकर | | १२५ |
| २. स्वातंत्र्याचे अग्रणी बाळशास्त्री जांभेकर | .. | १३७ |
| ३. वृत्तपत्राची बदलती भाषा | .. | १४५ |

प्रकरण पहिले

# एकोणिसावे शतक : समाज आणि नियतकालिके

### धर्म व समाज

मध्ययुगीन हिंदुस्थानामध्ये कृषी संस्कृतीचा प्रभाव असल्यामुळे दैववाद मोठ्या प्रमाणावर रुजला होता. परंपरेने चालत आलेल्या पारलौकिकतेच्या प्रभावामुळे समाजमनात परमार्थप्रवणता दृढ झाली होती. त्यामुळे भौतिक जीवनाचे संरक्षण आणि संवर्धन याचा फारसा विचार झालेला नव्हता. तथापि ऐहिकतेचा अभावही जाणवत होता. धर्माचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे मानव व ईश्वर यांचे नाते जडणे आणि त्याचे प्रतिबिंब मानवा-मानवांच्या व्यवहारात उमटवणे. अज्ञान, अंधश्रद्धा, रुढी-परंपरा, धर्मकल्पना, अर्थजीवन, ग्रामव्यवस्था व सामाजिक व्यवहाराचे संकेत यांवर दीर्घकालपर्यंत मध्ययुगीन संस्कृतीचेच वर्चस्व राहिले. समाजात स्वधर्मनिष्ठा असली तरी समाजनिष्ठा निर्माण झाली नव्हती. कुळाची प्रतिष्ठा, जातीची शुद्धता आणि वतनाचा अभिमान याभोवतीच सारे जीवनचक्र फिरत होते. खऱ्या धार्मिकतेपेक्षा धर्मभोळेपणा, शास्त्रापेक्षा रुढीचे स्तोम, कर्मकांड, व्रतवैकल्ये, मंत्र-तंत्र, शकुनापशकुन यांवरच भर दिला जात होता. परमार्थप्रवणतेमुळे भौतिक विकासाचा विचार समाजमनात निर्माण झालेला नव्हता. इंग्रजांच्या आगमनामुळे त्यांच्या विज्ञाननिष्ठ जीवनदृष्टीमुळे इहवादी, भौतिक जीवन विकासाची जाणीव आमच्यात निर्माण झाली. सांस्कृतिक विकासाचे मार्ग मूठभर लोकांच्याच हाती असल्यामुळे सामान्य जनता अज्ञानाच्या अंधारात गुरफटली होती. उत्पादन साधने व दळणवळणाचे मार्ग फार मर्यादित होते. शेती, सैनिकी पेशा, वैदिकी व मामुली गरजा भागविणारी कारागिरी यापलीकडे अर्थार्जनाचे मार्ग उपलब्ध नव्हते. परंपरागत कृषिसंस्कृतीचा प्रभाव आणि आत्यंतिक दैववाद त्यामुळे भौतिक जीवनाचे संरक्षण आणि संवर्धन याचा फारसा विचार कुणी केलाच नव्हता.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रथम पादांत फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली होती. तिच्यातून समता, स्वातंत्र्य, बंधुता ही लोकशाहीची तीन तत्त्वे आली होती. जीवनाच्या

आर्थिक, धार्मिक, सामाजिक बाबतीत स्वतंत्र विचार सुरू झाले होते. या विचारांचा पगडा असलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांनी व्यापार, राजकारण आणि धर्मप्रसार या त्रिसूत्री धोरणाद्वारे ब्रिटिश राजवटीचा हिंदुस्थानमध्ये भरभक्कम पाया रोवला. ब्रिटिशांच्या आगमनामुळेच हिंदुस्थानातील भौतिक उन्नती आणि मानसिक परिवर्तन घडून येण्याची शक्यता निर्माण झाली. व्यापारी व राजकीय हेतूंच्या सिद्धीसाठी पाश्चात्य संस्कृतीचा हेतुत: प्रचार करणे हेही त्यांचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. त्यांनी राजकीय आक्रमण जितक्या गुप्तपणे केले, तितकेच त्यांच्या ख्रिस्ती धर्माचे सेवाधर्माच्या आश्रयाने, हिंदुस्थानात आक्रमण केले.

## ख्रिस्ती धर्मप्रसार

महाराष्ट्रात तर प्रत्यक्ष पेशवाई नष्ट होण्याच्या आधीपासूनच ठिकठिकाणी विखुरलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांनी जनमनावरील धर्मविषयक पकड ढिली करण्याचा प्रयत्न सतत चालविला होता. हिंदूंच्या अंगवळणी पडलेला धर्म म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून ब्राह्मणांनी धूर्तपणाने आपले वर्चस्व त्रैवर्णिकावर अबाधित राखण्यासाठी चालवून दिलेले एक आचारांचे रहाटगाडगेच आहे असा प्रचार त्यांनी चालविला होता. आंग्लशाहीत त्यांनी ही प्रचाराची मोहिम निकराने चालविली. हिंदूंच्या साऱ्या धर्मकल्पना म्हणजे मूर्ख व भोळसट अशा समजूतीचे एक कडबोळे असल्याचे ते उघडपणे बोलू लागले. हिंदूंचे देव, त्यांचे अवतार, त्यांची रूपे व कार्ये, त्यांची मानवी चरित्रे व दैवी सामर्थ्य इत्यादींची थट्टा उडवून असल्या मूर्खपणाने हिंदूधर्म ओतप्रोत भरला असल्याचे आता मिशनरी बोलू लागले. नाना प्रकारचे श्रृति-स्मृती पुराणोक्त आचार-व्यवहार, पूजा-अर्चा, नवससायास यांची त्यांनी भरपूर टिंगल करून घेतली. हिंदूंचा पुनर्जन्मावरील विश्वास व पाप-पुण्यासंबंधीच्या त्यांच्या कल्पना यावर देखील त्यांनी कुत्सित हल्ले चढविले. ही वैचारिक लढाई करण्यात ख्रिस्ती मिशनऱ्यांना ज्या पत्रक-पुस्तिकांचा अस्त्रासारखा उपयोग झाला ती बंगालमध्ये श्रीरामपूर मिशन्समधील छापखान्यात छापली जात असत.

इंग्रजी अमदानीमध्ये हिंदुस्थानात ज्ञानाच्या विविध क्षेत्रात जे कार्य मोठ्या जोमाने सुरू झाले, त्याची मुहूर्तमेढ १८७४ सालीच सर विल्यम् जोन्स याने कलकत्यामध्ये रोवली होती. त्याने 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' या संस्थेची स्थापना केली. हिंदुस्थानचा इतिहास, प्राचीन अवशेष, कला, शास्त्र आणि वाङ्मय इत्यादींचा

अभ्यास करणे हे या संस्थेचे सर्वात प्रमुख उद्दिष्ट होते. शास्त्रीय पद्धतीने आपल्या इतिहासाचा आणि संस्कृतमधील ज्ञानभांडाराचा अभ्यास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली ही पहिलीच संस्था होती. या संस्थेचे कार्य अनेक व्यक्तींना मार्गदर्शक ठरले. या एशियाटिक संस्थेच्या आरंभीच्या सभासदापैकी विल्यम् चेंबर्स, ग्लॅडविन्, हॅमिल्टन आणि चार्ल्स विल्किन्स यांनी संस्कृत, पारशी, बंगाली भाषेचा अभ्यास करून एतद्देशीय ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर केले. विल्किन्सनने तर फार बुद्धिचातुर्याने आणि दीर्घ परिश्रम करून संस्कृत, पर्शियन व बंगाली टाईप पाडून छपाईची सोय करून दिली. हिंदूंचे धर्मशास्त्रावरील ग्रंथही भाषांतरित केले आणि हिंदूंच्या व्यापक ज्ञानोपासनेचा परिचय पाश्चात्यांना करून दिला. बंगालमधील या इंग्रजांच्या, हिंदुस्थानातील प्राचीन इतिहासाचा, शास्त्रांचा व साहित्याचा परिश्रमपूर्वक केलेल्या व्यासंगामुळेच एकोणिसाव्या शतकात हिंदुस्थानीयांना ज्ञानसंपादन व ऐहिक संवर्धनाची प्रेरणा मिळाली हे निर्विवाद सत्य आहे.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्मपाशात अडकविण्यासाठी हिंदुस्थानीय लोकांची धर्मश्रद्धा डळमळीत करण्याचा जोरदार प्रयत्न केला. डॉ. विल्सनसारख्या विख्यात मिशनऱ्याने 'हिंदुधर्म प्रसिद्धीकरण' हा ग्रंथ लिहून हिंदू धर्मावर चौफेर हल्ले चढविले. या आकस्मिक हल्ल्यामुळे काही प्रतिपक्षी बावचळून गेले, तर काहींना ही डिवचणी उत्तर देण्यास कारणीभूत ठरली. आपल्यापाशी जी काय उपलब्ध साधनसामुग्री असेल ती घेऊन यावेळी प्रतिपक्षाला धडक दिली नाही, तर आपला धर्म हा-हा म्हणता नेस्तनाबूत होईल या विचाराने जे अस्वस्थ झाले त्यांनी आपल्या लेखण्या सरसावल्या व प्रसंग पडेल तेथे वाणीचाही वापर केला. हिंदू धर्मावरील हल्ला मुख्यत्वेकरून मिशनऱ्यांकडून झालेला असल्यामुळे साहजिकच तदनुषंगाने ख्रिस्ती धर्माविषयीही अनुकूल प्रतिकूल मत प्रकटन भरपूर झाले. पाद्री मंडळींनी ख्रिस्ती धर्माचा फारच गाजावाजा चालविल्यामुळे हिंदूधर्मासंबंधी लिहावे अशी परिस्थिती निर्माण झाली. स्वाभाविकच हिंदूधर्माचा बचाव करणाऱ्यांना, आपल्या धर्मावर जे खरे-खोटे आक्षेप घेण्यात येत होते, त्यांचे निरसन तर करावे लागलेच; पण याच्या जोडीला धर्मातही कसे दोष आहेत याचेही विवरण करावे लागत असे. स्वधर्मावर होणाऱ्या हल्ल्याला परतवून लावण्यासाठी हिंदूधर्मियांच्या लेखण्यांना ऊत आला होता. यातूनच धर्माची खरी मूल्ये काय असावीत, बदलत्या जगाप्रमाणे धर्मानेही आपली कालबाह्य झालेली

मूल्ये झिडकारून नवीन मूल्यांची कास धरावी अशा स्वरूपाचे वातावरण हिंदुस्थानामध्ये तयार होऊ लागले.

एकोणिसाव्या शतकातील सामाजिक जाणीवांचा विचार करता स्पर्शबंदी, रोटीबंदी, बालविवाह, बालाजरठविवाह, विधवांचे केशवपन अशा गंभीर प्रश्नांच्या नाना प्रकारांमुळे साऱ्या देशाला एखाद्या भल्या मोठ्या बंदीगृहाची अवकळा आली होती. समाजाच्या एकसंघतेला तडा जाऊन उच्च-नीचतेच्या निर्घृण जातिवृत्तीने सारेच पछाडले होते. दलित म्हणून काही वर्ग कायमचेच दुर्दैवी ठरले. त्यांच्या नशिबी अपमानित, पराभूत, अन्याय जगणे आले. सारी प्रजाच आर्थिकदृष्ट्या जर्जर होऊन गेली. मोठाली कुटूंबे हे भूषण वाटेनासे झाले. बालविवाहामुळे कोणत्या गैरसोयी निर्माण होतात, त्यातील धोके कोणते? त्याचा समाजस्वास्थ्यावर व कुटुंबाच्या स्थितीवर विपरीत परिणाम कसा होतो? दुष्काळ-महामारीमुळे बालमृत्यूचे वाढलेले भयावह प्रमाण व त्यामुळे बालपत्नीवर ओढवणारे वैधव्य इत्यादी गोष्टींचा गंभीरपणाने विचार करण्याची वेळ येऊन ठेपली. तरीही बालविवाहाची चाल मात्र तशीच होती. तिच्यामुळे बिचाऱ्या बालिकांवर ओढवू पाहणारे संभाव्य वैधव्य आणि त्यांच्या जन्माची होणारी दुर्दशा, रुढीप्रमाणे त्यांच्यावर लावण्यात आलेले केशवपनासारखे अमानुष प्रायश्चित आणि संन्यस्त जीवनाची सक्ती यासारख्या गंभीर गोष्टी अंत:करणाचा वेध घेणाऱ्या आहेत. द्रव्यलोभ, लाचारी, दारिद्र्य, दडपण अथवा अज्ञान यांना बळी पडून अल्पवयीन मुलींची लग्ने म्हाताऱ्या नवरदेवांशी लावून टाकण्याच्या प्रथेमुळेच बालविधवांच्या पुनर्विवाहांचा प्रश्न निर्माण झाला. आपल्या देशात तसे पहायला गेल्यास पुरुषवर्गाच्या बाबतीत पुनर्विवाहाचा प्रश्न कधी उद्भवलाच नव्हता. अनेक स्त्रिया करण्याचा पुरुषाचा हक्क मात्र अबाधित होता. सतीसारखी अमानुष प्रथा तर साऱ्या मानवजातीला कलंकित करणारी होती. या साऱ्या गोष्टी निंद्य असल्या आणि समाजातील सहृदयवर्गाने त्यांचा सदैव तिरस्कार केला असला तरीदेखील स्वयंप्रेरणेने ह्या पद्धती बंद करण्याच्या बाबतीत कुणी फारसे लक्ष घातले नव्हते.

## राजकीय स्थित्यंतरासोबत मानसिक परिवर्तन

पाश्चात्य संस्कृती मुख्यत: नागर, विज्ञाननिष्ठ व उद्योगप्रवण होती. तर त्या उलट हिंदुस्थानची संस्कृती ही पारमार्थिक, कृषीप्रधान व ग्रामीण होती. औद्योगिक संस्कृती ही प्रयत्नशील, गतिमान व व्यापक असते तर कृषीप्रधान संस्कृती स्थितिशील,

दैववादी व संकुचित असते. या औद्योगिक संस्कृतीचा कृषीप्रधान हिंदुस्थानी संस्कृतीशी संघर्ष होताच हिंदुस्थानच्या जीवनात स्थित्यंतर घडून आले. नवी शासनपद्धती, कायदा-सुव्यवस्था, शिक्षणसंस्था, कारखानदारी इत्यादींच्या अनुसंधानाने राज्यकर्ते आणि एतद्देशीय लोकांनी व्यक्तिगत व सामुदायिक हालचाली केल्या. या सर्वांच्या क्रियाप्रतिक्रियातून या नव्या मूल्यांचे येथे कमी-जास्त प्रमाणात संवर्धन होत गेले. जीवनाच्या राजकीय, आर्थिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक अंगांकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन येथील लोकांना प्राप्त झाला. किंबहुना राजकीय स्थित्यंतरासोबत एक प्रचंड मानसिक परिवर्तन येथे घडून आले.

पाश्चात्य शिक्षणाने एतद्देशीय लोकांना जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी, तिच्या आविष्काराची नवी साधने, समाजातील साऱ्याच स्तरांना आत्मविमोचन करून घेण्याची तात्विक संधी इत्यादी गोष्टी प्रथमच उपलब्ध करून दिल्या. या दृष्टीने इंग्रजी राजवट ही पुरोगामीच होती. भारतीयांच्या मागासलेपणावर जसजसा आघात होऊ लागला तसतशी नव्या-जुन्याची ओढाताण फार मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. पाश्चात्य कला, इतिहास, संस्कृती, औद्योगिकरण, त्यांचे पुढारलेपण पाहून एतद्देशीय लोक भारावून गेले. आपल्या देशाचे मागासलेपण ओळखून धर्मांतर, स्त्री-शिक्षण, विधवाविवाह, जातिभेद, लोकशाही, जनतेची दु:खे, राज्यकर्त्यांचे अन्याय, अर्थकारण, सांस्कृतिक घडामोडी इत्यादी विविध व वैचित्र्यपूर्ण बाबींवर प्रांजळ मतप्रकटन होऊ लागले. यातूनच अशिक्षित, सुशिक्षित, ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर, सनातनी-सुधारक, ख्रिस्ती-ख्रिस्तेतर, राज्यकर्ते - प्रजा इत्यादी अनेक द्वंद्वाचाही जन्म झाला.

### हिंदुस्थानात इंग्रजी शिक्षणाचा परिणाम

### इंग्रजी शिक्षण

इ. स. १८१८ पासून साऱ्या हिंदुस्थानवर ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाला. हिंदुस्थानच्या कोसळत्या राजकीय सत्तेचा आर्थिक पाया ढासळत असल्याने इंग्रज हे कोणी परके आहेत, त्यांचे बस्तान येथे बसू नये, त्यांना मदत करणे म्हणजे देशद्रोह आहे असे कुणाला वाटले नाही. उलट इंग्रजांचे राज्य हे कायद्याचे आणि सुनियंत्रित असल्यामुळे इंग्रजी सत्तेचे प्रथमत: स्वागतच झाले. संपूर्ण हिंदुस्थानभर आपले सार्वभौमत्व निर्माण झाल्यावर ते अधिकाधिक टिकवून ठेवणे इंग्रजांना अधिक

महत्त्वाचे वाटू लागले. प्रजेची मनोवृत्ती स्वकीय राजसत्तेस अनुकूल करून घेण्याच्या दृष्टीने त्यांनी हालचाली सुरू केल्या.

नव्या राजवटीला नवीन तऱ्हेचा नोकरवर्ग निर्माण करणे आवश्यक असल्यामुळे इंग्रजांनी हिंदुस्थानात इंग्रजी शिक्षणाचा श्रीगणेशा केला. शाळा-कॉलेजची स्थापना केली. विद्यापीठांची निर्मिती केली. इंग्रजी विद्यारूपी वाघिणीचे दूध प्राशन केल्यामुळे एतद्देशीय शिक्षितांच्या मनात आत्मभान आले. 'स्व'विषयक ही नवी जाणीव पुढे अनेक सामाजिक आणि वाङ्मयीन प्रवाहांना प्रेरणा देणारी ठरली. हिंदुस्थानी नवशिक्षित युवक पराधीनतेची बंधने झुगारून देण्यासाठी जागृत झाला. इंग्रजी विद्येमुळे जगाशी संबंध येऊ लागला. जगाकडे पाहण्याची ती खिडकीच वाटू लागली. हिंदुस्थानातील धर्म, रीतिरिवाज, भाषा, साहित्य, संस्कृती हे सर्व त्याज्य आहे व इंग्रजांचे सर्व काही अनुकरणीय आहे, असे या नवशिक्षित तरुण पिढीला वाटू लागले. आपण या जगाच्या दोन-तीन शतके मागे आहोत व इंग्रजांच्या सान्निध्याने आपणास हे मागासलेपण काढून टाकण्याची दैवयोगाने सुवर्णसंधीच मिळाली आहे असेही त्यांना वाटू लागले. इंग्रजी शिक्षणामुळे भौतिक विद्यांची उन्नती होऊ लागली. हिंदुस्थानातील जुने शिक्षण कालबाह्य होऊन पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, गणित, इतिहास, भूगोल, वाङ्मय यांसारखे नवे शिक्षण मिळताच एतद्देशीयांना चौकस व चौरस बुद्धीचे बाळकडू मिळू लागले. चिकित्सेच्या आधारावर नवी दृष्टी त्याला लाभली. इंग्रजी विद्येतच मुळी व्यक्तिवाद जागृत करण्याचे सामर्थ्य असल्यामुळे आणि वाङ्मयाच्या परिणामामुळे जागतिक जीवनातील घडामोडी नव-शिक्षिताला कळू लागल्या. जागतिक जीवनात झालेली स्थित्यंतरे, विशेषत: फ्रेंच राज्यक्रांतीनंतर जे काही बदल होत गेले त्यामुळे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. त्या सर्वांचा परिणाम नवशिक्षित पिढीवर झाला. इंग्रजांच्या किंबहुना जगातील नव्या राजकीय व सामाजिक चळवळी आपल्याकडेही आणल्याशिवाय आपली राष्ट्रोन्नती अशक्य आहे अशी या सुशिक्षितांची भावना झाली.

### इंग्रजी चळवळीचे केंद्र मुंबई

मुंबई हे मराठी भाषिकांचे सर्वात मोठे व महत्त्वाचे शहर असून ते व्यापारासाठी अनुकूल असे असल्यामुळे इंग्रजांनी मुंबईला आपल्या चळवळीचे प्रमुख केंद्र बनविले.

इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स्, यांस त्याच्या लग्नसमयी मुंबई बेट पोर्तुगालच्या राजाने आंदण दिले. तेव्हापासून त्यांनी मुंबईला प्रगतीपथाकडे पोहोचविले. टोलेजंग वाडे, विस्तीर्ण इमारती, स्वच्छ व सरळ रस्ते आणि औद्योगिक वसाहत वसवून त्यांनी मुंबईला पाश्चात्य शहराचा डामडौल आणला. इंग्रजी राजवट आल्यानंतर या शहराचा आणखीनच विकास झाला. मोठ-मोठ्या बाजारपेठा निर्माण करण्यात आल्या. गोदी व जहाजबांधणीचे काम त्यांनी सुरू केले. व्यापारांबरोबर औद्योगिकरणाचा भरभक्कम पाया घातला. कारखानदारीमुळे साहजिकच मुंबईची वर्दळ वाढली आणि स्थानिक लोकांना काम मिळू लागले. त्यांच्या राहणीमानात, आचार-विचारात आमूलाग्र स्वरूपाचा बदल घडून आला.

'छप्पन्न भाषा व अठरापगड जाती', या म्हणीनुसार मुंबईमध्ये अनेक जाती-धर्माचे लोक स्थायिक झाले होते. शिवाय पारशी, मुसलमान, यहुदी, इस्त्रायल, तुर्क, अरब, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज इत्यादी परकीय लोक वस्ती करून राहिले होते. भिन्न जात, भिन्न पोषाख, भिन्न चालीरिती यामुळे मुंबईची संस्कृतीच प्रगत बनली होती. साऱ्या हिंदुस्थानची सूत्रे मुंबईतून हलवायला इंग्रजांनी सुरुवात केली होती. परकियांची सतत ये-जा, यांमुळे संस्कृतीची सरमिसळ होत होती. भाषा, चालीरिती, हिंदुस्थानची प्रमुख बाजारपेठ, शिक्षणसंस्था, कारखानदारी व्यापारी उलाढाली यांमुळे मुंबई शहर इंग्रजी संस्कृतीचे प्रमुख केंद्र बनले होते.

## हिंदुस्थानात वृत्तपत्र निर्मितीस अनुकूल वातावरण

प्लासीच्या लढाईने इंग्रजांच्या हाती हिंदुस्थानची सारी सूत्रे आल्यावर व्यापारी कंपनी राज्यकर्ती बनली. पूर्वीच्या वसाहतीतील एकदेशी कारभार संपुष्टात आला. कंपनीला शासकीय व्यवहार करावा लागल्याने तिच्याविरुद्ध असंतोष निर्माण होऊ लागला व तो प्रकट करण्याची इच्छा प्रबळ होऊ लागली. या इच्छेतूनच हिंदुस्थानात वृत्तपत्रांचा जन्म झाला. अशातच इंग्रजांची हिंदुस्थानात येण्याची संख्याही वाढू लागली. संपत्तीच्या लोभाने व व्यापाराव्यतिरिक्त अन्य उद्देशानेही काही पाश्चात्य लोक येऊ लागले. त्यामुळे वसाहतीमध्ये स्वहित संबंधाने एकसंघपणा नाहिसा होऊन मतभेदाचे बीजारोपण झाले. साहजिकच ते व्यक्त करण्याची गरज भासू लागली. सत्ताधाऱ्यांविरुद्ध गाऱ्हाणी असत व ती त्यांच्या कानापर्यंत पोहोचवणारी वृत्तपत्रासारखी

साधने या परिस्थितीमुळे निर्माण झाली. त्यातच इंग्रजी वृत्तपत्रे इंग्लंडमधून येत होती आणि ती इंग्रजांच्या वाचनात येत होती. इंग्लंडच्या राजकीय घडामोडीमध्ये वृत्तपत्राने मोलाची कामगिरी केली होती. राज्यकर्त्यांचे दोष आणि जनतेचे कल्याण याकडे वृत्तपत्रांनी लक्ष दिल्याने एक प्रभावी शक्ती म्हणून इंग्लंडमध्ये वृत्तपत्रांना स्थान मिळू लागले होते. इंग्लंडमधील या घडामोडीचे पडसाद येथे थोडेफार उमटणे अपरिहार्य होते. त्यातूनच आपले मत प्रकट करण्यासाठी वृत्तपत्रासारख्या साधनांचा वापर करणे उपयुक्त ठरेल ही जाणीव येथे रुजली.

### वृत्तपत्र : प्रबोधनाचे प्रभावी माध्यम

पाश्चात्यांच्या संपर्काने आधुनिक विद्येशी संपर्क येऊन हिंदुस्थानी लोकांच्यामध्ये जागृती झाली व विविध क्षेत्रातील उणीवा दूर करण्याचा प्रयत्न सुरू झाला. पाश्चात्यांच्या वृत्तपत्र सृष्टीच्या निमित्ताने वृत्तपत्राविषयीच्या एतद्देशीय लोकांच्याही मनात अनेकविध कल्पना जागृत झाल्या. स्वमत प्रकटन, ज्ञानदान, विचारस्वातंत्र्य, अन्यायाला वाचा फोडणे, महत्त्वाच्या सामाजिक जबाबदाऱ्याची उकल करून जनतेचे प्रबोधन करणे हे वृत्तपत्राचे महत्त्वाचे सामर्थ्य प्रकट होऊ लागले. नियतकालिकांच्या प्रचाराला मुद्रणसंस्थेचे फार मोठे साहाय्य लाभले. मुद्रणसंस्था व वृत्तपत्रसंस्था या दोन संस्थांचे ज्ञानप्रसारदृष्ट्या, शिक्षणसंस्थापेक्षाही अधिक महत्त्व आहे. कारण शिक्षणसंस्थेप्रमाणे याची कक्षा मर्यादित नाही. 'छपाईची कला ही विज्ञानाने आधुनिक संस्कृतीला दिलेली फार मोठी देणगी आहे' असे रा. श्री. जोग म्हणतात. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी 'अनेक विद्यामूलतत्त्व संग्रह' या पुस्तकामध्ये तर – 'छापण्याची युक्ती न निघती तर वर्तमानपत्रे व नियमितकाळी निघणारी पुस्तके वगैरे कधी न होती.... हल्ली पृथ्वीवर एका महिन्यात जितके कागद छापले जातात, तितके हाताने लिहावयाचे असते, तर कोट्यावधी मनुष्ये लागली असती. संपत्ती इत्यादी उत्तमोत्तम गोष्टी उत्तरोत्तर वाढत (जाव्या म्हणून) परमेश्वरानेही अप्रतिम व अत्युत्तम कला ह्या लोकी पाठविली.' (चिपळूणकर कृष्णशास्त्री, १८६१, १९२) असे विचार प्रकट केले आहेत. ठराविक वेळी आणि इष्ट त्या संख्येने एकच मजकूर वाचकांना सादर करता येणे हे नियतकालिकांचे काम मुद्रणकलेमुळे सुकर तर झालेच; परंतु नियतकालिकांना फार मोठे वरदान लाभले.

इंग्रजी राजवटीबरोबर सुरू झालेल्या शिक्षणामुळे आपल्या ऐहिक आणि वर्तमानकालीन जीवनाविषयीच्या दृष्टिकोनामध्ये फरक पडला. त्याविषयी आपल्यास अधिक आस्था वाटू लागली. हिंदी लोकांचा अधिक घनिष्ठ संबंध इंग्रजी वृत्तपत्राशी येऊ लागला. त्याचे महत्त्व पटून त्याविषयी आस्थाही वाटू लागली. इंग्रजाशी घनिष्ठ संबंध बंगालमध्ये आल्याने विचारमंथनाला आणि सामाजिक जागृतीला प्रथम तेथेच प्रारंभ झाला. त्यातून राजा राममोहन रॉय यांनी बंगालमध्ये सर्वांगीण विकासाचा उद्योग आरंभिला होता. अशा उद्योगासाठी प्रबोधनाची नवी साधने आणि माध्यमे उपयोगात आणण्याचा साहजिकच प्रयत्न झाला. वृत्तपत्र हे लोकसंवादाचे आणि प्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे हे इथल्या लोकांना पटू लागले. इंग्रजांनी चालविलेल्या वृत्तपत्राचा तयार नमुना समोर होताच. त्या वृत्तपत्रांचे स्वरूप एतद्देशीय लोकांना उपयुक्त ठरणारे नव्हते, म्हणून आपली स्वत:ची वृत्तपत्रे सुरू करावीत असे इथल्या लोकांना वाटू लागले. यासंबंधी रा. के. लेले म्हणतात, ''सुरुवातीची सारी वृत्तपत्रे इंग्रजी होती, व त्यांचे स्वरूप आंग्ल समाजासाठी चालविलेली वृत्तपत्रे असे होते.... हिंदुस्थानात चालविण्यात येत होती म्हणून त्यांना भारतीय म्हणावयाचे, अन्यथा ती इंग्लंडातील वृत्तपत्रांची कमी दर्जाची नक्कल होती. हिंदी जनतेबाबत, तेथील घडामोडीबाबत त्यात विशेष काही आढळत नसे. यामुळे हिंदी जनतेच्या आकांक्षांचे प्रतिबिंब त्यात पडण्याचा प्रश्नच नव्हता. असे असले तरी भारतीय वृत्तपत्रसृष्टीचा पाया त्यांच्याद्वारा घातला गेला. शिवाय, या वृत्तपत्रांनी हिंदी वृत्तपत्रांसाठी एक तयार नमुना उपलब्ध करून दिला. वृत्तपत्र चालविताना वृत्त देण्याबरोबरच टीका टिप्पणी करून प्रबोधन करून लोकमत बनविले नाही, तरी त्याला वळण देण्याचा दृष्टिकोन ठेवणे आवश्यक असते. परिणामांची तमा न बाळगता शासनावर निर्भीडपणे शस्त्र धरण्याची तयारी संपादकाला ठेवावी लागते. शासनाचा रोष पत्करूनही जनहिताच्या दृष्टीने ठामपणे मतप्रतिपादन करण्याचा बेडरपणा दाखवावा लागतो. हे सारे गुण सुरुवातीच्या या इंग्रजी वृत्तपत्रांनी कमी-अधिक प्रमाणात जरूर प्रकट केले आणि वृत्तपत्र चालविण्याचा एक वस्तुपाठ येथे घालून दिला. ही वृत्तपत्रे ब्रिटिश वृत्तपत्रांच्या नमुन्यावर बेतलेली असल्याने व ब्रिटिश उदारमताचा वारसा आणि नव्याने उदयास येत असलेल्या आधुनिक लोकशाहीचे बाळकडू ही वृत्तपत्रे चालविणाऱ्या काहींना तरी लाभलेले असल्याने, हिंदुस्थानातल्या पहिल्या इंग्रजी वृत्तपत्रांनी एक चांगला आदर्श लोकांपुढे ठेवला.'' (लेले रा. के., १९८४, ३८-३९)

बातमी देणे व टिका टिप्पणी करणे हे वर्तमानपत्राचे प्रमुख कार्य. आवश्यक ती माहिती मिळविण्याची वृत्ती माणसाच्या ठिकाणी असतेच, शिवाय कुतूहल व सुरक्षितता या माणसाच्या सहज प्रवृत्ती आहेत. आजुबाजूच्या माणसांविषयी माहिती मिळविण्याची वृत्ती माणसात रानटी अवस्थेपासून आहे. प्राचीन काळी बातम्या तोंडी, शब्दांनी खाजगी व सरकारी पत्रव्यवहाराद्वारे, सार्वजनिक ठिकाणी पत्रके लावून वा दवंडी पिटवून किंवा दगडी स्तंभाचा उपयोग करून लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात असे. एखादी नवीन, अघटित वा सर्वांना जिच्याविषयी आस्था असेल अशा घटनेची माहिती प्रथम जाहीर करणे म्हणजे 'वार्ता' अशी जिची व्याख्या केली जाते तिचे अस्तित्व व तिचा प्रसार करण्याची साधने समाजाच्या अगदी प्राथमिक अवस्थेतही आढळतात. पण त्यांना काही मर्यादा होत्या. एकाचवेळी वार्ता सर्वांपर्यंत पोहोचविणे अवघड होते. वृत्ताच्या अनेक हस्तलिखित प्रती तयार करणे सुलभ नव्हते. मुद्रणकलेच्या शोधामुळे या अडचणीतून मार्ग निघाला. यामुळेच वृत्तपत्राचा जन्म सुकर झाला. वृत्ताचा दूरवर प्रसार झटपट करणे शक्य झाले. हिंदुस्थानातही आधी मुद्रणकला आली आणि नंतर वृत्तपत्रे निघाली. इतर अनेक आधुनिक कलाप्रमाणे मुद्रणाची कलाही पाश्चात्यांच्यांमुळे हिंदुस्थानात आली. पाश्चात्यांमुळेच वृत्तपत्रव्यवसाय हिंदुस्थानात दृढ झाला. अर्थात पाश्चात्य लोक आले नसते तर वृत्तपत्र व्यवसाय हिंदुस्थानात सुरू झाला नसता असेही म्हणता येत नाही. तर त्यांच्यामुळे तो हिंदुस्थानात लवकर आला असे म्हटले तर ते संयुक्तिक ठरेल. वृत्तपत्रनिर्मितीला आवश्यक असे सार्वजनिक जीवन असावे लागते. शिवाय मुद्रणाच्या सोयी, दळणवळणाच्या सोयी आणि पुरेसा वाचक वर्ग असावा लागतो. हिंदुस्थानात या सर्व गोष्टीची पूर्तता इंग्रजी राजवटीत झाली. त्यामुळे हिंदुस्थानातील वृत्तपत्रनिर्मितीला गती मिळाली.

### पहिले हिंदुस्थानी वृत्तपत्र

हिंदुस्थानात वृत्तपत्रनिर्मितीच्या कामी कंपनीच्या नोकरांनी पुढाकार घेतला. त्यातही पहिला अयशस्वी प्रयत्न विल्यम् बोल्टस् नावाच्या डच गृहस्थाने केला. बातमीचा प्रसार करून वृत्तपत्राचे मुख्य कार्य मतप्रदर्शन ही त्याची कल्पना होती, पण कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या आडकाठी धोरणामुळे विल्यम् असफल झाला. २९ जानेवारी १७८० रोजी जेम्स् ऑगस्टस् हिकी याने हिंदुस्थानातील पहिले वृत्तपत्र

'बेंगॉल गॅझेट' (Bengal Gazette) किंवा 'कलकत्ता जनरल ॲडव्हर्टायझर (Calcutta General Advertiser) या नावाने सुरू केले. 'हिकीज गॅझेट' नावानेच ते प्रसिद्ध आहे. धंद्याने मुद्रक असलेला व विद्वत्ता आणि सुसंस्कृतपणाचा अभाव असलेल्या हिकीने केवळ हौसेखातरच हे इंग्रजी साप्ताहिक सुरू केले होते. त्यामुळे त्या पत्रातील लेखन अभिरुचीहीन, हिणकस दर्जाचे होते. लोकांच्या खाजगी जीवनावर शिंतोडे, सरकारी अधिकाऱ्यावर अमर्याद टीका, निंदानालस्ती व वसाहतीतील शांतता धोक्यात आणणारा मजकूर प्रसिद्ध होत असल्याने सरकारने त्यावर बंदी घातली. काहींनी त्याच्यावर अब्रूनुकसानीचे खटले घातले. परिणामी त्याला चार महिने कैदेची व ५०० रुपये दंडाची शिक्षा झाली. एवढेच नव्हे, तर त्याला जप्तीसारख्या संकटांना सामोरे जावे लागले. शेवटी त्याची अन्नान दशा झाली. पहिल्याच वर्तमानपत्राच्या संपादकाची अशी शोकांतिका झाली. परंतु सरकारी रोषाला उत्तर देताना तो म्हणतो, ''समाजात मुद्रणस्वातंत्र्य असणे आवश्यक असून, प्रजाजनांना आपला विचार व मत मांडण्यास मोकळीक असली पाहिजे. या स्वातंत्र्यावर घाला घालणारे कोणतेही वृत्त जुलमी व घातक ठरेल.'' (लेले रा. के. १९८४, २५-२६) अर्थात हिकीला हवे असलेले स्वातंत्र्य इंग्लिश लोकांपुरतेच मर्यादित होते.

### हिंदुस्थानातील इंग्रजी वृत्तपत्राचे स्वरूप

हिकीने पहिले वृत्तपत्र सुरू केल्यावर त्याचे अनुकरण कलकत्यात तर झालेच, पण इंग्रजांच्या ताब्यातील मद्रास, मुंबई या मुलखातही वृत्तपत्रांचा उदय झाला. परंतु त्यांचे स्वरूप व त्यांचा वाचकवर्ग हा त्या इंग्रजी समाजापुरताच मर्यादित होता. यामुळे त्यांचा खप १००-२०० च्या घरातच असे. पण चालकांच्या डोळ्यासमोर इंग्रज वाचकवर्ग व तोही मूठभर असा असल्याने त्यातील मजकूर त्या जनतेला आवडेल, रुचेल असाच असे. त्यामुळे सात-आठ महिन्यांपूर्वीची शिळी चर्चाही उत्सुकतेने वाचली जाई. परदेशची बातमीपत्रे, जाहिरनामे, वाचकांची पत्रे व क्वचित काव्यही प्रसिद्ध करण्यात येई. जहाजांच्या बातम्यांबरोबरच प्रचलित व नव्या फॅशनची माहिती ह्या स्त्रियांच्या आवडीच्या विषयाला वृत्तपत्रात स्थान देण्यात येई. क्वचित प्रसंगी जाहिरातींनाही त्यामध्ये स्थान असे. ज्या देशात हे इंग्रज लोक राहत होते, व्यापार-उद्योग करीत होते, राजसत्ताही चालवू लागले होते त्या हिंदुस्थान देशातील जनतेचे अस्तित्वच जणू नाही असे या सुरुवातीच्या वृत्तपत्राचे स्वरूप होते. येथील घडामोडींना,

जनतेच्या सुख-दु:खाना पत्रात बिलकुल स्थान नसे. त्या सुमारास इंग्रजी भाषेचा प्रसार न झाल्याने एतद्देशियांची वाचण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे हिंदुस्थानी जनजीवनाविषयी वृत्तपत्रामध्ये बिलकुल आस्था नव्हती.

कंपनी सरकारच्या या वरिष्ठ अधिकाऱ्यांना वृत्तपत्राबद्दल मोठी आस्था वाटत होती असे नाही. जरा अधिक टीका झाल्यास संपादकास समज दिली जाई. फार तर जहाजात बसवून मायदेशी पाठविण्यात येई. वृत्तपत्रातील वैगुण्ये, त्रुटी व अन्याय यांची दखल मात्र घेतली जाई. सरकारचे वृत्तपत्राबाबत निश्चित असे धोरण नसल्यामुळे बहुतेक संपादकांना सरकारपुढे खुषमस्कऱ्याची भूमिका स्वीकारावी लागे.

## मुंबईतील पहिले वृत्तपत्र

मुंबईमध्ये वृत्तपत्रास अनुकूल असे सार्वजनिक जीवन नसल्यामुळे वृत्तपत्राची सुरुवात झाली ती कलकत्ता आणि मद्रासनंतरच. मुंबईतील पहिले वृत्तपत्र 'बाँबे हेरॉल्ड' १७८९ साली निघाले असले तरी त्याची फारशी माहिती उपलब्ध नाही. त्यानंतर १७९० मध्ये ल्यूक ॲशबर्नर याने 'बाँबे कुरिअर' हे वृत्तपत्र सुरू केले. या पत्राचे वैशिष्ट्य असे होते की, या इंग्रजी पत्रात प्रथमच गुजराथी व मराठी जाहिराती प्रसिद्ध होत असत. त्यानंतर १७९१ साली 'बाँबे गॅझेट' हे साप्ताहिक सुरू झाले. या पत्रात सरकारी अधिसूचना, आज्ञा, ठराव इत्यादी अधिकृत म्हणून प्रसिद्ध करण्यास मुंबई सरकारने मान्यता दिली होती. हे पत्र जवळजवळ सव्वाशे वर्षे चालू होते.

## हिंदुस्थानी वृत्तपत्रे

इ. स. १८१६ साली गंगाधर भट्टाचार्य या हिंदुस्थानी गृहस्थाने 'बेंगॉल गॅझेट' नावाचे पहिलेच हिंदुस्थानी परंतु इंग्रजी भाषेमधून वृत्तपत्र काढले. फक्त वर्षभरच ते चालले असले तरी हिंदुस्थानी लोकांचे पहिले पत्र व पहिला प्रयत्न हे त्याचे महत्त्व कधीच दृष्टिआड करून चालणार नाही. यानंतर हिंदुस्थानी भाषेत वृत्तपत्र काढण्याचा पहिला प्रयत्न श्रीरामपूरच्या बॅप्टिस्ट मिशनऱ्यांनी केला. धर्मप्रसाराचे एक महत्त्वाचे साधन म्हणून हिंदुस्थानातील विविध भाषांत बायबल छापण्याचा त्यांनी अगोदरच प्रयत्न केला होता; त्यामुळे बंगाली भाषेत वृत्तपत्र काढण्याचे धाडस त्याने केले. धर्मप्रसारासाठी देशी भाषांविषयी आस्था निर्माण करण्याच्या हेतूने त्यांनी

एप्रिल १८१८ मध्ये 'दिग्दर्शन' हे बंगाली भाषेतील मासिक सुरू केले. सरकारची प्रतिक्रिया आजमाविण्याच्या हेतूने त्यांनी प्रथम मासिक काढले व पुढे २३ मे १८१८ रोजी 'समाचार दर्पण' हे बंगाली भाषेतील साप्ताहिक सुरू केले.

हिंदुस्थानी भाषांत वृत्तपत्रे निघू लागली हे नवा जमाना येऊ लागल्याचे सुचिन्ह होते. लोकजागृती सुरू होऊन त्यासाठी नवी साधने निर्माण करण्याची प्रवृत्ती मूळ धरू लागल्याचे ते द्योतक होते. हिंदुस्थानातील वृत्तपत्राचे जग हे ब्रिटिश वा फ्रेंच वृत्तपत्राप्रमाणे एकभाषी नाही. येथे अनेक भाषा चालतात व अनेक भाषा समृद्ध आहेत. त्यामुळे हिंदुस्थानी वृत्तपत्रे म्हणजे विविध भाषांतील वृत्तपत्रे होत. महत्त्वाच्या हिंदुस्थानी भाषांत वृत्तपत्रे साधारणपणे एकाचवेळी निघू लागली. बंगालीबरोबर पारशी, उर्दू, हिंदी, तामिळी, उडीया, आसामी, पंजाबी भाषांतील वर्तमानपत्रे सुरू झाली.

मुंबईमध्ये पारशी लोकांच्या पुढाकारामुळेच गुजराती वृत्तपत्रे सुरू झाली. इंग्रजी वृत्तपत्रांनंतर चाळीस वर्षांनी हिंदुस्थानी भाषेत फर्दुनजी मर्झबान, या पारशी गृहस्थाने १८२२ साली 'मुंबईना समाचार' हे साप्ताहिक सुरू केले. वृत्तपत्र निर्मितीस अनुकूल वातावरण असल्यामुळे आणि शिक्षणात आघाडीवर असलेल्या पारशी लोकांनी अनेक वृत्तपत्रांना जन्म दिला. 'मुंबई वर्तमान', 'मुंबईना हरकारू अने वर्तमान', 'मुंबईना चाबुक', 'जामे जमशेद', 'मुंबई दुर्बीण', 'समाचार दर्पण', 'रास्त जोफतार'अशी त्यांची नावे सांगता येतील. गुजराती वृत्तपत्रांचा व्याप बराच काळ मुंबईत राहिला व वृत्तपत्रांच्या कामी त्यांनी खूपच आघाडी मारली.

## मराठी वृत्तपत्राच्या प्रेरणा

मराठी भाषिकांचे मुंबई हे मोठे शहर असून मुंबईत गुजराती वृत्तपत्र निघाल्यावर मराठी वृत्तपत्र निघाले. मराठी वृत्तपत्र मुंबईखेरीज अन्य कोणत्याही ठिकाणी अगदी पुण्यातही निघणे त्यावेळी अशक्य होते. मुंबईमध्ये वर्तमानपत्रास आवश्यक ते सार्वजनिक वातावरण व आधुनिकता असल्यामुळे नवे विचार समजून घेण्याइतकी मानसिक क्षमता मुंबईतील मराठी लोकांत निर्माण झाली होती. विद्या संपादनामुळे लेखन-वाचन करणारे मराठी लोक तयार झाले. ग्रंथनिर्मितीप्रमाणेच वृत्तपत्र हेही ज्ञानप्रसाराचे एक अमोघ साधन आहे याची जाणीव निर्माण झाली. इंग्रजी वृत्तपत्रांचा कित्ता समोर

होताच. गुजराती वृत्तपत्रे डोळ्यासमोर होती. क्वचित ती वाचण्यातही येत असत. तसेच बंगाली वृत्तपत्रांची माहिती कानी पडत होती. यामुळे मराठी भाषिक लोक हळूहळू वृत्तपत्राकडे वळणे अपरिहार्य ठरले. ज्ञानाचा प्रसार करण्यास प्रथम त्याचा संचय व्हावा लागतो. ज्ञान दुसऱ्यास देण्यास आत्मविश्वास वाढीस लागावा लागतो. त्याची संपन्नता अनुभवास येण्यास काही कालावधी लागतो. संपन्नतेनंतर ज्ञानदानाच्या प्रेरणेला अवकाश लागतो. मराठी वृत्तपत्र अशाच प्रेरणेतून जन्मास आले. प्रबोधनाची, नव्या पाश्चात्य विद्येचा देशबांधवांना परिचय करून देण्याची प्रेरणा त्यामागे होती.

## पहिले मराठी वृत्तपत्र

मराठी भाषेतील पहिल्या वृत्तपत्राचा मान आचार्य बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' या वृत्तपत्राला दिला जातो. तथापि 'दर्पण' च्या अगोदर एक मराठी वृत्तपत्र अस्तित्वात असल्याचा पुरावा मात्र मिळतो. २० जुलै १८२८ रोजी त्याचा 'मुंबापूर वर्तमान'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला होता. परंतु त्या पत्राचा चालक कोण होता, संपादक कोण, प्रकाश कोण, व ते कितीवेळ चालले होते याचा पत्ता लागत नाही. पत्राच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध झालेला 'एक विक्षिप्त' यांचा लेख 'बाँबे गॅझेट' या मुंबईतील इंग्रजी वृत्तपत्राने आपल्या २३ जुलै १८२८ च्या अंकात प्रसिद्ध केला होता, हाच काय तो पुरावा. तत्कालिन वृत्तपत्रे चाळूनही त्याची माहिती मिळत नाही. तसेच ते साप्ताहिक, पाक्षिक की मासिक होते हेही स्पष्ट होत नाही. परंतु 'मुंबापूर वर्तमान' पत्राला आद्य मराठी वृत्तपत्र असे निश्चितपणे म्हणावे, असा पुरेसा आधार मिळत नाही. कालानुक्रमे 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र म्हणता आले नाही तरी मराठी वृत्तपत्राचा पाया घालून त्याची थोर परंपरा सुरू करण्याचा मान 'दर्पण'कडेच जातो. 'दर्पण'चे संपादक बाळशास्त्री जांभेकर ह्यांचे स्वतंत्र कर्तृत्वही थोर असल्याने त्या पत्राला वयाने नाही तरी गुणकर्तृत्वाने ज्येष्ठत्वाचा मान देणे जरूर आहे. ज्या पत्राचे आणि त्या संपादकाचे स्मरण नंतरही सतत कायम राहिले त्या पत्राला आद्य पत्र म्हणून गौरविता आले नाही तरी प्रथम दर्जाचे आद्यपत्र म्हणून त्याचा उल्लेख केलाच पाहिजे. सामाजिक जीवनाला प्रेरणा देण्याचा ज्या वृत्तपत्राने प्रयत्न केला ते वृत्तपत्र म्हणजे 'दर्पण' होय.

***

प्रकरण दुसरे

# बाळशास्त्री जांभेकर

### आधुनिक महाराष्ट्राचे जनक

एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात पश्चिम भारतामध्ये ब्रिटिश सत्ता स्थिरस्थावर झाल्यावर सर्व परिस्थितीचा धैर्याने आणि व्यापक दृष्टीने विचार करून समाजाला जागृत करणारा आणि मार्ग दाखविणारा, स्वदेशोन्नतीच्या विविध क्षेत्रात तळमळीने अखंड परिश्रम करणारा बुद्धिमान आणि अष्टपैलू पांडित्य असणारा पहिलाच पुरुष म्हणजे बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर. ज्ञानलालसा, राष्ट्रोद्धाराची दृष्टी, स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान, यांबरोबरच आदर्शभूत चारित्र्य, परोपकारी वृत्ती आणि सार्वजनिक कार्याची हातोटी या गुणांच्या बळावर आणि स्वकर्तृत्वाने महाराष्ट्रामध्ये सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीचा पाया घालणारे बाळशास्त्री जांभेकर हे पहिले पुरुष होते. म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे आद्य ज्ञानमहर्षी, आद्य पत्रकार, आद्य समाजसुधारक म्हटले जाते. एवढेच नव्हे, तर त्यांना 'पश्चिम भारतातील नवयुगप्रवर्तक आणि आधुनिक महाराष्ट्राचे जनक' असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये. अशा युगपुरुषाचे व्यक्तिमत्त्व आणि जीवन कसे कसे आकाराला आले ते समजावून घेणे आवश्यक आहे.

### घराणे

रत्नागिरी जिल्ह्यात देवगड तालुक्यापैकी खारेपाटणनजीक पोंभुर्ले म्हणून बावडा संस्थानचे अंमलाखालील एक गाव आहे. तेथे जांभेकर यांचे घराणे पूर्वीपासूनच मोठे मान्यवर विद्याचारसंपन्न होऊन गेले. त्या घराण्यातील बहुतेक मंडळी वैदिक, याज्ञिक, पुराणिक, शास्त्री म्हणून प्रसिद्ध आहेत. हे घराणे मुळापासून भिक्षुकवृत्तीचे असल्यामुळे तत्कालीन संप्रदायाप्रमाणे सर्व मंडळी वेदशास्त्र पारंगत होऊन गेली हे साहजिकच आहे. या मंडळींनी 'वेदमूर्ती' व 'वेदशास्त्रसंपन्न' या पदव्या संपादन केल्या होत्या. त्या घराण्यामध्ये पुरुषाप्रमाणे स्त्रियाही शिकलेल्या होत्या आणि त्याही पुराण सांगत

असत. गंगाधरशास्त्री जांभेकर हे व्युत्पन्न पुराणिक असून स्वभावाने अतिशय दयार्द्र वृत्तीचे व परोपकारी होते. त्यांच्या पत्नीही सगुणाबाई स्वभावाने प्रेमळ, धर्मनिष्ठ व पतिपरायण होत्या. त्यांना दोन पुत्र व दोन कन्या अशी चार अपत्ये. वडीलपुत्र नारायणशास्त्री त्याच्या पाठीवर लाडूबाई व चिमाबाई आणि सर्वात लहान म्हणजे बाळशास्त्री जांभेकर.

## बालपण

बाळशास्त्री जांभेकरांचा जन्म इ. स. १८१२ मध्ये गंगाधरशास्त्री जांभेकरासारख्या धार्मिक, सदाचारसंपन्न व व्युत्पन्न पुराणिकांचे पोटी झाला. शिक्षणाचा पिढीजात वारसा. सुशील आणि सुसंस्कारित घराणे यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुसंपन्न झाले. लहानपणीच संस्कृतभाषेची नाळ जोडल्यामुळे आणि प्रख्यात ग्रंथकारांच्या ग्रंथांशी संबंध आल्यामुळे त्यांनी विद्येत खूपच प्रगती केली. बाळशास्त्री हे एकपाठी असून त्यांची स्मरणशक्ती तीव्र होती. त्यामुळे त्यांची अध्यापक मंडळी व सहाध्यायी त्यांना 'बालबृहस्पती' म्हणत असत. लहानपणापासूनच त्यांची वृत्ती सात्त्विक असून त्याचे मन खेळण्यापेक्षा अभ्यासातच अधिक रमे. त्याकाळी पोंभुर्ल्यास शाळेची सोय नसल्यामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण वडिलांच्या सान्निध्यात घरगुती पद्धतीनेच झाले. बालबोध व मोडी लेखन-वाचन, व्यावहारिक अंकगणित, तोंडचे हिशेब, रामदास, तुकाराम, वामन, मोरोपंतादी प्रसिद्ध मराठी कवींच्या निवडक कविता, रामायण, महाभारत व पौराणिक कथा, मराठ्यांच्या इतिहासातील क्वचित उपलब्ध बखरी इत्यादी मराठी अभ्यास झाला होता. आठव्या वर्षी व्रतबंध होताच त्यांनी प्रसिद्ध संस्कृत स्तोत्रपाठ, वेदपाठ घेतले होते. वयाच्या बाराव्या-तेराव्या वर्षी तर अमरकोश, लघुकौमुदी, पंचमहाकाव्यासारखे संस्कृत ग्रंथांचे अध्ययन झालेले. न्यायशास्त्र व व्याकरणशास्त्र यामध्ये तर त्यांनी चांगलीच प्रगती केलेली.

## शिक्षण

इ. स. १८१८ साली पेशवाईचा अस्त झाला आणि साऱ्या भारतभर ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाला. नव्या राजवटीस नवीन तऱ्हेचा नोकरवर्ग तयार करणे आवश्यक असल्याने आणि प्रजेची मनोवृत्ती स्वकीय राजसत्तेस अनुकूल करून घेण्याच्या उद्देशाने २१ ऑगस्ट १८२२ रोजी मुंबईचा गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन

याने 'दि बाँबे नेटिव्ह स्कूल बुक अॅण्ड स्कूल सोसायटी' नावाची संस्था स्थापन केली. त्याकामी त्यावेळचे धनिक लोक, जहागिरदार इत्यादिकांचे सहकार्यही त्याने मिळविले. त्या शाळेचा कारभार जॉर्ज जर्व्हिस या हुषार इंजिनिअरकडे सोपविण्यात आला. एतद्देशीयांना त्यांच्या जन्मभाषेतून शिकविले असता पाश्चात्य विद्येचा अभ्यास अधिक सुगम होतो आणि इंग्रजी भाषेचे ज्ञान काही निवडक व होतकरू विद्यार्थ्यासच करून दिले असता ते स्वभाषेत ग्रंथरचना करून अधिक सुलभतेने स्वबांधवात ज्ञानप्रसार करू शकतील अशी त्याची शिक्षणप्रणाली होती. त्यामुळे त्याने देशी भाषेतील ग्रंथरचनेस पारितोषिक देऊन चालना दिली. त्यासाठी त्याने छापखाना घातला आणि त्यातून स्वत: व इतरांकडून लिहिलेली अनेक पुस्तके छापून काढली. त्याचबरोबर त्याने मुंबईमध्ये नवीन वळणाच्या चार देशभाषीय शाळाही काढल्या.

मुंबईमध्ये नवीन शाळांवर देखरेख करण्यासाठी त्यावेळचे विद्वान गृहस्थ सदाशिव काशिनाथ छत्रे व जगन्नाथशास्त्री क्रमवंत या दोघांची नेमणूक करण्यात आली. विद्याप्रसाराच्या कामी या दोघांनी खूपच कष्ट घेतले. त्यावेळी इंग्रजी शाळेत आपली मुले पाठविण्याचे पालकांना धैर्य होत नसे. कारण एल्फिन्स्टन साहेबांनी आपल्या शिक्षणविषयक योजनेत काही मिशनरी लोकांचे साहाय्य घेतले होते. त्यामुळे त्या शाळेत गेलेली मुले फसविली जावून कदाचित बाटतील अशी त्यांच्या आई–बापास भीती वाटत असे. प्रथमत: शिक्षणप्रसाराच्या कामात ही मोठीच अडचण होती. पण छत्रे आणि क्रमवंत यांनी न डगमगता शिकविण्याचा व लोकांची मने शिक्षण घेण्याकडे वळविण्याचा क्रम चालूच ठेवला. शिवाय त्यांनी बाहेर गांवाहून आपल्या ओळखीच्या तरुण व होतकरू मुलांना मुंबईत शिकविण्याकरिता आणले. कित्येकांना आपल्या घरीही ठेवून घेतले. त्यात बाळशास्त्री जांभेकर हेही होते. बाळशास्त्र्यांचे वडील गंगाधरशास्त्री अन् बापू छत्रे यांचे हितसंबंध असल्यामुळे बापू छत्र्यांच्या विनंतीवरून बाळशास्त्र्यांना मुंबईस शिक्षणासाठी आणले. शिवाय गंगाधरशास्त्र्यांचे थोरले जामात रामचंद्रशास्त्री जानवेकर यांची बापू छत्र्यांनी मराठी शाळा तपासणीस म्हणून नेमणूक करून घेतल्याने बाळशास्त्र्यांची बहिणीकडे राहण्याची आयती सोयही झाली.

### असामान्य धारणाशक्ती

बाळशास्त्री यांची त्यावेळची एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. त्यावरून ते किती विलक्षण बुद्धिमान होते व त्यांची स्मरणशक्ती किती तल्लख होती याची

कल्पना येऊ शकते. सन १८२४ च्या सुमारास ते प्रथम मुंबईस आले तेव्हा ते एका रस्त्यावर उभे असताना दोघा गोऱ्या शिपायांची मारामारी झाली व त्यासंबंधीची कोर्टात फिर्याद दाखल झाली. त्याविषयी झालेल्या चौकशीत या लहान मुलाची (बाळशास्त्र्यांची) साक्ष झाली. त्यावेळी बाळशास्त्र्यांना इंग्रजीचा गंध देखील नव्हता, तरी सुद्धा त्यांना त्या दोन गोऱ्या शिपायांची इंग्रजीत झालेली बाचाबाची अगदी बरोबर सांगितली. त्यावरून न्यायाधीशाला या मुलाच्या स्मरणशक्तीबद्दल मोठे कौतुक वाटले व त्यांनी शिक्षणखात्यातील मुख्य अधिकाऱ्याकडे त्याची शिफारस केली. याप्रमाणे बाळशास्त्र्यांचा इंग्रजी शिक्षणाचा योग जमून आला.

## प्राविण्य

बाळशास्त्री जांभेकरांना १८२६ मध्ये एकदम सोसायटीच्या शाळेत प्रवेश मिळाला. त्यावेळी जेमतेम पन्नास विद्यार्थी होते. रॉबर्ट मर्फी नावाचा हुषार आयरिश लष्करी तरुण त्या शाळेचा मुख्याध्यापक होता. त्याने दोन-तीन हुषार विद्यार्थ्यांना थोडे बहुत तयार केले होते व तेच त्याला शिकविण्याच्या कामी मदत करीत असत. मर्फीनंतर मेनवारींग यांची मुख्याध्यापकपदी नेमणूक करण्यात आली. मर्फीइतका तो हुषार नव्हता.

या शाळेमध्ये मुख्य भर इंग्रजीवर दिला जायचा. इतिहास, भूगोल व शास्त्रज्ञान यांचा थोडा बहुत परिचय होत असे. मराठी शाळेतल्यापेक्षा गणित मात्र इथे अधिक शिकवले जात नसे. बाळशास्त्री जात्याच बुद्धिमान व उद्योगी असल्याने सर्व विद्यार्थ्यांत ते अग्रगण्य असत. शिक्षकांचा तर त्यांच्यावर भारी लोभ असे. विद्यार्थी दशेतच ते गणिताध्यापक म्हणून महिना १५ रु. वर काम करू लागले. अवघ्या चारच वर्षात त्यांचे इंग्रजी शाळेतील शिक्षण संपले. परंतु एवढ्या अल्पावधीत त्यांनी कितीतरी विषय आत्मसात केले. भाषाज्ञान, गणित, इतिहास यात त्यांनी चांगलेच प्राविण्य मिळविले. आत्ताच्या एखाद्या पदवीधरास देखील भूषणास्पद होईल इतकी भाषाज्ञानात व इतिहासांत त्यांनी प्रगती केली होती. पदार्थविज्ञान, ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी विषय त्यांना फार आवडत. क्लिष्ट ग्रंथ वाचूनही त्यामध्ये त्यांनी यशस्विता संपादिली होती.

नेटिव्ह सेक्रेटरीच्या महत्त्वाच्या पदासाठी १७ वर्षांच्या तरुण बाळशास्त्रींनी सोसायटीचे सेक्रेटरी जर्व्हिस यांच्याकडे ३० फेब्रुवारी १८३० रोजी नोकरीसाठी

फड्याॅ इंग्रजीमध्ये सुरेख अर्ज केला. त्यामध्ये त्यांनी आपली स्वत:ची तयारी कोणत्या विषयात किती झाली हे स्पष्ट लिहिले आहे. त्या अर्जावरून त्यांना तेरा भाषा अवगत होत्या हे दिसून येते. मराठी, इंग्रजी व संस्कृत ह्या भाषांचे तर त्यांचे अध्ययन चांगले झाले होतेच. शिवाय त्यांनी गुजराथी, बंगाली व पारशी भाषांचे ज्ञानही आत्मसात केले होते. त्यावेळी मराठी इंग्रजी व्यतिरिक्त अन्य भाषा व उच्च प्रतीचे गणित हे विषय शिकवले जात नसतानाही अंकगणित, बीजगणित, भूमिती, महत्त्वमापन, लॉगरिथम्स् इत्यादी विषयात त्यांनी प्राविण्य संपादिले होते.

### अध्यापक

सन १८२९ मध्ये विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांनी एल्फिन्स्टन विद्यालयात प्रोफेसर आर्लिबार यांचे हाताखाली बाळशास्त्र्यांची असिस्टंट प्रोफेसरपदी नेमणूक केली; व पुढे आर्लिबार यांच्या जागेवर प्रोफेसर म्हणून नेमले. यापूर्वी एतद्देशीयांस हा मान मिळालेला नव्हता. बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रातील पहिले प्रोफेसर होत. यावेळी त्यांची पुरती विशीही ओलांडली नव्हती. इतक्या लहान वयात एवढ्या मोठ्या जबाबदारीच्या पदावर त्या जुन्या काळात एका एतद्देशीय माणसाची नेमणूक झाल्याचे हे एकमेव उदाहरण सापडेल. बाळशास्त्र्यांची हुशारी व कर्तबगारी पाहून स्वत: बापू छत्रे यांनाही सेवानिवृत्त व्हावेसे वाटले.

### नेटिव्ह सेक्रेटरी

बाळशास्त्री अल्पवयीन असल्यामुळे मार्च १८३० पासून रॉबर्ट कॉटन मनी यांनी 'डेप्युटी नेटिव्ह सेक्रेटरी' म्हणून त्यांची दरमहा ५० रु. पगारावर नेमणूक केली. परंतु बाळशास्त्र्यांची कार्यप्रवणता, बौद्धिक सामर्थ्य आणि सद्वर्तन अनुभवास येताच मार्च १८३२ पासून त्यांना एकदम १०० रु. दरमहा पगारावर बापू छत्र्यांच्या जागी पूर्णांशाने 'नेटिव्ह सेक्रेटरी' म्हणून नेमण्यात आले. त्यावेळी १०० रुपये मासिक वेतन म्हणजे पोक्त वयाच्या एतद्देशीय गृहस्थासही ही मोठीच गोष्ट होती. या शिक्षणसंस्थेत तत्कालीन मुंबईतील अत्युच्च युरोपियन अधिकारी, निष्णात प्रोफेसर, सर्वश्रेष्ठ पारशी, हिंदू व मुसलमान प्रतिष्ठितांचा समावेश असे. ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे विशीच्याही पूर्वी बाळशास्त्र्यांना त्यावेळी केवढी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती हे समजते.

नेटिव्ह सेक्रेटरी या नात्याने पत्रव्यवहारादि कारभारी कामाव्यतिरिक्त बाळशास्त्र्यांना शाळेत कांही अध्यापनही करावे लागत असे. शिवाय त्यांना भाषांतर समितीच्या उद्योगाकडेही लक्ष द्यावे लागे. जर्व्हिससाहेबांनी "A Treatise on the objects, advantages and pleasure of knowledge" - By Lord Broughum ह्या प्रसिद्ध शास्त्रीय पुस्तकाचे 'विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष' या नावाने भाषांतर करून १८२९ मध्ये ते छापून काढले. त्यावेळी बाळशास्त्र्यांनी ह्या उपक्रमास हातभार लावला होता. मनिसाहेबांनी तर जांभेकरांकडून 'नीतिकथा', 'सारसंग्रह' व गोल्डस्मितकृत इतिहासावरून 'इंग्लंड देशाची बखर' भाग १ व २ ही लहानमोठी पुस्तके तयार करवून घेतली. ह्यावरून बाळशास्त्र्यांनी आपल्या लहान वयातच मराठी ग्रंथ रचनेस आरंभ केला हे दिसून येते.

## युवराजाचे शिक्षक

अक्कलकोटकर भोसले हे सातारकर छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचे मांडलिक होते. राजपुत्र शहाजी भोसले यांना चांगले शिक्षण देण्याकरिता त्यांनी मुंबई सरकारकडे एका हुशार माणसाची मागणी केली. असा बुद्धिमान मनुष्य मिळणे त्याकाळी कठीण असल्यामुळे साहजिकच बाळशास्त्रींची दरमहा १२० रु. वर नेमणूक करण्यात आली. परंतु बाळशास्त्र्यांनी आपल्या मूळ पदावर येण्याचा हक्क राखूनच १३ डिसेंबर १८३२ रोजी साताऱ्यास श्रीमंत प्रतापसिंहांच्या पदरी नोकरी पत्करली. त्यावेळी दरबारचे रेसिडेंट कर्नल लॉर्डविक यांनी बाळशास्त्र्यांना श्रीमंतांच्या समक्ष जी स्वकर्तव्याची जाणीव करून दिली त्याची नोंद महाराजांच्या खास रोजनिशीत पुढीलप्रमाणे केलेली आढळते. 'रेसिडंटनी सरकार समक्ष त्यास सांगितले की, 'तुम्ही अक्कलकोटी शहाजीस फक्त विद्याभ्यास सिकवावा. बाकी राजकारणात पडू नये व तेथील लोक वाईट आहेत. त्यांचे ऐकून इकडील तिकडे व तिकडील इकडे असे काही करू नये व शहाजीस कोणी काही गैर शिकविले असता ते त्याचे मनात येऊ नये येवेसी तजवीज शहाजीस सिकवून त्याचे चित्त फीसीदी लोकाकडे लागू नये आसे करा इ.' (जांभेकर ग. गं./खंड १, १९५०, ११७)

बाळशास्त्र्यांचा जाती स्वभावच कोणतेही कार्य अतिशय दक्षतेने करण्याचा असल्यामुळे युवराज शिक्षकाचे मुख्य कर्तव्य त्यांनी अत्यंत समाधानकारक बजावले.

मुंबईतील भाषांतर समितीच्या कामासंबंधी ते जागृत असत. ह्यावेळी 'इंग्लंड देशाची बखर' भाग २ हे पुस्तक छापून काढले. त्याची मुद्रितेही तेच तपासत असत. आपल्या विविध विषयाचा व्यासंगही त्यांनी चालू ठेवला होता. संस्कृत अध्ययन व भारतीय ज्योतिषशास्त्र याकडे सुद्धा त्यांनी विशेष लक्ष दिले होते.

## असिस्टंट प्रोफेसर

सन १८२७ मध्ये माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन सेवानिवृत्त होऊन मायदेशी गेले. त्यावेळी त्यांच्या नावाने सार्वजनिकरित्या 'एल्फिन्स्टन प्रोफेसरशीप फंड' उभारण्यात आला. त्याच्या स्मरणार्थ अडीच लाख रुपये गोळा करून त्याचा विनियोग 'मुंबई शिक्षा मंडळी' च्या प्रौढ विद्यार्थ्यास पाश्चात्य वाङ्मय व शास्त्रे यांचे उच्च प्रतीचे शिक्षण देणे हा होता. त्यासाठी विलायतेतून विद्वान प्राध्यापकांना बोलावण्यात आले. १८३५ मध्ये प्रो. आर्लेबार हे गणित, विज्ञान शाखेचे मुख्य अध्यापक तर प्रो. जॉन हार्कनेस् इंग्रजी वाङ्मय, तत्त्वज्ञानशाखेचे मुख्य अध्यापक म्हणून एल्फिन्स्टन कॉलेजात रुजू झाले. त्यांना दरमहा ६०० रुपये वेतन आणि १०० रुपये घरभाडे मिळत असे. शिवाय १५० रुपयेवर एक व १०० रुपयेवर एक असे दोन 'असिस्टंट प्रोफेसर' मदतीस देऊन सहा जणांना शिष्यवृत्या देण्याची योजना आखली होती. परंतु वस्तुस्थिती अशी होती की, एल्फिन्स्टन स्कूलमध्ये उच्च वर्गातून जे शिक्षण मिळत होते त्यापलीकडे जाऊ इच्छिणारे विद्यार्थी तेव्हा जसे दुर्मिळ होते तसे असिस्टंट प्रोफेसर म्हणून चांगले काम करू शकतील असे बाळशास्त्र्यांव्यतिरिक्त अन्य तरुण विद्वानही मिळण्यासारखे नव्हते. त्यामुळे युरोपिअन विद्वान येण्यापूर्वीच १८३४ मध्ये अक्कलकोटच्या युवराजच्या गुरूपदाचे त्यागपत्र देऊन एल्फिन्स्टन कॉलेजात 'पहिले असिस्टंट प्रोफेसर' म्हणून बाळशास्त्री रुजू झाले. युरोपिअन विद्वान प्राध्यापकांच्या सहवासात राहून गणित, ज्योतिषशास्त्र यांच्या दृढ व्यासंगाने आणि परिश्रमाने लवकरच त्यांनी प्राविण्य संपादन केले. त्यांनी आपली योग्यता एवढी वाढवली की दरमहा १५० वरून ३०० रुपयेपर्यंत त्यांना वेतन मिळू लागले. अवघ्या पंचविशीत हा पराक्रम असामान्यच होता. ह्यानंतर आपल्या कॉलेजला विद्यार्थी मिळविण्यासाठी प्रो. आर्लेबार आणि प्रो. हार्कनेस् यांनी कोटात एक स्वतंत्र 'ज्युनिअर कॉलेज स्कूल' सुरू केले. त्या कॉलेजवर बाळशास्त्री जांभेकरांची प्रमुखपदी नेमणूक केली. ही कामगिरीही त्यांनी उत्तमरित्या पार पाडली.

### ॲक्टिंग प्रोफेसर

बाळशास्त्री जांभेकरांच्या अंगी अष्टपैलू विद्वत्व असल्यामुळे वाङ्मय व विज्ञान शाखेबरोबरच विविध विषय शिकविण्यात ते निष्णात होते. युरोपिअन बुद्धिमान अध्यापकांसमवेत शैक्षणिक कार्य करीत असताना त्यांचे कोणत्याही प्रकारचे उणेपण कुणालाही दिसून आले नाही. उलट पडेल ती जबाबदारी आनंदाने स्वीकारून त्यामध्ये नावलौकिक मिळविला. प्रो. आर्लेबार रजेवर गेले असता त्यांच्या जागी 'ॲक्टिंग प्रोफेसर' म्हणून त्यांनी दोन वर्षे काम पाहिले. अध्यापकाचे कार्य करीत असता कुलाबा येथील वेधशाळेचे चालकत्वही बाळशास्त्र्यांनी चांगले सांभाळले होते.

जांभेकरांच्या गणित व ज्योतिष या शास्त्रातील असामान्य कर्तृत्व दर्शविणाऱ्या गोष्टी उल्लेखनीय आहेत. पुण्याच्या विष्णुशास्त्री जोशींना गणित व ज्योतिष विषय मराठी शिकविणे भाग पडल्याने 'डिफरेन्शिअल व इंटीग्रल कॅलक्युलस'वर 'शून्यालब्धी व मूल परिणती गणित' मराठीमध्ये लिहून प्रसिद्ध केले. ही अपूर्व गोष्ट नवीन संस्कृत – मराठी परिभाषा योजून त्यांनी निर्माण केली. हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य. तसेच खगोलशास्त्रावरील दोन ग्रंथही त्यांनी आपल्या शिष्याकडून लिहवून घेतले. त्यामध्ये युरोपिअन नावाच्या तारांगणाना अनुरूप संस्कृतसंज्ञा त्यांनी योजल्या. इतकेच नव्हे तर गणित, ज्योतिष हे विषय शिकविण्याचे प्रयोग करून प्रो. आर्लेबार यांनी बाळशास्त्र्यांच्या साहाय्याने ' A course of pure and mixed Mathematics - Vol. I & II' नावाचा ग्रंथ लिहिला.

### ज्ञानमहर्षी

मुंबईबाहेरील जिल्ह्यातून सरकारी मराठी व इंग्रजी शाळांचा कारभार पाहण्यासाठी एल्फिन्स्टन कॉलेजमधील प्राध्यापकांनाच जावे लागे. जांभेकरांच्या वाट्याला हे शाळा तपासणीचे कामही आले. आजच्यासारखी दळणवळणाची साधने त्यावेळी नसल्याने विजापूर-रत्नागिरीसारख्या दुर्गम परिसरात पायी प्रवास करीत हे काम त्यांनी चार वर्षे केले. शिक्षणप्रसाराचे हे कार्य म्हणजे एक प्रकारची देशसेवाच म्हटली पाहिजे. जांभेकरांच्या प्रगल्भ बुद्धिमत्तेची आणि अथांग ज्ञानलालसेची छाप इंग्रजी अधिकाऱ्यावर व अध्यापकावर पडलेली होती. त्यांचा प्रामाणिकपणा, त्यांची

कर्तव्यनिष्ठा, त्यांची धडपड, तळमळ यामुळे जांभेकर इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनातील आदराचे स्थान होऊन बसले होते. म्हणूनच तर बाळशास्त्र्यांच्या म्हणण्यानुसार 'बोर्ड ऑफ एज्युकेशन'ने १८८५ साली 'अध्यापक वर्ग' काढण्याचे ठरविले. अध्यापक वर्गाची स्थापना करीत असताना १८४४ च्या इतिवृत्तात बोर्डाने काढलेले उद्गार बाळशास्त्र्यांचा सार्थ गौरव करणारे आहेत. ते म्हणतात, 'आम्ही संकल्पित अध्यापक वर्ग मुंबईतच काढून त्याचे मार्गदर्शित्व असिस्टंट प्रोफेसर बाळशास्त्री याजकडे सोपविण्याचे ठरविले.... ह्या योजनेने आम्हास अशी उमेद वाटते की, आमच्या एतद्देशीय प्रोफेसरांच्या अंगी जी थोर बुद्धिमत्ता व नानाविध पात्रता आहे तिला स्वतंत्र क्षेत्र उपलब्ध होऊन आपल्या देशबांधवांच्या मनावर इष्ट ते सुसंस्कार करण्यास त्यांना अधिक सामर्थ्य येईल. (जांभेकर ग. गं., खंड १, १९५०, १२३)

बाळशास्त्र्यांनी ज्ञानदानासाठी करता येतील तेवढे प्रयत्न केले. 'विद्या हे बळ आहे' असे सांगून पाश्चात्य लोक पुढारलेले का ? व आपण अजून त्यांच्यामागे का आहोत हे पटवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी पाश्चात्य व एतद्देशीय शिक्षणशतील फरक सांगितला. कित्येकांना त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या हाताखालून गेलेले कितीतरी शिष्य पुढे नावारूपाला आले. मुंबईसारख्या पुढारलेल्या शहरात विद्यार्थ्यांचे पाऊल भलत्या मार्गात पडू नये म्हणून बाळशास्त्र्यांनी आपल्याच घराजवळचा वाडा भाड्याने घेऊन त्यात विद्यार्थी वसतीगृह चालू केले. त्यांच्या ह्या परोपकारी वृत्तीमुळे त्यांचे कितीतरी शिष्य पुढे नावारूपाला आले. शिक्षणाच्या बाबतीत केलेल्या कार्यामुळे त्यांना 'महाराष्ट्राचे आद्य ज्ञानमहर्षी' असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये.

### वाङ्मयनिर्मिती

जांभेकरांचे ग्रंथलेखन हे त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याच्या अनुषंगाने आणि जर्व्हिससाहेबांच्या साहचर्याने विद्यार्थी दशेतच झालेले आहे. त्यांनी आरंभीच 'नीति कथा', 'सारसंग्रह', 'इंग्लंड देशाची बखर' भाग १ व २, 'भूगोल विद्या', 'गणित भाग', 'बालव्याकरण', 'भूगोल विद्येची मूलतत्त्वे', समीकरण विषयीची टिप्पणे, 'शून्यालब्धि गणित', 'मूलपरिणती गणित', 'हिंदुस्थानातील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास', 'हिंदुस्थानचा इतिहास' हे प्रकाशित झालेले ग्रंथ, तर 'मानसशक्ती विषयीचे शोध' हा ग्रंथ अपूर्णावस्थेतच लिहिलेला आढळतो. त्यांचे स्नेही राघोबा जनार्दन यांना 'मरे यांच्या इंग्रजी व्याकरणाचा संक्षेप' आणि विनायक शास्त्री दिवेकर व भाऊ

महाजन याना 'शब्दासिद्धि निबंध' ही पुस्तके लिहिण्याचे कामी बाळशास्त्र्यांनी मदत केली होती. त्या अनेक प्रकाशित ग्रंथांव्यतिरिक्त बीजगणित, भूगोल, मराठी व्याकरण इत्यादी विषयावर पुस्तके लिहिण्याचा त्यांचा विचार होता. त्यांनी एक 'इंग्रजी-मराठी धातुकोश' पूर्ण केला होता आणि 'शून्यालब्धि मूल परिणती' गणितावर एक विस्तृत ग्रंथ अर्धाअधिक रचला होता. मात्र दुर्दैवाने हे दोनही ग्रंथ काळाच्या पोटात गडप झाले. 'पुनर्विवाह प्रकरण' ह्या नावाची एक पोथीही त्यांच्या नावावर छापली गेली असून 'संध्येचे भाषांतर' त्यांनी हाती घेतले होते. त्यांचा महत्त्वाचा आणि शेवटचा उद्योग म्हणजे विविध पाठ नोंदवून केलेले 'ज्ञानेश्वरी' ह्या मौलिक ग्रंथाचे प्रकाशन होय.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या ग्रंथरचनेच्या पसाऱ्याकडे दृष्टिक्षेप टाकल्यास त्यांच्या बुद्धिमत्तेची कल्पना तर येतेच, शिवाय अष्टपैलू प्रतिभा व लोकोपकारक जीवननिष्ठा प्रत्ययास येते. अवघ्या सोळा-सतराव्या वर्षीच ग्रंथलेखनास आरंभ करून केवळ तेहतीस वर्षांच्या अत्यल्प आयुर्मर्यादेत नानाविध सार्वजनिक जबाबदारीची कामे उत्तम रितीने सांभाळून आधुनिक मराठी गद्याच्या प्रारंभकाळी त्यांनी ग्रंथरचनेची प्रचंड कामगिरी घडवून आणली होती यात वादच नाही.

**धार्मिक कार्य**

जांभेकर व त्यांचे कुटुंब वारकरी संप्रदायातलेच असले तरी जुन्यालाच चिकटून रहावे व दंभ माजवावा असे मात्र त्यांना वाटत नव्हते. त्यांचे धर्मासंबंधीचे विचार उदार व व्यापक होते. ते सकाळ-संध्याकाळ नित्यनियमाने संध्या वगैरे करीत असत. पण आपली धर्मकृत्ये त्यातील हेतू समजून घेऊन करावी. सत्य हे धर्मात कमी-अधिक प्रमाणात असते. त्यामुळे एका धर्माने दुसऱ्या धर्माचा द्वेष करू नये. होमहवन, व्रत-वैकल्ये यांचे प्रस्थ माजवू नये. धर्म हा अंत:करणाचा विषय आहे आणि तो आचरताना लोकांच्या स्तुती-निंदेकडे पाहण्याचे कारण नाही असे त्यांचे म्हणणे होते.

जांभेकरांनी धर्म-शुद्धीच्या कार्यातही धडाडीने भाग घेतला होता. नारायण शेषाद्री हा ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या शाळेमध्ये शिकत असता ख्रिस्ती धर्माच्या उत्साही व अविवेकी प्रचारामुळे त्याने ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला. त्याचा भाऊ श्रीपती शेषाद्री

हाही त्या शाळेत शिकत होता. नारायणाच्या मागोमाग श्रीपतीही धर्मभ्रष्ट होऊ नये म्हणून पाद्र्यांच्या कचाट्यातून सोडविण्यासाठी जांभेकरांनी व जगन्नाथ शंकरशेट यांनी पुढाकार घेऊन त्यांच्या वडिलांना पुढे केले आणि सुप्रीम कोर्टाकडून श्रीपतीचा मोठ्या शिकस्तीने ताबा मिळविला. पण त्यानंतर फारच संकट निर्माण झाले. श्रीपती ख्रिस्ती धर्मात गेला नव्हता. पण तो सत्तावन्न दिवस पाद्र्याच्या घरात राहिला होता. अभक्ष्यभक्षणाचे आणि अपेयपानाचे 'महापातक' त्याच्या हातून घडले होते. तेव्हा अशा भ्रष्ट मुलाला परत हिंदू धर्मात कसे घ्यावयाचे हा प्रश्न निर्माण झाला आणि त्यावर सनातनी मंडळीत दोन तट पडले. श्रीपतीला शास्त्रोक्त प्रायश्चित देऊन आणि शुद्ध करून स्वधर्मात घेता येईल हा पक्ष बाळशास्त्र्यांनी उचलला. त्याच्या उलट दादाजी धाकजी म्हणून पाठारे प्रभू पुढारी मुंबईला होते. त्यांनी, 'एकदा भ्रष्ट झालेला हिंदू शुद्ध करून स्वधर्मात घेण्यास शास्त्राची अनुज्ञा नाही', या बाजूचे समर्थन केले. बाळशास्त्र्यांनी खूपच खटपट करून धर्मशास्त्रज्ञांची परवानगी घेऊन श्रीपतीला पूर्वांग प्रायश्चित देऊन स्वधर्मात घेतले. या प्रकरणी बाळशास्त्र्यांना खूपच मन:स्ताप झाला. सनातन्यांनी त्यांच्यावर बहिष्कारही टाकला. शेवटी आपल्यामुळे समाजात फूट पडू नये म्हणून 'विष्णवे नम:' म्हणून प्रायश्चित घेतले. परंतु या प्रकरणातूनच हिंदू समाजातील सामाजिक सुधारणेचा 'श्रीगणेशा' झाला.

### सामाजिक कार्य

बाळशास्त्री जांभेकरांचा काळ हा युनिव्हर्सिटी स्थापनेच्या पूर्वीचा, जेव्हा शालोपयोगी पुस्तकेही उपलब्ध नव्हती तेव्हाचा. आगगाड्या, तारायंत्र व फोटोग्राफी हिंदुस्थानात येण्यापूर्वीचा काळ होता हे लक्षात ठेवले पाहिजे. बाळशास्त्र्यांच्या आयुष्याचा आरंभच समाजाचा मुलभूत व आद्य प्रश्न जो शिक्षण, त्याच्या प्रवर्तक संस्थेपासून झाला. पाश्चात्य संकट राजकीय व लष्करी उपायांनी उखडून टाकता येणार नाही, प्रथम आपणास पाश्चात्य संस्कृती, तिच्या शास्त्रीय अंगोपांगासहित जाणून घेतली पाहिजे असे जांभेकरांना वाटत होते. आपल्या देशाची व समाजाची स्थिती त्याकाळी अभिमानाच्या गोष्टी बोलण्याची नसून मागे पडलेल्या गोष्टी भरून काढण्याची होती. शास्त्राचे व जगाबद्दलचे अज्ञान हे आपल्या राष्ट्राचे दोन प्रमुख दोष काळाने वाढत आले होते. ते नाहीसे करण्यासाठी प्रथम शिक्षणप्रणाली सुधारणे, परदेशात जाऊन तेथील चांगल्या गोष्टी शिकून त्या आपल्या देशात आणणे, हा मार्ग

त्याकाळी चोखाळण्याचा होता. तो मार्ग स्वत:च्या चरित्राने बाळशास्त्री यांनी दाखवून दिला.

बाळशास्त्री आपल्या जुन्या विद्या आणि शास्त्रे व आधुनिक ज्ञान यातील फरक सांगताना म्हणतात – ''आपल्या जुन्या ज्ञानाचा मुख्य हेतू परमार्थसाधन हा होता, तर पाश्चात्यांच्या ज्ञानाचा हेतू इहलोकीची सेवा हा आहे. विद्या ही श्रीमंतास भूषण,गरिबांस पोटाचे साधन, तरुणास उत्तम उद्योग, वृद्धास विश्रांती आणि सर्वास मोक्षप्राप्तीचा उपाय होय.'' (शेजवलकर त्र्यं. शं., १९५९, ३१३) इंग्रजी राज्याबद्दल आपण कोणती वृत्ती धारण केली पाहिजे व त्याचा फायदा कोणत्या रीतीने करून घेतला पाहिजे यांचे कथन त्यांनी काया–वाचा–मने आणि लेखनातून केले. इंग्रजांच्या शेजारी उभे राहण्यास शास्त्रसत्तेने आपली पायरी चढेपर्यंत त्यांच्याशी आपले संबंध सलोख्याचे व गोडीचेच ठेवले पाहिजेत असे बाळशास्त्र्यांचे स्पष्ट मत होते. महाराष्ट्राच्या आणि मुंबईच्या अठरा पगड जातीत आत्मीयता निर्माण करण्याची मृदू वाणी व सौजन्य त्यांच्याजवळ होते. समाजातल्या सर्व तऱ्हांच्या घडामोडीत प्रत्यक्ष शिरून ज्ञान मिळविण्याचा व त्याद्वारे लोकसेवा करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. सर्वांशी मिसळल्यामुळे बाळशास्त्र्यांना संपूर्ण महाराष्ट्र समाजाचे ज्ञान झाले होते. त्यांच्या गरजांची खरी जाणीव झाली होती. शास्त्रज्ञान, भाषाज्ञान व लोकज्ञान अशी तिन्ही अंगे त्यांनी शक्य तितकी आत्मसात केली. आपल्या ज्ञानाचा आणि गुणांचा उपयोग समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस व्हावा असा त्यांनी हव्यास धरला. पाश्चात्य ज्ञानात आधुनिक महाराष्ट्राचा प्रवेश करून देण्याची पायाभूत कामगिरी त्यांनी केली. द्रव्यप्राप्तीला महत्त्व न देता समाजसेवा त्यांनी महत्त्वाची मानली. बाळशास्त्र्यांचे कोणतेही काम अडून राहिले नाही, की कोणत्याही कृत्यात जातीयता आडवी आली नाही. त्यांचे सहकारी हिंदू–मुसलमान, महाराष्ट्रीयन–कानडी–पारशी–गुजराथी–युरोपिअन अधिकारी एवढेच नव्हे तर विद्वान संशोधकांशीही त्यांचा घनिष्ठ संबंध आला.

### प्रबोधनाचे पुरस्कर्ते

बाळशास्त्री जांभेकरांनी जी सामाजिक व धार्मिक प्रकरणी महत्त्वाची कामगिरी केली. तिच्याविषयी सर नारायण चंदावरकर १९०१ मधील मुंबई प्रांतिक सामाजिक परिषदेच्या आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणतात, 'ह्या इलाख्यात ब्रिटिश अमदानींतील

हिंदू सामाजिक सुधारणेचा प्रारंभ गेल्या दशकात १८४० च्या आसपास झालेला असून बाळशास्त्री जांभेकर हे आमचे आद्य समाजसुधारक होत.'' (जांभेकर ग. गं., खंड १, १९५०, ११७)

बाळशास्त्री हे प्रबोधनाचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यासाठी १८४५ मध्ये राघोबा जनार्दन सारख्या उत्साही मित्राला उत्तेजन देऊन त्यानी 'बाँबे नेटिव्ह जनरल लायब्ररी' उघडली. मुंबईमधील हेच एतद्देशीयांचे पहिले सार्वजनिक ग्रंथालय. बाळशास्त्र्यांच्या लोकशिक्षणाचा आणखी एक उद्योग म्हणजे, 'नेटिव्ह इंप्रूव्हमेंट सोसायटी'ची स्थापना. पुढे बाळशास्त्र्यांच्या शिष्यांनी 'स्टुडन्टस् लिटररी ॲण्ड सायंटिफिक सोसायटी' नावाचे जे प्रसिद्ध ज्ञानप्रसारक मंडळ स्थापून लोकशिक्षणाचे व लोकसुधारणाचे कित्येक वर्षे काम केले ते मंडळ म्हणजे बाळशास्त्र्यांच्या पूर्वोक्त संस्थेचेच अपत्य होय.

बाळशास्त्र्यांचे सार्वजनिक कार्य, व्यक्तिमत्त्व, विद्वत्ता व चारित्र्य सर्वमान्य असल्याने सार्वजनिक सभांचे नेतृत्व नेहमी त्यांच्याकडेच असे. ह्याविषयी एक तत्कालीन गृहस्थ लिहितो, ''शास्त्री लोकांच्या व नवीन विद्वान लोकांच्या सभात त्यांस अध्वर्यूपणाचा मान मिळे. त्यांत ते प्रमुख कार्यभाग उचलीत व तसे करण्यास ते योग्य होते. इंग्रजीत त्यांची भाषणे अस्खलीत, उत्तम व चटकदार होत. संस्कृतांतही चांगले भाषण करण्याची शक्ती त्यांस आहे असे सर्वांच्या प्रत्ययास येई.'' (जांभेकर ग. गं. खंड १, १९५०, १३५)

अग्रगण्य एतद्देशीय विद्वान व लोकमान्य सार्वजनिक पुढारी म्हणून जांभेकरांची ख्याती झाल्यामुळे आणि शिक्षणाच्या कार्यात सरकारला सर्वांगीण सहकार्य केल्यामुळे, जनतेच्या हरएक महत्त्वाच्या प्रश्नावर इंग्रज लोक त्यांचे मत अधिकृत मानीत असत. बाळशास्त्र्यांवर इंग्रज धार्जिणे म्हणून आगपाखड झाली असली तरी इंग्रजांच्या सहवासात राहून त्यांच्या संस्कृतीसह त्यांच्या कला, ज्ञान आत्मसात करूनच आपणास प्रगतीपथाकडे घोडदौड करता येईल हा जांभेकरांचा स्पष्ट हेतू होता. सरकारचे सर्वच काही बरोबर आहे अशी मात्र त्यांनी कधीही भूमिका घेतली नाही. उलट सरकारी अधिकाऱ्यावर व कामकाजावर त्यांनी योग्य त्यावेळी आवाज उठविला. त्यांनी सरकारी कामातील दोषही दाखविले. शक्यत्या सुधारणा करवून घेतल्या. अध्यापकापासून वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत त्यांची घनिष्ठ मैत्री असल्यामुळे एतद्देशीयांच्या प्रश्नांची

उकल करण्यास त्यांना त्यांची खूपच मदत झाली. सरकारने तर जांभेकरांचा वयाच्या अठ्ठावीसाव्या वर्षी 'जस्टिस ऑफ द पीस' चा बहुमान देऊन गौरव केला. त्यामुळे मुंबईतील बड्या लोकात व सरकार दरबारी मोठा मानही मिळू लागला.

### आचार्य

एकोणीसाव्या शतकात शिक्षण, वाङ्मय, शास्त्रज्ञान, भारतीय पुराणेतिहास संशोधन व सार्वजनिक सामाजिक कार्य ह्या विविध क्षेत्रातून केवळ मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्र, गुजराथ व कर्नाटक ह्या प्रांतात ज्यांनी नावलौकिक मिळविला, त्यापैकी बहुतेकांवर त्यांच्या शिक्षणाचा व आदर्शाचा परिणाम झाला. त्यामध्ये रा. ब. दादोबा पांडुरंग, भाऊ महाजन, गोविंद नारायण माडगांवकर, नौरोजी फर्दूनजी, रा. सा. भोगीलाल प्राणवल्लभदास, नारायण दिनानाथजी, विनायक वासुदेवजी, रघुनाथ नारायण खोटे, रा. ब. नाना मोरोजी, डॉ. भाऊ दाजी, रा. ब. राम बाळकृष्णजी, डॉ. आत्माराम पांडुरंग, रा. बा. प्रो. केरो लक्ष्मण छत्रे, प्रो. दादाभाई नौरोजी या तरुण पिढीवर बाळशास्त्र्यांच्या अगाध पांडित्याची व अध्यापनपटुत्वाची छाप पडली होती. त्यांचे विमल चारित्र्य व सरलता याजबरोबर त्यांची शिस्त व कळकळ यांचा त्यांच्यावर चिरंतन ठसा उमटला. डॉ. दादाभाई नौरोजी यांनी वेसावा (मुंबई) येथून ११ मे १९०९ रोजी लिहिलेल्या आपल्या एका पत्रात सुमारे सत्तर वर्षांनंतर आपल्या गुरूवर्यासंबंधीची स्मृती पुढील शब्दात व्यक्त केली आहे. ''आपले गुरू म्हणूनच काय तो मी त्यांस ओळखतो आणि खरोखरच ते अतिशय बुद्धिमान, चतुर, सालस व सूज्ञ गुरू होते. आपल्या शिष्यांवर त्यांचे प्रेम असून त्यांच्याविषयी त्यांना कळकळ होती. आम्हाला त्यांच्या अष्टपैलू विद्वत्तेइतकाच त्यांच्या एकंदर चारित्र्यासंबंधी थोर आदर व कौतुक वाटे. व्यक्तिश: माझ्यावर त्यांचा विशेष लोभ असे आणि ते माझे नेहमी फार काळजी घेत. माझ्या आयुष्यातील एका महत्त्वाच्या घटनेचे त्यांस श्रेय असून त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे. माझ्याबद्दल वाटत असलेल्या कळकळीमुळे व मजसंबंधीच्या त्यांच्या अनुकूल मतामुळे मला शाळेतून कॉलेजात वाजवीपेक्षा लवकर घालण्यात आले. त्यांच्या अकाली निधनाने त्यांच्या छात्रवर्गास अत्यंत दु:ख झाले, आणि त्यामुळे केवळ आमच्या संस्थेचीच नव्हे, तर देशाची मोठी हानी झाली.' (जांभेकर ग. गं., खंड १, १९५०, १३७) डॉ. दादाभाई नौरोजींचा बाळशास्त्र्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयीचा आदर व अभिप्राय म्हणजे बाळशास्त्र्यांच्या हाताखाली शिकलेल्या सर्व तरुण पिढीचा अभिप्राय व आदर होय यात शंका नाही.

बाळशास्त्री हे केवळ तरुण पिढीच्याच प्रेमाला व पूज्य बुद्धीला पात्र झाले होते असे नव्हे, तर मुंबई शहरातील हिंदू, पारशी, मुसलमान, समाजधुरिणांनाही त्यांच्याविषयी आदर वाटत असे. त्यांच्याहून वयाने आणि अनुभवाने मोठी असलेली मंडळीही सार्वजनिक कार्यात त्यांचे मार्गदर्शन घेत असत. ह्यावरून आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे 'पश्चिम भारतातील नवयुगप्रवर्तक व आधुनिक महाराष्ट्राचे जनक' म्हणून संबोधले जातात यात वादच नाही.

## पत्रकारिता आणि जांभेकर

अग्रगण्य एतद्देशीय विद्वान आणि लोकमान्य सार्वजनिक पुढारी म्हणून बाळशास्त्री जांभेकरांचा लौकिक झाला. एतद्देशीयांना हरएक बाबतीत ज्ञान दिले पाहिजे, त्यांचे प्रबोधन केले पाहिजे यासाठी त्यांनी १८३१ च्या शेवटी एक नवीन महत्त्वाचा उद्योग हाती घेतला. इंग्रजी भाषेच्या व वाङ्मयाच्या अभ्यासाने आणि पुरोगामी मंडळीच्या सहवासाने त्यांच्या अंगी जसा बहुश्रुतपणा उत्पन्न झाला, तसाच त्यांचा स्वदेशाभिमानाचा स्फुलिंगही प्रज्वलित झाला. त्यामुळेच त्यांनी ज्ञानप्रसाराचे व लोकसुधारणेचे एक प्रमुख साधन म्हणून वृत्तपत्र काढण्याचा संकल्प केला. सर्व जगामध्ये पाश्चात्य राष्ट्रांची जी प्रगती झाली ती वृत्तपत्रामुळेच हे त्यांना उमजले होते. ज्ञान आणि विज्ञान यांचा पुरस्कार करणे, सार्वजनिक नीतिमत्ता सुधारणे, जनतेला त्यांची कर्तव्ये सांगणे, राज्यकर्त्यांच्या हुकूमशाहीला लगाम घालणे, हे सामर्थ्य वृत्तपत्राच्या अंगी आहे हेही ते जाणून होते. याशिवाय वृत्तपत्र काढण्याच्या मुळाशी बाळशास्त्र्यांची दुसरीही एक भूमिका होती. बंगाल प्रांत हा मुंबई प्रांताच्या आधी साठ-सत्तर वर्षे इंग्रजांच्या ताब्यात गेलेला होता. शिक्षणाच्या आणि देशी भाषेतील वृत्तपत्रांच्यामुळे बंगालमधील जनतेची केवढी प्रगती झालेली होती हे बाळशास्त्र्यांनी पाहिले होते. त्यामुळे नुसता शिक्षणाचा प्रसार करून चालायचे नाही हे त्यांनी ओळखले होते. कारण त्यावेळी जनताच अडाणी होती असे नाही तर विद्वान माणसेही अत्यंत प्रतिगामी आणि अनुदार वृत्तीची होती. सनातनी विचारांचे आणि आचारांचे प्रचंड दडपण समाजावर पडलेले होते. हा पगडा दूर केल्याखेरीज जनतेची प्रगती होणार नाही ह्याची बाळशास्त्र्यांना जाणीव होती. त्याचा स्पष्ट उल्लेख 'Liberty of Sentiment' ह्या शब्दात त्यांनी लेखात केलेला आहे. लोकांच्या भावना उदार झाल्या पाहिजेत, जीवनाकडे पाहण्याचा

त्यांचा दृष्टिकोन विशाल झाला पाहिजे ह्याबद्दल बाळशास्त्र्यांचा विशेष कटाक्ष होता. मुंबई प्रांतात देशी वृत्तपत्रे निघाल्यावाचून ही गोष्ट होणे अशक्य आहे, हे ओळखूनच त्यांनी आपले वृत्तपत्र सुरू केले.

जांभेकरांच्या पुढे इंग्रजी वृत्तपत्रांचा कित्ता होता. बंगाली वृत्तपत्रांची माहिती कानी पडत होती. तशातच पारशी लोकांच्या पुढाकाराने मुंबईमध्ये 'मुंबईना समाचार', 'मुंबई वर्तमान' ही गुजराथी प्रादेशिक वृत्तपत्रे सुरू झाली होती आणि ती बाळशास्त्र्यांच्या वाचनात येत होती. बाळशास्त्री हे बहुविद्यासंपन्न असल्यामुळे बंगालमधील बंगाली, इंग्रजी ही वृत्तपत्रे त्यांच्या नजरेतून सुटत नसत. बंगालमध्ये राजा राममोहन रॉयसारख्या अग्रणीने आपल्या विचाराच्या प्रसारासाठी आणि समाजप्रबोधनासाठी वृत्तपत्राची कास धरली होती. वृत्तपत्र निर्मितीच्या कामी जांभेकरांना बंगाली वृत्तपत्रेच प्रेरक ठरली. कारण बंगाली वृत्तपत्रात, गुजराथी वृत्तपत्रापेक्षा समाज प्रबोधनाचे दर्शन अधिक घडत असे. गुजराती वृत्तपत्रात व्यावसायिक भागावरच अधिक लक्ष केंद्रित केले जाई. उलट बंगाली वृत्तपत्रांना राजा राममोहन रॉयसारख्या व्यक्तीचा पुढाकार असल्याने ती अधिक ध्येयवादी होती. बाळशास्त्र्यांचा पिंडच ध्येयवादी आणि सुधारकाचा असल्यामुळे ग्रंथनिर्मितीप्रमाणेच वृत्तपत्र हेही ज्ञानप्रसाराचे एक अमोघ साधन आहे हे त्यांना मनोमनी पटले. म्हणूनच त्यांनी त्यांच्या इतर उपद्व्यापापैकी एक महत्त्वाचा असा वृत्तपत्रनिर्मितीचा खटाटोप केला.

### दर्पणकार

बाळशास्त्र्यांनी आपल्या वृत्तपत्राला 'दर्पण' हे नाव जाणीवपूर्वक योजले असावे. शिवाय बंगालमधील 'समाचार दर्पण' वरूनही हे नाव सुचले असावे. जांभेकरांना बंगाली भाषा अवगत असल्याने त्यांच्या वाचनात ती आल्याची शक्यता आहे. किमान त्या पत्राची त्यांना माहिती तरी असणार. अशातच १८३२ मध्ये मुंबईमध्ये 'दर्पण' नावानेच गुजराती साप्ताहिक काढण्याचे घाटत होते. या सर्व घटना 'दर्पण' या नामकरणामागे असाव्यात. बाळशास्त्र्यांच्या 'दर्पण' पत्रात इंग्रजी व मराठी असा मजकूर समोरासमोर येत असे. बंगालमधील 'समाचार दर्पण' ही १८२९ साली द्विभाषी झाले होते. इंग्रजी मजकूर व समोर त्यांचे बंगाली भाषांतर असा त्याचा साचा होता. बाळशास्त्र्यांच्या 'दर्पणा'त इंग्रजी मजकूर व समोर त्याचे मराठी भाषांतर असे.

'दर्पण'चा पहिला अंक शुक्रवार, ६ जानेवारी १८३२ रोजी बाहेर पडला. 'दर्पण' पत्राच्या उपक्रमाचे स्वरूप दर्शविणारी त्याची जाहीर घोषणा प्रस्ताव किंवा प्रॉस्पेक्टस् १२ नोव्हेंबर १८३१ रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. प्रस्तावात 'दर्पण' काढण्याचे मुख्य उद्दिष्ट, मराठी व इंग्रजी लेखनाचा हेतू, कोणता मजकूर येईल इत्यादी सर्व गोष्टी स्पष्ट करण्यात आल्या होत्या. तो प्रस्ताव असा –

''स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा, आणि या देशाची समृद्धी व येथील लोकांचे कल्याण याविषयी स्वतंत्रेने व उघड रीतीने विचार करावयास स्थळ व्हावे, या इच्छेने कित्येक मुंबईत राहणारे लोकांचे मनात आहे की, 'दर्पण' या नावाचे एक न्युसपेपर म्हणजे वर्तमानपत्र छापून प्रसिद्ध करावे... या देशचे लोकांत विलायती विद्यांचा अभ्यास वाढावा, तेथील ज्ञान प्रसिद्ध व्हावे असे नात्याने या वर्तमानपत्राचा उद्योग मुख्यत्वे आरंभिला आहे खरा, परंतु ज्यास इंग्रजी भाषा येते त्यांस मात्र याचा उपयोग असे न व्हावे म्हणोन योजिले आहे की, एक बाजूस इंग्रजी व एक बाजूस मराठी असावे, म्हणजे जे मराठी मात्र जाणतात त्या सर्वांसही याचा उपयोग होईल... मूळ विषय आणि भाषांतर समोरासमोर छापली जातील. दर्पणात जाहीर खबरा आणि विलायतचे व बंगालचे पत्रांचे काही काही अंश लिहिले जातील. तसेच या देशातील, विलायतेतील व दुसरे देशातील मोठ-मोठी वर्तमानेही लिहिली जातील. कोणी साहेब लोकांनी या देशचे लोकांनी हिंदुस्थानातील लोक, धर्म आणि विद्या यासंबंधी काही लिहून पाठविले असता, तेही दर्पणात छापले जाईल. तसेच विलायतेतील विद्या, कला कौशल्ये याविषयींचे लहान-लहान ग्रंथ लिहिले जातील असे गोष्टीपासून जिज्ञासू पुरुषास शोध करायाला, आणि विद्येत परिश्रम करणारांस विचार करावयास विषय मिळतील, परंतु जे शुद्ध मनोरंजन मात्र इच्छितात, त्यांचीही हृदये दर्पणामध्ये लहान लहान चमत्कारिक ज्या गोष्टी असतील त्यापासून संतुष्ट होतील. मनोरंजन करणे, चालते काळाची वर्तमाने कळविणे, आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे, या गोष्टींची दर्पण छापणारांस मोठी उत्कंठा आहे, म्हणून या गोष्टी साध्य होण्याविषयी जितका प्रयत्न करवेल तितका ते करतील. कोणा एकाचा पक्षपात किंवा नीचपणा या दोघांचा मळ या दर्पणास लागणार नाही. कारण की दर्पण छापणारांचे लक्ष्य निष्कृत्रिम आहे, म्हणोन

हे वर्तमानपत्र ज्या रितीने भले आणि गुणी पुरुषांस मान्य होईल त्या रितीने करण्यास ते दृढ निश्चयाने उपयोग करतील.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ३, ५) प्रस्तुतचा प्रस्ताव ६ जानेवारी १८३२ च्या पहिल्याच अंकात पुनर्मुद्रित केला होता.

'दर्पण' पत्रात इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांत मजकूर प्रसिद्ध होत असे. प्रथमपासूनच ही पद्धत होती. पानातील दोन स्तंभापैकी डावीकडच्या स्तंभात इंग्रजी मजकूर असे व त्याचेच भाषांतर उजवीकडच्या स्तंभातून देण्यात येत असे. असे प्रत्येक पानात दोन स्तंभ असत. पत्राचा आकार १९ x ११ ।। इंच असून दोन स्तंभी एकूण आठ पाने देण्यात येत असत. पत्राचा पहिला अंक मेसेंजर प्रेस नंबर १, काळबादेवी रोड, येथे कासवजी नावाच्या पारशी गृहस्थाने रघुनाथ हरिश्चंद्रजी यांच्यासाठी छापून प्रसिद्ध केला होता. पुढे 'दर्पण' कुरिअर प्रेसमध्ये श्रीकृष्ण जगन्नाथजी हे छापत असत. 'दर्पण'ची त्रैमासिक वर्गणी ६ रुपये होती, व अंकाला कागद म्हटल्याचेही आढळते. 'दर्पण'च्या खपाची संख्या वर्षभरातच ३०० च्या वर गेली. त्याकाळी साक्षर वर्ग अत्यंत मर्यादित आणि प्रत्यक्ष पैसे खर्च करून वाचणारा वर्गही त्याहून अल्प होता. शिवाय दळणवळणाच्या सुविधा नसल्यामुळे टपाल खर्चही बराच लागे. त्यामुळे 'दर्पण'ची आर्थिक स्थिती बेताचीच होती.

'दर्पण' प्रथम काही महिने पाक्षिकच होते. पण अनेक विषय पंधरा दिवसांनी लिहावयाचे म्हणजे शिळे होऊन जात, म्हणून वाचकांनीच पत्र साप्ताहिक करण्याची मागणी केली. ४ मे १८३२ च्या अंकापासून पत्राचे साप्ताहिकात रूपांतर करण्यात आले. दि. २७ एप्रिलच्या अंकात, 'दर्पण छापण्याचे रीतीत काही फेरफार' असे म्हणून स्पष्टीकरण दिले होते.

'आम्ही हा कागद वाचणारास कळवितो की, आमचे मनांत 'दर्पण' छापण्याचे रीतींत कांही फेरफार करायचा आहे. त्या फेरफारापासून हे पत्र घेणारांस संतोष होऊन त्यानी यथापूर्व आम्हास आश्रय द्यावा अशी आम्ही आशा धरीत आहो. दर पंध्रा दिवसांस एकवेळ छापायाचे सांप्रतचे रीतीमुळे आजपर्यन्त फार गैरसोई झाली. असे बहुत वेळ घडले की जी एकादी बातमी आम्हास केवळ टांकता येईना, ती गावांत प्रसिद्ध होऊन जुनी होईपर्यन्त आम्हास छापायास अवकाश सापडू नये, किंवा काही एक लिहायाजोगा विषय आमचे मनांत लिहायाचा असतां त्याचा रस गेल्यामुळे तो

आम्हास टाकून द्यावा लागला, तसेंच केव्हा केव्हा छापायाचे विषय इतके जमावे की, त्यांतून कांही तसेच न छापितां महिना महिना राहावे. हा कागद घेणारांतून कित्येकांनी तो दर आठवड्यास छापावा म्हणोन आम्हास विनंती केली आहे, आणि आम्हास वाटते कीं असेच सर्वांचे मनांत आहे. याकरिता आम्ही शेवटी दर आठवड्यास छापण्याचा बेत केला. पुढले शुक्रवारापासून हा कागद दर आठवड्यास छापिला जाईल. कागद घेणारांस पैका अधिक न पडतां ही गोष्ट व्हावी, म्हणोन कागदाचा सांचा बदलण्याचे जरूर पडेल, परंतु आशा धरितो की जो फेरफार योजिला आहे तो वाचणाराचे सोईस पडेल. आमचे मनांत आहे की पुढे दर्पण इंग्रजी न्युसपेपर छापतात तसे मोठे चिनई कागदावर छापावे, आणि तो कागद दुहेरी मोडावा असा की त्याची आठ पृष्ठे होतील. तशी पृष्ठे पंध्रा दिवसांचे कागदाची बारा छापली जातील व पुरवणी सारिखा जो पुढले आठवड्यात छापला जाईल त्याची आठ होतील. म्हणोन आतां हें पत्र घेणारांस या कागदाची आठ पृष्ठे मिळतात, ती पुढे वीस मिळतील. ती या कागदापेक्षे किंचित लहान होतील खरी, परंतु आमचे छापणाराचे आदमासावरून त्यांत सांप्रतचे १३ पृष्ठां इतका विषय छापला जाईल.' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ३९)

'दर्पण' हे वृत्तपत्र बाळशास्त्री जांभेकरांनी रघुनाथ हरिश्चंद्रजी व वासुदेव जनार्दनजी यांच्या साहाय्याने सुरू केले. पत्र प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी त्याच्या काही प्रती सरकारने आश्रयार्थ घ्याव्या, अशी विनंती करणारा अर्ज २ जानेवारी १८३२ रोजी करण्यात आला होता. या अर्जावरून बाळशास्त्री हे 'दर्पण'चे संपादक होते. रघुनाथ हरिश्चंद्रजी हे बाळशास्त्र्यांपेक्षा वयाने आठ वर्षे मोठे व मिलीट्रीतला हिशेब तपासणीचा अनुभव पाठीशी असल्याने ते पत्राची आर्थिक बाजू सांभाळीत. जनार्दन वासुदेवजी हेही ह्या दोघांचे शालेय जीवनातील अत्यंत हुषार मित्र होते. 'दर्पण' चे चालक 'एक दोन पैसेवाले नेटिव्ह गृहस्थ' होते असे दादोबा पांडुरंग यांनी म्हटले आहे. (प्रियोळकर अ. का. १९४७, १८७)

दर्पणची इंग्रजी बाजू बाळशास्त्रीच सांभाळत. 'दर्पण'ची मराठी बाजू कोण सांभाळीत असे याचा स्पष्ट उल्लेख कुठेच सापडत नाही. परंतु श्री. वि. सी. सरवटे, प्रा. गं. बा. सरदार आणि गं. दे. खानोलकर यांनी 'दर्पण'चे इंग्रजी मजकुराचे मराठीत भाषांतर भाऊ महाजन करत होते' असे म्हटले आहे. २ जानेवारी १८३२ च्या

सरकारकडे केलेल्या अर्जावर बाळशास्त्री जांभेकर, रघुनाथ हरिश्चंद्रजी व वासुदेव जनार्दनजी यांच्याच सह्या आहेत. भाऊ महाजन हे मराठी बाजू सांभाळणारे असले तर त्यांचे नाव त्यावर असणे आवश्यक होते. ''बाळशास्त्री यांच्या समकालीन (१८४० अगोदर) व्यक्तींमध्ये भाऊ महाजन यांचे नांव सांपडत नाही.... 'दर्पण' पत्राची मराठी बाजू सांभाळण्याशी रा. भाऊ महाजन यांचा काहीही संबंध नव्हता असे नि:संदिग्धपणे म्हणता येते. 'दर्पण' मधील मराठी भाषेचे वळण आणि भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' मधील मराठीची धाटणी यामध्येही फरक आहे.'' (जोशी वि. कृ., १९४६, २७)

बाळशास्त्री पोंभुर्ल्यास गेले असता १४ नोव्हेंबर १८३२ रोजी रघुनाथ हरिश्चंद्रजी यांनी त्यांना पत्र पाठवले होते. त्यामध्ये 'तुम्ही गेल्यानंतर प्रसिद्ध झालेले दोन अंक (दर्पणाचे) तुमच्याकडे पाठवीत आहे', असे रघुनाथ हरिश्चंद्रजी लिहितात. ''दर्पणाची इंग्रजी बाजू बाळशास्त्री हेच संपादित व लिहीत, ही गोष्ट निर्विवाद आहे. इंग्रजी बाजूचे मराठी भाषांतर कोण करी हाच काय तो प्रश्न आहे, आणि आरंभी तरी हे कामहि बरेचसे त्यांजकडे असे, असे ह्या पत्रावरून दिसते. त्यांच्या अनुपस्थितीत भाषांतर करण्याचे काम सांभाळीत असलेले 'नाना' व त्यांचे सहाय्यक 'विष्णुशास्त्री' हे कोणते नि:संदिग्धपणे सांगणे कठीण आहे, तथापि ही कामगिरी सुद्धा भाऊ महाजन यांजकडे नव्हती, हे ह्या पत्रावरून निर्विवाद सिद्ध होत आहे... पूर्वोक्त 'दर्पण' चालकापैकी दुसरे सही करणारे जे जनार्दन वासुदेवजी त्यांस कदाचित 'नाना' म्हणत असतील. (जांभेकर ग. गं., खंड ३, १९५०, ४०३) त्यामुळे 'दर्पण'ची मराठी बाजू सांभाळणारे भाऊ महाजन नाहीत. 'नाना'च असण्याची शक्यता उपलब्ध पुराव्यावरून अधिक दिसते. पण त्याची संपूर्ण माहिती मिळत नाही.

'दर्पण' हे केवळ मराठीतीलच आद्य वर्तमानपत्र नसून, एतद्देशीयांनी पश्चिम भारतात सुरू केलेले आद्य इंग्रजी पत्रही हेच होय. 'दर्पण' हे वृत्तपत्रापेक्षा मतपत्र अधिक होते आणि तरुण बाळशास्त्र्यांची इंग्रजी लेखनशैली सुबोध व आकर्षक असल्याने अल्पावधीत त्याचा चांगला बोलबाला झाला. दादोबा पांडुरंग आत्मचरित्रात सांगतात – ''बाळशास्त्री यांनी एक मोठें स्मरणीय काम केले.... शास्त्रीबाबांनी ते (दर्पणाचे काम) मोठ्या मनोत्साहानें कांही दरमहा न घेता.... पत्करिले... त्या वर्तमानपत्राने त्यांची मोठी कीर्ति वाढविली.'' (जांभेकर ग. गं., खंड ३, १९५०,११७) म्हणूनच आजही 'मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक' म्हणून ते मराठी लोकांच्या डोळ्यासमोर राहतात.

बाळशास्त्र्यांनी 'दर्पण' पत्र मोठ्या स्वार्थत्यागाने व ध्येयाने सुमारे साडे आठ वर्षे चालविले असले तरी ते १ जुलै १८४० पासून बंद करावे लागले. त्यावेळी त्यांनी २६ जून १८४० रोजी 'शेवटचा निरोप'ही घेतला. पत्राला समर्थ अशी व्यावसायिक पाठराखण नसल्यामुळे कदाचित ते बंद करावे लागले असावे. 'दर्पण' पत्र बंद करण्यापूर्वीच सुमारे वर्षभर 'दिग्दर्शन' नावाचे मराठी मासिक सुरू झाले होते. त्याचे संपादक बाळशास्त्री जांभेकरच होते. 'दिग्दर्शन' हे केवळ मराठी भाषेतील आद्य मासिक नसून तत्पूर्वी पश्चिम भारतातील इतर देशभाषातही अशा प्रकारचा उपक्रम कोणी केलेला नव्हता. ह्या मासिकात बातमीचे सार, भूगोल, इतिहास, पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र व साधारण विद्या याविषयी थोडा थोडा मजकूर, दुसऱ्या ग्रंथातून घेतलेला किंवा नवा लिहून छापला जाई. हे पुस्तक महिन्यातून एकदा प्रकाशित होत असे. २४ ते ३२ पानामध्ये ज्ञानशाखांचे सुबोध ज्ञान करून देणे व लोकशिक्षण घडवून आणणे हाच या मासिकाचा उद्देश होता. हे मासिक जवळ जवळ चार वर्षे चालले व नंतर बंद पडले.

आपल्या विद्वज्जन्य कर्तृत्वाने बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीतच नव्हे तर महाराष्ट्राच्या वैचारिक प्रबोधनामध्ये 'दर्पण' द्वारा मोलाची भर घातली. म्हणूनच त्यांना 'पश्चिम भारतातील नवयुगप्रवर्तक व आधुनिक महाराष्ट्राचे जनक' म्हणून संबोधले जाते. परंतु या थोर महापुरुषाचा सहवास मात्र दीर्घकाळ देशाला लाभू नये हे दुर्भाग्यच ! १७ मे १८४६ साली त्यांचे अल्पशा आजाराने देहावसन झाले. भारताचे पितामह म्हणून संबोधले जाणारे दादाभाई नौरोजी यांनी आपल्या गुरूविषयी-जांभेकरांविषयी 'पश्चिम भारत खंडातील अर्वाचीन विद्वन्मुकुटमणी', 'प्रख्यात पंडित', 'अद्वितीय विद्वान' अशा शब्दात त्यांच्या गुणाबद्दल आणि कर्तृत्वाबद्दल आदराने लिहिले आहे. विष्णु नरसिंह जोशी सारख्या ज्योतिष गुरूने जांभेकरांच्या निधनानंतर काढलेले पुढील उद्‌गार अधिक समर्थक वाटतात. ''शिकवण्यास शास्त्रीबाबासारखा मनुष्य मिळणे कठीण. आणि त्या पुरुषाचे सौजन्य वगैरे बहुतच गुण व अनंत विद्या आणि विशाल बुद्धी ही पाहून परमानंद होतो. सारांश आजपावेतो असा पुरुष प्राय: जाहला नसेल.'' (जांभेकर ग. गं., खंड ३, १९५०, १२१)

***

प्रकरण तिसरे

# दर्पण : सामाजिक अभ्यास

बाळशास्त्री जांभेकरांची अष्टपैलू बुद्धिमत्ता, समाजोद्धाराची दृष्टी आणि स्वदेशोन्नतीची आत्यंतिक कळकळ, त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक अशा विविध क्षेत्रांतील त्यांनी केलेल्या लेखनावरून स्पष्ट होते. जीवनविकासाचे आणि सामाजिक उन्नतीचे प्रमुख साधन म्हणजे शिक्षण असे त्यांना प्रथमत:च जाणवले होते. इंग्रजी राज्यकर्त्यांचे उदाहरण त्यांच्यासमोर होते. म्हणून सर्वांगीण जीवन विकासासाठी शिक्षण ही त्यांना गरजेची गोष्ट वाटली आणि त्याचा त्यांनी पुरस्कार केला. 'विद्या हे बळ आहे' असे सांगून त्यांनी सत्य, नीति, सदाचार, उद्योगपरता या मूल्यांच्या संदर्भात समाजाला उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला. शिक्षकांद्वारे सामाजिक जागृती होऊ शकेल अशी जांभेकरांची श्रद्धा असल्यामुळे नवीन शिक्षक घडविण्यासाठी त्यांनी 'नॉर्मल स्कूल'ची स्थापना केली. अज्ञानात बुडालेल्या समाजाला ज्ञान देण्यासाठी जे जे मार्ग अवलंबिता येतील ते ते मार्ग त्यांनी अवलंबिले. समाजात असलेल्या तत्कालीन रूढी, परंपरा, अंधश्रद्धा व समजुती यांवर त्यांनी प्रहार केला. विधवाविवाह बंदीसारख्या दुष्ट रूढीविरुद्ध त्यांनी आवाज उठविला व लेखणीही चालविली. स्त्री-पुरुष भेद न मानता स्त्रियांना देखील शिक्षण देऊन जागृत केले पाहिजे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. ग्रहणाचेवेळी सुतक पाळणे, दानधर्म करणे या समजुती वेडगळ व अज्ञानजन्य कशा आहेत हे त्यांनी गणित, खगोल व ज्योतिषशास्त्राच्या आधारे व्याख्याने देऊन सांगितले. तसेच इंग्रजी राज्याचे संकट राजकीय व लष्करी उपायांनी आता उखडून टाकता येणार नव्हते. प्रथम आपण पाश्चात्य संस्कृती तिच्या शास्त्रीय अंगोपांगासहित समजून घेतली पाहिजे व त्या योगे आपल्या देशाचा विकास केला पाहिजे ही बाळशास्त्र्यांची धारणा होती. शास्त्राचे व जगाबद्दलचे अज्ञान हे आपल्या राष्ट्राचे प्रमुख दोन दोष काळाने वाढत आले होते. शिक्षणानेच आपल्या देशाचे मागासलेपण दूर करता येईल हे बाळशास्त्र्यांना जाणवले होते. शाळांची निर्मिती करून, पाश्चात्य शिक्षणाची कास धरून, परदेशात जाऊन

तेथील चांगल्या गोष्टी शिकून आपण शहाणे झालो पाहिजे. तरच आपल्या देशातील अंध:कार आणि दारिद्र्य हटेल, असे बाळशास्त्र्यांनी कृतीने आणि उक्तीने दाखवून दिले. बाळशास्त्र्यांनी सुरू केलेल्या 'दर्पण' या नियतकालिकातील लेखनावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि विचारांचे दर्शन घडते.

## दर्पण

बाळशास्त्र्यांच्या आयुष्याचा आरंभ समाजाचा मुलभूत व आद्य प्रश्न जो शिक्षण त्याच्या प्रवर्तक संस्थेपासून झाला. त्यामुळे शैक्षणिक बाबतीत त्यांना जेवढे करता येईल तेवढे त्यांनी केले. समाजजागृती आणि शिक्षणप्रसार यांसाठीच तर त्यांनी 'दर्पण' पत्राची निर्मिती केली. पाश्चात्य विद्यांचा, नव्या ज्ञानाचा लोकांना परिचय करून द्यावा, त्यांचा अभ्यास व्हावा व त्याद्वारे देशाची उन्नती आणि कल्याण व्हावे अशा हेतूनेच 'दर्पण'चा प्रपंच मांडण्यात आला होता. 'दर्पण' पत्र सुरू झाले तेव्हा वृत्तपत्रांचा प्रसार, विशेषत: भारतीय भाषांतील वृत्तपत्रांचा प्रसार, फारसा झाला नव्हता. त्यामुळे बातम्यांपेक्षा लोकांना काहीतरी सांगण्याला, समजावून देण्याला अधिक महत्त्व होते. जनतेला ज्ञान देऊन प्रबोधन करणे हा 'दर्पण'चा जन्महेतूच होता. जनता जुनी होती पण राजवट नवी होती. तिने प्रचलित केलेले शिक्षण, कायदेकानू नवीन होते. म्हणून जनतेला मार्गदर्शनाची आवश्यकता होती. नियतकालिकाचे स्वरूप, सामर्थ्य आणि पद्धती यांची एतद्देशियांना माहिती नव्हती. मुंबईबाहेरच्या मुलुखात तर ही गोष्ट विचारातच आली नव्हती. नियतकालिकाचा प्रकार आपल्याकडे प्राचीन काळी शोधूनही सापडणार नाही. तो नवा प्रकार समजून देण्यासाठी, छापखान्याची माहिती देण्यासाठी आणि नियतकालिकांपासून जे फायदे होतात, त्याविषयीची चर्चा ६ जानेवारी, १८३२ च्या 'दर्पण'च्या पहिल्याच अंकात केली होती. 'जा देशातून आपले सांप्रतचे शककर्ते एथे आले, त्या देशात ते एथे आल्याचे पूर्वी फार दिवसांपासून या आश्चर्यकारक छापयंत्राची कृत्ये चालू होती, त्यांपासून मनुष्यांचे मनांतील अज्ञानरूप अंधकार जाऊन त्यावर ज्ञानरूप प्रकाश पडला... जा जा देशामध्ये अशे लेखांचा प्रचार झाला आहे, तेथे तेथे लोकांचे आंतर व्यवहारांमध्यें तसेंच बाह्यव्यवहारांमध्ये शाश्वत हित झालें आहें. यांपासून बहुत वेळ विद्यांची वृद्धि झाली आहे. लोकांमध्ये नीति रूपास आली आहे. केंव्हा केंव्हा प्रजाना राजाचे आज्ञेत वर्तावे आणि राजानीही त्यांवर जुलूम करूं नये अशा गोष्टी यांपासून घडल्या आहेत.

अलीकडे कित्येक देशात धर्मनीति आणि राज्यनीति यांत जे चांगले आणि उपयोगी फेरफार झाले आहेत त्यांसही थोडे बहुत हे लेख उपयोगी पडले आहेत.' (जोशी वि. कृ., सहस्त्रबुद्धे श्री. म., १९४६, ३)

नियतकालिक हे ज्ञानप्रसाराचे अमोघ साधन आहे. त्यामुळे लोकांमध्ये आचारसंहिता वाढण्यासाठी, व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यासाठी, राजांच्या अन्यायाला पायबंद घालून जनतेचे कल्याण करण्यासाठी, विद्येच्या वृद्धीसाठी, आणि समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पाश्चात्य राष्ट्रात नियतकालिकांचे लेखन उपयोगी पडलेले आहे असे 'दर्पण'कारांनी म्हटले आहे. 'लोकस्थिती, धर्मरीती आणि उपयोगी फेरफार घडवून आणणे' हे नियतकालिकाचे कर्तव्य आहे अशी त्यांची धारणा होती. या बाबतीत त्यांच्या डोळ्यासमोर पाश्चात्य विद्येच्या प्रभावाने जागृत झालेला बंगाल प्रांत आणि त्यांचे नेते राजा राममोहन रॉय हे होते. पहिल्याच अंकात म्हटले आहे, 'विद्येपासून आणि सरळ बुद्धीपासून जी फळे होतात त्यांचे यथार्थ ज्ञान युरोपियन लोकांशी बहुत दिवस सलगीचें संघट्टन पडल्यामुळें बंगालचे लोकांस झालें आहे. या गोष्टी त्यांचे मनात पक्केपणी ठसून त्यानी स्वदेशीय लोकांचे विद्याभ्यासाकरितां प्रयत्न केले, आणि ते त्यांचे यत्न सफल झाले, तेथे विद्या, वाढण्यास आणि सरळ बुद्धि होण्यास कारणे मुख्यत्वे करून दोन, एक सर्व विद्यालय म्हणजे सर्व विद्यांची शाळा, आणि दुसरें तेथे जी बहुत तद्देशीय वर्तमानपत्रे छापून प्रसिद्ध होतात तीं. बरे असेच उपाय एथे केले तर अशीं फळे न होतील कीं काय ?' (जोशी वि. कृ., सहस्त्रबुद्धे श्री. म., १९४६, ४, ५)

बाळशास्त्र्यांनी बंगाल प्रांतातील पुढारलेपणाचे उदाहरण देऊन आपणही विद्येची कास धरून मुंबई प्रांताला प्रगतीकडे न्यायला हवे अशी पहिल्याच अंकात त्यांनी एतद्देशीयांना जाणीव करून दिली आहे. तसेच आपल्या मुलांना शिकविण्यासाठी फार चांगली मंडळी येथे आली आहे. एल्फिन्स्टनही आपल्याकडे विद्यांचा प्रसार करण्यासाठी येणार आहे. त्यामुळे 'दर्पण'कारांनी 'विद्या व्यवहाराचे द्वार' असे एक वर्तमानपत्र सुरू व्हायला हवे, जेणेकरून एतद्देशीयांना विद्येची परिपूर्ण माहिती देऊ शकेल, अशा स्वरूपाची अपेक्षा व्यक्त केली आहे. नियतकालिकांपासून जवळच्या व दूरच्या प्रदेशातील घटना समजतील, विद्यांपासून उत्पन्न होणारे विचार समजतील, लोकांना उद्योगी बनवता येईल, त्यांची जिज्ञासू वृत्ती वाढीस लावता येईल आणि एकंदरीत

देशाच्या प्रगतीस नियतकालिक फार उपयोगी पडू शकेल अशी बाळशास्त्र्यांची विचार प्रणाली होती.

त्यावेळी पुस्तकांचा, वृत्तपत्रांचा आणि शाळांचा प्रसार झालेला नसल्यामुळे अल्प किंमतीत वृत्तपत्र देऊन जी काही वाचणारी मंडळी आहे त्यांचे व त्यायोगे समाजाचे मतपरिवर्तन करण्याचा आणि त्यांना शिक्षणाभिमुख बनविण्याचा प्रयत्न 'दर्पण'कारांचा होता. पाश्चात्य विद्येचे ज्ञान एथील लोकांना मिळावे म्हणून प्रयत्न केला जात होता. ''एल्फिन्स्टनने तर 'शिक्षा मंडळी'ची स्थापना करून चांगल्या विद्येची मूळ पुस्तके या देशात निर्माण करणे, शाळा काढून लोकांना उपयोगी विद्या शिकविणे, हा उपक्रम चालू केला आहे. त्यामुळेच मुंबई प्रांतातील ५६ शाळांत ३,००० मुले शिक्षण घेत आहेत. मुंबई प्रांतातील शाळा तर फार चांगल्या वाढल्या असून प्रत्येक शाळात १२५ मुले आहेत. त्यामुळे इंग्रजांचा हा ज्ञानदानाचा प्रयत्न सफल होत असून एतद्देशीयांनी त्यांना मदत करावी आणि स्वत:चा विकास करावा असे आवाहनही 'दर्पण'कार करतात.

### विद्या – शिक्षण

'दर्पण'कार विद्याविषयक विचार पटवून देत असताना मोठमोठ्या विद्वानांची उदाहरणे आणि त्यांच्या वक्तव्याचे दाखले देतात. 'विद्या हे बळ आहे' हे लॉर्ड बेकनचे उद्‌गारच आपल्या लेखाला बाळशास्त्र्यांनी शीर्षक दिलेले आहेत. म्हणून जांभेकर म्हणतात, 'या वाक्याचा खरेपणा या काळात स्पष्टपणे दिसून येतो. विद्येचा प्रकाश मुळातच पूर्व देशातून पश्चिम देशावर पडला हे सिद्ध झाले आहे. हजारो वर्षांपासून इथल्या लोकांना विद्येची मूळ स्वरूपे माहीत होती. म्हणूनच आज युरोप खंडात कला–कौशल्ये भरभराटीस आली आहेत. परंतु या देशामध्ये इतकी वर्षे गेली तरी त्यांची वाढ झाली नाही. विद्येचे प्रमुख उपयोग येथील लोकांना समजलेच नाहीत. कारण या देशातील विद्वान लोकांनी न्याय व वेदांत या शास्त्राकडे जेवढे लक्ष दिले, तेवढे लक्ष भौतिक विद्यांकडे व कला–कौशल्याकडे दिले नाही. विद्या ही फक्त धर्माच्या उपयोगी आहे. तिचा उपयोग मानवाच्या व्यवहारी जीवनात कांहीच नाही, असे आपल्या प्राचीन विद्वानांचे मत होते. त्यामुळे इतिहास, भूगोल, विज्ञान यांकडे येथील लोकांनी दुर्लक्ष केले. पाश्चात्य लोक भौतिक विद्यांमध्ये पारंगत आहेत, म्हणून ते आमच्यापेक्षा पुढे आहेत आणि आम्ही मात्र त्यांच्यापेक्षा खूपच मागे आहोत.

काळ जसा बदलत जातो, तस-तसे जुन्या चाली-रीति सोडून, नव्याचा स्वीकार आपोआप होत जातो. या देशाच्या स्थितीत इंग्रज आल्यापासून गेल्या वीस वर्षांत मोठा बदल घडून आला आहे आणि हे आपल्या देशास आवश्यकच आहे. म्हणून या देशातील लोकांनी आपले लक्ष संसारोपयोगी कला-कौशल्याकडे द्यावे. त्याचा व्यवहारात उपयोग कसा होतो हे प्रथमत: शिकावे. पाश्चात्य लोक आमच्या पुढे का ? आणि आमची दुर्दशा का झाली ? याची कारणे शोधावीत, आपल्यातील दोष काढून आपल्या उन्नतीचे मार्ग स्वीकारावेत, यासाठी लॉर्ड ब्रहमचे पुढील उद्‌गार दिलेले आहेत. 'विद्येचे व्यवहारातील उपयोग मोठ्या कामाचे आहेत आणि आपले ज्ञान वाढविल्याने द्रव्य मिळण्यात आणि सुखात कांही स्वार्थ होणार नाही, असा मनुष्य कोणी नाही.'

बाळशास्त्र्यांनी एकूण शिक्षणालाच अनुलक्षून 'विद्या' हा शब्दप्रयोग त्या काळात केलेला आहे. त्यामध्ये भूगोल, इतिहास, विज्ञान, भाषा आणि साहित्य इत्यादी सर्व शास्त्र व कला यांचा समावेश होतो. अनेकविध ज्ञानशाखांची त्यावेळी नुकतीच ओळख होऊ लागली होती. आपल्याकडे ह्या ज्ञानशाखा अपरिचित होत्या. त्यामुळे एकंदरीत सर्वच ज्ञानाला त्यांनी 'विद्या' ही संज्ञा वापरली.

हिंदुस्थानची संस्कृतीच मुळात कृषीप्रधान,स्थितीशील, अंधश्रद्धाळू आणि दैववादी असल्यामुळे शिक्षणासारख्या नव्या गोष्टीचा अंगीकार करायला येथील लोक आपणहून येणे शक्य नसल्याने, त्यांचे मनपरिवर्तन करून नवकार्यास प्रवृत्त करणे, हे जांभेकरांनी महत्त्वाचे मानले. विद्वानांची मते, इंग्रजी वृत्तपत्रांच्या प्रगतीनिर्देशक बातम्या त्यांनी येथील जनतेसमोर 'दर्पण'मधून मांडल्या. कलकत्यातील 'रिफार्मर' वृत्तपत्रातून विद्येविषयक स्पष्ट केलेले संपादकाचे मतही जांभेकरांनी पुढीलप्रमाणे उद्‌धृत केले आहे. विद्येमुळे देशात श्रेष्ठपणा येतो असा त्याचा मतितार्थ आहे.

'आता समय असा आला आहे कीं, सर्व राज्यांतील लोकांनी सज्ञान दशेस चढावें, किंवा तिरस्कार आणि दु:ख यांत पडावें, या काळात संपत्ति म्हणजे सज्ञानपणा आणि विद्या व कला यांचा अभ्यास, म्हणजे ती यापासून प्राप्त होत्ये, असें झाले आहे. परंतु सांप्रत संपत्ती आणि विद्या यांचा परस्परसंबंध साधारण पाहाणाराचे दृष्टीसही उघड येतो. विलायतेंतील लोकांमध्ये विद्येचा प्रसार झाला, त्यामुळें त्या देशास किती श्रेष्ठपणा प्राप्त झाला, याचाच आम्ही विचार करून पाहूं. विलायतेंतील

जा चमत्कारीक यंत्रांनी द्रव्य मिळण्यास उपाय बहुत झाले आहेत, त्या यंत्रांस मूळ कलाकौशल्यांची वृद्धि, विलायतेसारिखे लहान आणि दूर देशचे लोकांनी येऊन विलायतेपेक्षेंही मनुष्यांचे संपत्तीविषयी चांगलें हें राज्य घेतले, आणि रक्षण केले, हे सामर्थ्य त्यांस विद्येनें आलें नव्हे ? बरें असेच हिंदुस्थानचे लोक पुढे कोणत्ये वेळेस विलायत घेतील. ही कल्पना असंभाव्य स्वप्नासारिखी वाटत्ये याचे कारण काय ? याचे कारण हिंदुस्थानचे लोकांपेक्षें विलायतेचे लोकांत विद्या फार आहे हें नव्हे काय? विलायत देश या देशापेक्षे, आणि दुसरे बहुत देशांपेक्षे श्रेष्ठता पावला आहे, याचें कारण विद्येचें सामर्थ्य नव्हे काय ? असें असतांही आमचे द्रव्यवान मित्र अशे अखूड दृष्टीचे आहेत की, ते इंद्रियांची हजारो मलिन सुखें ज्ञानाचे स्वार्थापेक्षें चांगली मानितात, ते आपली संपत्ति व जमविलेलें द्रव्य फार वेडेपणाचे खेळांत घालवितात, परंतु विद्येचे कामासाठी एक पैसाही खरचीत नाही. अशा साधारण गोष्टी लिहिल्या असतां, त्यांचे विरुद्ध कोठे आढळतें, म्हणून आम्ही कबूल करायास सिद्ध आहों की, या स्तुत्य उद्योगांस आपल्या सामर्थ्यांप्रमाणें मदत करणारे आमचे लोकांत बहुत आहेत. या थोड्यांची आम्ही गोष्ट लिहिली नाही, परंतु आमचे लोकांतून जा बहुत करून लोकांचे डोळे विद्येचे स्वार्थाविषयी आजून झांकले आहेत असे वाटतें, त्यांची लिहिली.' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ५६, ५७)

ब्रिटिशांच्या उदार धोरणामुळे हिंदुस्थानात शाळा निघत होत्या. हे चित्र जांभेकरांच्या दृष्टीने उत्साहवर्धक होते. म्हणून शिक्षणाच्या चळवळीला धनिक लोकांनी आर्थिक सहाय्य करावे आणि हे कार्य नेटाने चालू ठेवावे म्हणून 'दर्पण'मधून आवाहनही केलेले आढळते. जग खूप मोठे आहे. इंग्रजी शिक्षण ही त्या जगाकडे पहायची खिडकी आहे. तेव्हा हे इंग्रजी शिक्षण आत्मसात करा असे बाळशास्त्र्यांनी आवर्जून सांगितले. एतद्देशियांना आपल्या भाषेव्यतिरिक्त, प्रांताव्यतिरिक्त काहीच माहीत नसते. दुसऱ्या परिसराचा, देशाचा आणि भाषेचा अभ्यास ते करीत नाहीत. त्या गोष्टी जाणून घेत नाहीत हीच एतद्देशियांची मर्यादा आहे, हे जांभेकरांनी जाणले होते. म्हणून तर ''ह्युझेल साहेब मुंबईत सृष्टिवृत्तांतासंबंधीच्या नव्या गोष्टींचे आकलन करून घेण्यासाठी आणि नवीन वर्तमाने शोधण्यासाठी आला आहे'', असे जांभेकरांनी 'दर्पण'मध्ये लिहिले आहे. ह्युझेल साहेबाने देशभर भ्रमंती करण्यासाठी सरकारकडे परवानगी मागितली असून कदाचित सरकार त्याला परवानगी देईल आणि सर्व

साहित्य आणि सोयीही उपलब्ध करून देईल. कारण, विक्तर जाकिमांट ह्या फ्रेंच गृहस्थास अशाच कामी सरकारने परवानगी देऊन मदत केली होती. त्यानिमित्ताने एतद्देशियांना अशा विद्याव्यासंगाची जाण करून देण्यासाठी आणि विद्येसाठी प्रयत्नशील बनविण्यासाठी बाळशास्त्री लिहितात, -

''युरोपियन लोक असे विद्या व मनुष्याचें ज्ञान वाढविण्यासाठी आपलीं घरें सोडतात, समुद्रांतून हजारों कोश जातात, परदेशचा जमिनी शोधितात, स्वेच्छेने वियोग सोशितात, व आपण संकटांत पडतात, असे जेव्हां आमचे दृष्टीस पडतें, तेव्हां ज्ञानासाठीच त्यांस जी ईर्ष्या येते, आणि जा आस्थेनें ते त्याचा उद्योग करितात, तें करून जर अतिशय आश्चर्य झालें नाहीं, तरआम्हास कांहीं समजत नाहीं असें होईल. तसेंच हे लोक इतके तोटे सोसतात, आणि या कामाकरितां केलेल्या मंडळ्या, त्यांचे परोपकारार्थ विद्या वाढविण्याचे उद्योग, आणि नवे नवे शोध, व युक्ति काढून मनुष्याचें सामर्थ्य वाढविण्याचे, किंवा इतर मनुष्यांस उपयोग पडण्याचे, उद्योग चालतील असें करतात, असे जेव्हा (दृष्टीस) पडतें, तेव्हां युरोपियन लोकां.... मध्यें सर्वापेक्षें उत्कृष्टपणा व कळांमध्यें... याविषयी संशय राहत नाही.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ४९)

एतद्देशीयांच्या अंगी ज्ञानलालसा निर्माण व्हावी आणि विद्येच्या कामी पाश्चात्य लोकांचे अनुकरण त्यांनी करावे हाच बाळशास्त्र्यांचा दृष्टिकोन होता. पाश्चात लोकांच्या श्रेष्ठपणाचा गौरव करून, एतद्देशीयांचे मनोधैर्य वाढवून त्यांना कार्यप्रवण करणे याच हेतूने बाळशास्त्र्यांनी 'दर्पण'मधून विद्याविषयक लेखन सातत्याने केले आहे.

### विज्ञान

पाश्चात्य लोकांची जिज्ञासू वृत्ती, संशोधक दृष्टी, धाडस आणि ज्ञान आत्मसात करून घेण्याची तळमळ एतद्देशीयांनी घ्यावी आणि तशा स्वरूपाचा प्रयत्न करून पाश्चिमात्य देशासारखे हिंदुस्थानाला प्रगतीच्या शिखराकडे न्यावे असे जांभेकरांना वाटत होते. पाश्चात्य राष्ट्रात लागलेले शोध, प्रगत झालेले विज्ञान यांची जाण करून देण्याचा प्रयत्न 'दर्पण'कारांनी केला. छापखान्याची माहिती तर त्यांना दिलीच शिवाय त्यावेळी नुकत्याच सुरू झालेल्या वाफेच्या इंजिनांविषयीची माहितीही स्वतंत्रपणे

करून दिली. वाफेपासून मोठमोठी जहाजे चालवण्याइतपत शक्ती निर्माण होते. शिवाय या शक्तीचा अनेक कामासाठी उपयोग करता येतो. या शक्तीचे ज्ञान एतद्देशयांना व्हायला हवे. कारण वाफेच्या शक्तीचा ज्यांनी शोध लावला त्या पश्चिमी लोकांच्या बुद्धीत आणि ज्यांना ती उघडून सांगितली तरी समजायला कठीण जाते, त्या पूर्वेकडील लोकांच्या बुद्धीत इतके अंतर आहे. परंतु त्यांनी लक्षात ठेवावे की, ''विद्या कोणते एके देशांतच असते असें नाही, आणि मनुष्य तेथून सर्वत्र सारिखेच. बखरेवरून त्यांस कळेल की विलायतेंतील लोक हजार वर्षांचे, अलिकडेच आतां जितके एथील लोक कलाकौशल्यांत माहितगार आहेत, त्यापेक्षे कमी होत.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, २९) स्वदेशाभिमानाची बाळशास्त्र्यांची वृत्ती यातून प्रगट होते. शिवाय आम्हीही विद्येच्या क्षेत्रात कमी नाही हे ते जाणवून देतात.

आपल्या देशातील पूर्वाभिमान जागृत करून आपल्यात असणारा न्यूनगंड काढून टाकणे बाळशास्त्री जांभेकरांना गरजेचे वाटते. सर्व मनुष्यास बुद्धीचा अंश सारखाच असतो, परंतु आपण प्रयत्न करत नाही. प्रयत्नाने सारे काही सिद्धीस नेता येईल, असे बाळशास्त्र्यांचे मत होते. पाश्चात्य लोक हे प्रयत्नवादी व जिद्दी आहेत. म्हणून ते विद्वान आहेत. आणि आम्ही मात्र मूर्खच. मूर्ख हा शब्दप्रयोग त्यांनी एतद्देशीयांच्या अज्ञानपणास अनुलक्षून केला आहे. ''विद्वान आणि मूर्ख या दोहोंमध्ये अंतर प्रकाश - अंध:कार, सत्य - असत्य, मनुष्याची बुद्धी आणि पशूंचे ज्ञान यांमध्ये जीतकें आहे तितकेंच आहे. मूर्ख आपले आयुष्याचा एकरूप प्रवाहें करून संतुष्ट असतो, तो आपले सभोंवतें सृष्टितील पदार्थ असतात तितके मात्र पाहातो, त्याची इच्छा संसारातील अवश्य पदार्थांचे बाहेर जात नाहीत, आणि त्यास आपला देश व आपण जांमध्ये राहातों ते लोक यांचे मात्र ज्ञान असतें. इकडे मनुष्याच्यानें जितके श्रम होतात तितके करून विद्वान ईश्वराचे कृत्यांचे गुन्ह्यांचा शोध करायास यत्न करितों, अंतरिक्षांतील जडांचा, गति जा नियमांप्रमाणे चालतात, ते नियम शोधून काढितो, विचार करून आणि अनुभव घेऊन तो सभोंवताले सृष्टींतील पदार्थातील कारणें आणि गुण समजतो, जे समजले म्हणजे तो आपले ज्ञान मनुष्याचें कल्याण करण्याचे उपयोगास लावितो, आणि सृष्टींतील मुलभूते ही त्या कामात आणितो.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, २९) 'दर्पण' कारांची सूक्ष्म संशोधक दृष्टी येथे दिसून येते.

एतद्देशीय लोकांचे जीवनच मुळी व्यवहारी चाकोरीतून चालले आहे. इतर गोष्टीकडे अथवा अफाट विश्वातील गूढांकडे ते लक्ष देत नाहीत. पाश्चात्य लोक मात्र विश्वातील गूढांचे संशोधन करतात आणि त्याचा उपयोग मानवी कल्याणासाठी करतात. आपले दुबळेपण दूर सारून आपणही विद्याभिलाषी बनून संशोधन क्षेत्राकडे वळले पाहिजे, असे ते म्हणतात. यासाठी शिक्षणाची कास धरणे आवश्यक आहे आणि याकामी सरकारने मदत केली पाहिजे अशीही जांभेकरांची अपेक्षा आहे. ते म्हणतात, ''जें सरकार विद्येचे वृत्धीस आश्रय देतें आणि प्रजांत उपयोगी ज्ञानाचा प्रसार होण्यास उमेद देतें, तेथे मनास विद्येचा संस्कार करण्यास लोकांस विशेष उत्साह होतो, आणि जुलूमगारांचे अंमलापेक्षें तरी राज्यांत हे उद्योग अधिक सफळ होतात. अशे उद्योगांपासून विद्या सुरुपांस येत्ये, आणि लोकांचा ज्ञानसंग्रह वाढतो. एके पिढीचे लोक नवे शोध करितात, त्यांपासून दुसरे शोध पुढली पिढी करित्ये. या रीतीनें विद्या आणि कला वाढतात आणि ज्ञानाचा प्रसार होतो. परंतु आपलीं मनें चांगले मार्गास लावणें, हें जितकें लोकांचे स्वाधीन आहे तितकें राजांचे नाही, हे आमचे लोकांनी ध्यानात धरावें, आणि हें दुसरें लक्ष्यांत ठेवावें कीं, जांस विद्या संपादन करायाची आहे, त्याणीं जर आपले मनांतील द्वेषबुत्थि घालविली नाहीं तर त्यांचा उद्योग फुकट जाईल.

असें होईपर्यन्त युरोपियन लोकांनी कलामध्यें व सृष्टिसंबंधि विद्यांमध्ये जे नवे शोध केले आहेत त्यांचें त्यांस चांगलेपणी ज्ञान व्हायाचें नाही. जरी त्या चांगल्या आहेत अशी थोडासा विचार केला असतां त्यांची खातर होईल, तरी पुष्कळ असे आहेत की ते सर्व नव्या गोष्टिंचा तिरस्कार करितात, बहुत लोक चांगले जांचे परिणाम असे फेरफारांपासून आपण व आपले पूर्वी वडील असें करित व मानीत आले आहेत तसें करण्याची त्यांस मोठी आवड असत्ये. जेव्हां अशा कल्पना मनांतून काढून टाकल्या तेव्हां मन सत्यग्रहण करण्यास योग्य होतें. जे सत्य सर्व ज्ञानाचें मूळ आहे जसें ज्ञान सर्व शक्तीचें आहे, तेव्हां शोध व विचार यांपासून उपयोगि फलें होतात, वस्तु आपापले वास्तविकरूपांने दिसतात, त्यांचे गुण समजतात, प्रतिदिवस आणि प्रतिघटका नवे ज्ञान काहीतरी माहीतगारी करून देत्ये, आणि तीपासून नवी सुखे आणि श्रुत्थ आनंद प्राप्त होतात.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, २९, ३१)

## सामाजिक

'दर्पण' मधून बाळशास्त्री जांभेकरांनी सामाजिक उन्नतीच्यादृष्टीने चौफेर लेखन केले. शिक्षण कार्यापासून ते समाजातील प्रचलित रूढी-परंपरा, दुष्ट चालीरीती, ढोंगी प्रवृत्ती यांसारख्या अनिष्ट प्रथांवर आपली लेखणी चालवली. आपले मागासलेपण आणि पाश्चात्य लोकांचे पुढारलेपण यातील अंतर जाणवून दिले. अंधश्रद्ध समाजाला पाश्चात्य ज्ञानाची, विज्ञानाची जाणीव करून देणे, भोळ्या समजुतीवरील विश्वास घातक आहे हे समजावून सांगणे, जगातील बदलत्या परिस्थितीचे भान करून देणे, समाजाची नीतिमत्ता सुधारून त्यांना सुसंस्कारित करून, प्रगतीपथाकडे नेणे, अशाच कामी 'दर्पण'ने पुढाकार घेतला. हा समाजसुधारणेचा पहिलाच प्रयत्न होता. त्यामुळे 'दर्पण'च्या मार्गात अनेक अडचणी आल्या. परंतु 'दर्पण' कोणाचे मिंधे नव्हते. समाजप्रबोधनाची कास ध्याने अंगिकारली होती. या मार्गात येणाऱ्या सनातन्यांच्यावरच नव्हे तर सरकारवरही त्यानी टीकास्त्र सोडले. प्रसंगी प्रतिगामी वृत्तीच्या लोकांना आणि सरकारलाही सामावून घेऊन देशाच्या उन्नतीचे कार्य अवलंबिले.

## अंधश्रद्धा

हिंदुस्थानात पुणे, मुंबई किंवा सुरत यासारख्या मोठ्या शहरात त्या काळात 'नाचतमाशासारख्या गुलामगिरी'च्या अनिष्ट प्रथा बोकाळल्या होत्या. खुद्द श्रीमंत लोकच त्यांना आश्रय देत असत आणि त्यापासून आनंद उपभोगत असत. 'दर्पण' ने अशा श्रीमंत, हौशी आणि अविचारी लोकांची निंदा करून अशा वाईट चालीविरुद्ध आवाज उठविला. ''जे लोक कसबिणीच्या मंडळ्या तयार करतात, ते लोक गरीब, दुःखी लोकांच्या लहान मुली विकत घेतात, विधवा स्त्रियांचाही फायदा घेऊन त्यांच्या मुली विकत घेतात आणि शहरात नेऊन विकतात. एवढेच नव्हे, लहान मुलेही चोरून नेतात. मुली जर सुंदर असतील तर त्यांचा अधिक फायदा होतो. अशा स्वरूपाचा निंद्य प्रकार हिंदुस्थानात चालला आहे. त्यामुळे सामान्य माणसाने विचार करावा की ह्या निष्पाप मुलींना ते कोणत्या उद्योगासाठी प्रवृत्त करतात ? त्यामुळे त्यांच्यावर कोणते संकट उद्भवत असेल ? ह्या अनिष्ट प्रथा धर्मबाह्य आणि विनाशकारक आहेत. यामुळे समाजामध्ये वाईट प्रवृत्ती वाढीस लागतात. परंतु या समाजाची दुसरी रीत आहे. जे लोक तमाशास जातात आणि तमासगिरीणीशी संबंध

ठेवतात, त्यांचीच प्रतिष्ठा वाढते. अलीकडे मुसलमान, हिंदू, पारशी लोकांत वाईट प्रवृत्तीकडे आणि व्यसनाकडे पैसा खर्च करण्याची वृत्ती वाढली आहे. पैसा खर्च करायचाच असेल तर संस्कारात, धर्मात खर्च करा. पातकी बायकांची अभद्र कृत्ये धर्मकृत्याशी मिसळणे यापेक्षा मोठा वेडेपणा कोणता ?

आपल्या देशात शिक्षण कमी असल्यामुळे अशा प्रकारच्या निंद्य गोष्टीविषयी समज लहानपणापासूनच घडत गेले. परंतु शिक्षित, समंजस माणसेसुद्धा तमाशास जातात. तेव्हा आम्ही त्यांची किती निंदा करावी ? समाजामध्ये बऱ्यावाईट चालीरीती चालू ठेवाव्या हे शहाणपणाचे लक्षण आहे. परंतु त्या चाली विकोपास घालवणे हे मूर्खपणाचे व अज्ञानपणाचे लक्षण आहे. कारण स्त्रियांना अशा कामी प्रवृत्त करणे म्हणजे उघड उघड त्यांना गुलामगिरीत ढकलणे होय. गुलामगिरी ही विनाशकारक असते. सर्वच गुलामगिरीपासून समाजाचे तोटे होतात. अधार्मिक लोकांचे मनोविकार वाढतात. धर्माने वागणारी आणि सज्जन माणसेही अधार्मिक आणि व्यसनी बनतात. नाचतमाशास समाजातील बहुतांश लोक प्रोत्साहन देतात त्यामुळे समाजात नीती फार कमी आहे हेच स्पष्ट होते. नाचणाऱ्या सर्व बायका कसबिणी असतात आणि त्यांची कृत्ये अभद्र असतात. त्यांना आश्रय देणे म्हणजे गुलामगिरीस आश्रय केल्यासारखे आहे.''

बाळशास्त्र्यांनी वरील लेखात समाजातील मुख्य दोषावरील कारणमीमांसा सांगून त्यांवर प्रहार केला आहे. अज्ञानी लोकांबरोबरच शिक्षित वर्गावरही त्यांनी टीकास्त्र सोडले. वाईट कारणाकडे आपली शक्ती वाया जाते त्याच शक्तीचा वापर इतर सामाजिक उन्नतीसाठी केला तर देशाचे कल्याण होईल अशी 'दर्पण'कारांची धारणा होती. त्यासाठी ते लिहितात, ''आम्ही ही गुलामगिरीची तऱ्हा लिहिली ही कोतवालांचे बंदोबस्ताने बंद होणार नाही. जी वाईट गोष्ट होण्यास ती गुलामगिरी अवश्य पाहिजे, ती गोष्ट पूर्वी बंद झाली पाहिजे, म्हणजे ही गुलामगिरी पक्की बंद होईल, परंतु तिची मुळें अशीं घट्ट झालीं आहेत, की विद्या व मोठे ठिकाणी तसा आचार लोकांस दृष्टिस पडणे, या वांचून ती बंद होईल ही आशा व्यर्थ आहे. म्हणोन आम्ही या प्रसंगी भले आणि समर्थ इंग्रेज व या देशचे लोक यांस मुख्यत्वे लिहितों कीं, त्यांणी आपले मनुष्यमात्राचे कल्याणविषयींची इच्छा, मनुष्यपणा, आणि नीति यांही करून कही गुलामगिरीची रीति चालण्याचीं जी साधनें आहेत तीं, आपल्यापासून

उपाय होईल तेवढा करून बंद करावीं, जा या गुलामगिरीपासून लोकांची नीति फार भ्रष्ट होत्ये. आणि हजारोंचे घरीं बुड आणि दु:ख ही येतात.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ६१)

समाजसुधारणेचे व्रत स्वत:पासून सुरू केले तरच समाजसुधारणा शक्य आहे अशी बाळशास्त्र्यांची धारणा होती. अशा दुष्ट चालीरीतींच्या मुळाशी जाऊन शोध घेण्याची वृत्तीही त्यांच्या ठिकाणी होती. गिरगावात एक कोंबडा माणसासारखे बोलतो आणि भविष्य सांगतो अशी अफवा पसरली होती. त्या आश्चर्यकारक कोंबड्याचा बाळशास्त्र्यांनी शोध घेतला. परंतु एक माणूस स्वत:च्या पोटासाठी इतर माणसांना फसवत होता आणि त्यावर पैसे कमवत होता. बरीच भोळी माणसे यावर विश्वास ठेवत होती. तसेच मुंबईमध्ये एक तुमडीबाबा आला होता. तो काही मनात चिंतन करून आपली तुंबडी रुपयांनी भरतो असे लोकांना वाटत होते. त्याच्या भोंदूगिरीला लोक सरळ सरळ फसत होते. मुंबई प्रांतात त्याच काळात चर्चिली गोष्ट म्हणजे एक मुलगा ईश्वरी सामर्थ्याने चमत्कार करतो. अशा भोंगळ गोष्टीवर जनता विश्वास ठेवते म्हणून जांभेकर म्हणतात, ''परंतु ते जा अज्ञानांत बुडाले आहेत, ते अज्ञान, व जा अज्ञानापासून भोळेपणा उत्पन्न होतो, आणि तशे प्रकारचे लबाड व कावेबाज यांचे अनुषंगाने चालतात. खरेच पाहिले असतां या देशचे लोकांमध्ये चमत्कारिक व असंभाव्य गोष्टींची नेहमी आवड असणे, हे सर्वदा विचित्र लक्षणच होऊन गेलें आहे. त्यांस सांगा कीं, विलायतेमध्यें घोड्यावांचून वाफयंत्राचे सामर्थ्याने गाड्या लिवर्पूल शहराहून मान्चेस्तर शहरास वाटसरू व जिनस घेऊन, दर तासास २० मैल (१० कोश) प्रमाणे इतक्या जलद जातात, असे सांगितले म्हणजे ते तुम्हाकडे पाहून आपली डोकीं हलवितील. युरोपियन विद्यांनी केलेला दुसरा कांही चमत्कार त्यांस सांगा, आणि तो युक्तीनें सिद्ध करून बुद्धीस आणून देतां येतो असे दाखवा, म्हणजे ते असे समजतील की तुमची शुद्धि गेली, किंवा आपली शुद्धि गेली असे तुम्हास वाटले आहे, आणि असे मनांत आणून ते तुम्हाकडे पाहूं लागतील.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ७१)

त्याकाळचा विचार केल्यास जनता अज्ञानाच्या अंध:कारात एवढी बुडाली होती की, ती सहजासहजी बाहेर येणार नव्हती. तरी सुद्धा 'दर्पण'कारांनी अशा समाजाला अंध विश्वासाच्या भोवऱ्यातून काढण्याचा प्रयत्न केला. पाश्चिमात्य

देशाची उदाहरणे देऊन तेथील शोध, समाजजीवन, शिक्षण यांचे एतद्देशीयांना आकलन करून दिले. शिक्षणाशिवाय समाजोद्धार नाही हे बाळशास्त्र्यांनी ओळखले होते. ज्ञान, विज्ञानाने माणूस सुसंस्कारित होतो अशी त्यांची कल्पना होती.

'दर्पण'मध्ये बाळशास्त्र्यांनी काही परभू बानकोटास मौजेकरता आगीची नाव करून गेले ह्या शीर्षकाखाली लेख लिहिला आहे. आजच्या काळात साधी वाटणारी ही गोष्ट पण त्याकाळात समुद्रपर्यटन करणे म्हणजे धर्म बुडविणे अशी धारणा होऊन बसली होती. त्यातही जहाजाने आणि वर सफरीला आणि अशा स्वरूपाचा प्रयत्न ब्राह्मण लोकांकडून व्हावा, ती घटना साहजिकच त्या काळात आश्चर्यकारक होऊन बसली होती. अर्थात बाळशास्त्र्यांनी त्या लोकांच्या धाडसाचे कौतुक केले आहेच शिवाय देशाटनाचे महत्त्वही विशद केले आहे. कारण ही छोटीसी घटना उद्याच्या प्रगतीचे आणि देशविकासाचे आश्वासन देणारी गोष्ट आहे असे बाळशास्त्र्यांना वाटले.

### शिक्षणप्रसार

'दर्पण'ने सर्वात अधिक महत्त्व दिले ते शिक्षणाला. लोकांच्यामधील न्यूनगंड नाहीसा करून, शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन, त्यांना शिक्षणाभिमुख करण्याचा महत्त्वाचा प्रयत्न 'दर्पण'ने केला. बाळशास्त्री हे कट्टर पुरोगामी होते. त्यामुळे सनातन्यांना उद्देशून त्यांचे मतपरिवर्तन त्यांनी करावे हे साहजिकच होते. त्या काळात नुकतीच शाळांची निर्मिती होत होती. बाकावर बसणे हे महापातक समजले जाई, किंवा आपली मुले इंग्रजी शाळेत गेल्यास ख्रिस्ती बनतील या भीतीमुळे अनेक पालक आपल्या मुलांना शाळेत घालत नव्हते. जे लोक नव्या गोष्टींचा स्वीकार करीत नाहीत, जुने तेच सोने म्हणून हट्ट धरतात, अशा लोकांना नव्या शिक्षणाची महती पटवून देणे गरजेचे होते. शिक्षण म्हणजे मुळात काय असते हे माहीत नसणाऱ्या अज्ञानी लोकांना समजावून सांगणे गरजेचे होते. त्या काळात केवळ जनताच अडाणी होती असे नव्हे तर विद्वान माणसेही प्रतिगामी आणि अनुदार वृत्तीची होती. सनातनी विचारांचे आणि आचारांचे प्रचंड दडपण समाजावर पडलेले होते. ते दूर करण्याचा प्रयत्न करणे हे सुद्धा त्या काळात महापातक समजले जाई. ते कार्य बाळशास्त्र्यांनी 'दर्पण'मधून केले यात वादच नाही.

बाळशास्त्र्यांसमोर सामाजिक विकासाचे व उन्नतीचे व्यापक क्षितीज होते. शिक्षणप्रसाराचे माध्यम म्हणूनच तर त्यांनी नियतकालिक सुरू केले. लौकिक व भौतिक विद्यांचा अंगीकार करणे, विज्ञानाची जाणीव करून देणे आणि एतद्देशीयांना शिक्षणास प्रवृत्त करणे हाच त्यांचा उद्देश होता. सामाजिक उन्नतीचे आणि व्यक्तिमत्वाच्या विकासाचे साधन म्हणजे शिक्षण हे त्यांना मनोमन पटले होते. हाच विचार जनतेला पटवून देण्यासाठी त्यांनी वृत्तपत्राचा अंगीकार केला. शिक्षक हा समाजाचा केंद्रबिंदू असतो. तो माणसे घडवू शकतो. जनतेला उपदेश देऊन नीतिमत्ता सुधारत असतो आणि देशाला प्रगतीपथावर नेत असतो. त्यामुळे शिक्षकांनाच चांगल्या शिक्षणाने परिपूर्ण करण्यासाठी जांभेकरांनी 'नॉर्मल स्कूल'ची स्थापना केली. बाळशास्त्री जांभेकरांनी शिक्षकांना केलेला उपदेश त्यांच्या शिष्याने केशवराव मवाळकर यांनी आपल्या आत्मचरित्रात कथन केला आहे. त्या उपदेशाचा सारांश असा,

''पूर्वकाळचे महाप्रबुद्ध ऋषीजन हे अरण्यवास पत्करून विद्यासंपन्न होत आणि विद्यादान करीत. त्यांनी आपल्या देशात अपूर्व ज्ञानभांडारे भरून ठेवली आहेत. ती इतकी तुडूंब आणि ओतप्रोत भरली आहेत की, ती नुसती चाळायला सबंध जन्म पुरावयाचा नाही. त्या ऋषींचे आपण वंशज म्हणवितो. मग विद्याभ्यास अन विद्यादान करण्याची आपणांस का लाज वाटावी ? विद्या शिकून तुम्हाला कारकून अंमलदार व्हावेसे वाटते. शिक्षकाचा व्यवसाय लोक हलका मानतात. पण तसे नाही. प्रजा मूढ आहे. म्हणून सरकारी नोकरांचे महत्त्व विद्याप्रसार जस जसा होत जाईल तसतसे सरकारी नोकरांचे ढोंगसोंग अन् थाटमाट नाहिसा होईल. प्रजा शहाणी आणि समजूतदार झाली म्हणजे कारकुनीला कोण विचारतो ? म्हणून विद्याभिलाषी व्हा. विद्याभ्यास करा. लोकांना सुशिक्षण द्या. सरकार व प्रजा, धनी व चाकर, आई–बाप व पुत्र ह्यामध्ये प्रेमभाव निर्माण व्हावा, स्वदेशाभिमान, आणि स्वधर्माभिमान लोकांच्या मनात उपजावा असा प्रयत्न करा. हेच आपले ऋषीवंशजाचे कर्तव्य. गुरू दसपट ज्ञानी असेल तर तो एकपट ज्ञान शिष्यास देऊ शकेल. शंभरपट ज्ञानी असेल तर तो दसपट ज्ञान देईल. म्हणून जास्तीत जास्त विद्यासंपन्न व्हा.'' आजच्या शिक्षकांनीही मुखोद्‌गत करून ठेवण्यासारखा हा उपदेश आहे. बाळशास्त्री जांभेकर हे जात्याच विद्वान, बहुविध भाषा पारंगत आणि त्यांना ज्ञानाची चौफेर दृष्टी असल्यामुळे ज्ञानाचे

महत्त्व व सामर्थ्य त्यांना नि:संशय पटले होते. म्हणूनच त्यांनी 'दर्पण'च्या खटाटोपातून मागासलेपणाच्या खोल गर्तेत रुतलेल्या समाजाला प्रगतीच्या शिखरावर नेण्याचा प्रयत्न केला. जनतेला विद्येचे महत्त्व पटवून देऊन त्यांना शिक्षणाकडे प्रवृत्त केले.

हिंदुस्थानात त्या काळी होत असलेल्या शैक्षणिक चळवळींचा आणि घडामोडींचा तपशील जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न 'दर्पण'ने केला. त्या काळात आजच्या सारखी वृत्तप्रसाराची माध्यमे प्रगत झालेली नव्हती. सरकारकडून जो हुकूम येई तो आणि इतर शैक्षणिक वृत्तांत 'दर्पण' मधून प्रसारित करण्यात येत असे. मुंबईमध्ये मेनवारिंग साहेबाने सुरू केलेल्या इंग्रजी शाळेची बातमी पुढीलप्रमाणे दिली आहे. ''मुंबईमध्ये एक इंग्रजी शाळा होणार असून तेथे एतद्देशीय लोकांच्या मुलांना इंग्रजी विद्येचे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागेसाठी आवश्यक पात्रता असणारे परिपूर्ण असे शिक्षण देण्यात येणार आहे. तसेच कंपनीने असे ठरविले आहे की, सरकारी सर्व कामे सर्व जातीच्या लोकांना उच्च-नीचपणाचा भेद न मानता द्यावीत. ही गोष्ट हिंदुस्थानातील लोकांना फायद्याची आहे. ह्या जाहीर खबरीकडे लोकांनी अवश्य लक्ष द्यावे.''

दळणवळणाची प्रगती त्यावेळी आजच्या इतकी झाली नसल्यामुळे, दूरच्या प्रांतातून उशीरा येणाऱ्या बातम्या, ऐकीव पण उपयुक्त माहिती 'दर्पण' मध्ये दिली जात असे. अशाच स्वरूपाची अर्धवट बातमी पुण्यात सरकारने घातलेल्या इंग्रजी शाळेबद्दलची आहे. पुण्यासारख्या धार्मिक वृत्तीचे लोकजीवन असलेल्या शहरात सरकारने इंग्रजी शिक्षणाला सुरूवात केली. याचे आश्चर्यही व्यक्त करण्यात आले आहे. तसेच ''शिकविणारा मेस्तर इझिल् हा इंग्रजीतील विद्वान आणि मराठी भाषा जाणणारा आहे. म्हणून त्याला शिक्षक नेमले आहे. ते काम चांगले चालवण्याची त्याची योग्यता आहे असे समजते. परंतु नव्या शाळेत मुले किती, शिकविण्याची पद्धती कोणती, हे समजलेले नाही. परंतु पुण्यात लोक इंग्रजी शिक्षण घेण्यास अनुकूल आहेत आणि या देशातील लोकांत इंग्रजी शिक्षण घेण्याची वृत्ती वाढत चालली आहे हे पाहून आम्हास नि:संशय वाटते की, सरकारने इच्छिल्याप्रमाणे घडून येईल.''

इंग्रजी वृत्तपत्रातून छापण्यात आलेल्या काही प्रगतीनिर्देशक बातम्यांना 'दर्पण' मध्ये पुन्हा स्थान देण्यात येत असे. 'बुइकली गाईड' पत्रातून आलेली शिक्षणविषयक बातमी 'दर्पण' कारांनी सारांश रूपात दिली आहे.

''पुण्यातील पेशव्यांच्या बुधवार वाड्यात सरकारने इंग्रजी शाळा घातली असून मेस्तर येस्डेल नावाच्या साहेबास महिना ५०० रुपये वेतन देऊन शिक्षक म्हणून त्याची नेमणूक केली आहे. ती शाळा पुढील जानेवारी महिन्यापासून सुरू होईल.''

सरकारचे शिक्षणविषयक धोरण जनतेपर्यंत पोहोचवण्याचे कार्यही 'दर्पण' ने केले. ज्यावेळी सरकारकडून शिक्षण संस्थांना मिळणारा पैसा कमी करण्यात आला त्यावेळी ते वृत्त आकडेवारीसह देऊन त्यावर 'दर्पण' ने नापसंती व्यक्त केली आहे. ''आजतागायत शिक्षण संस्थांस जो पैसा मिळत होता तो कमी केला आहे. दरवर्षी फक्त २०,००० रु. मिळतील. शिक्षण संस्थांच्या खर्चाची जेव्हा आम्ही चौकशी केली तेव्हा आम्हास समजले की, मंडळीची शाळा पुस्तके व मोलज्वर्द साहेबाचा मराठी कोश छापण्याचा खर्च मिळून चार-पाच वर्षांपासून सरकारमधून दरवर्षी ४०,००० अथवा ५०,००० सरासरी खर्च होत असे. येथील लोकांच्या शिक्षणाकरितां खर्च फार होत आहे असे सरकारचे म्हणणे आहे. त्यामुळे मोठ-मोठ्या शहरातून लोकांच्याकडून निधी उभारून शाळेचा खर्च चालवावा असा त्यांचा बेत आहे. सर्व सरकारी खाती पैशाच्या अडचणीमुळे कमी केली. त्याच कारणामुळे शिक्षणावरील खर्च कमी केला. परंतु एतद्देशीय लोक जे शिकण्याची अपेक्षा करतात त्यांना निश्चित वाईट वाटेल.

शिक्षणविषयक चळवळ नुकतीच सुरू होत होती, आणि मध्येच सरकारने त्यामध्ये अडसर निर्माण करून जनतेची प्रगती खुंटणारा मार्ग अवलंबावा हे पाहून बाळशास्त्र्यांनी सरकारच्या कृत्याबद्दल नाराजी व्यक्त केली, शिवाय आपली प्रतिक्रियाही व्यक्त केली आहे. ते म्हणतात, ''जेव्हां राजा किंवा लोक आपल्यास ज्ञानी म्हणवतात,तेव्हां राज्य चालविणाराचा धर्म आहे की, प्रजामध्यें ज्ञान वाढवायाकरितां,आणि त्यांची मने चांगली करायाकरिता त्याणें सर्व प्रकारें आश्रय द्यावा, आणि साह्य व्हावें, असे करण्यानें जे लाभ होतात ते जेव्हां इतके समजण्यात आले, आणि मान्य केले गेले आहेत, कीं मनुष्यास, त्यांची ज्ञानइंद्रियें चालू करण्यानें ज्ञानावस्थेंत आणावे, हे प्रितीचे कृत्य फारस उत्तम आणि उपयोगी आहे, जेव्हां सामान्य मनुष्यें नेटिव लोकांची मनें बरी व्हावीं म्हणोन सर्व यत्न करतात, आणि अशा यत्नाचे चांगले फळाचा दाखला, कलकत्याकडे पाहिले असतां चमत्कारीक आणि अन्यत्र द्यायास योग्य दिसून येतो, अशा समई, या देशांत जे त्याच कारणास्तव श्रम

करतात, त्यांस सरकारने आजदीन पर्यंतजें साहित्य केलें होतें, त्यांतील एक मोठा अंश कमी केल्यानें, त्यांस इतके अश्रयहीण करोंन आणि त्यांचा श्रमाचे फळ प्राप्त व्हायाकरितां जे उपाय होते ते इतके कमी करावे, हा विचार केल्यानें आम्हांस फार दु:ख होतें, यात संशय नाही.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ७५)

'दर्पण' कारांनी वेळप्रसंगी सरकारच्या चुकाही लक्षात आणून दिल्या. त्या काळात हिंदुस्थानी लोकांनी ब्रिटिश सरकारवर टीका करणे किती अवघड होते पण जेथे प्रसंग पडला तेथे मोठ्या भारदस्तपणे आणि प्रतिष्ठित भाषेत सरकारवर टीका करण्यास बाळशास्त्री मुळीच घाबरले नाहीत. मुंबईमधील शिक्षा मंडळीतील युरोपियन मुख्य पंतोजीस त्याचा पगार न देता त्याला सरकारने नोकरीवरून कमी केले त्यावेळी अशाच स्वरूपाची टीका केली आहे. हा पंतोजी एका घरात पाच वर्षे राहिला होता. त्याची प्रकृती बिघडली त्यामुळे त्याने घर सोडण्याचा निश्चय केला. त्यासाठी घरभाडे मिळावे म्हणून त्याने सरकारकडे अर्ज केला. सरकारने त्याचा करारनामा फिरवून नवा करार करण्यास सांगितले, नाही तर पहिल्या कराराप्रमाणे त्याने नोकरी करण्यास आणखी मुदत लिहून द्यावी. तरच त्याला घरभाडे मिळेल असे सांगितले. परंतु तो पंतोजी दुसरा करार करण्यात तयार झाला नाही. त्यामुळेच पंतोजीस नोकरीतून काढून टाकण्याचा निर्णय सभेमध्ये घेतला गेला, व त्याचा पगार बंद केला. शिक्षा मंडळीतून हुषार आणि सर्व गोष्टीत निपुण असा पंतोजी निघून गेला व त्याचे झालेले नुकसान पाहून आम्हास वाईट वाटते. अशा गोष्टी अयोग्य आहेत. जांभेकरांनी सरकारचे दोष दिसतील ते स्पष्ट लिहिले आहेत व आपली प्रतिक्रियाही व्यक्त केली आहे. शिक्षण संस्थेतील चांगल्या विद्वान गृहस्थास सरकारने दिलेली वागणूक सहन न झाल्यामुळे त्याबद्दल आपला निषेध जांभेकरांनी व्यक्त केला आहे. कारण जांभेकर सुद्धा एक जातिवंत शिक्षक होते. अशा शिक्षकांच्यावर या काळात झालेला अन्याय सहन न झाल्यामुळे त्यांनी लेखणी चालवली.

### राजकारण

इंग्रजी शिक्षणाने एतद्देशीय लोकांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. इंग्रजी भाषेतच मुळी व्यक्तित्वाचे भान आणून देण्याचा गुण आहे. हे जस जसे वाढू लागले तस तसे पाश्चात्य लोकांप्रमाणे सरकारमध्ये वरिष्ठ जागेवर नोकरी करण्याची इच्छाही

बळावत गेली. कारण इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये राजा राममोहन रॉय सारख्या बुद्धिमान हिंदुस्थानी गृहस्थाने न्यायपद्धतीतील दोष काढून त्यावर उपाय सुचविले होते. इंग्लंडच्या विद्वान लोकांनीही त्याच्या बुद्धीची कदर केली होती. त्यामुळे साहजिकच असे वरिष्ठ अधिकाऱ्याच्या जागेवर काम करण्याच्या पात्रतेचे लोक हिंदुस्थानात तयार होत आहेत असे एतद्देशीयांना वाटू लागले, आणि इंग्लंडच्या पार्लमेंटलाही ते पटले. त्यामुळे हिंदुस्थानी पार्लमेंटने काढला. ज्या एतद्देशीय गृहस्थांची 'जस्टिस ऑफ पीस' सारख्या वरिष्ठ पदावर नेमणूक केली होती त्यांची नावे जाहीर करून त्यांना सनदा वाचून दाखविल्या होत्या. हा सारा वृत्तांत 'दर्पण' मधून देण्यात आला होता. त्यानिमित्ताने बाळशास्त्री लिहितात, ''इंग्रजांच्या मुलुखातला ज्या या देशातील माणसाचा जन्म आहे त्यांना जस्टीस ऑफ पीसची कामे द्यावी म्हणून जो पार्लमेंटमध्ये कायदा झालेला आहे ते येथील सरकारकडे आला नाही. कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांचा एतद्देशीय लोकांच्या या वरिष्ठ जागेवर नेमणुकी करण्याबाबत फार द्वेष आहे. पण मुंबई सरकारचे मत अनुकूल आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. एतद्देशीयांना उच्च अधिकाराच्या जागा प्रथमत:च मिळवून देण्याच्या कामी लॉर्ड क्लेर व सर हर्बर्ट कांपटन या मुख्य न्यायाधिशांनाच श्रेय द्यावे लागेल. तसेच पोलीस खात्यातील मॅजिस्ट्रेट तीन आहेत त्या ठिकाणी दोन करावेत आणि पेटी सेशनच्या कोर्टात आजतागायत दोन रोज मोऱ्योच मॅजिस्ट्रेट व एक बिनपगारी जस्टीस ऑफ पीस व एक वकील बसत असत त्या ठिकाणी आता एक रोज मोऱ्याचा मॅजिस्ट्रेट, एक इंग्रज जस्टीस, एक एतद्देशीय जस्टीस ऑफ पीस व शास्त्रासंबंधी विचाराकरिता एक वकील बसतील.'' अशा स्वरूपाचा सरकारमध्ये कायद्यात होणारा बदल जनतेला सांगण्याचे महत्त्वपूर्ण काम 'दर्पण' ने केले आहे. बाळशास्त्र्यांचा यामधून देशाभिमान दिसून येतोच, शिवाय आपण आता प्रगतीकडे नि:संशयपणे वाटचाल करीत आहोत याचा आत्मविश्वासही दिसून येतो.

सरकारने पेटी सेशनच्या कोर्टात ज्यावेळी जगन्नाथजी शंकरशेट यांना मॅजिस्ट्रेट म्हणून नेमले त्यावेळी 'दर्पण' ने लिहिले आहे, ''मॅजिस्ट्रेट म्हणून नेमलेले पाहून आम्हाला आनंद वाटला. अशा वरिष्ठ प्रतिष्ठेच्या जागेवर काम करणारा हा एतद्देशीय प्रथम पुरुष आहे.'' असे गौरवोद्‌गारही काढले आहेत. वरिष्ठ जागेवर सरकार एतद्देशीयांची नेमणूक करू लागले, आणि एतद्देशीय त्यास समर्थ आहेत याचा आनंद व अभिमान बाळशास्त्री येथे प्रकट करतात.

हिंदुस्थानी लोकांच्या सरकारमध्ये वरिष्ठ जागेवर नेमणूका झाल्याने इंग्रज अधिकाऱ्यांच्या खुर्चीला खुर्ची लावून बसता येऊ लागले. आपण कुठे तरी कमी आहोत हा न्यूनगंड नाहीसा झाला आणि आत्मविश्वास वाढीस लागला. परंतु एतद्देशीय अधिकारी वर्गास इंग्रज अधिकारी पत्र लिहिताना अगर बोलताना मान देत नसत. त्यांची नीति उद्धट असे. त्यामुळे सरकारने सर्व कामगारांनी जस्टिस ऑफ पीसच्या जागेवर नेमलेल्या सर्व हिंदुस्थानी लोकांना आदराने बोलावे व वागावे असे फर्मान काढले. कारण, ''या देशांतील बहुत करून सर्व लोकांस अशा इंग्रज लोकांशी या देशातील ज्या गृहस्थांशी खासगत व्यवहार चालत असे त्यांत इंग्रेज लोक त्यांस ''में डीयर सर'' म्हणजे माझे प्रीय महाराज असे लिहीत, व त्यांस असें दाखवीत कीं तो लिहिणारा त्यांचा परम मित्र आहे, व त्या पत्राचे पाठीवर त्यास 'हस्कूयर' किंवा शेट असें लिहीत, परंतु त्याच इंग्रेजांपासून यास सरकारी पत्र येई त्यांत या पत्राचे आरंभी 'सर' म्हणजे 'महाराज' हा शब्द नसे, किंवा शेवटी सन्मान विशिष्ट शब्द लिहीत नसत, किंवा पत्राचे पाठीवर कांही मर्तबा नसे, इंग्रेज लोक परस्परांस पत्रें पाठवितात त्यांत जर असें नसलें तर त्यास हा उद्धटपणा व अपमान वाटतो, परंतु असें आम्ही लिहीतों कीं, प्रतिष्ठित एतद्देशीय गृहस्थास लिहीण्याचे जा पद्धतीकडून वाईट वाटतें ती पद्धती कित्येक साहेब लोकांनी फार दिवसांपासून सोडली, आणि ज्यांस ते लिहितात, त्यांचे योग्यतेप्रमाणें त्यांस लिहूं लागलें. ग्याझेटमध्ये जाहीरनामा छापला आहे त्यावरून कळून येईल की, ज्या आमचे थोडे लोकांस जस्टिस ऑफ पीस नेमिले आहे त्यांस मात्र या आदरयुक्त लिहीण्याचे पद्धतीने लिहावें. परंतु ही बंदी थोडके दिवस चालले असें आम्ही इच्छितों, आणि इंग्रेज लोकांस सन्मान करून लिहितात त्याप्रमाणे ज्याची योग्यता आहे त्या गृहस्थांशी सरकार कामगारांशी पत्रोत्तर व्यवहाराचा प्रसंग पडेल तेव्हां त्यांस इंग्रेजांप्रमाणे आदरें करून लिहावें.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, १०७)

बाळशास्त्र्यांचा स्वाभिमान यातून प्रकट होतोच शिवाय स्वबांधवांचा अभिमानही त्यांनी जोपासण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसून येते. आमच्या भूमीत येऊन आमच्यावर राज्य करणारी माणसे आम्हाला गुलाम म्हणून वागवणार असतील, आम्हाला जर किंमत देणार नसतील तर आम्ही ते कदापीही सहन करणार नाही अशीच जणू त्यांची धारणा होती. जगातील सर्वच माणसे बुद्धीने सारखी असतात.

आमचे जे हक्क आहेत ते आम्हाला मिळालेच पाहिजेत. यासाठी त्यानी इंग्रज अधिकाऱ्यावर टीकास्त्र सोडले. कांहीवेळा सरकारच्या गुणांचे समर्थनही केले. सरकारदरबारी आब राखून जनहिताच्या गोष्टी प्रामुख्याने 'दर्पण'ने केल्या. खऱ्या अर्थाने ही एक प्रकारची समाजजागृतीच होती.

## आर्थिक शोषण

बाळशास्त्री जांभेकर हे अभ्यासू आणि कर्तव्यदक्ष पत्रकार होते. जगात किंबहुना आपल्या देशात काय चालले आहे याचे भान मुंबई प्रांतातील लोकांना करून देणे, सुधारणेच्याकामी जनतेबरोबर सरकारलाही सामावून घेऊन नव-नवीन सुधारणा करणे, अशा स्वरूपाचे कार्य त्यांनी केले. आज खेडोपाड्यात बँकांची जाळी पसरली आहेत, पण त्याकाळी बँकेचे महत्त्व पटून आपल्या प्रांतातील लोकांच्या कल्याणासाठी बँकेची अपेक्षा करणारे आणि जाहिरपणे वृत्तपत्रातून सांगणारे बाळशास्त्री एकमेव म्हणावे लागतील. बाळशास्त्र्यांच्या वाचनात मद्रास, कलकत्ता येथील वृत्तपत्रे येत होती. तेथील घडामोडीचे ज्ञान येथील लोकांना 'दर्पण' कार करून देत असत. 'मद्रासच्या सरकारने जाहिर केले आहे की, कलकत्यातील सरकारने जी पेढी घातली आहे तिच्यासारखी मद्रासमध्ये एक पेढी काढण्यात येणार आहे. ती पेढी उच्चनीचपणाचा भेद न मानता सर्वांना खुली राहील. त्यामध्ये एक रुपयापासून पाचशे रुपयापर्यंत रक्कम ठेवता येईल. वर्षाला शेकडा चार रुपये व्याजही देण्यात येईल. ज्यांनी पैसे ठेवले नसतील त्यांना पाहिजे तेव्हा पाहिजे तेवढी रक्कम काढता येईल. कलकत्याच्या पेढीप्रमाणे मद्रासच्या पेढीत सरकारची भागीदारी असेल. त्या सरकारास अधिकार आहे की सहा महिन्यापूर्वी सूचना करून व्याजाचा दर कमी करावा. कलकत्यातील पेढी ही गरीब व मध्यम वर्गीयांना सोयीची झाली कारण एरवी खर्च होऊन जाणारी रक्कम पेढीत ठेवली जाते व त्यावर व्याजही मिळते. मद्रास व कलकत्यामध्ये सरकारने चांगल्या विचाराने पेढी घातली त्याप्रमाणे मुंबईच्या सरकारने तशा स्वरूपाची पेढी येथे घालावी. तसे केल्यास लोकांचे कल्याण होईल व सरकारची प्रतिष्ठा वाढेल.'' एकंदरीत ज्या इंग्रजी राजवटीपासून ज्या सुधारणा होत होत्या, त्या सुधारणांचा पुरस्कार करणे, परप्रांतासारखे नवीन उपक्रम आपल्या प्रांतात राबविण्यास प्रोत्साहन देणे अशा स्वरूपाची भूमिका 'दर्पण'ची होती.

इंग्रजी राजवटीमुळे व्यापाराला महत्त्व प्राप्त झाले होते. 'दर्पण'कारांना व्यापाराचे हे महत्त्व मनोमन पटले होते. व्यापारामुळे लोकांचे उद्योग वाढतील. उद्योगामुळे येथील लोकांना काम मिळेल, त्यांच्या उत्पन्नात भर पडून त्यांचे राहणीमान सुधारेल आणि परिणामी देशाची आर्थिक बाजू भक्कम होईल असे त्यांना वाटत होते. परंतु सरकारने व्यापाऱ्यांच्या मालावर ज्यावेळी जकात आकारायला प्रारंभ केला त्यावेळी बाळशास्त्र्यांनी 'दर्पण' मधून आवाज उठविला. माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी न्यायचा असेल तर सरकार जकात आकारते. त्यामुळे देशातील व्यापारास अडथळा होतो. मालाची झडती घेतल्यामुळे व्यापाऱ्यांचे खूप नुकसान होते. त्यात जकात आकारणारे नोकर व्यापाऱ्यावर खूपच जुलूम करतात. अयोग्य आणि दुःखदायक गोष्टींपासून प्रजेचे रक्षण करणाऱ्या सरकारबद्दल विश्वास वाटत असताना आणि व्यापाराचे महत्त्व जाणणाऱ्या सरकारने जकातीसारख्या अयोग्य गोष्टीला प्राधान्य द्यावे हे आश्चर्य नव्हे काय? १२ ते १५ मैलांच्या अंतरावर हे जकात नाके आहेत. प्रत्येक नाक्यावर वेगवेगळा कर आकारला जातो. सरकारकडे जकातीखेरीज उत्पन्नाचे अन्य मार्ग आहेत. त्याचा अवलंब करावा. वेगवेगळ्या मालावर वेगवेगळा कर आकारतातच. शिवाय विलायती मालावर जकात घेत नाहीत. त्यांना खुशाल जाऊ देतात. पण गावठी मालावर मात्र जकात आकारली जाते. शेतकऱ्यांच्या मालावर आणि कारागिरांच्या मालावर जकाती आकारल्याने खूपच वाईट वाटते. सरकारने जकाती घेण्याच्या रद्द केल्या तर लोकांचे उद्योग वाढून उत्पन्नात भर पडेल आणि साहजिकच व्यापारास आश्रय मिळेल. इंग्लंडमधील अधिकाऱ्यांचे मतही असेच आहे. म्हणून तर त्यांनी जकातीचा कायदा तेथे रद्द केला. हिंदुस्थानातील कलकत्याचे गव्हर्नर जनरल बंगाल प्रांतातील जकात रद्द करण्याच्या विचारात आहेत. जकात बंद पडल्याने सरकारच्या उत्पन्नात घट पडेल हे मान्य, परंतु ती घट भरून काढण्यासाठी व्यापार वाढवून, पडीक जमिनी लागवडीखाली आणून आणि उद्योग वाढवून काढता येईल. आम्हास भरवसा वाटतो की, लोकांच्या कल्याणासाठी जकात बंद करण्याचा विचार सरकार करेल.''

सरकारचे दोष दाखवून, अयोग्य गोष्टींना आळा घालून, सरकारला पर्याय सुचवून देण्याच्या कामी 'दर्पण'ने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. व्यापार वाढवणे, उद्योग वाढवणे, पडीक जमिनी लागवडीखाली आणणे, या गोष्टीतून जनतेचे किंवा

देशाचे कल्याण होईल हे बाळशास्त्री ओळखून होते. त्यांचा दूरदर्शिपणाही त्यामधून दिसून येतो. सरकारच्या अनागोंदी कारभारावर टीका करणे आणि लोकहिताच्या कामी झटणे हे वृत्तपत्राचे कार्य असते. ते 'दर्पण'ने निःस्पृहपणे पार पाडले. जकात घेताना नोकरांचा जुलूम, विलायतचा माल जकातरहित ह्या सरकारच्या स्वार्थीपणावर टीका करून तशा स्वरूपाचे कृत्य सरकारने लागलीच थांबवावे असेच त्यांना म्हणायचे आहे.

मुंबई हे इंग्रजी चळवळीचे प्रमुख केंद्र आणि तेथे हिंदुस्थानातील प्रमुख बाजारपेठ असल्याने साहजिकच लोकांची वर्दळ वाढली. वाढत्या लोकसंख्येमुळे भिकाऱ्यांचा प्रश्न तेथे निर्माण झाला. जेव्हा भिकाऱ्यांचा सुळसुळाट झाला, तेव्हा त्यांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी आणि त्यांना संरक्षण देऊन ती पद्धत बंद करण्यासाठी टाऊन हॉलमध्ये सभा झाली. त्या सभेचा वृत्तांतही बाळशास्त्र्यांनी 'दर्पण' मधून दिला आहे. तो वृत्तांत असा, ''मुलखी परोपकारी मंडळीने सर्व प्रकारचे गरीब लोक यांचे देश, धर्म किंवा जाति यांचा विचार न करितां संरक्षण करावे असे या समयीं ठरले. वास्तविक कंगाल व वयोवृद्ध व जरजर असे जे गरीब लोक त्यांचे ही मंडळी संरक्षण करील, परंतु उद्योग करून किंवा दुसऱ्या कोणत्या उपायाने आपले पोट भरावयास जो समर्थ आहे त्यास ही मंडळी आश्रय करणार नाही. आणखी असे ठरले की, एक धर्मशाळा करावी, आणि जे भीक मागावयाची सोडून देतील त्यास तेथे या मंडळीच्या कायद्याप्रमाणे पैका वाटावा, आणि तेथे ज्या गरीब लोकांस नेहमी ठेवून घेतील त्या सर्वांपासून कांही सुलभ कामे करवावी.'' या सभेस मुख्य एतद्देशीय लोक हजर होते. विकासांच्या समस्येवर मात करण्यासाठी त्यांना कोणीही भिक्षा देऊ नये, उलट धर्मशाळेत पाठवावे असे ठरले. याकामी सात-आठ हजाराची रक्कम जमली. शेवटी 'दर्पण' मध्ये म्हटले आहे, ''अशा परोपकारी व धार्मिक कार्यास इंग्रज व एतद्देशीय लोक जास्तीत जास्त मदत करतील अशी आम्हास आशा आहे.''

अशाच स्वरूपाची मुंबई शहरामध्ये 'शहर साफ ठेवण्याकरिता मंडळीची नेमणूक' ही बातमी 'दर्पण'मधून देण्यात आली होती. ''रस्ते स्वच्छ ठेवण्याकरिता रस्त्यातील घाण, केरकचरा काढून टाकावा, म्हणजे शहरातील हवा स्वच्छ राहील व लोकांचे कल्याण होईल. त्या कामी एक मंडळ स्थापन केले असून कलेक्टर-सारख्या मान्यवर व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली ते कार्य करेल. ज्या काही सुधारणा

करायच्या असतील त्या या मंडळींला लोकांनी सांगाव्यात.'' सुधारणेच्या बातम्या जनतेपर्यन्त पोहोचवून त्या घटनां–कृतींचे अनुकरण करायला लोकांना भाग पाडणे हाही उद्देश 'दर्पण'चा होता.

**गुन्हेगारीची वृत्ते**

ज्यावेळी देशात ठकांचा सुळसुळाट वाढून त्यांच्या निर्दयी कृत्यांना उत आला त्यावेळी 'दर्पण'ने हे वृत्त जनतेपर्यंत पोहोचवले. ''ठक लोक निर्दयी, क्रूर असून, त्यांनी शेकडो लोकांना केवळ पैशासाठी ठार केले आहे. रात्री–अपरात्री ते गरिब वाटसरूवर हल्ला करतात, त्यामुळे लोकात घबराटीचे वातावरण पसरले आहे. अशा निर्दयी, निष्ठूर लोकांना कांही ब्राह्मण, सरदार आश्रय देतात. इंग्रज सरकारने त्यांच्या टोळ्या नेस्तनाबूत करून ठकांचा कायमचाच बंदोबस्त केला.'' अशाच गुन्हेगारी जगतातील खळबळजनक वृत्त ''पट्टावाग आइल आफ् फ्रान्समधून पळून गेल्याची बातमी'' या शीर्षकाखाली दिलेली होती. मुंबईतील चोरांच्या टोळीचा प्रमुख पट्टावाग सोनार याला जन्मठेपेची शिक्षा होऊन त्याला काळ्या पाण्यावर पाठविले होते. परंतु तो काळ्या पाण्याच्या शिक्षेवरून पळून आला. त्याला मुंबईतील कित्येक लोकांनी पाहिलेले होते. म्हणूनच 'दर्पण' ने ही बातमी छापली. परंतु त्या बातमीच्या संदर्भात न्यायाधिषांनी 'दर्पण'कारांना बोलावून घेऊन विचारपूस केली. ज्यांनी बातमी दिली त्यांची नावे विचारू लागले. ती नावे 'दर्पण'कारांनी सांगितली नाहीत कारण ते न्यायाधिष उद्धट रीतीने बोलले. 'दर्पण'कारांना अशा रीतीने बोलू लागले की, त्यांनी भिऊन बातमी देण्याऱ्यांची नावे सांगावीत. पण अशा धमकावणीला ते भ्याले नाहीत. जर त्यांची नावे सांगितली तर त्यांचे खूप हाल होतील आणि पुन्हा आपल्याला अशा बातम्या मिळणार नाहीत म्हणून ते गप्प बसलेत. नंतर मात्र बातमी देणाऱ्यानेच ''नावे सांगावयास हरकत नाही. ते त्यांना माहित आहे'' असे सांगितले तेव्हाच 'दर्पण'कारांनी पट्टावाग या गुन्हेगाराला केव्हा व कोठे पाहिले हे 'दर्पण'मधून प्रसिद्ध केले. 'दर्पण'कार या निमित्ताने लिहितात, '' ह्या तडीपार केलेल्या व तिथून पळून आलेल्या गुन्हेगाराला पकडण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यानी काहीच प्रयत्न केले नाहीत. ज्या माणसांनी या गुन्हेगारास पाहिले त्यांची काहीच छानबीन केली नाही. मुख्य मॅजिस्ट्रेटचा तर या गोष्टीवर विश्वासच बसेना. जेव्हा पट्टावाग याला ठेवले होते त्या मॉरिशसच्या सरकारकडून पट्टावाग व सुमारे बारा कैदी पळून गेले.

''अशा स्वरूपाचे पत्र आले तेव्हाच त्यांचा विश्वास बसला. त्यासंबंधी जी आम्ही बातमी प्रसिद्ध केली होती ती खरी आहे अशी अधिकाऱ्यांची नंतर खात्री झाली. पट्टावागसारख्या क्रूर गुन्हेगारास पकडण्यासाठी सरकारने ताबडतोब प्रयत्न करावेत. वर्तमानपत्राने या अधिकाऱ्यास ज्या गोष्टी कळतात त्या अधिकाऱ्यांनी इतरांपेक्षा स्वत:च्या डोक्याचा वापर केल्यास अधिक चांगले होईल.''

ह्यावरून 'दर्पण' पत्रातील बातम्या किती अचूक होत्या आणि हे पत्र किती जागरूक होते याची कल्पना येईल. वरील वृत्तावरून सरकारी अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार, निष्काळजीपणा आणि 'दर्पण'कारांची निष्ठा व पत्रव्यवसायातील बांधिलकी दिसून येते. सरकारी नोकरांच्या, अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेवर ताषेरे उडविणे, लाचलुचपत, लांडीलबाडी यावर टीकास्त्र सोडणे, अधिकाऱ्यांच्यावर बारीक लक्ष ठेवून त्यांच्या अधिकाराचा गैरवापर होऊ न देणे अशा स्वरूपाचे कार्य 'दर्पण'कारांनी केले. कोणालाही न भिता जनतेच्या, देशाच्या कल्याणासाठी बाळशास्त्र्यांनी लेखणी झिजविली. देशोन्नतीच्या मार्गात येणारे अडथळे दूर करून सरकारला नवीन कार्याची अंमलबजावणी करण्यास भाग पाडले. 'दर्पण'चे हे कार्य प्रशंसनीय म्हणावे लागेल.

### धर्मासंबंधी

इंग्रजी राज्याबरोबर इंग्रजी शिक्षण आले. पण याच इंग्रजी शिक्षणाचे बोट धरून इंग्रजांचा धर्म आणि संस्कृतीही येऊ लागली. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी सुरू केलेल्या धर्मप्रसारामुळे त्या काळात धर्मांतराचे मोठे संकट हिंदू समाजावर आले. हिंदू समाजातून कोण बाहेर जाते याची हिंदू समाजाने आजपर्यंत कधीच पर्वा केलेली नव्हती. तेव्हा बाहेर जाणाऱ्यांना परत कसे आणावे ह्याची चिंता करण्याचे त्याला कधी कारणच पडले नाही. पण धर्माकडे पाहण्याची बाळशास्त्र्यांची दृष्टी फार विशाल आणि संग्राहक होती. इंग्रजी विद्येच्या प्रसाराबरोबर ख्रिस्ती धर्माचा प्रसार होतो आहे हे त्यांच्या लक्षात आले. पाश्चात्यांच्या ज्ञानाचे आणि विज्ञानाचे ते कट्टे पुरस्कर्ते होते. पण त्याचबरोबर त्यांना हिंदू धर्माचा आणि संस्कृतीचा प्रखर, अभिमान होता. मात्र धर्माभिमानाला उदार भावनेची जोड मिळायला हवी अशी त्यांची भूमिका होती. त्या काळात धर्माचा अशा गोष्टीने विचार करणे ही काही सामान्य गोष्ट नव्हती. इंग्रजी शिकलेले त्यावेळचे कित्येक विद्वान आणि पंडित शास्त्रीसुद्धा ख्रिस्ती धर्मात गेले.

पण सर्वांपेक्षा जास्त इंग्रजी विद्या हस्तगत करूनही बाळशास्त्री यांनी आपले स्वत्व आणि स्वाभिमान मुळीच सोडला नाही. आपल्या वृत्तपत्रात धर्मांतराची बातमी ते अगदी कटाक्षाने देत असत.

**धर्मांतराचे संकट**

श्रीपाद शेषाद्री ह्याने ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला त्यावेळी त्याला पुन: हिंदू धर्मात घेण्यासाठी, सनातनीविरुद्ध बाळशास्त्री, असे दोन तट पडून हे प्रकरण खूपच चिघळले. बाळशास्त्र्यांवर त्यावेळी बहिष्कारही टाकण्यात आला. शेवटी आपल्यामुळे समाजात फूट पडू नये म्हणून त्यांनी माघार घेतली. 'दर्पण' पत्राने अशाच हिंदू लोकांनी ख्रिस्ती धर्मात प्रवेश केल्याच्या बातम्या प्रसिद्ध केल्या. अशा लोकांविषयी समाजात खूप उत्सुकता असे आणि तो सर्वांच्या चर्चेचा विषय असे. त्यामुळे धर्मांतर केलेल्या व्यक्तीचे स्वभावविशेष, त्याचे व्यक्तिमत्त्व आणि त्याची परिस्थिती याचेसुद्धा वर्णन केले आहे. ''ख्रिस्ती झालेला गिरमाजी आपा याचा वृत्तांत'' या शीर्षकाखाली दिलेली बातमी अशाच स्वरूपाची आहे. ''गिरमाजी आपा जोशी याने आपला हिंदू धर्म सोडून ख्रिस्ती धर्म स्विकारला आहे. त्याच्या गृहवर्तणुकीची आणि प्रतिष्ठेची माहिती मिळविण्याचा आम्हीं प्रयत्न केला परंतु आम्हास ती मिळाली नाही. या ब्राह्मणाविषयी खूपच बातम्या आमच्या कानावर आल्या आहेत. परंतु त्या विसंगत असल्यामुळे आम्ही त्यावर विश्वास ठेऊ शकत नाही. विश्वास ठेवण्याइतपत एक बातमी, पत्राने आमच्याकडे आलेली आहे. त्यामध्ये गिरमाजी आपा हा जोशीपणा करून भिक्षा मागत असे. आता तो ख्रिस्ती धर्मात जाऊन स्वयंपाक्याचे काम करतो आहे. तो नाशिकमध्ये राहात असून सध्या मुंबईमध्ये मुलींची शाळा काढून स्वत:चा उदरनिर्वाह चालवतो. त्याने ख्रिस्ती देवळात प्रवेश मिळविण्यासाठी मेस्तर उइल साहेबानं सांगितले. तेव्हापासून त्याच्यात बदल झाला आणि त्याला जो सत्यधर्म वाटतो त्याचे तो आचरण करू लागला. म्हणून त्याने ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला.''

दुसरी बातमी म्हणजे, ''कलकत्यातील बाबू कृष्णा मोहन बानरजी याने हिंदू धर्मातून ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला. तो हिंदू कॉलेजमध्ये शिकलेला असून 'इनक्वायरर' वर्तमानपत्राचा चालक आहे. रे. मे. डफ साहेबाने त्यास बापतिज्मा देऊन ख्रिस्ती धर्मात घेतले. या साहेबांनी जी ख्रिस्ती धर्माची पुस्तके लिहिली आहेत ती एतद्देशीय तरुण मुले वाचतात आणि ख्रिस्ती धर्मात प्रवेश करतात. या गृहस्थाच्या बाबतीतही असेच झाले.''

धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीची कारणमीमांसा 'दर्पण'कार मुद्दाम देतात. परंतु उपलब्ध अंकावरून ख्रिस्ती धर्मात प्रवेश करू नये असे स्पष्ट कुठेच लिहिलेले आढळत नाही. कदाचित श्रीपाद शेषाद्रीच्या प्रकरणावरून जो त्यांना मनस्ताप झाला त्यावरून कदाचित त्यांनी धडा घेतला असेल. परंतु धर्मांतराच्या प्रकरणांना आणि धार्मिक वादांना त्यांनी पत्रात खूपच स्थान दिलेले आहे. हे 'दर्पण'मधील वाचकांच्या पत्रव्यवहारावरून सिद्ध होते.

बाळशास्त्री हे कट्टर हिंदू धर्माभिमानी होते. ख्रिस्ती धर्माचे संकट पाहता ते जबर होते. आपण जर गप्प बसलो तर सारा धर्मच धोक्यात येईल अशी त्यांची धारणा. बुद्धीच्या कसोटीवर धर्माची तत्त्वे तपासली पाहिजेत आणि कालबाह्य तत्त्वे झिडकारून नव्या मूल्यांचा स्वीकार केला पाहिजे किंबहुना परिस्थिती जस जसी बदलत जाते तसे धर्मानेही बदलावे आणि मानवी कल्याणासाठी धर्म असावा असे त्यांचे धर्मविषयक विचार होते. म्हणूनच त्यांनी धार्मिक गोष्टींना 'दर्पण'मध्ये स्थान दिले, आणि त्यांनी लोकांच्या मनावर जो धर्माचा जबरदस्त पगडा बसला होता तो थोडा शिथील करण्याचा प्रयत्न केला.

### धर्मग्रंथ चळवळीला स्थान

धर्माच्या चळवळीत ख्रिस्ती व हिंदू धर्मग्रंथांच्या प्रसिद्धीकरणामुळे खूपच वादंग उठले. एकमेकांच्या धर्मग्रंथातील दोष दाखवून व आपल्या धर्मग्रंथाचे समर्थन करून आपलाच धर्म कसा श्रेष्ठ आहे हे पटवून देण्याच्या कार्याला त्यावेळी ऊत आला होता. वृत्तपत्र अगर छापील पुस्तके या साधनाद्वारे मतप्रदर्शन केले जाई. 'दर्पण'कारांनी अशा ग्रंथांची नमुनेदार परीक्षणे छापली आहेत. ग्रंथ प्रसिद्ध झाला की तो सूक्ष्मपणे वाचून त्या ग्रंथाचे गुणदोष दाखवणे, प्रसंगी तो वाचकांना विकत घेण्यास अथवा वाचण्यास प्रवृत्त करणे हे कार्य 'दर्पण'कारांनी नित्यनियमाने पार पाडले आहे. पाद्री उइलसन् साहेबाने लिहिलेल्या 'हिंदू धर्म प्रसिद्धीकरण' या ग्रंथाचे असेच समर्थन केलेले आहे.'' पाद्री उइलसन् यांनी मोरभट दांडेकरांचे हिंदू धर्म स्थापनेचे उत्तर, इंग्रजीत व मराठीत 'हिंदूधर्मप्रसिद्धिकरण' या नावाने छापले असून ते विकायचे आहे. उइलसन् साहेबांच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत गेले वर्षी त्यांचा व मोरभटाचा जो वाद झाला त्याचा वृत्तांत संक्षेपाने लिहिला आहे. तसेच हिंदू धर्माची स्थापना मोरभट्टाने

कोणत्या रीतीने तयार केली व छापली हेही लिहिले आहे. ब्राह्मणाने हिंदू धर्म स्थापण्याकरिता पुढे येऊन आणि त्यासंबंधी ग्रंथ छापून वादाचा प्रारंभ केला. अशीही गोष्ट प्रथम मोरभटानेच केली असे आम्हास वाटते.'' अशा स्वरूपाचे ग्रंथाचे थोडक्यात परीक्षण करून, ग्रंथाची जाहिरात करून नकळत त्यावर आपले मतप्रदर्शनही केलेले आढळून येते.

तत्कालिन काळात प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाची माहिती, त्यांचे स्वरूप वाचकापर्यंत पोहोचवणे, त्याच्या सामर्थ्य मर्यादासहित विश्लेषण करणे हे कार्य 'दर्पण'ने सातत्याने केले. 'दर्पण'ने प्रसिद्ध केलेला 'प्राचीन धर्म व हिंदू धर्म यांचे स्वरूप व साम्य यांचा शोध' हा स्फूटलेख ले. क. वानस केनडी यांच्या ग्रंथावर आधारित असून ग्रंथपरीक्षणाचा एक आदर्श नमुना म्हणूनच त्याकडे पहावे लागेल. बाळशास्त्री विद्वान, अभ्यासू आणि जागरूक पत्रकार होते. म्हणूनच अशा स्वरूपाचे ग्रंथ काळजीपूर्वक वाचून त्यावरील परीक्षणे ते काटेकोरपणे तयार करीत असत. ''केनडी साहेबांचा हा ग्रंथ अलिकडेच प्रसिद्ध झाला असून ते भाषाभिज्ञ व संस्कृत आणि अनेक भाषात निपुण आहेत. त्यांची पक्षपात विरहित दृष्टी, चिकित्सक वृत्ती, यामुळे त्यांनी हिंदू धर्माचे यथातथ्य वर्णन केले आहे. आम्ही तो ग्रंथ सूक्ष्मपणे आणि मोठ्या आवडीने वाचला असून, केनडी साहेबांची सर्वच मते आम्हास मान्य आहेत असे नाही. त्यांनी मन:कल्पीत गोष्टी मांडल्या नाहीत. ते, शास्त्रे प्राचीन आहेत असे मानतात. परंतु त्यांची उत्पत्ती ईश्वरापासून झाली हे त्यांना अमान्य आहे. त्यांना जसा हिंदू धर्म वाटेल, तसे त्यांनी त्यांचे वर्णन केले आहे. बेतली साहेब आणि इतर लेखकांनी केलेले सिद्धांत त्यांनी खोडून टाकलेले आहेत. हिंदू धर्माची पुस्तके सातशे आठशे वर्षाच्या आतील नसून ती तीन हजार वर्षापासूनची आहेत असे त्यांचे म्हणणे आहे व त्यांनी तो शोध लावला. तसेच इतर प्राचीन धर्म व हिंदू धर्म यामध्ये सारखेपणा आहे हे दाखवून दिले आहे. शिवाय संस्कृत व अन्य प्राचीन भाषा यात जवळीकता आहे हे सिद्ध केले आहे. त्यावरून प्राचीन धर्म हे हिंदू मतापासून उत्पन्न झाले होते ही गोष्ट पटते. हिंदू शास्त्र्यांचे फल व मानवांच्या मनावर होणारे परिणाम यांविषयी केनडी साहेबांनी संक्षेपाने लिहिले आहे. या ग्रंथातील पुष्कळ मते सत्य व पक्षपातरहित आहेत. हिंदू धर्माचे ज्ञान करून घ्यायचे असेल तर हा ग्रंथ वाचावा. ग्रंथकारांचे पूर्ण ज्ञान, शोधक दृष्टी, परिश्रम आणि सूक्ष्म बुद्धि दिसून येते. तसेच केनडी साहेबांची विद्वत्ता आणि पूर्वदेशीयभाषाभिज्ञ वृत्ती दिसून येते. ग्रंथ चांगल्या योग्यतेचा आहे.''

हिंदू धर्माच्या चळवळीत 'दर्पण' वृत्तपत्राने नि:संशय मोठी कामगिरी केली आहे. या चळवळीतूनच हिंदू धर्माचे खरे स्वरूप बाहेर पडले. जिथे दोष असतील तेथे प्रहार आणि जे योग्य असेल त्याचा पुरस्कार ही वृत्ती 'दर्पण'ने प्रथमपासूनच जोपासली होती.

### सांस्कृतिक

'दर्पण'कारांनी तत्कालिन सांस्कृतिक घडामोडींना पत्रामध्ये स्थान दिलेले आहे. कोणत्याही देशाची सांस्कृतिक पार्श्वभूमी बळकट असेल तर तो प्रगतीपथाकडे जाऊ शकतो. म्हणूनच त्यांनी सांस्कृतिक बाबींना महत्त्व दिले. त्यातही बाळशास्त्र्यांची जागरुकता आणि समाजोद्धाराची कळकळ प्रकट होते. नाचतमाशे किंवा कसबिणीच्या कोठ्या हे मनोरंजनाचे साधन जरी असले तरी त्या गोष्टीपासून समाजाला वाईट परिणाम भोगायला लागतात. मनोरंजन करणाऱ्या मंडळींचे आयुष्य दु:खात भरडले जाते. समाजामध्ये अप्प्रवृत्ती वाढीस लागतात, आणि समाजाच्या विकासालाच खीळ बसते. त्यामुळे नाचतमाशांना त्यांनी कडक विरोध केलेला दिसून येतो. परंतु कलकत्यामध्ये जेंव्हा हिंदू नाटकांचे थिएटर सुरू झाले तेव्हा त्याचे बाळशास्त्र्यांनी स्वागत केलेले दिसून येते. कारण नाटक हे प्राचीन हिंदू संस्कृतीचे आणि सांस्कृतिक चळवळीचे प्रमुख साधन होते. हिंदुस्थानात ज्या नव्या गोष्टींचा प्रसार झाला, त्यात कलकत्यामध्ये हिंदू नाटकशाळा सुरू झाली. त्या सांस्कृतिक घटनेचे समर्थन करताना म्हटले आहे, ''डॉ. विल्सन् साहेबांनी 'हिंदूनाटक संग्रह' या ग्रंथात लिहिले आहे. चौदाशे-पंधराशे वर्षापूर्वी युरोप खंडात नाटकविद्या नव्हती. त्यावेळेस हिंदुस्थानातील नाटके अस्ताला चालली होती. मुसलमानी ग्रंथात नाटकांचे उल्लेख सापडत नाहीत, त्यामुळे हिंदुस्थानात मुसलमानांनी नाटकाला प्रवृत्त केले असे म्हणताच येत नाही.''

नाटकशाळेच्या निमित्ताने बाळशास्त्र्यांनी नाटकांच्या मुळाचा शोध घेऊन त्यावर दृष्टिक्षेप टाकला आहे. ते लिहितात, ''हिंदूंची नाटके ही या देशात उत्तरेकडच्या व पश्चिमेकडच्या मुसलमान लोकांचा अंमल होण्यापूर्वी केलेली होती. ज्यावेळी हिंदूराजे संस्कृत नाटकांचा रस घेण्यास समर्थ होते त्यावेळी नाटके उदयास आली असावीत. कारण भोजराजा व त्यांचे कित्येक वंशज यांच्या दरबारात जे कवी होते त्यांनी केलेल्या 'शाकुंतल' इत्यादी नाटकावरून दिसून येते. पुष्कळ नाटके ही

अलीकडील आहेत हे सिद्ध करता येते. 'धर्मविजय' सारख्या नाटकांना तर दोनशे वर्षेही झाली नाहीत. या अलीकडील नाटकांचा अभिनय कधी झाला असेल असे आम्हास वाटत नाही. ती संस्कृत भाषेत लिहिली आहेत. ती भाषा मुसलमानांच्या राज्यात फार थोड्या लोकांनाच समजत होती. तसेच त्या नाटकात विचित्र भाषांची अनेक संभाषणे आहेत. त्या नाटकातील भाषा कवींना अगर भाषेच्या अभ्यासकांनाच समजते. ही नाटके ज्या राजांच्या नावाने केली आहेत, त्या राजांची माहितीसुद्धा बखरीमध्ये आढळत नाही. कुठल्याही एका राजदरबारात नाटकाद्वारे मनोरंजन करण्याची पद्धत असती तर मुसलमान व युरोपियन बखरकारांनी ती गोष्ट लिहिली असती. यावरून सिद्ध होते की, अर्वाचीन नाटके ज्या राजांच्या नावाने केली आहेत आणि त्यांचा प्रथम सभेत अभिनय केला असे प्रस्तावनेत असते, हे सर्व कल्पित आहे. कदाचित प्राचीन व अर्वाचीन नाटके विद्वान लोकांच्या मनोरंजनासाठी इतर काव्यासारखी केली असतील. ते कसे असेल ते असो. एक गोष्ट निर्विवाद आहे, की जरी या नाटकांचा कोठे प्रयोग झाला असला तर ऐकणाऱ्यामध्ये थोडक्यांचेच मनोरंजन झाले असेल. डॉक्टर विल्सन्चे मत आहे की, 'नाटकांचा प्रयोग प्राचीन राजांच्या दरबारात होत आहे. त्यांनी याविषयी म्हटले आहे ती ऐकणाऱ्यातून बऱ्याच जणांना समजत नसतील आणि त्यापासून सामान्य लोकांच्या मनात रस किंवा अभिरूची निर्माण झाली नसेल.'

इतक्या वर्षांनी आता हिंदू नाटकांचा परकीय भाषेत प्रयोग होतो आहे आणि त्यापासून एतद्देशीय आणि इंग्रज लोकांचे मनोरंजन होते हे पाहून आनंद वाटतो. अशा गोष्टी होतील हे कालिदासाच्या आणि भवभूतीच्या कधी मनातही आले नसेल. आमची खात्री आहे की, ''कलकत्यातील हिंदू नाटक शाळेस एतद्देशीय व इंग्रज लोक मदत करतील. 'रिफार्मर' वृत्तपत्राच्या संपादकाप्रमाणेच आम्ही इच्छा प्रकट करतो की, या नाटकापासून जे मनोरंजन होईल तेणेकरून देशातील अभद्र जत्रा अशा स्वरूपाचे समारंभ बंद होतील.''

नाटकांची कला जगामध्ये प्रथमत:च हिंदूंना अवगत होती. यासाठी बाळशास्त्र्यांनी नाटकाच्या उगमाचा शोध घेऊन त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. समाजातील अनिष्ट प्रथा, रूढी, परंपरा बंद करण्याच्या कामी नाटकासारख्या सांस्कृतिक माध्यमाचा उपयोग होऊ शकेल असा दूरदर्शी विचार

बाळशास्त्र्यांचा होता. बारिक सारीक गोष्टीमधून दिसून येणारी 'दर्पण'कारांची समाजोद्धाराची दृष्टीही येथे दिसून येते.

### आर्थिक विचार

'दर्पण'कारांनी जसे धर्म, शिक्षण आणि समाजोन्नतीच्या कार्याला पत्रात स्थान दिले, तसे आर्थिक विचारालाही प्राधान्य दिलेले आढळून येते. समाजोन्नतीसाठी देशाची आर्थिक बाजू मजबूत असायला हवी. तरच प्रगती शक्य आहे अशी बाळशास्त्र्यांची धारणा होती. यासाठी सरकारने लोकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी योजना राबवल्या पाहिजेत असाही त्यांनी हट्ट धरला. शेतकऱ्यांच्या पिकासाठी कर्ज देणे, त्यांच्या मालाला योग्य भाव देणे, कारागिरांना उत्तेजन देऊन उत्पन्न वाढविणे, व्यापार वाढविणे, बँकांची निर्मिती करणे अशा स्वरूपाचे अनेक उपाय 'दर्पण'मधून सरकारला सुचवून दिले.

### शेतकऱ्यांच्या समस्या

बाळशास्त्री हे जागरूक संपादक असल्याने इतर प्रांतात चाललेल्या घडामोडींचे पडसाद आपल्या प्रांतातील लोकांना कळविणे किंवा प्रसंगी इतर पत्रातील बातम्या आपल्या पत्रात छापणे असा त्यांचा नित्यक्रम असे. कलकत्यातील वृत्तपत्रांमध्ये ''गव्हर्नर जनरल साहेबांनी शेतकऱ्यांना वीस हजार रुपयाची मदत करून कापूस, तंबाखू, साखर, रेशीम या सारखी पिके उत्तम काढणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षिस देण्याचे ठरविले आहे.'' अशी बातमी आली होती. हे वृत्त 'दर्पण' निर्मितीनंतरच्या दुसऱ्याच म्हणजे २० जानेवारी १८३२ च्या अंकात देऊन मुंबई इलाख्यातील शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी जांभेकरांनी आवाज उठविला. बंगाल प्रांतातील सरकार शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील असताना मुंबई प्रांतातील सरकार शेतकऱ्यासाठी काहीच करत नाही. उलट शेतकऱ्यांचे हालच होत आहेत. धान्याची आयात वाढल्याने सर्वच धान्याच्या किंमती उतरत चालल्या आहेत. त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांनी देखील पैसा मिळवून देणारी पिके घ्यायला हवीत. त्यासाठी तो कष्ट करीत नाही. त्यांना जर ती पिके घेण्याची पद्धती शिकविली, त्यांना आर्थिक मदत देऊन मार्गदर्शन केले तर तो कष्ट करू शकेल. अमेरिकेत तंबाखू चांगला पिकतो आणि मॉरिशस् येथे कापूस चांगला पिकतो म्हणून सरकारने तेथून कापूस व

तंबाखूचे बियाणे आणून शेतकरी वर्गात मोफत वाटण्याचा हुकूम काढला आहे. शिवाय पिके कशी घ्यावीत यांची माहिती देशीभाषेतील पुस्तकात लिहून ती सर्वत्र वाटण्याची तजवीज केली आहे. कापूस साफ करायची यंत्रे पाठवून त्यामध्ये फुकट कापूस स्वच्छ करून दिला जातो. अलीकडे तर साखर व रेशीम उत्पादनासाठी चांगल्या कराराने ज्या जमिनी दिल्या आहेत ते उद्योग सफल झाल्यास बरेच लोक अशा कामासाठी प्रवृत्त होतील. मातब्बर आणि प्रतिष्ठित गृहस्थास अशा कौलाने मक्ते देणे यापासून सुद्धा शेतकरी वर्गाचे कल्याण होईल. सरकारने देखील शेतकऱ्यांना वेळोवेळी मदत करावी. म्हणजे उत्पन्न वाढेल आणि देशाचा महसूल अधिक होऊन जनतेचे कल्याण होईल.

शेतकऱ्यांच्या समस्या, त्यावरील उपाय यासंबंधीही बाळशास्त्र्यांनी विचार मांडले आहेत. हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतीमध्ये प्रगती झाली पाहिजे, शास्त्रशुद्ध शेती करून आर्थिक उत्पादन देणाऱ्या पिकांना अग्रक्रम दिला पाहिजे. अशा विचारांनीच बाळशास्त्र्यांनी 'दर्पण'मधून लिहिले आहे. शिवाय शेतकऱ्यांच्या तंबाखू, कापूस, साखर, रेशीम या पिकावरच औद्योगिक विकास अवलंबून आहे हे त्यांनी जाणले होते.

देशातील आर्थिक विचाराबाबत 'दर्पण'कारांचे मत उदार स्वरूपाचे होते. मद्रास, कलकत्ता येथे जशी बँकांची निर्मिती झालेली आहे तशीच सरकारने मुंबई प्रांतात बँकेची सोय उपलब्ध करून लोकांचे कल्याण करावे असे 'दर्पण'कार सुचवितात. तसेच खर्च फार होतो म्हणून विलायतेशी आगीच्या जहाजाने व्यवहार करण्यास ज्यावेळी नकार आला आणि गलबत अशा कामासाठी लावू नये अशी कोर्ट ऑफ डायरेक्टर्स् यांनी भूमिका घेतली तेव्हा 'दर्पण'ने आवाज उठविला. कारण जहाजाचे दळणवळण ठेवले तरच परदेशी व्यापार होईल. हे बाळशास्त्री जाणून होते. त्यामुळे पाश्चिमात्य देशाशी सतत संपर्क ठेवण्यासाठी हा मार्ग चालूच केला पाहिजे असे जांभेकरांनी सांगितले. कारण यातच जनतेचा, देशाचा फायदा आहे. त्यामुळे सरकारने नफ्याची गोष्ट सोडून हा व्यवहार पुन्हा सुरू करावा.

बाळशास्त्र्यांनी 'दर्पण'मधून सरकारच्या आर्थिक घडामोडींचा तपशील जनतेपर्यंत नेऊन पोहचवला. 'कंपनी सरकारच्या तीन इलाख्यातील जमा-खर्चाची याद' या

शीर्षकाखाली लेख लिहून मुंबई, मद्रास, कलकत्ता या तीन प्रांतातील १८२७ ते १८३० या तीन वर्षात सरकारने एकूण किती खर्च केला याची माहिती, आकडेवारीसह जनतेसमोर ठेवली आहे. ''तीन वर्षात या खात्यातील खर्च जमेपेक्षा अनुक्रमे १,३२,८४,६७९, १,१७,४२,०८५, आणि १,०९,६०,७०० रुपये इतका अधिक झाला. पेशव्यापासून एवढा मातब्बर मुलूख प्राप्त करून इंग्रजांनी शांतता आणि सुव्यवस्थेचे राज्य आणले. त्यामुळे इंग्रज सरकारांत काही एक रक्कम शिल्लक राहील असे बहुतेकांना वाटत होते. परंतु तोटा झालेला पाहून आश्चर्य वाटते. अधिक खर्च कुठे आणि कसा झाला याचे कारण कळायला साधन नाही. आणि सरकारी वहिवाटीची पूर्णपणे माहितीही नाही. परंतु यावरून वाचकांनी समजावे की, सरकारास खर्च कमी करणे भाग पडले म्हणून त्यांनी सर्वच ठिकाणी तसे केले आहे. प्रस्तुतच्या लेखावरून सरकारच्या राज्यकारभारावर बाळशास्त्र्यांचे बारीक लक्ष होते. आणि अधिक खर्च कसा व कुठे झाला याचा जाबही ज्यांनी सरकारला विचारला आहे. पेशव्यांच्या अनागोंदी कारभारामुळे जनता विटली होती. इंग्रजांच्या हाती सत्ता आल्यावर कायदा आणि सुव्यवस्थेचे राज्य आले. त्यामुळे उधळपट्टीवर नियंत्रण बसले. काही एक रक्कम शिल्लक रहायला हवी होती, पण तोटा झालेला पाहून, सरकारच्या कारभारावर आश्चर्य व्यक्त केलेले आहे. बाळशास्त्र्यांचा मुत्सद्दीपणा येथे दिसून येतो.

**राजकीय विचार**

'दर्पण'ने राजकीय घडामोडी जनतेपर्यंत नेऊन जनतेला काही नव्या गोष्टींची जाण करून देण्याचा प्रयत्न केला. इंग्लंडमधील पार्लमेंट आणि जनता यामध्ये झालेला संघर्ष आणि बदल, हिंदुस्थानविषयक पार्लमेंटचे धोरण किंवा ब्रिटिश अधिकाऱ्यांचे विचार, सुधारणाविषयक पास होणारे कायदे, एतद्देशीयांना उच्चपदी नेमणूक करण्यासंबंधीचे प्रयत्न, अशा चौफेर बाजूंनी 'दर्पण'ने लेखन केले आहे. जनतेला नेहमी जागरूक ठेवणे हा त्याचा स्थायीभाव होता. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर जगाच्या घडामोडीमध्ये होणारे बदल विशेषत: इंग्लंडमधील राजकीय परिस्थितीचे आकलन जनतेला करून देण्याचा 'दर्पण'चा दृष्टिकोन उल्लेखनीय म्हणावा लागेल. फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिलेली देणगी म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता ही लोकशाहीची प्रभावी मूल्ये आणि व्यक्तिवादाचा प्रभावी पुरस्कार. या सर्वांचे साद पडसाद 'दर्पण'मधून प्रकट झालेले दिसून येतात.

हिंदुस्थानी लोकांना राज्यकारभारामध्ये उच्चपदस्थानी सामावून घेण्यासाठी 'दर्पण'ने प्रथमत: विचार मांडले. ''राज्यकारभारातील कित्येक खात्यात, विश्वासाचे, आब्रूचे आणि जोखिमाचे जागावर एतद्देशीयांना नेमले असता, राज्यकारभार योग्य होईल किंवा नाही या गोष्टींचा विचार सरकारने आणि कोर्ट ऑफ डायरेक्टरने पुष्कळ वेळा केला आहे. या देशात प्रामाणिक आणि उद्योगी माणसे असून राज्यकारभाराची वहिवाट त्यांच्या स्वाधीन केल्यास काळजी करण्याचे कारण नाही. उलट आपला स्वार्थच आहे असे कंपनी सरकारच्या नोकरांनी सांगितले आहे. तरीसुद्धा या देशातील लोकांची वरिष्ठ जागेवर नेमणूक झाली नाही. पुष्कळ वर्षे झाली तरी येथील लोकांचा अधिकार सरकारने लक्षात घेतलेला नाही हे पाहून वाईट वाटते. परंतु याचा शोक न करता बंगाल व मुंबई येथील सरकारने नेटिव्ह जज्ज व कमिशनर यांना मोठा अधिकार आणि मोठी प्राप्ती करून देण्याकरिता जे कायदे केले आहेत त्यावरून सरकारच्या ध्येय धोरणात फरक पडत चालला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. सरकारने जी जबाबदारी आणि विश्वास आमच्या लोकांवर ठेवला ते कार्य त्यांनी उत्तमरीतीने पार पाडावे यातच त्यांचे हित आहे. कित्येक जणांना वाटते की एतद्देशीयाजवळ प्रामाणिकपणा, बुद्धी व मोठ्या जागेवर काम करण्याची कुवत नाही. परंतु हे अज्ञानपणाचे आणि द्वेषाचे लक्षण आहे. प्राचीन बखरा आणि लोकांची स्थिती पाहिल्यास या देशातील लोकांत बुद्धी आणि नीती यांचे दाखले पुष्कळ आढळतात. राज्यकारभारामध्ये मोठमोठ्या जागेवर काम करण्यास, बुद्धीमान, प्रामाणिक व बहुश्रुत लोक सापडणार नाहीत असा कित्येकांचा भ्रम आहे तो या दाखल्यावरून खोटा करता येतो.''

बाळशास्त्र्यांच्या 'दर्पण'मधील विचारावरून सरकारला वरिष्ठ जागा एतद्देशीयांना देणे भाग पाडणे आणि एतद्देशीयांचा त्याकामी आत्मविश्वास वाढीस लावणे हे दिसून येते. ''आमच्या सरकारचे आम्हावर चांगले लक्ष्य आहे. आम्हास एकवेळ तपासून पहावे, असे त्यांच्या मनात आहे. जर त्यांनी विश्वासाने आणि प्रामाणिकपणे काम केले तर यापेक्षा मोठी संधी प्राप्त होईल आणि त्यांचे कल्याण होईल. यामुळे कित्येक लोकांच्या मनात असलेला उदासीनपणा जाईल. ते आपल्या मुलांना अधिक पैसा व श्रम खर्च करून चांगले शिक्षण देतील. अलीकडे विद्येच्या प्रवाहामुळे नवीन तरुण वर्ग तयार होत आहे. त्याची इंग्रजी भाषेतील प्रवीणता, पाश्चात्य विद्यांचे आकलन,

आणि त्यांचा बहुश्रुतपणा पाहून निश्चितच त्यांना चांगल्या हुद्यावर काम आणि प्रतिष्ठा मिळेल.'' तरुणांना आवाहन करून त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत करणे हे बाळशास्त्र्यांनी महत्त्वाचे मानले. कारण राजकीय बाबतीत ते मुत्सद्दी आणि धूर्त होते. यासाठी तर एल्फिन्स्टन साहेबांनी प्रकट केलेले मनोगत त्यांनी मुद्दाम दिले आहे. ''विद्या वाढू लागली म्हणजे राज्यातील मोठ-मोठी कामे या देशातील लोकांस द्यावी असे आपोआप होईल. आणि अंतस्थ राज्यमसलती आणि लढाईसाठी मोठे अंमल या वाचून इतर सर्व ठिकाणे त्यास सोई पाहून मिळाया जोगी करावी आणि शेवटी ती सर्व त्यांसच मात्र मिळावी असे करणे राज्यनीतीस योग्य आहे.'' यावरून बाळशास्त्र्यांना आपल्या हक्कांची जाणीव होऊन त्यांना स्वातंत्र्याची कुणकुण लागली होती असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये.

'दर्पण'कारांनी सरकारच्या अधिकाऱ्यांची मने वळविण्याचा प्रयत्न केला. एतद्देशीयांना उच्चपदस्थानी नेमल्यास जनतेचा सरकारवर अधिक विश्वास बसेल आणि सरकारला राज्यकारभार करणे सोपे जाईल असे बाळशास्त्र्यांना वाटत होते. राज्यकारभारामध्ये हळूहळू बदल करण्यास सरकारला भाग पाडणे हेच बाळशास्त्र्यांनी महत्त्वाचे मानले आणि त्यासाठी एतद्देशीय लोकांची मने खंबीर करण्याचा प्रयत्न त्यांनी 'दर्पण' मधून केला.

इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये हिंदुस्थानची न्याय व्यवस्था सुव्यवस्थित करण्याचा महत्त्वाचा बदल घडून आला. त्याचे वृत्त जांभेकरांनी 'दर्पण'मधून दिले आहे. त्याकाळी हिंदुस्थानमधून इंग्लंडला अपिले पाठवावी लागत असत. जे न्यायदानास बसतात त्यांना या देशाच्या रीतीरिवाजांची बिलकूल माहिती नसते त्यामुळेच अपिलांची चौकशी करण्यास वेळ लागतो. त्यामुळे या देशातील अधिकारी लोकांवर दहशत रहात नाही. असे होऊ नये म्हणून पार्लमेंटने एक कायदा काढला आहे. त्या कौन्सिलच्या पद्धती चांगल्या व्हाव्या आणि त्यांच्या अधिकारापासून व सत्तेपासून जनतेला फायदा व्हावा म्हणून बरेच कायदे केलेले आहेत. या नव्या नियमाप्रमाणे त्वरीत व योग्य न्यायदान होईल. इंग्लंडच्या सरकारवर जो भरवसा नव्हता तो आता राहील. ''अशा स्वरूपाच्या बातम्यांमधून सरकारमध्ये जे घडेल त्याची खडान्खडा माहिती जनतेसमोर ठेवून जनतेला विश्वासात घेऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे हे 'दर्पण'ने महत्त्वाचे कार्य केले आहे.

## इंग्लंडमधील राजकीय घटनांविषयी उत्सुकता

बाळशास्त्री जांभेकरांच्या वाचनात इतर इंग्रजी वृत्तपत्रे येत असत. तसेच काही परदेशी वृत्तपत्रेही त्यांना वाचायला मिळत. पाश्चात्य विद्वानांच्या गाठी भेटी होऊन चर्चा होत असे. शिवाय हिंदुस्थानवर ब्रिटिशांचे राज्य असल्यामुळे इंग्लंडमध्ये घडत असलेल्या घटनांची त्यांना साहजिकच उत्सुकता होती. या उत्सुकतेपोटीच आणि आपल्या देशबांधवांना तेथील समाचार सांगण्याच्या हेतूनेच त्यांनी 'दर्पण'मध्ये लिहिले आहे. इंग्लंड देशातील सरकार व जास्तीत जास्त तेथील जनता, राज्यव्यवस्थेत बदल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे कित्येकांच्या झोपा उडालेल्या आहेत. जर राज्यव्यवस्थेत बदल झाला तर सामान्य लोकांच्या हातात सत्ता येईल. ज्या मोठ्या लोकांच्या हातात सध्या सत्ता आहे ती नाहीशी होईल. म्हणून ते प्रखर विरोध करत आहेत. तेथील राज्यव्यवस्थेत बदल झाल्यास बरे होईल किंवा वाईट होईल यांविषयी आम्ही आमचे मत लिहीत नाही. परंतु एवढे मात्र सांगतो की, गरीब आणि अज्ञानी लोकांपेक्षा श्रीमंत लोकांकडे राज्याची सत्ता असावी. कारण त्या राज्यव्यवस्थेपासून देशाचे कल्याण होते. परंतु कित्येक काळानंतर लोकांच्यामध्ये बदल घडला आणि ती पद्धती देशाच्या प्रगतीस उपयोगी नाही असे वाटू लागले. तसे पाहिले असता इंग्लंडमधील जनतेच्या परिस्थितीत खूपच अंतर पडलेले आहे. म्हणूनच तेथील लोकांनी राज्यव्यवस्था बदलण्याचे ठरविले आहे. त्यांचे कार्य खूपच चांगले. परंतु अवघड आहे. इंग्लंडमधील लोकांची, त्यांच्या राज्यव्यवस्थेची आंम्हास पूर्णपणे माहिती नसल्यामुळे आम्ही आमचे मत लिहीत नाही. ''परंतु सांप्रत इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांत बहुत संबंध आहे म्हणोन ज्या गोष्टीपासून तेथे बरे वाईट होईल त्यांपासून एथेंही कांही थोडें बहुत त्याप्रमाणे होईल, म्हणोन लिहिल्या आहेत.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, १३)

बाळशास्त्र्यांनी हा लेख लिहिला आहे तो 'दर्पण'पत्र नुकतेच सुरू झाले होते तेव्हा. ज्याप्रमाणे इंग्लंडमध्ये राजकीय घडामोडी घडत होत्या आणि धनिक लोकांची सत्ता जाऊन जनतेचे राज्य येत होते, तशाच स्वरूपाचा बदल हिंदुस्थानात घडून यावा याची जाणीव बाळशास्त्र्यांनी 'दर्पण'मधून जनतेला करून दिली आहे. हे स्वातंत्र्याचे वारे बाळशास्त्र्यांच्या मनात प्रथमत:च रुजले होते. केव्हा केव्हा लिखाणातून ते स्पष्ट झालेले आहे. ''नव्या राज्यकर्त्यांच्या अंमलाखाली आपण नव्या विद्या प्राप्त करून

घेऊन जास्त शहाणे होऊ व नव्या सुधारलेल्या पद्धतीप्रमाणे राज्यकारभार हाकण्याची आपल्यामध्ये पात्रता आल्यावर आपणास पारतंत्र्यांत दडपून ठेवण्यास जगातील कोणतीही शक्ती समर्थ होणार नाही व इंग्रजी लोकांना शेवटी 'चले जाव' करणें भाग होईल अशी त्यांची खात्री होती.'' (प्रियोळकर अ. का. मनोहर, १९४७, २६६) खऱ्या अर्थाने हिंदुस्थानमध्ये 'चले जाव' चळवळीचे पहिले पुरस्कर्ते आणि द्रष्ट्ये विचारवंत म्हणून बाळशास्त्र्यांच्याकडेच बोट दाखवावे लागेल. स्वातंत्र्याचे महत्त्व त्याकाळी त्यांना पटावे आणि त्यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत हे आश्चर्य नव्हे काय ? त्यांची जागरूकता देशाभिमान आणि राष्ट्रोद्धाराची विशाल दृष्टी पाहून हेवा वाटतो.

अशाच स्वरूपाचा ५ ऑक्टोबर १९३२ साली प्रसिद्ध झालेला त्यांचा लेख– 'इंग्लंड देशांतील राजकीय सुधारणेसंबंधीचे बिल संमत झाले' हा होय. त्या लेखात ते लिहितात, ''पार्लमेंटच्या सभेत चांगल्या पद्धतीचा बदल घडून यावा यासाठी इंग्लंड देशातील लोक दोन वर्षे भांडत होते. लॉर्ड ग्रे सारख्या गुणी, धाडसी, आणि स्वदेशाचे कल्याण करणाऱ्या व्यक्तीच्या नेतृत्वाखाली तेथील लोक एकत्र आले आणि त्यांनी संघर्ष केला. अयोग्य व्यक्तीजवळ सत्ता असल्याने सर्वांचाच नाश होत होता. तिचा नायनाट करण्यासाठी त्या सर्वांनी दृढ निश्चय केला आणि ते कार्य सिद्धीस गेले. ते बिल मंजूर होऊ नये म्हणून ड्यूक ऑफ वेलिंग्टन् आणि त्याचे साथीदार प्रयत्न करत होते. परंतु त्यांचा बिमोड झाला. पूर्वी ड्यूक आणि त्याचे साथीदार व स्वार्थी प्रधानांमुळे राज्यव्यवस्थेत जे दोष निर्माण झालेत ते दूर करण्याचा प्रयत्न प्रजेच्या पक्षाचे लोक आता करू लागतील. भ्रष्ट सत्ता जाऊन आता तेथे जनतेच्या हाती सत्ता आली आहे. ''अशे चांगले रीतीने पार्लमेंट सभेपासून इंग्लंड देशांत जे कल्याण होईल असे इच्छित आहेत, त्यांतून काही विभाग या देशासही मिळेल, जेव्हां झरा स्वच्छ होतो, तेव्हां त्यापासून वाहाणारे प्रवाह निर्मळ वाहतात.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ६३)

इंग्लंडमध्ये जनतेने जशी राज्यव्यवस्था उलटून टाकली होती आणि स्वत:चे न्यायाचे राज्य आणले होते तशाच स्वरूपाचा बदल येथेही घडून यावा किंबहुना सरकारनेच जनतेकडे राज्य सुपूर्द करावे असे या लिखाणावरून स्पष्ट होते. हिंदुस्थानात इंग्रजी सत्ता स्थिर स्थावर होते ना होते तोच स्वातंत्र्याचा विशाल दृष्टिकोन बाळशास्त्र्यांनी

'दर्पण'मधून मांडला. आपले राज्य का गेले ? याचे अचूक निदान करणारा आणि स्वातंत्र्याची प्रथमत:च जाणीव करून देणारा पहिलाच पुरुष म्हणजे बाळशास्त्री जांभेकर.

'या देशावर रशियनांचा हल्ला होण्याचे भय' या मथळ्याखाली मुंबईमध्ये पसरलेल्या एका अफवेचे 'दर्पण'ने निराकरण केले आहे. मुंबईमध्ये रशियनांची टोळी विलायतच्या सरकारवर हल्ला करण्यास येत आहे अशी सर्वत्र चर्चा, तर्कवितर्क चालले होते. काही विघ्नसंतोषी मंडळी सरकारविषयी असंतोष, अविश्वास निर्माण करीत आहेत आणि येथील लोकांना घाबरवून सोडत आहेत असे लिहिले होते.

**व्यक्तीपरिचय**

'दर्पण' ने मोठ-मोठ्या विद्वान लोकांचा, साहित्यिकांचा परिचय करून देऊन त्यांच्या कार्याचे गुणविशेष वाचकांना ज्ञात करून दिले आहे. थोर व विद्वत्तापूर्ण लोकांचे आदर्श जनतेसमोर ठेवणे व जनतेस अशा कार्यास प्रवृत्त करणे हा 'दर्पण'कारांचा उद्देश होता. त्यात पाश्चात्य विचारवंत, ग्रंथकार आहेत, तसेच एतद्देशीय विद्वान, कार्यकर्तेही आहेत. राजा राममोहन रॉय सारख्या प्रज्ञावंताचा असाच परिचय आणि त्यांच्या कार्याचे थोडक्यात विश्लेषण 'दर्पण' ने केलेले आहे. राममोहन रॉय हा बंगाल देशातला राहणारा आणि जातीने ब्राह्मण आहे. त्याने लहानपणीच या देशातील व युरोप खंडातील भाषांचा अभ्यास केला. कित्येक विद्वान लोक त्यांच्या प्रवीणतेची प्रशंसा करतात. त्याला जसी विद्येची आवड तशीच धर्माच्या विचाराची आवड. त्यामुळे त्याने विचार करून आपला वर्णाश्रमादी धर्म सोडला आणि वेदांतमत स्वीकारले. दिल्लीच्या बादशहामुळे तो विलायतेस गेला. तेथे गेल्यावर राजाचा प्रधान आणि मोठमोठे लोक यांनी त्याचे कौतुक केले. दिल्लीच्या बादशहास वकील चांगला मिळाला असे तेथील लोक म्हणू लागले. विलायतच्या राजाचा भाऊ व मुलगा यांच्याशी त्याची मैत्री जमली. त्यांची मैत्री वाढेल म्हणून कंपनीच्या नोकरामध्ये भीती निर्माण झाली. कंपनीच्या कामगारांनी ज्यावेळी त्याला मेजवानी दिली त्यावेळी हिंदुस्थानच्या कारभारासंबंधी जमलेले बरेच लोक होते. परंतु त्या ब्राह्मणाने मद्यमांस खाणाऱ्यांमध्ये बसून भात व थंड पाण्याव्यतिरिक्त कशालाच स्पर्श केला नाही.'' अशा स्वरूपाची बातमी देऊन हिंदुस्थानी लोकांना धर्माभिमान जागृत करायला

लावणे आणि थोर पुरुषांचा, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करणे हे 'दर्पण'ने काटेकोरपणे कार्य केले आहे. त्याच लेखात शेवटी 'राममोहन रॉयसारिखे चमत्कारिक पुरुषांविषयींच्या गोष्टी पुढल्या एकादे कागदांत आम्ही कदाचीत लिहू'' असे नमूद केले आहे.

हिंदुस्थानात चाललेल्या न्यायदानाच्या पद्धतीची उत्तरे राममोहन रॉय यांनी पार्लमेंटपुढे दिली त्यां त्यांच्या कार्याचा आढावा 'दर्पण'मधून देण्यात आला होता. पार्लमेंटपुढे दिलेल्या उत्तराविषयी राजा राममोहन रॉय यांची खूपच वृत्तपत्रांनी स्तुती केली आहे. आजपर्यंत न्यायदानासंबंधी परखड वक्तव्य कोणी केले नव्हते. त्यामुळे न्यायदानातील दोष काढण्याविषयी, आणि दोष दूर होण्याचे उपाय सांगण्याविषयी राममोहन रॉय यांचे शहाणपण आणि मनाचा मोठेपणा लक्षात येतो. तसेच न्यायदान पद्धतीतील चांगल्या गोष्टींपासून जे कायदे झाले ते कबूलही केले आहेत. या गोष्टीवरून राममोहन रॉय यांचा भलेपणा आणि नि:पक्षपातीपणा दिसून येतो. तसेच कोणत्या राज्यकारभारात आणि विद्येत कल्याण कसे होईल हे दाखवून दिले आहे. जी सभा फार मान्यवर, जिच्याजवळ खूप अधिकार आणि तिच्याजवळ बुद्धिवंतातील बुद्धिवान लोक आहेत ती इंग्लंडची पार्लमेंटची सभा हिंदुस्थानमधल्या बंगाल प्रांतात राहणाऱ्या एका गृहस्थापासून सल्ला घेण्यास आणि त्याचे मन अजमावून घेण्यास उद्युक्त झाली आहे आणि त्या पुरुषांच्या देशात जे राज्य करतात त्यांचे सरकार त्याच्या बोलण्यास किंमत देणार नाही अशा स्वरूपाचा राज्यकारभार चालला आहे. या महान हिंदुस्थानात राजा राममोहन रॉयसारखे पुष्कळ लोक आहेत. विलायतेत जसा त्यांचा मानसन्मान केला जातो तसा जर येथे करण्यात आला तर त्याने जसा सल्ला देऊन मत मांडले तसेच तेही सांगतील.'' हिंदुस्थान सरकारने राजा राममोहन रॉय यांचा योग्य मान राखला नाही याची स्पष्ट शब्दात बाळशास्त्री जाणीव करून देतात.

व्यक्तिपरिचय करून देत असता व्यक्तीचे कार्य आणि महात्म्यही 'दर्पण' ने कथन केले आहे. प्रस्तुतच्या निवेदनावरून सरकारवर टीका केलेली दिसून येतेच. शिवाय एतद्देशीय बुद्धिवंताचा आदर करायला सरकारने शिकले पाहिजे असे नकळत सुचविले आहे.

त्याकाळी समुद्रपर्यटन करणे खूप धाडसाचे कार्य समजले जाई. अशा धाडसाच्या नवनवीन उत्सुकतापूर्ण बातम्यांना 'दर्पण'ने स्थान दिले. अशा व्यक्तीच्या गुणांचे आणि कार्याचे समर्थनही केले. ''गुजराथ येथे राहणारा सामलदास देसाभाई बोर्डोज शहरावरून इंग्लंडला गेला होता. तो या देशास परत आला. तो जातीचा अभिमान सोडून व समुद्राची भीती न बाळगता गेला होता. त्याला पहायला आणि इंग्लंड देशातील माहिती त्याच्या तोंडून ऐकायला अनेकजण गेले होते. आमची त्याच्याशी अजून भेट झाली नाही. परंतु त्याला जे भेटले त्यांच्याकडून कळले की, लंडन शहराच्या सौंदर्याचे तो फार गोडवे गातो. तसेच तेथे जे लोक त्याला भेटले ते लोक हिंदुस्थानातील इंग्रजापेक्षा अगदी भिन्न दिसून आलेत. कारण येथील इंग्रजांच्या तोंडचा जो मद्याचा वास येतो, तो तेथील लोकांच्या तोंडचा येत नाही. जेवढ्या लोकांचा त्याच्याशी परिचय आला ते लोक त्याचा सन्मान करीत, असे तो म्हणतो. हिंदुस्थानात न्याय मिळत नाही म्हणून इंग्लंडच्या सरकारकडे तो गेला होता. तेथील लोकांना जेव्हा हे कळले तेव्हा त्यांनी त्याला मदत केली व ते त्याचे मित्र बनले. जर सामलदासाविषयी किंवा त्याने दावा कसा चालविला हे आम्हास कळले तर ते प्रसिद्ध करण्यात येईल. आम्ही ऐकतो की, त्याचे हक्क व पैसा त्याला मिळण्यासाठी सरकारने हुकूम काढला आहे.''

अशाच स्वरूपाची समुद्रपर्यटनाची वार्ता 'दर्पण'ने काही परभू बानकोटास मौजेकरिता आगीची नांव करून गेले, त्याविषयी या शीर्षकाखाली दिली होती. पर्यटनाचे महत्त्व सांगून अशा लोकांच्या धाडसाचे गोडवे गाणे व एतद्देशीयांना अशा उपक्रमात सहभागी होण्यास उद्युक्त करणे हा बाळशास्त्र्यांचा दृष्टिकोन होता. एतद्देशीयातून काहींनी अशी बुद्धी दाखवली, ते पाहून आनंद होतो. जहाजाचे महत्त्व, त्याचा उपयोग, कळून येईलच. शिवाय नव्या गोष्टींचे ज्ञान मिळेल. अशा नव्या उपक्रमास जनतेने सहाय्य केले पाहिजे असे बाळशास्त्र्यांनी लिहिले आहे.

### मृत्यूलेख

मान्यवर व्यक्तींच्या कार्याविषयी त्यांची जनतेला ओळख करून देण्यासाठी 'दर्पण' ने तर लिहिले आहेच, शिवाय एखादी प्रतिष्ठित व्यक्ती मृत्यू पावल्यास त्याची बातमी व्यक्तिपरिचय आणि गुणासहित देण्यात येत असे. निधन पावल्याचे दुःखही प्रकट केले जाई. पुण्यातील सरकारी शिल्प शाळेतील मुख्य शास्त्री बाळशास्त्री

घगवे यांचा मृत्यू झाल्याची व दु:ख व्यक्त केल्याची बातमी 'दर्पण'ने प्रसिद्ध केली होती. ''बाळशास्त्री घगवे हे पटकीसारख्या आजाराने वारले असून पुण्यातील मुख्य हिंदूच्या ते परिचयाचे होते. ते पराकाष्टेचे बुद्धिमान, संस्कृतमध्ये व्युत्पन्न आणि कवी होते. काव्यनाटकाचे ते अभ्यासक असून मराठी कोशाचीही त्यांनी निर्मिती केली. त्यांच्याकडून एतद्देशीयांना खूप अपेक्षा होत्या. परंतु त्यांचे वयाच्या ३६ व्या वर्षी अकाली निधन झाले. आमचे पत्र लिहिणाराने म्हटले आहे की, त्यांचेबरोबर एतद्देशीय लोकांचे विद्याभ्यासाचे एक मुख्य भूषण आणि आश्रय गेला.''

चिमाजीराव आप्पासाहेब यांच्या मृत्यूचीही बातमी 'दर्पण'मध्ये देण्यात आली होती. ''आम्ही ऐकतो की चिमाजीराव आप्पासाहेब बाजीरावाचे कनिष्ठ बंधू वारल्याची बातमी मुंबईत आली आहे. ते २९ मे रोजी वारले. त्यांचा जन्म इ. स. १७८४ च्या एप्रिल महिन्यात गोदावरी नदीच्या काठी कोपरगावी, मुक्कामी झाला. त्यांचा बाप रघुनाथराव वारला तेव्हा त्यांची आई आनंदीबाई गरोदर होती, आणि पुढे काही महिन्यानंतर चिमाजीराव जन्मले. त्यावेळी नाना फडणवीस यांच्या अधिकाराखाली राज्य चालले होते. म्हणून चिमाजीराव, त्याची आई आनंदीबाई, भाऊ बाजीराव व त्यांच्या वडीलाचा दत्तकपुत्र अमृतराव ही सर्व सन १७९३ पर्यंत कोपरगावी कैदेत होते. नंतर त्यांस नाशिकजवळ आनंदवेलीस नेले व त्यानंतर त्यांना शिवनेरी किल्यावर बंदीत ठेवले. १७९५ मध्ये माधवराव पेशवे जुन्या वाड्यावरून उडी घेऊन गेले तेव्हाच नानांनी काम सोडले. ती संधी पाहून बाजीरावाच्या पक्षाच्या लोकांनी त्याला गादीवर बसवले. पुढे लौकरच नवा प्रधान बाळोबातात्या याने बाजीरावापासून कित्येक मंडळी फोडून शिंदे व परशुराम भाऊ पटवर्धन यांच्या मदतीने बाजीरावास अधिकारावरून काढले आणि माधवरावांची पत्नी यशोदाबाई हिला चिमाजीआप्पा दत्तक देऊन चिमाजी माधवराव या नावाने गादीवर बसविले. परंतु सर्व संस्थाने व इंग्रज सरकार यांनी बाजीरावाचा अधिकार कबूल करून त्यास पूर्ववत् गादीवर बसविले. चिमाजी आप्पास काढून टाकले आणि भावाचे राज्य घेतले म्हणून त्याकडून प्रायश्चित घेतले. तेव्हापासून त्याने राज्यकारभाराकडे दुर्लक्ष केले. इंग्रजांनी पेशव्यांचे राज्य घेतले त्यावेळेस आप्पासाहेब त्यांचे स्वाधीन झाले आणि त्यांच्या संमतीने काशीस जाऊन विलायती सरकारने वर्षास दोन लाख रुपयांची नेमणूक केली व तो तेथे राहू लागला. चिमाजी आप्पाचे पाठीमागे काहीही संतती नाही.''

अशा स्वरूपाच्या वरील मृत्यूलेखात मराठ्यांचा सारांशरूपाने इतिहासही बाळशास्त्र्यांनी सांगितला आहे. चिमाजी आप्पा पेशवे घराण्यातील असल्यामुळे त्यांच्या जन्मापासून काही ठळक गोष्टींची माहिती 'दर्पण'कारांनी लिहिली आहे. 'दर्पण'कारांनी सर्वच घडामोडींना 'दर्पण'मध्ये स्थान दिलेले दिसून येते. काही उणीव त्यामधून दिसून येत नाही. मराठी भाषेतील पहिल्याच वृत्तपत्राचे हे कार्य नि:संशय महान आहे.

### प्रासंगिक

'दर्पण'मधून बाळशास्त्र्यांनी काही प्रासंगिक वृत्तांनाही महत्त्व दिले आहे. मुंबई प्रांतात 'दर्पण'चे कार्य अविरत चालू होतेच. शिवाय इतर देश भाषांमध्ये जी वृत्तपत्रे निघत होती त्याची माहिती त्यांनी 'दर्पण'मधून दिली आहे. गुजराथी भाषेत निघत असलेले 'जामे जमशीद' नावाचे वृत्तपत्र व त्याच्या स्वरूपाविषयी जाहिरात स्वरूपाने लिहिले आहे. ''वाचकांसाठी आम्ही कळवितो की, 'जामे जमशीद' हे पत्र एका पारशी गृहस्थाने गेल्या महिना पंधरवड्यात छापण्यास आरंभ केला आहे. ते दर आठवड्यास सोमवारी प्रसिद्ध होईल. त्यात विशेष करून शहरातील इंग्रजी वृत्तपत्रातील भाषांतरे आणि व्यापारसंबंधी बातमी असेल आणि ते व्यापारी वर्गास बरेच उपयुक्त ठरेल. या पत्राचा बाहेरचा आकार फार चांगला दिसतो आणि अजूनपर्यंत जी गुजराथी भाषेत वृत्तपत्रे झाली, त्यामध्ये ते अति उत्तम आहे. कारण ते पत्र शिलाछापावर छापीत असतात. या देशातील लिपीस ठशांच्या छापापेक्षा शिलाछाप फार चांगला उपयोगी ठरतो.''

वृत्तपत्रांच्या स्वरूपाविषयी माहिती 'दर्पण'ने वाचकांना करून देण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्याची जाहिरात वजा थोडक्यात माहिती जनतेसमोर मांडली आहे.

### 'दर्पण'मधील पत्रव्यवहार

वाचकांच्या पत्रांना मराठी वृत्तपत्रात सतत महत्त्वाचे स्थान मिळत आले आहे. त्याची सुरूवात 'दर्पण' या पहिल्या वृत्तपत्रापासून आढळते. 'दर्पण'मध्ये वाचकांची पत्रे प्रथमपासून आढळतात. क्वचित संपादकीय उत्तरांसह पत्रे प्रसिद्ध होत असत. ज्ञानप्रबोधनासाठी अस्तित्वात आलेल्या 'दर्पण' पत्रांत वाचकांना सामान्यत: मोकळेपणाने आपले मनोगत व्यक्त करण्याची संधी देण्यात येत असली तरी, संपादक बाळशास्त्री

आपला संमय सुटू न देण्याची दक्षता घेत असत. या पत्रातून प्रकट होणाऱ्या तत्कालीन वाचकांच्या मनाचा, किंबहुना समाजमनाचा तळ शोधता येतो. त्या काळात धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक उलाढाली बऱ्याच होत होत्या. त्या सर्वांविषयी समाजाच्या प्रतिक्रिया आणि एकूण सर्व घटनांचे प्रतिबिंब 'दर्पण'च्या पत्रव्यवहारात दिसून येते. शिवाय तत्कालीन समाज किती जागरूक होता याचेही दर्शन त्यामधून दिसून येते.

बाळशास्त्र्यांनी 'दर्पण' पत्र अगदी नि:स्वार्थीपणे चालवले. जनतेला ज्ञान देणे आणि प्रबोधन करणे हाच 'दर्पण'चा प्रेरक हेतू होता. त्यामुळे बाळशास्त्र्यांनी फालतू विषयांना अजिबात महत्त्व दिले नाही. एका गृहस्थाने बाळशास्त्र्यांची स्तुती करणारे पत्र लिहिले ते बाळशास्त्र्यांनी छापले नाही. त्या संबंधी बाळशास्त्री लिहितात. ''त्याने जी आमची स्तुती केली त्यास आम्ही अद्यापि योग्य झालो नाही. त्या पत्राचा विषय आम्हीच आहोत. परंतु आम्ही चमत्कारीक विषयांना प्राधान्य देत असल्यामुळे ते पत्र आम्ही छापले नाही.''

वरील गोष्टीवरून बाळशास्त्र्यांची प्रसिद्धीविन्मुख वृत्ती दिसून येते. बव्हंशी वाचकांनी पाठवलेल्या सर्व पत्रांना 'दर्पण'मध्ये स्थान दिले जाई. 'क्यू' नावाच्या पत्र लिहिणाराने 'दर्पण'कडे पत्र पाठवले होते. परंतु ते 'दर्पण'मध्ये छापून आले नाही म्हणून त्याने 'कुरियर' वृत्तपत्रात 'दर्पण'कारांच्यावर पक्षपाताचा आरोप ठेवून ते छापले. त्याला उत्तर देताना बाळशास्त्री लिहितात, ''क्यू''चे पत्र १४ तारखेच्या अंकात छापले आहे. कदाचित तो अंकच त्यांना मिळाला नसेल. पत्र छापण्यास थोडा उशीर लागला. कारण अगोदर आलेली पत्रे खूपच होती ती छापायची होती. परंतु 'क्यू'चे पत्र दाबून ठेवावे अशी आमची इच्छा नव्हती. आम्ही आमच्या विचाराशी सहमत असलेल्या पत्रांना स्थान देतोच. शिवाय सहमत नसलेल्या किंवा आमच्या मताविरुद्ध असलेल्या पत्रांनासुद्धा 'दर्पण'मध्ये स्थान देत असतो. कोणत्याही बाबतीत आम्ही पक्षपात करीत नाही.'' या खुलाशावरून बाळशास्त्र्यांचा नि:पक्षपाती आणि प्रांजळ दृष्टिकोन, 'दर्पण'ची उंची वाढवण्यास समर्थ ठरला असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये.

'दर्पण'कार वाचकांच्या पत्रव्यवहारात अधिक लक्ष देत. कारण वाचकांच्या प्रतिक्रियातून 'दर्पण'कारांना मार्गदर्शन मिळे. असंख्य वाचकांच्या पत्रावरून त्यांनी

'दर्पण'चे पाक्षिकातून साप्ताहिकात रूपांतर केले. एका पत्र लिहिणाराने अंकातील बऱ्याच चुका 'दर्पण'कारांच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्याला उत्तर देताना बाळशास्त्री लिहितात, ''पुढील अंकापासून पत्रातील ज्या चूका आहेत त्या शुद्धिपत्रात दुरूस्त केल्या जातील. भाषांतरे जर शुद्ध नाहीत असे वाटले तर वाचक आम्हास क्षमा करतील. कारण भाषांतर करण्यासाठी विषय कठीण असतात आणि त्याला खूपच कष्ट पडते. परभाषेतील शब्द, त्यांचे अर्थ बरोबर योजणे, अप्रौढ मराठी शब्द योग्य येणे अशा खूप अडचणी येतात. त्यामुळे जर चुका झाल्याच तर आम्हास क्षमा करावी.''

'दर्पण' पत्र चालवण्यात खूपच अडचणी येत होत्या हे वरील उताऱ्यावरून सिद्ध होते. शिवाय दळणवळणाच्या अडचणी, छापखान्याच्या गैरसोयी आणि अपुरे भांडवल हे संकट 'दर्पण'वर होतेच. परंतु तरी देखील ह्या अडचणीतून 'दर्पण'ने मार्ग काढला. एका पत्रात वाचकाने जहाज म्हणजे काय अशी जिज्ञासा प्रकट केली होती. त्याविषयी 'दर्पण'ने स्वतंत्र लेख लिहून त्यांच्या शंकेचे निरसन केले, व त्याच्या उत्सुकतेला समाधानकारक उत्तर दिले. तसेच एका पत्र लिहिणाराने 'युरोपियन लोकांना असंतुष्ट करण्याच्या भीतीमुळे आपले पत्र छापले नाही' असा आरोप 'दर्पण'वर केला होता. त्याला उत्तर देताना बाळशास्त्री म्हणतात, ''म. म. स. याने आपल्या पत्रात विपरीत, तुच्छ आणि निंदानालस्ती केली आहे. त्याच्या लिहिण्याच्या कठोर पद्धतीमुळे त्या पत्राला दूषण द्यावे आणि कडवट प्रतिक्रिया व्यक्त करावी असेच ते आहे. परंतु त्या पत्राचा आम्ही मान राखतो, कारण जो खरा धैर्यवान आणि योद्धा आहे, त्याच्याशी वैर करावे, भांडावे अशी आमची इच्छा आहे. परंतु प्रक्षोभक किंवा भडक पद्धतीचे दोष जे त्याने लिहिले आहेत, ते जर आम्ही पत्रात छापले तर बहुदा मोठा वाद निर्माण होईल. शिवाय एतद्देशीय वाचकांना ते रूचणार नाही. युरोपियन लोकांना असंतुष्ट करण्याच्या भीतीमुळे त्याचे पत्र छापले नाही किंबहुना त्याची मते अयोग्य आहेत, त्यामुळे त्याचे पत्र छापले नाही असे नाही. पत्रे लिहिणाऱ्याकरिता आणि आमच्या स्वत:च्या विचाराकरिता जी आम्ही पाने देतो त्यावरून कळून येईलच.''

'दर्पण'कारांनी प्रक्षोभक आणि काही गोष्टीवर निष्कारण वाद होऊ नयेत अशी पत्रे छापण्याचे टाळले आहे. कारण इतर पत्रामध्ये धर्मासंबंधी जे वाद चाललेले होते

त्यावेळी 'दर्पण'ने आपली भूमिका 'दर्पण' चालविण्याची आमची रीति' या मथळ्याखाली स्पष्ट केलेली आहे. ''आमची खातर आहे की एथे सांप्रत लोकांची स्थिती आहे त्या स्थितीत आम्ही आजपर्यन्त चालविलेल्ये रीतिने चाललो असतांच लोकांस फार उपयोग आणि ज्ञान होईल. ती रीति ही की लोकामध्ये शोध करण्याची जी इच्छा होईल ती ही सांभाळावी, आणि इतके करून लोकांचे मनोरंजन व्हावे.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ४३)

आपल्या भूमिकेला धक्का न लावता ज्ञानदानाचे आणि प्रबोधनाचे वृत्त 'दर्पण'ने अखंडपणे कार्यान्वित केले. पत्रव्यवहारामध्ये सर्वांगीण विषयाला प्राधान्य दिले. शक्यतो सर्वच पत्रे प्रकाशित करण्याचा प्रयत्न केला. काही पत्रांना जरूर त्यांनी टाळले. बहुतांशी धार्मिक आणि सामाजिक स्वरूपाची पत्रेच 'दर्पण'मध्ये अधिक दिसून येतात. त्या वाचकांच्या 'दर्पण'मधील पत्रव्यवहाराचा स्थूलमानाने आपण विचार करू.

### धार्मिक पत्रे

धार्मिक पत्रांना 'दर्पण'ने विशेष महत्त्व दिलेले दिसून येते. ख्रिस्ती मिशनरी आणि एतद्देशीय लोक यांच्यात जो धार्मिक वाद उत्पन्न झाला त्याची कल्पना या पत्रावरून येते. ख्रिस्ती आणि हिंदू यांनी एकमेकांच्या धर्मावर ताशेरे उडविणे, आपलाच धर्म कसा श्रेष्ठ आहे हे पटवून देणे अशा स्वरूपाचे प्रकार तत्कालीन लोकात निर्माण झाले होते. यातूनच सनातनी विरुद्ध सुधारक असे गट पडले. एकमेकांचे मतप्रदर्शन या पत्रात आढळून येते. शिवाय या पत्रव्यवहारामध्ये हिंदू धर्माचे संघर्षाचे स्वरूप कसे होते ते, एका वाचकाने 'दर्पण'ला पाठविलेल्या आणि 'दर्पण'ने २९ जून १८३२ रोजी छापलेल्या पत्रातून सहज लक्षात येते.

''मी तुमचा पत्र वाचणारा लिहितों एसें जे तुम्ही पत्राचें नाव 'दर्पण' असें ठेविलें आहे, परंतु या तुमच्या पत्राचें नाव 'रणशिंग' असे ठेविलें असतां फार चांगलें शोभेल, कांकीं ते शिंग वाचलें म्हणजे दोहों सैन्यांत जसी लढाई होऊं लागत्ये, तसें तुमचें पत्र होतांच वाद चालू झाले. असो ही थट्टा. परंतु सांप्रत तुमचे पत्रांत धर्माचे वादांची पराकाष्टा झाली. ती इतकी कीं, वाचणारांतून बहुतांचे चित्तांत त्याचा त्रास उत्पन्न झाला असेल असें मला खचित वाटतें.

तुम्हास जर पत्राची जागा भरायास दुसरा विषय सांपडत नसला तर तुम्ही ते वाद इतके छापितां हें ठीकच आहे, तसें जर नसलें तर तुम्हीं ते इतके कोणत्या नफ्यानें छापितां, हें समजायास मी इछितों. मताभीमान्यांची समाधानें व्हावीं हें जर, तुमचे लक्ष्य असलें तर तें परम अशक्य आहे. ती गोष्ट कशी होईल ? कांकीं त्यांचें नावच मताभीमानी, तेव्हां ते अभिमान कसा सोडतील ? आणि अभिमानानें लोक काय बोलतील याचा विश्वास नाहीं.... माझा अभिप्राय हा किं काहीं वाद छापावें, परंतु पत्रांची पत्रे जीं वादानें भरतां, त्यांत दुसरे उपयोगी व मनोरंजक विषय लिहायास बहुत मिळतील.'' (जोशी. वि. कृ., सहस्त्रबुद्धे श्री. म., १९४६, ७)

प्रस्तुतच्या पत्रकर्त्याने 'दर्पण' पत्राचे दोष सांगितले आहेतच. शिवाय टीकाही केली आहे. तरी सुद्धा बाळशास्त्र्यांनी ह्या पत्राला 'दर्पण'मध्ये प्रसिद्धी दिली. बाळशास्त्र्यांचा विशाल दृष्टिकोण आणि नि:पक्षपातीपणा दिसून येतो.

१३ एप्रिल, १८३२ च्या पत्रात एका पत्रकर्त्याने शास्त्रे व परलोकसिद्धि या विषयावर चर्चा केली आहे. कारण १७ फेब्रुवारीच्या अंकात 'सत्यशोधक' या पत्रकर्त्याने ''विद्वान लोकही बहुदा इहलोकी कामे करण्यास अनुपयोगी आणि परलोक साधन म्हणावे तर तशी पुण्यकारक नव्हेत अशा शास्त्रांच्या अभ्यासात स्वत:ची आयुष्ये खर्ची घालतात. शास्त्राच्या उपयोगी असणारे मुळग्रंथ एकीकडेच राहिले आणि वादग्रस्त ग्रंथाकडेच सर्वांनी लक्ष द्यावे अशी पद्धत पडली आहे.'' असे लिहिले होते. म्हणून त्याला उत्तर देण्यासाठी वाचकाने हे पत्र पाठवले आहे. त्याच्या स्पष्टीकरणार्थ तो लिहितो, ''त्यास हिंदुंची शास्त्रे इहलोकोपयोग ज्या शास्त्रापासून नाही असे शास्त्रच नाही. आणि ती विद्वान लोक वाचतसुद्धा नाहीत. शास्त्रे ही इहलोकोपयोगी नाहीत हा दोष नव्हे. इहलोकाचा निर्वाह लोकांच्या चाली पाहून होतच आहे, व इहलोकोपयोग तुच्छ आहे म्हणून बहुदा शास्त्रे परलोकार्थच आहेत. शास्त्राच्या मुळग्रंथातील अर्थ खोलवर समजून घ्यायचा असेल तर तो सूक्ष्मपणे वाचला पाहिजे, तरच तो समजतो. असे असता शास्त्राचे मूळ ग्रंथ एकीकडेच राहिले असे लिहिणे चांगले नाही. व्याख्याग्रंथ व मोठे ग्रंथ केवळ वादाच्याच उपयोगी आहेत असे लिहिले आहे ते त्यांना न समजल्यामुळेच. कारण संस्कृत भाषेतील ग्रंथातच परलोकसिद्धि आहे. शास्त्रात गोष्टी व कांही जे पदार्थ असतील त्यांचे स्मरण चिंतन कसेहि करावे. त्यापासून परलोकसिद्धि आहेच असे बऱ्याच ग्रंथावरून स्पष्ट

झालेले आहे. त्या विषयाचा अभ्यास विशेष घासाघीस करून होतो तो विषय चित्तात दृढ होतो आणि बुद्धिमध्ये चांगला बिंबतो. याकरता शास्त्राच्या मुळग्रंथावरील व्याख्या काटेकोरपणे पाहिल्यास आणि सुक्ष्मतिसुक्ष्म गुण शोधून काढले म्हणजे शास्त्रांचे विषय बुद्धित दृढ झाल्याने परलोकसिद्धि आहे हे स्पष्ट होते.'' यावरून सत्यशोधक यांच्या पुरोगामी विचाराला एका सनातनी वाचकाने प्रतिगामी विचाराने केलेले समर्थन अगदी मार्मिक आहे.

'दर्पण'मध्ये काही जातीविषयक पत्रे प्रसिद्ध झालेली दिसून येतात. जाती परमेश्वराने निर्माण केल्या की मानवाने अशा स्वरूपाचा सूर त्या पत्रातून दिसून येतो. तर ४ मे १८३२ च्या पत्रात हिंदु धर्माचे जोरदार समर्थन करणारे आणि ख्रिस्ती धर्मावर टीकास्त्र सोडणारे विचार प्रकट केलेले आहेत. तो म्हणतो, ''हिंदु धर्माची निंदा करणारी पुस्तके अलीकडे बरीच लिहिली आहेत. ती निश्चित पक्षपाताने लिहिली आहेत. हिंदू लोक श्रेष्ठ आहेत हे कितीतरी ग्रंथावरून सिद्ध झाले आहे. हिंदू धर्माची निंदा केल्याने ख्रिस्ती धर्म श्रेष्ठ ठरतो असे नाही. अशी पुस्तके तरुणांच्या हातात पडल्यास विपरीत परिणाम होतो.'' प्रस्तुतचे पत्र पुण्याच्या गृहस्थाने पाठविलेले असून पुण्यासारख्या सनातनी मंडळीचे विचार कसे होते याचे प्रत्यंतर यामधून दिसून येते.

वरील हिंदु धर्माच्या कट्टर पुरस्कर्त्याच्या पत्राला उत्तर म्हणून 'हिंदुंचा मित्र' यांने हिंदु धर्माची दुसरी बाजू सांगून धर्माची खरी मूल्ये कळतील. बरेच लोक इतर धर्माचा अभ्यास करत आहेत. सरकारने देखील आपल्या धर्माप्रमाणे वागण्यास मोकळीक दिलेली आहे. टीकाकारांच्याविषयी वाईट मत करून घेण्याचे कारण नाही. कारण हिंदू, ख्रिस्ती आणि मुसलमान धर्मातही ते वाईट दोष दाखवतात. त्यामुळे टीकाकारांचा निर्दयपणा प्रेमाचा असतो.'' या पत्रातून दिसून येणारा उच्च विचार, प्रांजळपणा, सडेतोड वृत्ती, धर्मातील वाईट गोष्टी काढून टाकल्या पाहिजेत आणि अखंड मानवजातीच्या कल्याणासाठी धर्म असला पाहिजे, अशा स्वरूपाचा स्वर खरोखरच उल्लेखनीय आहे. या गोष्टीमुळे सुधारकांच्या तत्कालीन मतांचा निश्चित उलगडा होतो.

१६ जून, १८३२ च्या अंकात 'मनुष्याचा मित्र' नावाने पत्र लिहिणाऱ्या गृहस्थाने धर्माचे मुख्य तात्पर्य सांगण्याचा प्रयत्न केला आहे. कारण इ. न. र. याने पाठविलेल्या पत्रात ''धर्माचे फळे म्हणजे माणसाच्या मनात परमेश्वरावर श्रद्धा

बसावी, आपण पापी आहोत याची खात्री पटावी, आणि सर्वाभूती दया व कृपाळूता इत्यादी नीति आचरणात यावी'' असे लिहिले होते. प्रस्तुत पत्रकर्ता म्हणतो, ''इ. न. र. याने सांगितलेली हीच खऱ्या धर्माची फळे आहेत. आणि त्याच्या मताशी आम्ही सहमत आहोत.''

मुसलमान लोकांचे प्रेम परमेश्वरावर असत नाही. कुराण परमेश्वराकडे दया, माया आहे असे वर्णन करीत नाही. परमेश्वर काहीतरी काम सांगतो आणि त्याबदली काहीतरी देण्याचे कबूल करतो. म्हणून मुसलमान लोक असे मानतात की, परमेश्वराशी मानवाचे कोणत्याही पद्धतीचे संबंध नाही. ते आपण पापी आहोत असे मानतच नाहीत. कारण कुराण त्यास शिकविते की, त्याचे पातक इतके थोडे आहे की त्याच्या श्रमाने ते नाहीसे होईल. कुराणापासून 'सर्वा भूती दया कृपा' निर्माण होत नाही. त्याच्या मनात आपणाहून सर्व माणसे कुत्र्यासारखी आहेत. तसेच जे लोक मुसलमान होत नाहीत त्यांना ठार करावे अशी कृत्ये करण्यास कुराणा भाग पाडते. शिवाय तू पुण्य आणि फळ दे, स्तुती कर, दान दे, उपास कर आणि क्षमा, स्वर्ग, दारू आणि स्त्रिया घे असे सांगते. यावरून खऱ्या धर्माची मूल्ये महंमद पैगंबराच्या मुस्लीम धर्मात नाहीत हे स्पष्ट होते.

हिंदू धर्मात कृपेचा मार्ग मुसलमानांच्या धर्मात आहे त्यापेक्षा काही अधिक नाही. हिंदू दुसरे काही मानीत नाही. आपला व्यवहार परमेश्वर बरोबर न्यायाने करतो असे मानतात. त्यामुळे प्रेम करण्याची गोष्ट राहिलीच नाही. त्याच्या मनात परमेश्वराचे प्रेम उत्पन्न करणारे काही नाही. हिंदू आपण पापी आहे असे मानत नाही. कारण, किर्तन, प्रायश्चित, उपवास, धर्म व स्नान करून त्याची पापे धुऊन जातात. तो स्वत: काही करत नाही, कर्ता करविता परमेश्वरच आहे असे मानतो. त्यांच्यात निरनिराळ्या जातीमुळे ते एकमेकावर प्रेम करीत नाहीत. ते एकमेकाशी मित्रधर्म करू देत नाहीत. जगापासून अलग करणारी बंधने त्यांच्यात खूपच आहेत. तेव्हा हिंदू धर्मातही खऱ्या धर्माची तत्त्वे नाहीत.

ख्रिस्ती धर्मही हिंदू व मुसलमान धर्माशी मिळता जुळता आहे. ते ईश्वराची दया स्वतंत्र आहे असे मानीत नाहीत म्हणून ते परमेश्वरावर प्रेम करीत नाहीत. पाप–पुण्यावर त्यांचा विश्वास नाही. ते शत्रूवर प्रेम करीत नाहीत. नीतीचे आचरण करत नाहीत, आणि सर्व मानवावर कृपादृष्टी दाखवत नाहीत. जे ख्रिस्ती धर्म मानतात ते परमेश्वरावर व त्याच्या प्रजेवर प्रेम करतात. सर्वांवर दया व कृपाछत्र ठेवतात.

म्हणून धर्माचे तात्पर्य हे की, ''परमेश्वराचे मोठेपण उघड करणे, म्हणून सर्व धर्म मानवाच्या मनात एकसारखी फळे उत्पन्न करतील तर साऱ्यांचेच कल्याण होईल.''

वरील पत्रातून पत्रकर्त्याने हिंदू, मुसलमान, आणि ख्रिश्चन धर्मातील असणारे मुख्य दोष दाखवून खऱ्या धर्माची तत्त्वे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या पत्रावरून हे सिद्ध होते की, प्रस्तुतच्या पत्रकर्त्याने तिन्ही धर्मांचा सूक्ष्मपणे अभ्यास केलेला असावा. त्याची सद्सद्विवेक बुद्धी सर्वसमावेशक वृत्ती आणि पुरोगामी विचार स्पष्ट होतातच. शिवाय उदाहरणासह आपले विचार पटवून देण्याची हातोटीही दिसून येते.

'दर्पण'मध्ये परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल आणि पापपुण्याबद्दल बरीच चर्चा झाली. तेच तेच विषय उगीच चघळण्याची वृत्ती तत्कालीन वाचकांमध्ये असलेली दिसून येते. २२ जून १८३२ च्या पत्रात 'हिंदू धर्म ध्वंसक' या गृहस्थाने इ. न. र. याच्या पत्राला उत्तर देऊन हिंदू व ख्रिस्ती धर्माच्या ग्रंथांची तुलना केली आहे. तो म्हणतो, ''इ. न. र. याने पुराणातील चंद्र, सूर्य आणि ज्योतिषातील चंद्र-सूर्य एक नव्हेत असे म्हटले आहे. हे जर त्याने ग्रंथाच्या आधारे पटवून दिले तर मी त्याला एका श्लोकास एक सोन्याचा मोहोर देईन. त्याने जे लिहिले आहे त्याला पुरावा नाही. ज्योतिष ग्रंथ हे पुराणापेक्षा अलीकडचे आहेत हा माझा सिद्धांत नसून सर्वसामान्य लोकांचे मत म्हणून लिहिले आहे. युरोपियन अभ्यासकांनीही या सिद्धांताला पुष्टी दिली आहे.''

प्रस्तुतचे पत्र एखाद्या निबंधासारखे विस्तृत असूनही बाळशास्त्र्यांनी त्याला आपल्या अंकात स्थान दिलेले आहे. बाळशास्त्र्यांनी सुद्धा ज्योतिषशास्त्राचा गाढा अभ्यास केलेला होता. त्यामुळे कदाचित या पत्रामुळे ज्योतिषशास्त्राविषयीचे आकलन जनसामान्यांना होऊ शकेल याच उदार वृत्तीतून त्यांनी मुद्दाम हे पत्र छापले असावे. प्रस्तुत पत्रकर्त्याने आपली मते आग्रहाने मांडून दुसऱ्यांची मते पुराव्यासहित खोडून काढली आहेत. आपला एक विचार पटवून देण्यासाठी तर त्याने एका श्लोकास एक सोन्याची मोहोर देण्याची पैज लावली आहे.

६ जुलैच्या वाटसरूने लिहिलेल्या पत्रात ''ख्रिश्चन धर्माची प्रमाणे'' सांगण्यात आली आहेत. 'दर्पण'कारांना तो लिहितो, ''आजपर्यंत तुमच्या कागदांत जे उपयोगी आणि चांगले वाद-प्रतिवाद दृष्टीस पडले, त्यात मी कोणताही पक्ष घेतला नाही,

परंतु तुमच्या एका पत्रकर्त्याने म्हटले आहे की, धर्माविषयीचा वाद जरी कामाचा आहे तरी त्यापासून उभय पक्षास काही फायदा नाही. हे मला पटत नाही, म्हणून मी ख्रिस्ती धर्माचा खरेपणा काही गोष्टीवरून सिद्ध करून दाखवतो. ख्रिस्ती धर्माचा ग्रंथ परमेश्वरापासून निर्माण झाला आहे. कारण त्यातील चांगुलपणा, प्रौढपणा, निर्दोषवृत्ती, एकवाक्यता आणि सुसंगतपणा इतर धर्म ग्रंथापेक्षा श्रेष्ठ आहे. सर्व ग्रंथाचे एक लक्षण आहे की, मानवाचा कमीपणा, आणि ईश्वराचा श्रेष्ठपणा याची प्रतिष्ठा वाढवावी. त्यावर विश्वास ठेवून त्या मार्गाने गेल्यास तो पापापासून मुक्त होतो व पुण्याकडे लागतो व त्याच्या जीवनाचे सार्थक होते. हीच ईश्वराने सांगितलेली धर्माची काही प्रमुख मूल्ये आहेत आणि ही सर्व ख्रिस्ती धर्मग्रंथात आहेत. जे मनात द्वेष बुद्धी न धरता, लक्ष आणि मन लावून, सूक्ष्मपणे हा ग्रंथ वाचतील त्यांना निश्चितपणे या ग्रंथाची सत्यता पटेल.''

रेसपांडेन्स हा गृहस्थ म्हणतो, ''ख्रिस्ती धर्मात परमेश्वर एक आणि तो चांगला, सत्यशिल पवित्र असतो. हिंदू धर्मात परमेश्वर अनेक व त्यांनी बहुतेक सर्व पातके आचरण केलेली आहेत. असे असता हिंदू धर्म आणि ख्रिस्ती धर्म यांची मूल्ये आणि एकवाक्यता ही सारखीच कशी ?'' या पत्राला उत्तर देताना इ. न. र. म्हणते, ''हिंदू व ख्रिस्ती धर्मात तेड निर्माण करण्यासाठी अशा स्वरूपाचा मजकूर ख्रिस्ती लोक लिहितात.'' काही उदाहरणे देऊन प्रस्तुतपत्रकर्त्याने आपले विचार मांडले आहेत.

२० जुलै १८३२ च्या पत्रात म्लेंच्छ याने त्रयस्थाच्या दृष्टिकोणातून हिंदू व ख्रिस्ती धर्माचे समर्थन केले आहे. जे चांगले आहे त्याचे गुण गाणे आणि जे वाईट आहे त्याला झिडकारणे अशी याची वृत्ती आहे. 'दर्पण'कारांना काही सूचनेखातर तो म्हणतो, ''तुमच्या पत्राचे नाव 'दर्पण' हे आहे. कोणत्याही चेहऱ्यावरील खुणा, डाग दर्पणामुळे दिसून येतात. कदाचीत 'दर्पणा'ने एक मनुष्य याचे तोंडावरील डाग दाखविल्यामुळे त्यास राग आला असेल. परंतु त्याची फिकीर न करता आपली वृत्ती जोपासण्याचा प्रयत्न करा.''

डॉ. वालपीसारख्या ख्रिस्ती गृहस्थाने कोणत्याही धर्माचा उल्लेख न करता परमेश्वर आहे याविषयी आपले विचार उदाहरणांनी पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. तो म्हणतो, ''सृष्टीची निर्मिती करणारा असृष्ट प्राणी अनादीकाळापासून आहे. तो डोळ्यांनी दिसण्यास किंवा अनुभवास येण्यास अशक्य आहे. ज्याप्रमाणे

उष्णता आणि प्रकाश यांच्या कार्याच्या आणि अनुभवाच्या आधारे कोणीतरी आहे हे आपणास मान्य केले पाहिजे. जर घड्याळ नित्यनियमाने चालून आपले कार्य करते. त्या कार्याचा नियम करणारी कला माणसानेच निर्माण केली. अशाच पद्धतीने सूर्य, चंद्र आणि अंतराळातील तारे नियमित काळी भ्रमण करतात. जसे कच्च्या खनिजापासून त्याचे स्पेअर पार्ट आपोआप होतील, आणि त्यापासून आपोआप नियमित चालणारे यंत्र घडले जाईल हे मानणे जसे असंभाव्य तसेच अंतराळातील जडामध्ये दिवस-रात्र किंवा दिवस, महिने, वर्षे ही पुन्हा पुन्हा येतात. यामध्ये जो आश्चर्यकारक बंदोबस्त असतो तो कुणीतरी निर्माण केल्यावाचून होतो असे मानणेही असंभाव्य आहे. ईश्वराच्या शक्तीवाचून विश्वाची निर्मिती झाली ही कल्पना केवळ नियुक्तिक आहे. जशी दगडाची खाण, मातीचे ढीग आणि जंगल यांची मानवाच्या कौशल्यावाचून सुशोभित इमारत होऊ शकेल ही कल्पना, अथवा जी आमची आश्चर्यकारक, शरीरे ही वास्तवता, तेव्हा ईश्वराच्या सामर्थ्यावाचून जग निर्माण झाले आहे असे म्हणता येत नाही. सूर्य, पाऊस, पृथ्वी ह्या शक्ती उघड उघड आपणास दिसतात. सृष्टीच्या उत्पत्तीपासून अदृश्य गोष्टी स्पष्ट दिसतात त्या परमेश्वराने निर्माण केल्या आहेत. म्हणून त्या अनंत शक्ती म्हणजे परमेश्वर.'' हे पत्र सुद्धा खूपच विस्तृत असून डॉ. वालपीसारख्या ख्रिस्ती गृहस्थाने परमेश्वराचे अस्तित्व आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

धार्मिक स्वरूपाच्या पत्रव्यवहारामध्ये परमेश्वर आहे किंवा नाही, जातीयता, आणि धार्मिक मूल्ये यावरच बऱ्याच पत्रकर्त्यांनी पत्रे लिहिली आहेत. एकमेकांच्या धर्मावर किंवा विचारावर आघात करणे आणि आपलाच धर्म किंबहुना विचार कसा श्रेष्ठ आहे हे पटवून देणे, प्रसंगी टोकाची भूमिका घेणे अशा स्वरूपाचे प्रकार या पत्रकर्त्यांच्यामध्ये असलेले दिसून येतात. त्याच त्याच पत्रांना 'दर्पण'ने स्थान दिलेले आहे. पाप, पुण्य आणि परमेश्वर आहे की नाही या विषयांची पत्रे खूपच आढळतात. तत्कालीन सनातन्यांचे प्रतिगामी विचार आणि सुधारकांचे पुरोगामी विचार कसे होते याचा उलगडा होतोच; शिवाय धर्मातील दृष्ट प्रवृत्ती काळानुसार बदलल्या पाहिजेत आणि धर्माची मूल्ये अखंड मानव जातीस उपयोगी ठरतील अशीच असावीत हा मतप्रवाह हळू हळू रूढ झालेला दिसून येतो. 'दर्पण'मध्ये जो धार्मिक वाद पत्ररूपाने वाचकांसमोर मांडला. त्यातून धार्मिक चळवळीस प्रोत्साहन तर मिळालेच शिवाय खरा धर्म कोणता याची जाणही वाचकांना करून दिली.

**सामाजिक पत्रे**

'दर्पण'कारांनी धार्मिक पत्रव्यवहारापेक्षा सामाजिक पत्रव्यवहाराला अधिक महत्त्व दिले आहे. त्या पत्रातून तत्कालीन काळात निर्माण झालेला जातिभेदाचा प्रश्न, स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न, स्त्री-पुरुष समान हक्क, दुष्ट चालीरीतीवर हल्ला, विधवांच्या समस्यावर तोडगा, व्यसनावर टीका, गायकवाडांचा बंदोबस्त, यासारख्या नानाविध गोष्टीवर वाचकांनी लिहिल्याचे आढळते. जे ज्वलंत प्रश्न आहेत त्यावर तरी खूपच मतप्रदर्शन झाले. या पत्रव्यवहारावरून तत्कालीन समाज मन आणि एकंदरीत सामाजिक परिस्थितीचे भान लक्षात येते. सुधारकांचा सुधारक दृष्टिकोण कसा प्रबळ होत गेला आणि हिंदुस्थानातील सामाजिक परिस्थितीमध्ये बदल कसे कसे होत गेलेत याचे प्रत्यंतर या पत्रावरून दिसून येते. 'मनुष्य जातितील भेद' या शीर्षकाखाली मानव वंशाच्या दृष्टीने जगातील सर्व जाती धर्माच्या लोकांची माहिती एतद्देशीयांना करून देण्याचा प्रयत्नही पत्रकर्त्यांनी केलेला आहे. थोर आणि कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याचे गुणविशेष सांगून अशा महान व्यक्तीची देशाला प्रगतीपथाकडे नेण्यास खूप गरज आहे हे पत्रकर्त्यांनी वाचकांच्या मनावर बिंबविले आहे. एकंदरीत हिंदुस्थानी लोक आणि पाश्चात्य राज्यकर्ते यांच्या प्रयत्नातून घडून येणारा नवा समाज आणि त्याविषयीचे जनतेचे मतप्रदर्शन या पत्रव्यवहारातून स्पष्ट दिसते.

**पुनर्विवाहविषयक पत्रे**

परशुराम शेत्रस्थ ब्राह्मण याचे १५ ऑगस्ट १८३७ च्या अंकात प्रसिद्ध झालेले 'पुनर्विवाह प्रकरण' नावाचे लेखवजा विस्तृत पत्र खूपच महत्त्वाचे आहे. विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या पत्राला बाळशास्त्र्यांनी 'दर्पण'मध्ये स्थान दिले. या पत्रामधून पत्रकर्त्याची दिसून येणारी सुधारक वृत्ती, त्यांचा सडेतोडपणा, त्यांची सद्सद्विवेक बुद्धी, स्त्रियांविषयीची आत्मीयता आणि जुन्या वाईट प्रवृत्ती समूळ नष्ट करण्याची प्रबोधनाची दृष्टी दिसून येते. धार्मिक ग्रंथांचा आधार घेऊन आणि संस्कृत श्लोकांचे विवरण करून आपले विचार अत्यंत काटेकोरपणे प्रस्तुत पत्रकर्त्याने मांडले आहेत. सारांश रूपाने ते पत्र असे होते, ''हिंदुस्थानातील बालविधवांच्या दुष्कर्माची पाळेमुळेच खणून टाकावी. कारण हे सर्वव्यापी दुराचरण पाहून आमचे मन बऱ्याच दिवसापासून व्याकूळ होत होते. ते स्वाभीप्राय प्रकट करावे असेही वाटत होते. परंतु एकट्याने कोणतीही गोष्ट सिद्धीस जात नाही त्यास आवश्यकता असते संघशक्तीची. काही

वर्षापूर्वी व्यंकटराम शास्त्री याने या पुनर्विवाहावर आवाज उठविला होता, त्यावेळी समाजाने त्याला खुळ्यात काढले आणि बहिष्कृतही केले. परंतु या निंद्यप्रकाराविरुद्ध 'दर्पण'मध्ये पुन्हा आवाज उठविलेला पाहून आणि दक्षिणेत बाळाजीपंत नातू यानेही याविरुद्ध आवाज उठविल्यामुळे आणि आमच्या मित्रांनी आम्हास आधार दिल्यामुळे यावर मी लिहित आहे.

विधवा स्त्रियांना अध:पतनाकडे नेण्यास विद्येचा अभाव आणि लग्न करण्याची मनाई ही दोन कारणे आहेत. यासाठी स्त्रियांना विद्या शिकवावी. चांगले शास्त्र, पतिसेवादी धर्म, नीति यासारखे शिक्षण दिल्यास या वाईट प्रकृतीस आळा बसेल. चांगल्या शिक्षणाने स्त्रिया सुसंस्कारीत, सुशिल आणि विचारी बनतील. साहजिकच त्या वाईट प्रवृत्तीकडे आकर्षित होणार नाहीत.

लहानपणी मुलींचे लग्न करण्याची प्रथा बंद केली पाहिजे. विधवांना पुनर्विवाहाची परवानगी दिली पाहिजे. पूर्वी विधवांचा पुनर्विवाह होत असे. पण अलीकडे धर्माचा बंदोबस्त ठेवण्यासाठी विद्वानांनी त्यांच्या विवाहास बंदी घातली. वास्तविक स्त्री पुरुषापेक्षा अधिक हुशार, व्यापारात पुरुषापेक्षा वरचड, आणि अधिक कष्टाळू असते. त्यामुळे स्त्रियांना शिक्षण द्यावेच. पूर्वी रुक्मिणी, दमयंती, पार्वती यांना लेखन पठन करता येत होते. सुशिक्षित, सुजाण स्त्रिया सर्वांना आवडतात. लहानपणीच मुलींची लग्ने करण्याची प्रथा बंद करून स्त्री-पुरुष संबंध योग्य होईल तेव्हाच त्यांचा विवाह करावा.''

वरील 'पुनर्विवाह प्रकरणा'वरून तत्कालीन स्त्रियांचा प्रश्न किती गंभीर स्वरूपाचा होता आणि त्या प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न कसा केला आहे याचे दर्शन घडते.

### स्त्री-शिक्षणविषयक पत्रे

पिढ्यान पिढ्या खितपत पडलेल्या स्त्रियांना शिक्षण दिल्याशिवाय समाजसुधारणा होणार नाही हे जसे सुधारक सांगू लागले तसे स्त्री शिक्षणाचे महत्त्वही समाजाच्या लक्षात येऊ लागले. यासंबंधी वाचकांच्या बऱ्याच प्रतिक्रिया 'दर्पण'कडे आल्या. ''सध्या स्त्रीयांची जी दुर्दशा झाली आहे त्यावर प्रतिबंध घातला पाहिजे. मुलांना शिकविण्याच्या कामी स्त्रीच उपयोगी पडू शकेल. त्यामुळे पहिल्यांदा स्त्रीस शिक्षण द्यावे'' अशा स्वरूपाचे विचार विचार म. म. स. याने व्यक्त केलेले आहेत.

३० मे १८३४ च्या पत्रात ''स्त्री शिक्षणाची दीशा'' याबाबत विचार मांडले आहेत. 'दर्पणा'त स्त्री शिक्षणाविषयी लिहिलेले पाहून आनंद वाटला. स्त्रियांना शिकविणे आजच्या काळात आवश्यक आहे. सर्व लोक धर्म, नीति, कलाकौशल्ये आणि विद्या आपल्या मुलाला देण्याचा प्रयत्न करतात. परंतु मुलांवर लक्ष ठेवणे आणि कोवळ्या मनावर संस्कार करणे हे जिचे कर्तव्य आहे ती मात्र अज्ञानात गुरफटली आहे. अलीकडे मॅजिस्ट्रेटसारख्या उच्च पदावर असलेल्या मंडळींनी मुलींना किंवा स्त्रियांना शिक्षण देण्याची प्रथा आपल्यात नाही म्हणून नकार दर्शविला आहे. परंतु त्यांनी ज्यावेळी उच्च पदावर असलेल्या मंडळींनी मुलींना किंवा स्त्रियांना शिक्षण देण्याची प्रथा आपल्यात नाही म्हणून नकार दर्शवला आहे. परंतु त्यांनी ज्यावेळी उच्च पदावर नेमणूक झाली त्यावेळी का बरे आपल्याकडे प्रथा नाही म्हणून नकार दिला नाही ? स्त्रीच्या शक्तीचा अजून साक्षात्कार समाजाला झाला नाही. त्यांना एकवेळ बंदीवासातून मुक्त करा, त्यांना विचार करु द्या, शिक्षण घेऊ द्या, त्यांच्या सुखाचा त्यांना आस्वाद घेऊ द्या. तेव्हाच तुम्हास स्त्रीची शक्ती कळून येईल. स्त्रियांना देखील मान, प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. तरच ती इंग्रजी स्त्रीसारखी ताठ मानेने चालू शकेल.''

स्त्री शिक्षणाचा समर्थक विचार वरील पत्रात मांडला आहे. तर 'कित्येक हिंदू चाली बऱ्या व्हाव्या' या विषयी एक 'उत्कंठीत' या नावाने पत्र लिहिलेल्या गृहस्थानेही अशीच भूमिका घेतली आहे, तो म्हणतो, ''स्त्रीयांना शिक्षण देणे हे मला पटते.

बऱ्याच जणांना स्त्रियांस शिक्षण देणे म्हणजे वाईट मार्गाला लावणे असे वाटते. परंतु त्यांची ती खुळचट कल्पना आहे. त्यांना वाटते शिक्षणाने स्त्री कठोर बनेल, दुष्ट होईल. मला आश्चर्य वाटते की त्यांना शिकविणे म्हणजे लावण्य किंवा दुसऱ्या काही शृंगारीक पुस्तकांची माहिती करून देणे. परंतु तसे नसून नीति, आचारसंहिता दृढ होण्यासाठी शिक्षण दिले पाहिजे.'' याच संदर्भात एक गृहस्थ लिहितो, ''एखादा माणूस दूरदेशी जातो आणि तेथून आपल्या पत्नीला पत्र पाठवतो. पण त्या स्त्रीला पत्र वाचता न आल्यामुळे ते दुसऱ्याकडून वाचून घ्यावे किंवा तसेच पत्र लिहून घ्यावे लागते. परंतु तीने स्वत:च लिहिले असते तर प्रेमाच्या नाजूक गोष्टी व व्यक्तिगत लिखाण ती करू शकली असती. म्हणून स्त्री शिक्षणाची अत्यंत गरज आहे.''

४ जुलै, १८३४ च्या पत्रात स्त्री शिक्षणासंबंधी प्राचीन दृष्टांत दिला आहे. तो लिहितो, ''स्त्रियांनी विद्या, कला शिकाव्या याविषयीचे दृष्टांत व्योम संहितेत दिले आहेत. यज्ञाचेवेळी अग्नीस आहुती देतेवेळी वेद मंत्र म्हणावे लागतात. हे काम स्त्री करत होती. देवादिकांच्या स्त्रियाही अधिकारी होत्या. त्यामुळे स्त्री शिक्षणाबद्दल कुणीही मनात संदेह बाळगू नये.''

तत्कालीन काळात स्त्री शिक्षणासंबंधी प्राचीन - अर्वाचीन विचारांची मत प्रदर्शने 'दर्पण'मध्ये दिसून येतात. या पत्रव्यवहारानेच स्त्री शिक्षणाच्या चळवळीस उत्तेजन दिले असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये.

### स्त्री-पुरुष समान हक्काविषयी पत्रे

''संसार सुखाचा व्हायचा असेल तर बायको विचारी, सुशील व सुसंस्कारीत असावी लागते. परंतु या देशातील चाल याविरुद्ध आहे. समज न येताच, त्यांच्या आवडी व स्वभाव न पाहताच लहान मुलींची लग्ने लावली जातात. त्यामुळे याचा परिणाम दोघांवरही होतो. ही पद्धत बंद करून दोघांनाही समज आल्यावर मनास वाटेल त्याप्रमाणे बायका किंवा नवरा पसंद करावा. एकमेकांचे परस्परावर प्रेम असेल, दोघेही शिक्षित असतील तर संसारात सुख वाटते. त्यामुळे स्त्रीला शिक्षण देणे गरजेचे आहे. ती देखील इंग्रजी स्त्रीसारखी स्वतंत्र राहू शकली पाहिजे. तिला देखील समाजात मान, प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. पुरुषाबरोबर ताठ मानेने वावरू शकलो पाहिजे. कोणतेही बंधन तिच्यावर असता कामा नये. पुरुषानेही तिला मोकळीक द्यावी. एवढेच नव्हे तर तिला समान हक्क द्यावेत'', अशा स्वरूपाचे व्यापक विचार काही पत्रकर्त्यांनी व्यक्त केलेले आहेत.

### जातिभेद

ज्याप्रमाणे तत्कालीन पत्रकर्त्यांनी 'दर्पण'मधून विधवा विवाह, स्त्रीशिक्षणाचे समर्थन केलेले आहे. त्याचप्रकारे जातिभेदाच्या दुष्ट चालीविरुद्ध आवाज उठविला आहे. यामध्ये सुद्धा काही प्रतिगामी विचाराची आणि पुरोगामी विचाराची माणसे आहेत. इ. न. र. या प्रतिगामी विचाराच्या पत्रकर्त्याने मनुष्याच्या जातिभेदाचे समर्थन केलेले आहे. तो म्हणतो, ''कलकत्यातील कित्येक हिंदूंनी शास्त्राप्रमाणे मानवामध्ये जातीचा आणि धर्माचा भेद नसावा असे म्हटले आहे. परंतु मी म्हणतो इंग्रजीमध्ये

'क्यास्त', प्राकृतमध्ये 'जात' आणि संस्कृतमध्ये 'ज्ञान' असे म्हटले जाते. हे शब्द पृथ्वीवरील साऱ्या भाषात उत्पन्न झाले. ख्रिस्ती आणि नवीन विचारांचे हिंदू यांच्या मताप्रमाणे त्या शब्दाचा वाच्य पदार्थच कोठे नाही. परंतु माझे असे म्हणणे आहे की, पशु, पक्षी, झाडे, वेली, मृत्तिका आणि विश्वात जितके पदार्थ आहेत त्यात जशा जाती आहेत मग मनुष्यातच का नसाव्या ?

वरील पत्रकर्त्यास उत्तर 'एक मनुष्य' नावाने पत्र लिहिणाऱ्या गृहस्थाने दिलेले आहे व मानवामध्ये जातीच नाहीत असे सिद्ध केलेले आहे. तो म्हणतो, ''पशुपक्षामध्ये जाती आहेत मग माणसामध्ये का नसाव्या असे असेल तर त्या गाढवामध्ये का नसाव्या ? मानवाची जात एकच आणि सर्व माणसे एकाच बीजापासून निर्माण झाली.'' याच पत्रात दुसरा एक पत्रकर्ता म्हणतो, ''प्राण्यात जाती आहेत हे मान्य पण एक कोंबडा दुसऱ्या बरोबर खात नाही किंवा रहात नाही असे मी कधी पाहिले नाही. किंवा ज्या भांड्यातील पाणी कोकणातील कुत्रा प्याला आहे त्याच भांड्यात इतर देशातील कुत्रे पीत नाही असे मी पाहिले नाही. तेव्हा मनुष्यामध्ये जात नाही. सर्व माणसे सारखीच असतात.''

'मनुष्य जातीचे भेद' यामध्ये चिनी, जपानी, आशियाई व युरोप खंडातील सर्व देशातील लोकांचे सूक्ष्म अवलोकन केलेले आहे. त्यांचे राहणीमान, तेथील प्रदेश, त्यांचा स्वभाव, आवडी निवडी, त्यांची शरीरे यांचे ज्ञान पत्रकर्त्यांनी एतद्देशियांना करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

**इतर पत्रे**

वरील धार्मिक आणि सामाजिक पत्रव्यवहाराव्यतिरिक्त काही प्रासंगिक पत्रेही आढळतात. कलकत्यामध्ये हुक्का ओढण्यासारखे व्यसन किती फैलावले आहे याचे ज्ञान करून दिले आहे व व्यसन शरीरास किती घातक आहे हेही सांगितले आहे. शिवाय, पारशी समाजातील झालेले आंदोलन, मुंज मुलींची का नाही ? या स्वरूपाची पत्रे आढळतात. पार्लमेंटात सुधारणाविषयक जे बदल झाले त्या राजकीय घटनांचा साद-पडसाद या पत्रव्यवहारामधून समजतो. तर राजा राममोहन रॉयसारख्या बुद्धिवान व्यक्तींच्या कार्याचा आढावा घेणारी आणि त्यांच्या गुणाचे महत्त्व सांगणारी तीन पत्रे पत्रकर्त्यांनी पाठविलेली आहेत, ती 'दर्पण'कारांनी छापली आहेत. एकंदरीच

समाजातील सर्व प्रश्नावर आणि त्याकाळी होत असलेल्या उलाढालीवर पत्रव्यवहार झालेला दिसून येतो.

बाळशास्त्र्यांच्या 'दर्पण'ने वाचकांच्या पत्रव्यवहाराचा जो पायंडा पाडून दिला तो आजतागायत प्रत्येक नियतकालिकामध्ये असलेला दिसून येतो. वाचकांच्या पत्रावरून पत्रात कोणत्या विषयाला स्थान द्यावे, वाचकांची अभिरूची कशी आहे याचे सम्यक आकलन होते आणि पत्र चालविण्यास सुकर होते. आजच्या काळात वाचकांची पत्रे नांव, गाव यासहीत प्रसिद्ध होत असली तरी 'दर्पण'मध्ये ती ठराविक नावाने किंवा टोपणनावाने प्रसिद्ध झालेली दिसून येतात. 'एक मनुष्य', 'ई. न. र. ', 'द. र.', 'हिंदूचा मित्र', 'मनुष्याचा मित्र', 'हिंदू धर्म ध्वंसक', 'वाटसरू', 'म्लेंच्छ', 'सत्यशोधक' अशा सांकेतिक नावाने वाचकांनी पत्रव्यवहार केल्याचे आढळते. एकंदरीत या पत्रव्यवहारामुळे सामाजिक समस्यांची उकल झाली,जनजागरण झाले आणि सामाजिक सुधारणेच्या कार्याला गती मिळाली.

## समारोप

बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी वृत्तपत्र सृष्टीचा श्रीगणेशा करून 'दर्पण' वृत्तपत्राला मानाचे स्थान मिळवून दिले. त्यातून त्यांची अष्टपैलू बुद्धिमत्ता, समाजोद्धाराची दृष्टी, स्वदेशोन्नतीची कळकळ आणि त्या काळाच्या मानाने असणारा प्रगल्भ दृष्टीकोन दिसून येतो. जीवन विकासाचे आणि सामाजिक उन्नतीचे प्रमुख साधन जे शिक्षण त्याचा अंगीकार करण्यास जनतेला भाग पाडले. 'विद्या हे बळ आहे' असे सांगून शिक्षण कार्यात जेवढी मदत करता येईल तेवढी त्यांनी केली. समाजजागृतीसाठी, आणि ज्ञानदानासाठी नियतकालिकाचा वापर करून जनतेपुढे पुरोगामी विचार मांडून प्रबोधन केले. रूढी, परंपरा, खुळचट कल्पना, अंध:विश्वास यांवर 'दर्पण'मधून हल्ला चढवला. विज्ञानाचे महत्त्व पटवून देऊन पाश्चात्य राष्ट्रात चाललेले नवनवीन शोध एतद्देशीयांना सांगितले. पाश्चात्य लोकांची जिज्ञासू वृत्ती, संशोधक दृष्टी, धाडस आणि ज्ञानलालसा एतद्देशीयांनी स्वीकारावी म्हणून प्रयत्न केला. प्रसंगी देशातील पूर्वाभिमान सांगितला आणि मनातील न्यूनगंड काढून टाकण्यास भाग पाडले. थोर, आदर्श, विचारवंतांचे दाखले त्यांचे विचार, ग्रंथकारांची मते, 'दर्पण'मधून मांडली. श्रेष्ठ ग्रंथाची परीक्षणे करून वाचकांची अभिरूची व्यापक बनविली. सरकारमध्ये किंवा इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये होणारे बदल, नवीन कायद्यांची जाण

एतद्देशीयांना करून दिली. बाळशास्त्र्यांनी सरकार व जनता यांच्यामध्ये मध्यस्थाची भूमिका बजावली. सुधारणेच्या कामी जनतेमध्ये जागृती तर केलीच शिवाय सरकारला ठोस पावले टाकण्यास भाग पाडले. व्यापाराचे महत्त्व पटवून दिले, कलाकौशल्ये, उद्योग याविषयी लेखन केले. शेतकऱ्यांच्या समस्यांवर सरकारला उपाय सुचवून दिले. राज्यकारभारातील दोष सरकारच्या आणि जनतेच्या दृष्टीस आणून दिले. धर्मासंबंधी उदात्त हेतूने लेखन केले. सांस्कृतिक बाबतीतही आपले मत मांडले. आर्थिक बाबींचा विचार करून बँकेची निर्मिती करण्यास सुचविले. जगामधील घडणाऱ्या गोष्टींचे साद-पडसाद 'दर्पण'मध्ये उमटविले. एकंदरीत 'दर्पण'मध्ये बाळशास्त्र्यांनी चौफेरपणे लेखन केलेले आहे. स्वदेशाभिमान, स्वदेशोन्नती याकडे विशेष लक्ष देऊन लोकांना कार्यप्रवण केले. बाळशास्त्र्यांच्या विचारांचा आवाका कालाच्या मानाने खूपच मोठा आहे. 'दर्पण'मध्ये त्यांनी केलेले लेखन सामाजिक उन्नतीसाठीचे होते. राष्ट्रीय विचारांची ठोस बैठक त्याच्या पाठीमागे होती. त्याचे सम्यक आकलन एतद्देशीयांना करून देणे हाच प्रेरक हेतू 'दर्पण'चा होता. स्वातंत्र्याची जाणीव झालेला पहिलाच पुरुष म्हणजे बाळशास्त्री जांभेकर, इंग्लंडमधील स्वातंत्र्याच्या घटना हिंदुस्थानी लोकांना सांगत असताना म्हणतात, ''ज्या गोष्टीपासून तेथे बरे वाईट होईल तसेच येथे होवो.'' म्हणून हिंदुस्थानातील 'चले जाव' चळवळीचे पुरस्कर्ते आणि द्रष्टे विचारवंत म्हणून त्यांच्याकडे पाहिले पाहिजे. महाराष्ट्रालाच नव्हे तर हिंदुस्थानाला प्रगतीपथाकडे नेण्याचे कार्य स्वत:च्या कृतीने आणि उक्तीने बाळशास्त्र्यांनी केले हे निर्विवाद. यासाठी तर त्यांनी 'दर्पण'ची निर्मिती केली. म्हणून 'दर्पण'ने १९ व्या शतकाच्या प्रारंभी अविस्मरणीय आणि उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याचे महत्त्व नि:संशय मोठे आहे.

***

प्रकरण चौथे

# दर्पण : वाङ्मयीन अभ्यास

'दर्पण'मधील लेखनाचा सामाजिक अभ्यास केल्यानंतर आता त्यामधील लेखनाचे वाङ्मयीन विशेष पहावयाचे आहेत. 'दर्पण'च्या आठ वर्षांच्या कालावधीमध्ये मराठी भाषेचे बदलत गेलेले स्वरूप आणि वाङ्मयीन जाणीव यांचा विचार करणे गरजेचे ठरते. मराठी भाषेला वृद्धिंगत करणाऱ्या परिस्थितीचाही स्थूलमानाने विचार करायला हवा.

इ. स. १८१८ साली पेशवाई नष्ट झाली आणि इंग्रजी राजवट सुरू झाली. सर्व बाजूंनी मोडकळीस आलेल्या मध्ययुगीन संस्कृतीमध्ये इंग्रजी अंमल बसल्याबरोबर अल्पकाळातच अनेक स्थित्यंतरे झाली. पाश्चात्य लोक आणि एतद्देशीय लोक यांच्या प्रयत्नातून शिक्षणप्रसार, ग्रंथनिर्मिती, नियतकालिके या माध्यमाद्वारे मराठी भाषेमध्ये हळूहळू बदल घडत गेला. इंग्रजीसारख्या जगातल्या प्रगत भाषेशी मराठी भाषेचा संबंध आला आणि मराठी भाषेला अगदी वेगळे वळण लागले. शब्दकोश निर्माण होऊ लागले. व्याकरणाची निर्मिती होऊन मराठी भाषेला साचेबद्ध आणि काटेकोर करण्याचा प्रयत्न होऊ लागला.

'दर्पण'च्या निर्मिती अवस्थेमध्ये इंग्रजीचा सुरुवातीचा कालखंड आणि अस्तंगत पावलेल्या पेशवाईच्या कालखंडाचा विचार करावयास हवा. तत्कालीन लेखन हे पेशवाईमध्ये पुन: उफाळून आलेल्या संस्कृत प्राबल्याचे व सुरुवातीच्या इंग्रजीच्या अशा संमिश्र परिणामातून निर्माण झालेले आहे. निश्चितपणे तिला शुद्ध स्वरूपाची मराठीही म्हणता येत नव्हते किंवा तत्कालीन भाषेचे स्वरूपही मानता येत नाही. बालबोध आणि काहिशी मिशनरी वळणाची छाप असलेली मराठी असेच तिचे स्वरूप होते. 'दर्पण'मध्ये याचा प्रत्यय वेळोवेळी जाणवतो. मराठी भाषा शुद्ध करण्याची प्रक्रिया त्या कालखंडात सुरू झालेली असली तरी ज्येत्यांचा प्रभाव पूर्णपणे झुगारून टाकता आला नाही. १८३२ साली 'बाँबे नेटिव्ह एज्युकेशन' या

शैक्षणिक संस्थेची सुरूवात झाल्यानंतर ज्या काही विद्वानांनी शिक्षणासाठी क्रमिक पुस्तके लिहिली तीही इंग्रजी सत्तेला साजेशीच होती. त्यामुळे मराठी भाषेचा विकास हा इंग्रजी भाषेच्या मागोमाग होत असल्याचे जाणवते.

शिक्षणाची मक्तेदारी एका ठराविक वर्गातच राहिली असल्यामुळे त्याचाही स्वाभाविक परिणाम भाषेवर झाला. वाङ्मयाची भाषा जरी सुधारली तरी व्यावहारिक जीवनामध्ये मात्र तिचा फारसा वापर आढळत नाही. मुंबईच्या आजुबाजूला असणाऱ्या प्रांतात जी वाङ्मयीन स्थित्यंतरे होत होती त्याचाही फारसा परिणाम मराठीवर झाला नाही. एकंदरीत पाश्चात्य लोकांनी स्वत:च्या सोयीसाठी निर्माण केलेले शिक्षणाचे साधन आणि एतद्देशीयांची त्या संदर्भात असणारी तळमळ या प्रयत्नातून शिक्षणप्रसार, ग्रंथनिर्मिती, नियतकालिके यांचा प्रसार हळूहळू मराठी झाला. भाषेचे महत्त्व लोकांच्या लक्षात येऊ लागले. मराठी भाषेला सुस्लिष्ट, बांधेसुद आणि समाजप्रवण करण्याची प्रक्रिया अंमलात येऊ लागली.

मराठीतील पहिले नियतकालिक म्हणून 'दर्पण'चे कार्य नि:संशय मोठे आहे. ते कार्य योग्य आहे की नाही यापेक्षा ते प्रथम कार्य आहे हेच महत्त्वाचे आहे. ज्ञानप्रसाराबरोबरच समाजमनाला एक ठराविक दिशा देण्याचं कार्य 'दर्पण'ने आरंभिले. असंख्य मराठी भाषिकांच्यासमोर वृत्तपत्रातून नुकताच बदल घडत असलेल्या मराठी भाषेचा तयार नमुना ठेऊन आपल्याबरोबरच त्यांनाही बदल घडवून आणणेस भाग पाडले. बाळशास्त्री जांभेकरांचा ज्ञानदानाबरोबरच वाङ्मयीन प्रयत्न नि:संशय मोठा आहे. 'दर्पण'मधील मूळ लेखन बाळशास्त्री जांभेकर करत होते. त्याचा मराठी तर्जुमा जर्नादन वासुदेवजी या मराठी आणि संस्कृत भाषेत पारंगत असलेल्या विद्वान गृहस्थाने केला. 'दर्पण'चा वाङ्मयीन विचार करत असताना या दोन्ही लेखकांचा विचार होणे अपरिहार्य आहे. बाळशास्त्री जांभेकरांचे मुळातील विचार म्हणून त्यांचे इंग्रजी लेखन येथे आधाराला घेतले असून वाङ्मयीन पाहणी करताना जनार्दन वासुदेवजी (नाना) यांचे श्रेय नजरेआड केलेले नाही.

### नानाविध विषय

बाळशास्त्री जांभेकरांचा 'दर्पण' वृत्तपत्र सुरू करण्याचा उद्देशच मुळी ज्ञानदानाचा होता. लोकांना ज्ञान देण्याच्या मूळ हेतूला धक्का न लावता सर्व विषयांना पत्रात

स्थान देण्यात येत असे. 'लोकस्थिती, धर्मरीती आणि उपयोगी फेरफार घडवून आणणे' हे नियतकालिकाचे प्रमुख कर्तव्य आहे अशी बाळशास्त्र्यांची धारणा होती. त्यामुळे विद्याविषयक, धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, व्यक्तिमहात्म्य, मृत्यूलेख, सुधारणाविषयक आणि मनोरंजनात्मक अशा नानाविध विषयांची चर्चा 'दर्पण'मधून झालेली आहे. विद्याविषयक विचार, त्यांचे आदर्श, पाश्चात्य लोकांची ज्ञानलालसा, जिद्द, धडपड, जिज्ञासू वृत्ती वाचकांच्या अंगी उतरविण्याच्या समंजस भूमिकेतून लेखन झालेले आहे. 'नियतकालिक लेखापासून जे स्वार्थ होतात त्याविषयी' या लेखातून नियतकालिकाचे फायदे बंगाल प्रांताची झालेली प्रगती डोळ्यासमोर ठेवून सांगितलेले आहेत. 'वाफयंत्राच्या वृत्तांतापासून मनात आलेल्या गोष्टी' या लेखात तर विज्ञानविषयक माहिती दिली आहेच शिवाय पाश्चात्य लोक आणि एतद्देशीय लोक यांच्या प्रयत्नांची उकल करून देऊन 'बुद्धी कोणत्याही एका देशातच असते असे नाही ती सर्व देशात समान असते त्यासाठी प्रयत्न महत्त्वाचे' असे सांगितलेले आहे. 'विद्या हे बळ आहे' या लेखात तर एतद्देशीयांचे मागासलेपण आणि ब्रिटिशाचे पुढारलेपण सांगून लोकांनी शिक्षणाकडे वळावे आणि आपल्या देशाचे मागासलेपण दूर करावे असे लिहिले. लोकांना शिक्षणाभिमुख करण्याच्या दृष्टीने त्यांनी एल्फिन्स्टन् ह्युझेल साहेबांच्या कार्याचे महत्त्वही विशद करून सांगितले आहे.

सामाजिक किंबहुना सुधारणाविषयक विचारांची चर्चा करीत असताना पाश्चात्य लोकांनी विज्ञानात केलेली प्रगती, आपला अंध:प्राय आणि धर्मभोळा समाज यांचे एतद्देशीयांना सम्यक आकलन व्हावे अशा वृत्तीतून लेखन झालेले आहे. 'सरकारने पुण्यात इंग्रजी शाळा घातली, पुण्यातील इंग्रजी शाळेवर येस्डेल साहेब गुरू नेमिला' अशा वृत्तामधून शिक्षणविषयक घडामोडी जनतेपर्यंत पोहोचविल्या. ''शिक्षा मंडळीस सरकारातून पैका कमी झाला'' आणि 'रहदारी जकाती व मुलखी परोपकारी कामात वाढ'' या लेखातून मात्र सरकारच्या चुकीच्या धोरणाबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करून परखड टीकाही केली. सरकारचे धोरण एतद्देशीयांना प्रगतीपथाकडे नेणारे असावे अशी त्यांची धारणा होती. म्हणून तर बंगाल आणि मद्रास प्रांतात बँकांची निर्मिती झाली होती तशी 'सरकारने मुंबईस पेढी घालण्याचे अगत्य' अशी इच्छा व्यक्त केली. 'हिंदुस्थानातील नाचतमाशे हा गुलामगिरीचा प्रकार आहे', या लेखातून

समाजातील अपप्रवृत्ती समाजविघातक कशा आहेत हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. 'जगन्नाथ शंकरशेट जे. पी. मॅजिस्ट्रेट' झाले त्यावेळी एतद्देशीयांमधील पहिला पुरुष वरिष्ठ जागेवर काम करू लागला असे लिहिले आहे. यामधून त्यांचा देशाभिमान दिसून येतो. सामाजिक उन्नतीच्या अनुषंगानेच त्यांनी लेखन केले.

इंग्लंडमधील होणाऱ्या राजकीय घडामोडी, सरकार आणि जनतेमधील झालेला संघर्ष, त्यातून निष्पन्न झालेले लोकोपकारक फायदे याचे आकलन 'इंग्लंड देशातील राजकीय सुधारणेसंबंधी बील संमत झाले', 'इंग्लंड देशातील राज्यरीतीत बदल करण्यासंबंधी यत्न', 'विलायतेचे बादशहाचे कोंसलात फेरफार' या लेखातून करून दिले आहे. नकळतपणे स्वातंत्र्याची जाणीवही त्या अनुषंगाने एतद्देशीयांना करून देतात. 'एतद्देशीयास आदरे करून लिहावे' या लेखात तर पाश्चात्य अधिकाऱ्यांवर टीका करून आम्ही तुमच्यापेक्षा कुठे कमी नाही, असे सांगितले आहे. 'जस्टिस ऑफ पीसच्या सनदा वगैरे' अशा लेखातून सरकारमध्ये बदलणारे कायदेकानून यांची जाण एतद्देशीयांना करून दिली.

आर्थिक बाबतीत विचार करत असताना 'शेतकरी लोकास सरकारचे उत्तेजन' या लेखात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवला आणि शेतीविषयक सरकारने धोरण निश्चित आखावे असे सांगितले. 'कंपनी सरकारच्या तीन इलाख्यातील जमा-खर्चाची' या लेखात आकडेवारीसह मुंबई, मद्रास व बंगाल प्रांतातील जमा-खर्च वाचकांपर्यंत पोहोचवला व खर्च अधिक का व कशासाठी झाला याचा सरकारला जाबही विचारला आहे.

व्यक्तिपरिचय करून देत असताना 'राजा राममोहन रॉय' यांच्या कर्तृत्वाचा गुणगौरव करून त्यांचा आदर्श एतद्देशीयांनी घ्यावा, 'ह्युझेल साहेबांची' ज्ञानलालसा, जिज्ञासू वृत्ती, धडपड आणि 'सामलदास देसाभाई' याचे धैर्य एतद्देशीयांनी घ्यावे ही जाणीव ठेवून लेखन केलेले आहे.

मृत्यूलेख लिहित असताना बाळशास्त्री घगवे यांचे थोर कार्य आणि ते अल्पकाळी निधन झाल्याची खंत व्यक्त केली आहे. 'चिमाजीराव आप्पासाहेब' यांच्या मृत्यूची बातमी देत असताना त्यांचा कुलवृत्तांत दिला आहे.

सांस्कृतिक बाबतीत चर्चा करत असताना 'कलकत्यामध्ये हिंदू नाटकशाळा सुरू झाली' या लेखातून प्राचीन नाटकावर प्रकाश टाकून समाजसुधारणेच्या कामी

नाटक हे सांस्कृतिक माध्यम उपयोगी ठरू शकेल असे स्पष्ट लिहिले आहे. तर 'हिंदुस्थानातील नाचतमाशे हा गुलामगिरीचा प्रकार आहे. या लेखात नाचतमाशांना उत्तेजन दिल्यास वाईट परिणाम कसे होतात हे स्पष्ट केले आहे.

'जामे जमशीद नावाचे नवे गुजराथी वर्तमानपत्र' काही बानकोटास आगीची नाव करून गेले. 'ठग किंवा फासीगर' अशा प्रासंगिक विषयावर पण बाळशास्त्र्यांनी लिहिले आहे. 'स्वतंत्र व पक्षपातरहित वर्तमानपत्रापासून होणारी फळे व कार्ये' या लेखात तर नियतकालिकविषयक त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट होतोच शिवाय आदर्श पत्रकार कसा असावा हेही दिसून येते. 'दर्पण' छापण्याचे रीतीत काही फेरफार', 'दर्पण चालविण्याची आमची रीती' या लेखातून वाचकांच्या विनंतीनुसार 'दर्पण' पत्रात केलेली सुधारणा याचे विवेचन केलेले आहे.

धार्मिक विषयावर लिहित असताना हिंदू धर्माबरोबरच ख्रिस्ती, मुसलमान धर्मातील दोषावर बोट ठेवून बदलत्या काळानुसार धैर्याने बदलले पाहिजे, व धर्म अखंड मानव जातीच्या कल्याणासाठी असला पाहिजे अशी त्यांची धर्मविषयक भूमिका होती. स्वत:च्या धर्माभिमानास धक्का न लावता तटस्थ भूमिकेतून लिहिले आहे. 'ख्रिस्ती झालेला गिरमाजी आपा याचा वृत्तांत' या लेखात धर्मांतराची अगदी काटेकोरपणे बातमी दिली आहे. 'ले. क. वानस केनडी यांचा ग्रंथ प्राचीन धर्म व हिंदू धर्म', 'पाद्री वुईलसन साहेबाचा ग्रंथ हिंदू धर्म प्रसिद्धीकरण' या ग्रंथांची परिक्षणे करीत असताना अभ्यासू वृत्ती, सूक्ष्म निरीक्षण, प्रांजळपणा, नि:पक्षपाती दृष्टी या गुण वैशिष्ट्यासहीत केलेली आढळतात.

वरील नानाविध विषयाबरोबरच वाचकांच्या विविध विषयपर असंख्य पत्रांना बाळशास्त्र्यांनी स्थान दिले आहे. जनतेला प्रबोधनात्मक विचार सांगून जागृत करणे आणि देशाला प्रगती पथाकडे नेणे या वृत्तीतून त्यांनी लेखन केलेले आहे. त्यासाठी विषय निवडण्याची चोखंदळ पद्धती उल्लेखनीय आहे. 'दर्पण'च्या लेखनाचा सारासार विचार केल्यानंतर त्यातील वेगवगळ्या विषयांचे नाविण्य तर जाणवतेच पण ते निवडण्याचा बाळशास्त्र्यांचा हेतूही लक्षात येतो. तत्कालीन लोकांच्यासमोर जे ज्वलंत असे विषय होते त्यासंदर्भात त्यांना जास्तीत जास्त माहिती द्यावी किंवा ज्ञान द्यावे हा हेतू स्पष्ट होतो. विषयाच्या निवडीमध्ये कोणत्याही एका विषयाला पुन: पुन:

स्थान न देता त्याची निवड चोखंदळ वृत्तीने झाली आहे. पाश्चात्य राष्ट्रातील सुधारणावादी विषय जसे येतात तसेच एतद्देशीयांचे मागासलेपण दाखवून देण्याचा ते प्रयत्न करतात. सूक्ष्म निरीक्षण, संवेदनशील वृत्ती, प्रसंगी आढळणारा तटस्थपणा, दूरदृष्टीपणा, विषयांचे संपूर्ण ज्ञान असल्याशिवाय ते न लिहिण्याची प्रवृत्ती, पुराव्याव्यतिरिक्त आरोप न करणे आणि सर्वव्यापी समंजसपणा याचा प्रत्यय 'दर्पण'मधील नानाविध विषयांचे वाचन केल्यानंतर येतो.

## विचारसौंदर्य

एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या कालखंडाचा विचार करता पेशवाईतील भ्रष्ट राज्यसत्ता आणि कायदेशीर वृत्तीच्या इंग्रजांचा अंमल यांचा परिणाम समाजातल्या प्रत्येक स्तरावर झालेला होता. इंग्रजांच्या मर्जीत राहून त्यांच्या राज्यकारभाराचा उदोउदो करणारे जसे लोक होते तसेच आपल्यावर इंग्रजांचे परचक्र आले आहे असे भान राखणारे समाजसुधारकही होते. एकाच वेळी या दोन आघाड्यांच्यावर प्रबोधनाचे कार्य करणे 'दर्पण'कारांना भाग होते. प्रतिगामी आणि पुरोगामीवृत्तीच्या लोकांना आपल्याबरोबर घेऊन जाणेही गरजेचे होते. सर्वसामान्यांच्या गळी आपले विचार उतरविण्याच्या दृष्टीने त्यांना बदलत्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक प्रश्नांची चाहूल करून देणे हाच 'दर्पण'मधील विचारांच्या पाठीमागील मूळ हेतू होय. बाळशास्त्र्यांनी आपले विचार विद्वतेच्या पोटी मांडलेले नसून समाज प्रबोधनामध्ये आपले स्वत:चे भावनिक दर्शन विचारांच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'वाफयंत्राच्या वृत्तांतापासून मनात आलेल्या गोष्टी' या स्फुटलेखाच्या प्रारंभीच ते लिहितात, 'विद्वान आणि मूर्ख, या दोहोमध्ये अंतर प्रकाश, अंध:कार, सत्य-असत्य, मनुष्याची बुद्धी आणि पशुंचे ज्ञान, यांमध्ये जितके आहे तितकेंच आहे. मूर्ख आपलें आयुष्याचा एकरूप प्रवाहें करून संतुष्ट असतो, ते आपलें सभोवतें सृष्टीतील पदार्थ असतात तितके मात्र पाहतो, त्याची इच्छा संसारातील अवश्य पदार्थाचे बाहेर जात नाहीत, आणि त्यास आपला देश व आपण जांमध्ये राहतो ते लोक यांचे मात्र ज्ञान असतें. इकडे मनुष्याच्याने जितके श्रम होतात तितके करून विद्वान ईश्वराचे कृत्यांचे गुन्ह्यांचा शोध करायास यत्न करितो, अंतरिक्षांतील जडांचा गति जा नियमांप्रमाणे चालतात ते नियम शोधून काढितो, विचार करून आणि अनुभव घेऊन तो सभोंवताले सृष्टीतील पदार्थांची कारणे आणि गुण समजतो.

ते समजले म्हणजे तो आपले ज्ञान मनुष्याचे कल्याण करण्याचे उपयोगास लावितो, आणि सृष्टींतील मुलभूते ही त्या कामात आणितो'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, २९)

वरील विचारावरून पाश्चात्य लोक व हिंदुस्थानी लोक यांच्या बौद्धिक सामर्थ्याची आणि आकलनाची तफावत बाळशास्त्री आपल्यासमोर ठेवतात. लेखाच्या सुरुवातीलाच असे विचार मांडून नंतरच मूळ विषयाला हात घालण्याची आणि त्या विषयांचे आकलन करून देण्याची हातोटी 'दर्पण'कारांची होती. विज्ञानाची आणि नवीन शोधांची माहिती करून देण्याच्या निमित्ताने संपादकांच्या मनात आलेल्या गोष्टी वाचकापर्यंत पोहोचविणे हेच या लेखाचे प्रयोजन आहे. या लेखात 'दर्पण'कारांच्या विचार सौंदर्याचे दर्शन घडते. वाफयंत्र हा मूळ विषय अगदी चार-पाच ओळीतच त्यांनी आटोपला आहे. याच लेखाच्या उत्तरार्धात विद्येचे महत्त्व पटवून देत असताना ते म्हणतात, ''जे सरकार विद्येचे वृत्धीस आश्रय देतें, तेथे मनास विद्येचा संस्कार करण्यास लोकांस विशेष उत्साह होतो, आणि जुलुमगारांचे अंमलापेक्षे तशे राज्यांत हे उद्योग अधिक सफळ होतात. अशे उद्योगांपासून विद्या आणि कला वाढतात आणि ज्ञानाचा लवकर प्रसार होतो. परंतु आपलीं मतें चांगले मार्गास लावणे हे जितकें लोकांचे स्वाधीन आहे तितके राजाचे नाही, हे आमचे लोकांनी ध्यानात धरावे, आणि हे दुसरे लक्ष्यात ठेवावें की जांस विद्या संपादन करावयाची आहे, त्याणी जर आपले मनांतील द्वेषबुद्धि चालविली नाही तर त्यांचा उद्योग फुकट जाईल.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ३१) 'दर्पण'कारांच्या विचारांचा सखोलपणा आणि तो सोप्या शब्दात समजावून सांगण्याची त्यांची पद्धती प्रस्तुतच्या लेखावरून दिसून येते.

'विद्या हे बळ आहे' हे लॉर्ड बेकनचे उद्‌गारच मुळी 'दर्पण'कारांनी आपल्या लेखाला शीर्षकरूपात दिले. विचारवंतांचे आणि विद्वानांचे उद्‌गार, वक्तव्ये बाळशास्त्री आपल्या विचारांच्या पृष्टीदाखल अशा रीतीने देतात. हिंदुस्थान व पाश्चात्य राष्ट्रातील विद्याविषयक पार्श्वभूमी यांमधील अंतर विशद करताना बाळशास्त्र्यांनी पुढील विचार मांडला आहे. ''या दोन पृथ्वीचे भागांत विद्येची वृद्धि बरोबरीनें झाली नाहीं याचीं दुसरीं कारणें काय असतील तीं असोत, परंतु आम्हास वाटतें कीं, साधारण विद्येचे मुख्य उपयोग या देशातील लोकांस चांगले समजले नाहींत हें त्यातून एक कारण आहे.

याविषयीं प्रमाण इतकेंच लिहिलें पाहिजे कीं, ''या देशांतील विद्वान लोकांनी न्याय व वेदांत या शास्त्रांकडे जितकें लक्ष्य दिलें तितकें उपयोगी कला कौशल्यांकडे दिलें असतें, तर त्यांचे श्रमापासून बहुत चांगल्या गोष्टी घडल्या असत्या. परंतु सर्व विद्या धर्माचे उपयोगी, किंवा वादांमध्यें जय मिळविण्याचे साधन, तीचा मनुष्याचे संसारांतील कामाशीं कांहीं उपयोग नाहीं असे त्या प्राचीन विद्वान लोकांचे मत होतें असें वाटतें. हिंदू व मुसलमान या लोकांत शिल्प, भूगोलाचे ज्ञान, इतिहास यांमध्यें परिश्रम कमी याचें कारण हें आहे.''

परंतु ही गोष्ट सर्वांस संमत आहे कीं, काळ व पदार्थांची स्थितीही बदलली म्हणजे जुन्या रीति सोडून नव्या घेण्याचें प्रयोजन पडतें. या देशाचे स्थितीमध्यें गेले वीस वर्षात मोठा फेरफार झाला, जापासून प्राचीन संप्रदाय बहुत मोडले, आणि जो फेरफार झाला म्हणोन ही गोष्ट दिवसानुदिवस अधिक अधिक आवश्य होत आहे की, या देशचे लोकांनी आपलें लक्ष्य संसारोपयोगी कला कौशल्यांकडे द्यावें, त्यांचे व्यवहारांत उपयोग कसे होतात ते शिकावे, आणि सारांश, जा गोष्टींनी युरोपियन लोक या देशचे लोकांपेक्षें श्रेष्ठता पावले आहेत, आणि जा गोष्टी नाहींत म्हणोन या देशाची इतकी दुर्दशा झाली, त्या सर्व त्यांणी साध्य कराव्या.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ५३)

प्रस्तुतच्या उताऱ्यावरून एतद्देशीयांना विद्येचे मुख्य उपयोग समजले नाहीत तेंव्हा त्यांनी विद्येचा उपयोग व्यवहारात कसा उपयोगी पडतो हे शिकावे असे बाळशास्त्री सांगतात. विद्येचे महत्त्व पटवून देत असताना पाश्चात्य देशातील प्रगती वाचकांच्या डोळ्यासमोर ठेवतात व आपले मागासलेपण आपण शिक्षणानेच दूर करू शकू असा आशावादही ते प्रकट करतात.

स्पष्टवक्तेपणा आणि त्यासोबत काहीसा आवेशही त्यांच्या लेखनात कसा येतो त्याचे प्रत्यंतर पुढील उताऱ्यावरून दिसून येते. ''जा आमचे देशचे लोकांत विद्या कमी, आणि जांचे या विषयींचे समज देशाचरांमुळे लहानपणीं विपरीत पडोन गेले असतात, त्यांची जेव्हां आम्ही अशी निंदा करितों, तेव्हां जा साहेब लोकांचे समज स्वच्छ, आणि जांची अभिरूची चांगले ठिकाणीं जडत्ये, ते साहेब लोक असे तमाशास जातात, त्याविषयीं कोणता आधार नाही, त्यांची आम्ही किती निंदा करावी?

लोकांचा चाली, समज, आणि बऱ्यावाईट रीती, चालूं द्याव्या हें शहाणपण खरें, परंतु वर सांगितलेला तोटा जांपासून होतो, त्या चाली वाढत अशा करणें हे मूर्खपणाचें किंवा अज्ञानपणाचें चिन्ह.

आम्ही ही गुलामगिरीची तऱ्हा लिहिली ही कोतवालांचे बंदोबस्तानें बंद होणार नाहीं. जी वाईट गोष्ट होण्यास ती गुलामगिरी अवश्य पाहिजे, ही गोष्ट पूर्वी बंद झाली पाहिजे, म्हणजे ही गुलामगिरी पक्की बंद होईल, परंतु तिची मूळें अशी घट्ट झाली आहेत, की विद्या व मोठे ठिकाणी तसा आचार लोकांस दृष्टीस पडणें, या वांचून ती बंद होईल ही आशा व्यर्थ आहे. म्हणोन आम्ही या प्रसंगी भले आणि समर्थ इंग्रेस व या देशचे लोक यांस मुख्यत्वें लिहितों कीं, त्याणी आपली मनुष्यमात्राचे कल्याणाविषयींची इच्छा, मनुष्यपणा आणि नीति यांहीकरून ही गुलामगिरीची रीति चालण्याचीं जीं साधनें आहेत तीं, आपल्यापासून उपाय होईल तेवढा करून बंद करावी, जा या गुलामगिरीपासून लोकांची नीति फार भ्रष्ट होत्ये, आणि हजारोंचे घरीं बुड आणि दु:खहीं येतात.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ६९)

'दर्पण'मधील लेखन प्रबोधनाच्या भूमिकेतून मांडलेले असल्यामुळे साहजिकच भोळ्या समजुती, समाजातील अपप्रवृत्ती यावर त्यांनी आघात केला. समाजाला नीतिमत्तेचे, आचारसंहितेचे शिक्षण दिले पाहिजे या दृष्टीने त्यांनी लेखन केलेले आहे. बाळशास्त्र्यांचे युक्तिवादाचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. निव्वळ पत्रकार आणि विचारवंत या भूमिकेतून 'स्वतंत्र व पक्षपातरहित वर्तमानपत्रापासून होणारी कार्ये आणि फळे' या स्फूटलेखात त्यांच्या विचारांचा तळ गवसतो. ते म्हणतात, ''प्रसित्ध छापाची जीं अनेक कार्ये आणि फळें आहेत त्यांमध्यें स्वतंत्र व पक्षपात रहित छापण्यापासून, अधिकार अयोग्य रीतीने चालविणे, किंवा अधिकार जांजवळ दिला आहे त्या लोकांची वाईट वर्तणूक, यांवर धाक उत्पन्न झाल्यांवाचून कधीं राहात नाहीं यापेक्षें अधिक किमतीचें व बहुतांस हितकारक असें दुसरें छायाचें फळ कदाचित नसेल. परंतु हें हितकारक फळ उत्पन्न होण्याकरितां अधिकारावरचे लोकांचे कृत्यांची बारीक परीक्षा आणि ज्यांची जीं कृत्यें चांगलें प्रकारचीं दिसतील त्यांची प्रसित्धी (झाली) पाहिजे, तरच तें फळ उत्पन्न होईल. अशे लक्ष्यानें किंचित कोणी पुरुषाची गोष्ट बोलणें अगत्य पडलें, तर वर्तमान पत्राचें करणारानें कोणत्ये एके पक्षाचे लोकांचा आपणावर क्रोध होईल या भयामुळे, किंवा त्या पुरुषाचे प्रीतीमुळे हें आपलें

मोठें काम करायास माघें सरूं नये. जेथे सर्व लोकांचे हिताचा संबंध असेल, तेथे त्याणें या वरचे दोन कल्पनांतून कोणती एक कल्पना मनात आणून आपलें काम निष्कृत्रिम करण्यास चुकूं नये.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ६५) हा बाळशास्त्र्यांचा पत्रकारीतेवरील समर्पक विचार आजच्या पत्रकारांनाही आदर्शभूत ठरू शकेल असाच आहे. वृत्तपत्राचे महत्त्व त्या काळात त्यांनी किती पटले होते हे सहज लक्षात येते. वृत्तपत्राचे कार्य आणि फायदे एतद्देशीयांना समजून देण्याची तळमळ आणि वृत्तपत्राच्या प्रसाराची धडपड वरील विचारातून स्पष्ट होते.

'दर्पण'मधील लेखनातील निर्भीडता, परखडपणा आणि दूरदृष्टीपणा पुढील विचारातून स्पष्ट होतो.

''सरकारचे कामगाराच्या हातून जीं दुष्कर्मे घडतात, त्या सर्वांमध्ये लांच व लबाडी यांपासून लोकांचा नाश फार होतो, आणि हें दुष्ट कर्म न्याय करण्यासंबंधी कोणी पुरुषाचे हातून जेव्हां घडतें तेव्हां तर फारच होतो. देशाची समृद्धि व त्यांतील लोकांचें सुख यास कारणे दोन आहेत, एक न्याय करण्याचे रीतीचा शुत्धपणा, आणि दुसरे, तो न्याय करण्यासाठीं जो बेत केला असेल तो चांगला चालणें. कां कीं, या दोहोंवाचून वित्त विषय वास्तविक निर्भय राहत नाही, आणि या दोन गोष्टी असल्यावाचून कोणी कोणास उपद्रव केला असता त्यास उपाय राहाणार नाही, आणि त्यापासून उपद्रव करण्यास मर्यादा राहणार नाही, आणि हे तर लोक सुखी राहण्यास अवश्य आहे. या करिता जो पुरुष आपणास लोकांना न्याय करण्याचे कामावर नेमिलें, ही प्रतिष्ठा विसरून, आपला अधिकार वाईट ठिकाणीं लावतो, किंवा त्यापासून आपला लोभ तृप्त करण्यास प्रवृत्त होतो, त्या पुरुषाची सर्व प्रामाणिक मनुष्यांनी निंदा आणि कंटाळा करावा. त्याणें सर्व लोकांचा अपराध केला म्हणोन सर्व लोकांनीं त्यास शत्रूसारिखा समजून दूर करावा, त्यांचें नाव सर्व लोकांचे तोंडांत असावें, आणि त्याशीं व्यवहार करणे हा नीचपणा असें मोजावें. जो न्यायाचा व्यापार करितो, त्यास हें शासन फार निर्दय आहे काय ? (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ६५)

'दर्पण'मधील लेखनाचे स्वरूप एखाद्या नारळासारखेच आहे. वरकरणी अभिव्यक्ती रूक्ष, ओबडधोबड, कंटाळवाणी असली तरी अंतरंग मात्र समृद्ध आहे.

समाजाविषयी जिव्हाळा, जीवनविषयक प्रगल्भ दृष्टी, निवेदनातला साधेपणा, भारदस्त शब्द,एतद्देशीय तरुणांविषयी अभिमान, त्यांच्या अस्मिताजागृतीचा प्रयत्न यांनी हे लेखन समृद्ध झालेले आहे. 'दर्पण'मधील विचार हे प्रामुख्याने एतद्देशीयांच्या सर्वांगीण उन्नतीच्या अनुषंगाने आणि देशाला प्रगतीपथाकडे नेण्याच्या ठाम भूमिकेतून मांडलेले आहेत. परिवर्तनाची सर्वांगीण बूज त्याला आहे यात वादच नाही.

## प्रबोधनपर लेखनाची अभिनव पद्धत

बाळशास्त्र्यांच्या 'दर्पण'चा उद्देशच मुळी एतद्देशीयांना ज्ञान करून देणे आणि त्यांना प्रगतीच्या शिखराकडे नेण्याचा असल्यामुळे त्यातील लेखन हे सुधारणाविषयक दृष्टीने झालेले आहे. त्यासाठी बाळशास्त्री आपले खास विचार तर मांडतातच शिवाय आपल्या मताशी सहमत असलेला इतर वृत्तपत्रातील प्रगतीनिर्देशक मजकूरही वाचकांसमोर ठेवतात. विशेषकरून कलकत्यामधील 'रिफार्मर' या वृत्तपत्राचा मजकूर ते वारंवार देतात. 'कलकत्यामधील हिंदू नाटकशाळा सुरू झाली' या लेखात शेवटी जाता जाता लिहितात, ''आणि रिफार्मर वर्तमानपत्राचे लिहिणारा सारिखेंच आम्ही इछितों कीं, या नाटकांपासून जें मनोरंजन होईल तेणेंकरून देशांतील अभद्र जात्रा इत्यादि समारंभ बंद होतील.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, १७) 'विद्या हे बळ आहे' या लेखातही आपल्या मतांचा आढावा घेऊन झाल्यावर शेवटी आपल्या विचाराशी सहमत असलेला मजकूर ''आम्ही कलकत्यामधील रिफार्मर वर्तमान पत्रांतून आलेले त्या संपादकाचे मत छापतो'' असे प्रामाणिकपणे निर्दिष्ट करून दिला आहे. ''आता समय असा आला आहे कीं, सर्व राज्यांतील लोकांनी सज्ञान दशेस चढावें, किंवा तिरस्कार आणि दु:ख यांत पडावें. या काळांत संपत्ति म्हणजे सज्ञानपणा आणि विद्या व कला यांचा अभ्यास, म्हणजे ती यापासूनच प्राप्त होत्ये, असें झालें आहें. वास्तविक पाहिलें असता सर्व काळ थोडेंबहुत असेंच आहे, परंतु सांप्रत संपत्ति आणि विद्या यांचा परस्पर संबंध साधारण पाहाणाराचे दृष्टीसही उघड येतो. विलायतेंतील लोकांमध्ये विद्येचा प्रसार झाला त्यामुळें त्या देशास किती श्रेष्ठपणा प्राप्त झाला याचाच आम्ही विचार करून पाहूं. विलायतेंतील जा चमत्कारीक यंत्रांनी द्रव्य मिळण्यास उपाय बहुत झाले आहेत, त्या यंत्रास मूळ कलाकौशल्यांची वृद्धि, विलायतेसारिखे लहान आणि दूर देशचे लोकांनी येऊन विलायतेंपेक्षेंही मनुष्यांचे संपत्तिविषयीं चांगलें हें राज्य घेतलें, आणि रक्षण केलें, हे सामर्थ्य त्यांस विद्येनें आले

नव्हे ? बरें असेच हिंदुस्थानचे लोक पुढें कोणत्ये विलायत घेतील, ही कल्पना असंभाव्य स्वप्नासारिखी वाटत्ये याचें कारण काय ? याचें कारण हिंदुस्थानचे लोकांपेक्षें विलायतेचे लोकांत विद्या फार आहे हें नव्हे काय ? विलायत देश या देशांपेक्षें, आणि दुसरे बहुत देशांपेक्षें श्रेष्ठता पावला आहे, याचे कारण विद्येचें सामर्थ्य नव्हे काय ? असें असतांही आमचे द्रव्यवान मित्र अशे अखूड दृष्टीचे आहेत कीं, ते इंद्रियांचीं हजारों मलिन सुखें ज्ञानाचे स्वार्थापेक्षें चांगलीं मानितात, ते आपली संपत्ति व जमविलेलें द्रव्य फार वेडेपणाचे खेळांत घालिवतात, परंतु विद्येचे कामासाठी एक पैसाही खरचीत नाहींत. अशा साधारण गोष्टी लिहिल्या असतां त्यांचे विरुद्ध कोठे आढळतें, म्हणोन आम्ही कबूल करायास सिद्ध आहों की, या स्तुत्य उद्योगास आपल्या सामर्थ्याप्रमाणे मदत करणारे आमचे लोकांत बहुत आहेत. या थोड्यांची गोष्ट आम्ही लिहिली नाहीं, परंतु आमचे लोकांतून जा बहुत करून लोकांचे डोळे विद्येचे स्वार्थाविषयीं आजून झांकले आहेत असें वाटतें, त्यांची लिहिली.'' (जांभेकर ग. गं., खंड २, १९५०, ५६, ५७)

वरील 'रिफार्मर' पत्रातील उताऱ्यावरून 'दर्पण'चा समाजाला फायदा झाला पाहिजे, एतद्देशीयांना अज्ञानातून वर काढले पाहिजे, जगाचे बदलते स्वरूप त्यांना सांगितले पाहिजे, व समाजात परिवर्तन घडून आणण्याच्या उद्देशाने आणि समाजमनाला नवीन दिशा देण्याच्या प्रवृत्तीतून इतर पत्रांचे मजकूर आधाराला घेतले आहेत. मोठमोठ्या विचारवंतांची मते, ग्रंथांचे आधार एवढेच नव्हे तर आपल्या विचाराशी सहमत असलेल्या वाचकांच्या पत्रांनाही त्यांनी अग्रक्रम देऊन प्रसिद्धी दिली आहे.

'दर्पण'चा पहिला अंक प्रसिद्ध होण्यापूर्वी १२ नोव्हेंबर १८३१ रोजी पत्राचा उद्देश स्पष्ट करणारा 'प्रस्ताव' प्रसिद्ध करण्यात आला होता. पहिल्या अंकात तो पुन: देण्यात आला होता. प्रस्तावात 'दर्पण' काढण्याचे मुख्य उद्दिष्ट मराठी व इंग्रजी मजकूर देण्याचा हेतू, कोणता मजकूर छापला जाईल इत्यादी सर्व गोष्टी स्पष्ट करण्यात आल्या होत्या. म्हणजे बाळशास्त्र्यांच्या विचाराची ठोस भूमिका अगोदरच ठरलेली होती. त्या भूमिकेला अनुसरूनच त्यांनी अखंडपणे वाटचाल केलेली आहे. तसेच आपण मराठी भाषेमध्ये पहिल्यांदाच नियतकालिक सुरू करत आहोत याची जाणीव बाळशास्त्र्यांना जशी होती तशीच ती जनमानसात रुजावी असा त्यांचा मनोदय असल्याचे प्रस्तावावरून स्पष्ट होते.

एकोणीसाव्या शतकाच्या आरंभी आपण मराठीतील वृत्तपत्र सुरू करत आहोत, त्याची बांधणी करत आहोत याचा सार्थ अभिमान बाळशास्त्र्यांच्या मनामध्ये आहे. प्रस्तावात म्हटल्याप्रमाणे त्यांचा हेतू शुद्ध आणि समाजसापेक्ष आहे. बाळशास्त्र्यांचे व्यक्तिमत्त्वच बहुश्रूत आणि व्यासंगी असल्यामुळे त्यांनी 'दर्पण' मधील नवविचार अभिमानाने रसिक वाचकापुढे सादर केलेले आहेत. 'क्यु' या पत्रकर्त्याने जो पक्षपाताचा आरोप केला त्यावेळी जांभेकरांनी काढलेली स्पष्टोक्ती त्यांच्या समतोल आणि प्रगल्भ वृत्तीची निदर्शक आहे. पत्रकारितेला आवश्यक असणारी ही वृत्ती आजही दुर्मिळच म्हणावी लागेल.

'दर्पण'मध्ये सनसनाटी बातम्या विशेष आढळत नाहीत. 'ठग किंवा फासीगर', 'पट्टावाग आइल ऑफ फ्रान्समधून पळून गेल्याची बातमी' याच गुन्हेगारीवरच्या त्या काळाच्या मानाने थरारक बातम्या आहेत. 'जे शुद्ध मनोरंजन मात्र इछितात त्यांचीही हृदये लहान लहान चमत्कारीक गोष्टीपासून संतुष्ट होतील' असे प्रस्तावात म्हटले आहे. त्या काळात 'चमत्कारिक' किंवा 'आश्चर्यकारक' वाटणाऱ्या बातम्या म्हणजे 'बाबू कृष्ण मोहन बानरजी यास बापतिज्मा दिल्हा', 'काही परभू बानकोटास आगीची नांव करून मौजेकरिता गेले', 'सामलदास देसाभाई इंग्लंड देशाहून परत आला' या आहेत. त्या काळाच्या मानाने हेच मनोरंजनाचे विषय होते. विशेष करून धर्मांतर, विज्ञानविषयक जिज्ञासा, समुद्रप्रवासांचे धाडस, परदेश सफर याबाबतीत वाचकांच्यामध्ये उत्सुकता असे. आजच्याप्रमाणे बातम्यांच्या सनसनाटीपणापेक्षा प्रबोधकतेवर, प्रेरकतेवर 'दर्पण'कारांचा अधिक भर दिसून येतो. या नानाविध विषयांची चर्चा 'दर्पण' नव्यानेच वाचकासमोर ठेवीत असल्यामुळे व नव्या गोष्टी वाचायला मिळाल्यामुळे साहजिकच वाचकांचे मनोरंजन होई. एकंदरीत ज्ञानदानाबरोबरच मनोरंजनाच्या दृष्टीनेही 'दर्पण'चे लेखन झालेले आहे. मनोरंजनात्मक लिखाणावरून वाचकांची अभिरूची वाढत जाते हे बाळशास्त्री ओळखून होते. मनोरंजनाबरोबरच एखादा लोभट, क्लिष्ट ज्ञानात्मक विचार मांडून तोही वाचकांच्या गळी उतरविण्याची बाळशास्त्र्यांची हातोटी दुर्लक्षून चालणार नाही. 'हिंदुस्थानातील नाचतमाशे हा गुलामगिरीचा प्रकार आहे', व 'या देशावर रशियनांचा हल्ला होण्याचे भय' या लेखामधून बाळशास्त्र्यांनी अशाच स्वरूपाचे लेखन केलेले आहे. एकंदरीत 'दर्पण'च्या सर्वच लेखनात आपुलकी, तळमळ, समाजसुधारणेची धडपड, देशाला प्रगतीपथाकडे नेण्याची जिद्द मराठीतील पहिल्याच वृत्तपत्रात दिसून येते यात वादच नाही.

## अग्रलेख व स्फूटलेखांचे स्वरूप

'दर्पण'मधील लेखांचे स्वरूप पहात असताना वैयक्तिक आणि राजकीय तसेच सामाजिक लेखांचे स्वरूप वेगळे करणे विवेचनाच्या दृष्टीने सोयीचे ठरेल. व्यक्तिनिर्देश न करता केवळ सामाजिक किंवा राजकीय सुधारणेचा विचार केला तर जे लेख आपल्यासमोर येतात त्यांचे स्वरूप इंग्रजधार्जिणे असेच आहे. इंग्रजी सत्तेचा झालेला अंमल व त्याआधारे एतद्देशीय समाजावर झालेला परिणाम या दोहोंच्या संयुक्त परिणामातून जी एक सामाजिक चळवळ सुरू झाली त्यांचे दृश्य स्वरूप बाळशास्त्री जांभेकरांच्या अग्रलेखामध्ये दिसून येतो.

''पत्रव्यवसायात मानवी स्वभावाच्या निरिक्षणाला खूप अवसर असतो. जितका वृत्तपत्रकाराचा अनुभव व्यापक व निरिक्षण सूक्ष्म तितके त्याचे लेखन सकस व प्रत्यकारी... ललित लेखनाच्या निर्मितीत कलावंताच्या मन:स्थितीला आणि मन:स्वाथ्याला फार महत्त्व आहे. पत्रकाराला मन:स्थितीच्या अनुषंगाने जाऊन चालत नाही. ललित लेखकाइतकी सवड आणि स्वास्थ्य मिळतेच असे नाही... काळ हा हातामध्ये हातोडा धरूनच पत्रकाराच्या मानगुटीवर बसलेला असतो, किंवा अधिक परिचयाची उपमा घेऊन बोलावयाचे झाल्यास परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्याप्रमाणे पत्रकाराची अवस्था असते.... घाईघाईचे लिहावयाचे आणि ते पुन्हा चांगले म्हणजे वाचनीय लिहावयाचे ही तर तारेवरची कसरत आहे. वेळेच बंधन व वृत्तपत्रातील स्थलाची मर्यादा यामध्ये पत्रलेखकाला आपले लेखन बसवावे लागते आणि त्याला आकर्षक, फर्मास शीर्षक देऊन त्याचे छान बारसेही करावे लागते.'' (नसिराबादकर ल. रा., १९७६, १७६-१८०)

वरील उताऱ्यावरून लक्षात येते की, अग्रलेख ही संपादकाची वार्षिक परीक्षा असते. त्याचे वाचन, चिंतन, मनन, त्याचा अनुभव याचे सार अग्रलेखामध्ये प्रकट होत असते. एखाद्या विषयाबद्दलचे तर्कसंगत, सुसूत्र व प्रभावी प्रतिपादन म्हणजे अग्रलेख.

'दर्पण'मधील अग्रलेखातून व्यक्त झालेले विचार हे अभ्यासपूर्ण आणि व्यासंगी वृत्तीतून निर्माण झालेले आहेत. तत्कालीन कालखंड लक्षात घेतल्यास बाळशास्त्र्यांना इंग्रजांना दुखवायचे नसले तरी सुद्धा त्यांची भूमिका सामोपचाराचीच होती, हे

दिसून येते. केवळ राजकीय पातळीवरच नव्हे तर समाजसुधारणेच्या बाबतीतही त्यांनी व्यक्त केलेली मते तत्कालीन परिस्थितीला सुसंगतच अशी आहेत. ब्रिटीशांची राजनिती सांगून त्यांच्यावर टीका करण्यापेक्षा जे आहे ते स्विकारार्ह्य कसे आहे हे सांगण्याचा प्रयत्न 'दर्पण'कारांनी केल्याचे जाणवते. 'नियतकालिक लेखापासून जे स्वार्थ होतात त्या विषयी', 'इंग्लंड देशातील राज्यरितीत बदल करण्यासंबंधी यत्न', 'कलकत्यामध्ये हिंदू नाटकशाळा सुरू झाली', 'वाफयंत्राच्या वृत्तांतापासून मनात आलेल्या गोष्टी', 'विद्या हे बळ आहे', 'हिंदुस्थानातील नाचतमाशे हा गुलामगिरीचा एक प्रकार आहे', 'स्वतंत्र व पक्षपात रहित वर्तमानपत्रापासून होणारी कार्ये व फळे' या अग्रलेखातील जांभेकरांचे युक्तीवादाचे कौशल्य, निवेदनातील तर्कशुद्धता, सुसूत्र व प्रभावी प्रतिपादन, मुद्दा पटवून देण्याचे कसब वाखाणण्यासारखे आहे. अग्रलेखातील विचार सडेतोड, अर्थपूर्ण, अभ्यासू व व्यासंगी लेखनातून निर्माण झालेले आहेत.

'दर्पण'मधील स्फूटलेखनाचे स्वरूपही असेच आहे. एखाद्या विषयाची अंगे-उपांगे लोकांसमोर ठेवणे, त्यांना जागृत करणे, ध्येयवादी बनविणे ही स्फूटलेखनाची वैशिष्ट्ये 'दर्पण'मध्ये आढळतात. शैक्षणिक संबंधात व्यक्त झालेले विचार किंवा व्यक्तिचित्रणात्मक स्वरूपाचे लेखन यात कोणत्याही स्वरूपाचा आपमतलबीपणा नसला तरी आपण काहीतरी नवीन सांगत आहोत ही मात्र जाणीव बाळशास्त्र्यांच्या लेखनात वास करीत असते. हे स्फूटलेखही विविध विषयावरील आहेत. राजा राममोहन रॉय, सामलदास देसाभाई, ह्युझेल साहेब, बाळशास्त्री घगवे यांच्या व्यक्तिमहात्म्या बरोबरच सामाजिक कर्तव्याची जाणीव लेखनामध्ये स्पष्ट झालेली दिसून येते. वैयक्तिक स्वरूपाचे कार्य व्यक्त करीत असतानाच त्यांचा आदर्श जनतेसमोर ठेवणे, जनमत जागृत करणे, आणि एतद्देशीयांना समाजाभिमुख करणे हाही त्यांचा उद्देश होता. त्यामुळे आदर्शाच्या भावनेतून व्यक्तिकार्य व व्यक्तिमहात्म्य विशद केले आहे. आपली भूमिका स्पष्ट करीत असताना आपल्यावर होणारे आरोपही ते स्पष्ट करतात. 'क्यु' च्या पक्षपाताच्या आरोपाला दिलेल्या उत्तरावरून कुणाचाही रोष न पत्करण्याची भूमिका येथे स्पष्ट होते. मुंबई, मद्रास आणि बंगाल प्रांतातील जमा-खर्चाचे स्वरूप व्यक्त करताना राजकारणातील अंतर्गत ठोकताळेही अतिशय समर्थपणे बाळशास्त्र्यांनी व्यक्त केलेले आहेत.

बाळशास्त्र्यांनी 'दर्पण'मधून अग्रलेख व स्फूटलेख यांच्याद्वारे शिक्षण, विज्ञान, धर्म, सामाजिक सुधारणा, राजकारण अशा बहुविध विषयांवर लेखन केले. मराठी भाषेत अग्रलेख व स्फूटलेखांचे लेखन प्रथमत:च मांडले. आजच्या वृत्तपत्रसृष्टीला अग्रलेखांचा आणि स्फूटलेखांचा धडा 'दर्पण'ने घालून दिला असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये.

**लेखनशैली**

'दर्पण'मधील विविध लेखांचा विचार केल्यानंतर त्यातील लेखनशैलीचा विचार करता येईल. 'दर्पण' ची लेखनशैली सरळ, संथ स्वरूपाची असून त्यामध्ये फारसा आवेश जाणवत नाही. विचारांच्या प्रकटीकरणासाठी कोणत्याही स्वरूपाची बाह्य मदत न घेता किंबहुना अलंकारिकतेचा वापर न करता विधाने साध्या आणि सरळपणे व्यक्त केलेली आहेत. कधी कधी पाल्हाळीक स्वरूपाचे लेखन झाल्यामुळे लेखनात बाळबोधपणा जाणवतो. लेखनाच्या एकंदर प्रवृत्तीकडे पाहिल्यानंतर हे लेखन वरवर वाङ्मयाशी मिळते जुळते असे स्वरूप व्यक्त होते. या लेखनात प्रतिमा-प्रतिके यांचा फारसा वापर आढळून येत नाही. मनात जे आले ते लिहिले अशीच एकंदरीत या लेखनाची प्रवृत्ती दिसून येते. मधून केव्हातरी ''जेव्हां झरा स्वच्छ होतो, तेव्हां त्यापासून वाहाणारे प्रवाह निर्मळ वाहातात.'' अशी अर्थपूर्ण, सूचक वाक्ये येतात. निवेदनातील अभिजातपणा, बाळबोधपणा व क्लिष्टता जाणवते. कारण विचारांचा ठसा वाचकांच्या मनावर बिंबविण्याच्या हेतूने बाळशास्त्र्यांनी भाषेला नटविण्याचा प्रयत्न केलेला नाही. मूळ विचारच कसदार असल्यामुळे त्याच्या अभिव्यक्तीला सजविण्याची आवश्यकता 'दर्पण'कारांना वाटत नाही.

'दर्पण'मधील वाक्यरचना सर्वसामान्य मराठीसारखीच असली तरी काही वेळा लांबलचक वाक्ये येतात. बऱ्याच वेळा तर खूपच मोठाली वाक्ये दृष्टीस पडतात. उदा. ''रुशियनांची फौज वास्तवीक अटकनदी उतरून जय मिळवीत या आमचे संकुचित मुंबई बेटावर जरी येत असती, तरी ती सांप्रत आमचे लोकांचे मंडळीमध्ये कांही दिवसांपासून जा बातम्या बोलत आहेत त्या जे कित्येक भोळे लोक खऱ्या मानितात त्यापेक्षे आमचे एथील राहाणारे चांगले लोकांनी डोळे उघडून पाहिलें नसतें, किंवा त्यास अधिक भय वाटले नसतें.'' किंवा ''इकडे देशचा बखरा, आणि लोकांची स्थिती पाहिली असतां या देशचे लोकांत बुद्धी, आणि निती यांचे दाखले

बहुत आढळतात, कीं नेटिव लोकांमध्ये मोठीं कामें व जस्तिस ऑफ दी पीस याचें सोपे काम करायाजोगे, बुद्धिवान, बहुश्रूत आणि प्रामाणिक लोक सांपडणार नाहीत असा जो कित्येकांचा सित्धांत आहे तो जा दाखल्यावरून खोटा करीतां येतो अशें लोकांस आम्ही विचारूं कीं जा जडजाचे जागेवर सांप्रत या देशचे लोकांस ठेवितात, आणि खालचे अंमलदारांनीं केलेले न्यायाची पुन: चौकशी करण्याचा अखत्यार देतात त्या जागेवर किंवा तालुक्याचे जमादंबीचे किंवा दुसरे कोणतें कारभार खात्यांतील काम चालवावयास जे गुण पाहिजेत, त्यापेक्षें जस्तिस ऑफ दी पीस यांचे काम चालवायास अधिक पाहिजेत की काय ? असे लोकांचे मनात काय असेल ते असो, परंतु इतकें एक समजून मनास संतोष वाटतो कां, आमचे राजांचें आम्हाविषयीं चांगले लक्ष्य आहे, आणि आम्हास एकवेळ तपासून पाहावें असें त्यांचे मनात आहे.''

वरील प्रदीर्घ वाक्यरचनेत पाल्हाळ लावल्यामुळे अर्थ विस्कळीत झाल्याचे दिसून येते. इंग्रजी भाषेमधून आलेली विरामचिन्हे सर्रास वापरलेली आहेत. काही ठिकाणी अर्थ न लागणारी आणि संदिग्ध स्वरूपाची वाक्ये आढळतात. अर्वाचीन भाषेप्रमाणे त्याचा सरळ अर्थ लक्षात येत नाही. ''दर आठवड्यास पाठवूं नये तर त्यांणी ते आम्हास कळे असें करावे'', ''त्याचे शरीरास आरोग्य आहे'', ''असे जर त्यांचे वर्तणुकीवरून दिसते नाहीं तर त्यास यापेक्षें मोठे उद्योग मिळतील अशी जी आशा आहे ती धरून फळ नाही असे होईल.'', ''इंग्रजी शाळा मांडली आहे'' अशा स्वरूपाची बरीच वाक्ये अर्वाचीन भाषेचा विचार करता अर्थहीन वाटतात. बाळशास्त्र्यांनी मुळात इंग्रजी लिहिलेल्या मजकूराचे मराठीत भाषांतर करावे लागल्यामुळे कदाचित वाक्यरचना विस्कळीत झाली असावी.

इंग्रजी आणि बहुविध विषयात बाळशास्त्र्यांनी नैपुण्य मिळविले असल्यामुळे इंग्रजी लोकापेक्षा आम्ही कमी नाही. त्यांच्याबरोबरीने आपणही ताठ मानेने वावरू शकतो. या सार्थ अभिमानापोटी लेखाच्या प्रारंभीच 'आम्ही' हा शब्द त्यांनी वारंवार वापरलेला दिसून येतो. उदा. 'आम्ही आशा करीत आहो कीं', 'म्हणोन आम्ही प्रार्थना करतों कीं', 'आम्हीं हा कागद वाचणारास कळवितों कीं' अशा स्वरूपाच्या वाक्यात 'आम्ही' या शब्दाचा जाणीवपूर्वक वापर बाळशास्त्र्यांनी केलेला आहे. तत्कालीन वाक्यशैलीचे खास नमुनेही मधून मधून पहायला मिळतात. ''आम्हास काही समजत नाही असे होईल'', ''हे पाहून आम्हास आश्चर्य वाटते'', ''हे

आमच्याने निश्चय सांगवत नाही'', ''हे आमच्याने अगदी मान्य करवत नाही'', ''आम्हास भरवसा वाटतो की'', ''यात आम्हास संशय वाटत नाही'', ''अगत्याप्रमाणे फेरफार करून'', '' असे वाटणे हे मुर्खत्व होय.'', ''आम्हास भरवसा वाटतो की फार अगत्य ठेवील अशी आमची खातर आहे.'' तसेच ''आमची खातर आहे की'', ''असे आम्ही इछितो'', ''आम्ही ऐकतो की'' अशा वाक्यांचा सर्रास वापर केलेला दिसून येतो. ही लेखनशैली तत्कालीन काळातील खास 'दर्पण'कारांची होती. शिवाय 'आश्चर्यकारक', 'चमत्कारीक', 'जाहिर खबर', 'परमाणगी' हे शब्दही पुनः पुनः येतात. 'दर्पण'मधील वाक्यरचना व्यामीश्र स्वरूपाची आहे. कधी कधी क्रियापदांची रूपे प्रथम येतात व कार्यकारणभाव नंतर सांगितला जातो. प्रदीर्घ वाक्यरचनेमुळे विचारात विसंगती निर्माण होते.

'दर्पण'मधील लेखनाचा अभ्यास करत असताना शब्दस्वरूप अभ्यासणेही लक्षणीय आहे. एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीला मराठी भाषेतील शब्दरूपे पुढीलप्रमाणे दिसून येतात. इथे > इथ, इंग्रज > इंग्रेस, सारखे > सारिखे, इच्छिता > इछितो, म्हणून > म्हणोन, त्यांनी > त्यांणि, असते > असत्ये, येथील > एथील, तऱ्हा > तहा, प्रसिद्धि > प्रसित्धि, करणाऱ्याने > करणाराने, ज्या > जा, कोणते > कोणत्ये, एका > एके, टाऊन हॉल > टौन हॉल, पैसे > पैका, करतात > करितात, रशियन > रूशियन, वाटण्यासाठी > वाटायासाठी, मानतात > मानितात, चौकशी > चवकशी, ज्याची > जांची, समृद्धि > समृत्धि, सेक्रटरी > सेक्रेतरी, चुका > चुक्या, धान्य > दाणा, भागीदारी > बाहेदारी.

'दर्पण'मध्ये नि(य)मित, (स)र्व, अ(शारी) तीचे, (प...प)त्राविषयी हा आरोप...पैमाश खात्याची... इत्यादी शब्द आणि त्यांची विशिष्ट रचना नेमकी कशासाठी केली होती हे स्पष्ट होत नाही. त्यातून नेमका अर्थबोधही होत नाही, की कोणतीही सूचकता प्रकट होत नाही. कदाचित त्या काळाची ती शैलीच असली पाहिजे.

याशिवाय ''यामुळें आम्हांस नि:संशय वाटतें की, सरकारने इच्छिल्याप्रमाणे घडोन येईल'', ''लोकांचे मनात येत असेल ते दूर करावे म्हणून लिहिले आहे.'' ''आम्ही आपले वाचणारांत प्रसिद्ध करण्यास चुकणार नाही.'' अशी खास वाक्येही 'दर्पण'मध्ये आढळतात. लेखनातील जी शब्दयोजना आहे तिचे अर्थ त्या काळात वेगळे होते. उदा. योग्यतेस येणे – प्रगती, कां कीं – कुणास ठाऊक, फेरफार – बदल, रीती – पद्धती, अशेच लक्ष्याने – या हेतूने.

आजच्या वृत्तपत्रसृष्टीत तळटीपा दिल्या जात नाहीत. परंतु बाळशास्त्र्यांनी एखाद्या ग्रंथासारख्या १, २ असे आकडे टाकून किंवा (*) अशी फूली टाकून मजकूराच्या खाली वाचकांना अर्थ लावण्यासाठी तळटीपा दिल्या आहेत. खरं म्हटलं तर 'दर्पण'चा अंक हा वाचकांच्या हातात हप्त्याहप्त्याने पडणारा ग्रंथच होता. म्हणूनच ग्रंथलेखनासारख्या तळटीपा वृत्तपत्रामध्ये जांभेकरांनी दिलेल्या आहेत.

'दर्पण'ची एकंदर शैली वरवर वाङ्मयासारखी वाटते. निवेदन ओजपूर्ण वाटत नाही. फारसे अलंकार, प्रतिमा नाहीत. इंग्रजी अंमलानंतर मराठी भाषेत इंग्रजी शब्दांची सरमिसळ झालेली होती. त्याची साक्ष म्हणजे 'दर्पण'. बाळशास्त्री जांभेकर आणि वासुदेव जनार्दनजी संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक असल्यामुळे काहीसे संस्कृत प्राचुर्यही आढळते.

'दर्पण'मधील लेखनामधून संपादक बाळशास्त्री जांभेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे घडणारे दर्शनही दिसून येते. शिक्षक, विचारवंत, पत्रकार, लेखक, समाजसुधारक असे व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलूही स्पष्ट होतात. कधी आदर्श पत्रकाराच्या भूमिकेतेतून नि:पक्षपाती व परखडपणे विचार मांडतात तर कधी शिक्षकाच्या भूमिकेतून प्रेमळ उपदेशही करतात. कधी विचारवंतांच्या भूमिकेतून तटस्थपणे राहून फक्त विचार ऐकवतात तर कधी देशाच्या कल्याणासाठी तळमळीने लिहितात. बाळशास्त्र्यांचा बहुश्रूतपणा, धीरगंभीरता, आणि विवेकवृत्ती पदोपदी जाणवते. प्रतिपक्षाबद्दल बोलत असताना शब्द अगदी जपून वापरतात. सरकारवर टीका करत असताना आक्रमक भाषेचा अगर शिवराळ शब्दांचा ते अजिबात वापर करीत नाहीत. बाळशास्त्र्यांच्या मृदू वाणीने सरकारलाही विचार करायला लावले आहे. कुणाशीही वैरत्व पत्करू नये अशीच त्यांची वृत्ती होती. नव्या काळाबद्दलची महत्त्वाकांक्षा, आपुलकी आणि एतद्देशीयांबद्दलची आत्मीयता यांचे प्रत्यंतर प्रत्येक लेखात दिसून येते. मोजक्या भाषेत अधिक अर्थ सांगण्याची पद्धती वाखाणण्यासारखी आहे. उदा. 'विद्या हे बळ आहे.''

'आज' संपला की शिळेपण आले, असा आजच्या दैनिकासारखा प्रकार 'दर्पण'मधील लेखनाचा नाही. तत्कालीन वाचक चार-सहा महिन्याची शिळी वृत्तपत्रेही आनंदाने वाचत असत. 'दर्पण'मध्ये ज्ञानदानाला अधिक महत्त्व असल्यामुळे एखाद्या ग्रंथासारखाच मजकूर 'दर्पण'मध्ये असे. त्यामुळे एक अंक अनेकाकडून कित्येक दिवस वाचला जाई.

'दर्पण'चा उद्देश असा एतद्देशीयांना ज्ञान करून देण्याचा होता तसा इंग्रज अधिकाऱ्यांना हिंदुस्थानच्या सर्वांगीण परिस्थितीचे आकलन करून देण्याचा होता. त्यासाठीच 'दर्पण'मध्ये एका बाजूला मराठी व एका बाजूला इंग्रजी मजकूर देण्यात येत असे. असंख्य इंग्रजी अधिकाऱ्यांना मराठी भाषा येत नसल्यामुळे त्यांना हिंदुस्थानातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय प्रश्नांची उकल करून द्यावी म्हणून इंग्रजीमधून लेखन केलेले आहे. इंग्रजी लेखन करत असताना सरकारचा हिंदुस्थानबद्दल सहानुभूतीचा दृष्टीकोन निर्माण व्हावा आणि सरकारकडून अधिकाधिक सवलती, सुखसोयी निर्माण करून घ्याव्यात अशाच पद्धतीने इंग्रजी लेखन झालेले आहे. बाळशास्त्र्यांना जनतेबरोबरच सरकारशी हातमिळवणी करून सुधारणा करायच्या होत्या. प्रसंगी इंग्रजी अधिकाऱ्यांच्यावर परखड टीका करून राज्यकारभारात सुसूत्रता निर्माण व्हावी या अनुषंगाने 'दर्पण'चे इंग्रजी लेखन झालेले आहे. यावरून बाळशास्त्र्यांचा 'दर्पण'मधील इंग्रजी व मराठी मजकूर देण्याचा मूळ उद्देश लक्षात येतो.

'दर्पण'मधील इंग्रजी भाषा जेवढी भारदस्त आणि संपन्न आहे तेवढी मराठी भाषा नाही. इंग्लंडमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि भौतिक बदल झाले असल्यामुळे तेथील इंग्रजी भाषेचा विकास झाला होता. विविध विषय त्या भाषेतून मांडणे शक्य व्हावे एवढी इंग्रजी भाषा प्रौढ होती. बाळशास्त्र्यांसारख्या विद्वान संपादकाचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होतेच त्यामुळे 'दर्पणा'तील इंग्रजी भाषा उत्तम असली तर नवल नाही. पण मराठी भाषेची स्थिती तशी नव्हती. मराठी गद्य नव्यानेच इंग्रजी सत्तेच्या स्थापनेनंतर आकाराला येत होते. 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' आकार घेत होता. नवनवीन विषय मराठीत प्रथमच मांडावे लागत होते. भारदस्त पाश्चात्य विद्या आपल्या अप्रौढ आणि असिद्ध मराठीतून मांडावी लागली. त्यावेळचे एकूणच मराठी गद्य लेखन पाहिले तर ते अगदीच मामुली असल्याचे आढळते. भाषांतरे करून नवे विषय व त्यासाठी नवी भाषा एक प्रकारे घडविली जात होती. त्यावेळच्या बहुतेक साऱ्याच लेखनाची भाषा ओबडधोबड आणि रटाळवाणी होती.

पाश्चात्यांच्या आगमनामुळे साऱ्या हिंदुस्थानच्या समाज जीवनात आमूलाग्र स्वरूपाचा बदल घडून आला. मराठी भाषीकांच्या जीवनात सुद्धा एक मन्वंतर घडून आले होते. सर्व क्षेत्रात नव्या गोष्टी मांडल्या जात होत्या. नव्या शिक्षणाचा परिचय

करून देण्याची ही प्राथमिक धडपड होती. त्यामुळे विविध विषय मराठीतून मांडले गेले, हेच भाग्याचे मानायला हवे. वृत्तपत्रीय लेखनच नव्हे तर सबंध 'वृत्तपत्र' हे अभूतपूर्व असे नवे साधन म्हणून उभे करावे लागले. वृत्तपत्रांचे लेखन तर घाईगर्दीचे असते आणि त्यातल्या त्यात सर्वसामान्य जनतेच्या वाचनासाठीच ते असते. यामुळे वृत्तपत्रातील भाषेबद्दल आजही आक्षेप घेण्यात येतात. 'दर्पणा'तील भाषेकडे या दृष्टीने पाहिले पाहिजे. कसे मांडले यापेक्षा काय मांडले हेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे 'दर्पण'चे महत्त्व यादृष्टीने नि:संशय महान आहे.

'दर्पण' नियतकालिकाचा वाङ्मयीन अभ्यास करत असताना व्याकरणदृष्ट्या दोष जरी त्यामध्ये असले तरी वैचारिकदृष्ट्या 'दर्पण'चे कार्य नि:संशय महान आहे. वरकरणी 'दर्पण'ची अभिव्यक्ती ओबडधोबड, रूक्ष असली तरी अंतरंग मात्र समृद्ध आहे. 'दर्पण'ने मराठी वाङ्मयामध्ये निबंध वाङ्मयाची पार्श्वभूमी घालून दिली. स्फूटलेख, अग्रलेख यांचा परिपाठ घालून दिला. मराठी भाषेला प्राथमिक अवस्थेमध्ये वळण लावण्याचा प्रयत्न केला. भौतिक विद्या, अनेकविध प्रश्न यांच्या निमित्ताने नवीन शब्दांची भर घातली. चौफेर विषयावर लेखन करून इतरांनाही बोलके, लिहिते केले. बदलत्या काळाबरोबर 'दर्पण'ने मराठी भाषेत बदल केलाच शिवाय नियतकालिक माध्यमाद्वारे इतरांनाही बदल करणेस भाग पाडले. 'दर्पण'च्या रूपाने नियतकालिक हा वाङ्मयाचा नवा प्रकार मराठीमध्ये अवतीर्ण झाला. त्या निमित्ताने भाषांतराचाही प्रयत्न सुरू झाला. इंग्रजी राज्याच्या आगमनाने महाराष्ट्रात जे स्थित्यंतर घडले त्याची एक महत्त्वाची सांस्कृतिक साक्ष म्हणजे 'दर्पण' होय.

इंग्रजी राज्य आल्यानंतरच महाराष्ट्रातील प्रबोधन युगाला प्रारंभ झाला. या वैचारिक जागृतीचा स्फुल्लिंग बाळशास्त्र्यांच्या 'दर्पण' मधील लेखनातून फुललेला दिसून येतो. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन बाबतीत काळाच्या पुढे पाहण्याची बाळशास्त्र्यांची दृष्टी होती, म्हणूनच त्यांनी या क्षेत्रात अविस्मरणीय कामगिरी केली. एतद्देशीयांच्या हरएक प्रगतीसाठी त्यांनी आपली लेखणी चालविली. जनतेला सूज्ञ करून देशाला प्रगतीपथावर नेण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच श्रेष्ठ आहे .बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्राला नव्हे तर हिंदुस्थानालाही प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न केला. एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या अवस्थेमध्ये बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण'मधील लेखनातून समाज जागृतीसंबंधी

मांडलेले विचार आणि समाजसुधारणेचे कार्य अनेक विचारवंतांना प्रेरक ठरले. एकंदरीत सर्वांगीण बाबींचा विचार केल्यास बाळशास्त्री जांभेकर आणि 'दर्पण' यांचे महत्त्व मोठे आहे हे मान्यच करावे लागते.

**समारोप**

बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी भाषेतील 'दर्पण' पत्र प्रथमत:च सुरू केले तेंव्हा मराठी मुलखातच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानमध्ये भौतिक जीवनाचा फारसा विचार झाला नव्हता. त्यावर परमार्थप्रवणतेची छाप होती. कृषी संस्कृतीचा प्रभाव असल्यामुळे दैववाद मोठ्या प्रमाणावर रुजला होता. अज्ञान, रूढी-परंपरा, धर्मकल्पना, अर्थजीवन, ग्रामव्यवस्था आणि सामाजिक व्यवहाराचे संकेत यावर दीर्घकालपर्यंत मध्ययुगीन संस्कृतीचेच वर्चस्व राहिले. इंग्रजांच्या आगमनामुळे त्यांच्या विज्ञाननिष्ठ जीवनदृष्टीमुळे इहवादी, भौतिक जीवन विकासाची जाणीव निर्माण होऊ लागली. फ्रान्सच्या राज्यक्रांतीतून समता, स्वातंत्र्य, बंधुता ही लोकशाहीची मूल्येही हळूहळू आली. जीवनाच्या आर्थिक, धार्मिक, सामाजिक बाबतीत स्वतंत्रपणे विचार सुरू झाले. ब्रिटीशांचा व्यापार, राजकारण, धर्मप्रसार, शिक्षण यामुळे भौतिक उन्नती आणि मानसिक परिवर्तन घडून येऊ लागले. ब्रिटीश लोकांचे पुढारीपण आणि आपले मागासलेपण लक्षात येऊ लागले. जीवन विकासाचे आणि सामाजिक उन्नतीचे महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण आहे ही जाणीव बळावू लागली.

बाळशास्त्र्यांचा जन्मच शिक्षणाचा पिढीजात वारसा असलेल्या सुसंस्कृत घराण्यात झाल्यामुळे त्यांना शिक्षणाचे बाळकडू लहानपणापासूनच मिळू लागले. लहान वयातच इतिहास, भूगोल, ज्योतिष, गणित, विज्ञान या विषयामध्ये प्राविण्य संपादन केले. संस्कृत आणि इंग्रजीबरोबर तेरा भाषा त्यांनी पारंगत केल्या. असामान्य धारणाशक्ती, व्यासंगी आणि बहुश्रूत व्यक्तिमत्त्व, प्रगल्भ बुद्धिमत्ता या गुणामुळेच एकापेक्षा अनेक पदे त्यांनी भूषविली. इंग्रज अधिकाऱ्यांच्या अंत:करणातील मानाचे स्थानही त्यांनी पटकविले. एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी त्यांनी शैक्षणिक आणि सामाजिक बाबतीत केलेली कामगिरी अविस्मरणीय आहे. अध्यापक वर्गाची स्थापना, मुलांचे वसतीगृह, स्त्री-शिक्षणाचा प्रयत्न, एतद्देशीयांना शिक्षणाभिमुख करण्यासाठी दिलेले उत्तेजन, सहकाऱ्यांना ग्रंथ लेखनास केलेली मदत, सरकारला शिक्षणकामी केलेले

सहकार्य अशी अष्टपैलू कामगिरी बाळशास्त्र्यांनी बजावली. त्यांच्या ग्रंथरचनेकडे दृष्टीक्षेप टाकल्यास त्यांच्या बुद्धिमत्तेची कल्पना तर येतेच शिवाय त्यांची लोकोपकारक जीवननिष्ठाही प्रत्ययाला येते.

बाळशास्त्र्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष म्हणजे त्यांनी सनातनी आणि सुधारक, विद्वान आणि अज्ञानी, सरकार आणि जनता या सर्वांना बरोबर घेऊन सामाजिक सुधारणेचे जटील कार्य केले. ज्ञानप्रसारासाठी आणि 'एतद्देशीयांना योग्यतेस आणण्यासाठी 'दर्पण' या मराठी वृत्तपत्राची प्रथमत:च निर्मिती केली. 'विद्या हे बळ आहे' असे सांगून आपले मागासलेपण आणि पाश्चात्यांचे पुढारलेपण लोकांच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला. पाश्चात्य राष्ट्रात घडणाऱ्या घडामोडी, बदलते लोकजीवन, विज्ञानात झालेली प्रगती यांची जाणीव करून दिली. सामाजिक वैगुण्यावर परखड विचार व्यक्त करून लोकांना शिक्षणाभिमुख करण्याचा महत्त्वाचा प्रयत्न केला. धर्माबाबतीत उदार आणि व्यापक विचार व्यक्त करून पाश्चात्य संकट हे राजकीय अथवा लष्करी उपायांनी उखडून टाकता येणार नाही तेव्हा पाश्चात्य संस्कृती तिच्या शासकीय अंगोपांगासहीत आपण जाणून घेतली पाहिजे असे त्यांनी सांगितले. त्यासाठी नव्या गोष्टीचा अंगीकार करा आणि ब्रिटीशाप्रमाणे आपण आपल्या देशाला प्रगतीपथावर नेऊ शकू असा ठाम विश्वास जनतेमध्ये रुजविण्याचा प्रयत्न केला. बाळशास्त्री हे प्रबोधनाचे खंदे पुरस्कर्ते होते. समाजात अभयता, अस्मिता, स्वाभिमान आणि स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म याविषयी प्रेम, आपुलकी निर्माण करण्याच्या दृष्टीने बाळशास्त्र्यांनी केलेले कार्य अजोड आहे. सुधारणावादी जीवनदृष्टी, आणि दूरदर्शीपणा लाभलेला प्रज्ञावंत सुधारक, विधायक बाण्याचा पत्रकार, मुरब्बी राजकीय विचारवंत, बहुश्रूत लेखक म्हणून त्यांचा यथार्थ गौरव केला जातो.

मराठी भाषेमध्ये 'दर्पण' हे पहिलेच वृत्तपत्र असून सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक बाबतीत 'दर्पण'ने केलेले कार्य नि:संशय महान आहे. 'दर्पण'मध्ये लोकांच्या मनोरंजनाबरोबरच ज्ञानदानाला महत्त्व दिलेले आहे. लोकांच्यामधील न्यूनगंड नाहिसा करून आत्मविश्वास वाढविणे, त्यांना जागृत करणे, धर्म, रूढी,परंपरा घातक कशा आहेत हे सांगणे थोर व्यक्तींचे विचार, आदर्श आणि कार्य जनतेसमोर मांडून लोकांना उद्युक्त करणे, वाचकांच्या पत्रांना स्थान देऊन त्यांना बोलके करणे, इंग्रजांच्या राज्यकारभारातील चुका दाखविणे, सुधारणांचे उपाय

सुचविणे व सरकारकडून जास्तीत जास्त कार्याची अपेक्षा बाळगणे अशा सर्वांगीण बाबतीत 'दर्पण'ने थोर कार्य केले. अपुऱ्या सोयी, अपुरा पैसा, बातमी मिळण्याची साधने अत्यल्प अशा संकटावर मात करून वाचकांना कमी वर्गणीत अंक दिला. पत्राच्या पाठीमागे नफ्याचा कोणताही दृष्टीकोन न ठेवता आणि स्वत: मोबदला न घेता अगदी नि:स्वार्थीपणे 'दर्पण'चे कार्य पार पाडले.

बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रातील आद्य सुधारक म्हटले पाहिजेत. काळाच्या पुढे पाहण्याची त्यांची दृष्टी होती. त्यांनी अल्प आयुमर्यादेत सतत नव्या गोष्टींचा अंगीकार केला. जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी 'दर्पण'ची निर्मिती केली. प्रथम पाक्षिक आणि नंतर साप्ताहिक असे त्याचे स्वरूप होते. 'दर्पण'चा एकूण कालखंड जरी कमी असला तरी काळाच्या संदर्भात त्याचे सामाजिक कार्य मोलाचे आहे. शिक्षण, धर्मांतर, जातीयता, ब्रिटीश राज्यकारभार याविषयी लेखन केले आणि सत्यस्वरूप समाजाला दाखवून दिले. गुजराथी, पारशी, इंग्रजी वृत्तपत्रांच्या तुलनेत 'दर्पण'चे सामाजिक कार्य अधिक मोलाचे आहे. निर्भीडता, परखडपणा, प्रामाणिक मते, दूरदृष्टीपणा, लेखाभिमान, स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म याविषयी लिखानातून दिसून येणारी आपुलकीची भावना या वैशिष्ट्यांमुळेच 'दर्पण' श्रेष्ठ ठरते.

'दर्पण'कारांच्या ठिकाणी राष्ट्रीय विचारांची ठोस बैठक होती. हिंदुस्थानातील 'चले जाव' चळवळीचे पुरस्कर्ते आणि द्रष्टे विचारवंत म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे. त्या काळात एवढ्या प्रगल्भ विचाराचा आणि कर्तृत्वाचा महान पुरुष महाराष्ट्राला लाभावा हे महाराष्ट्राचे भाग्य नव्हे काय ?

वाङ्मयीन बाबतीत विचार केल्यास मराठी भाषेला सुष्ट आणि बांधेसूद बनविण्याचा प्रयत्न केला. विज्ञानातील संज्ञांना परिभाषा योजून नवीन शब्दांची भर घातली. इंग्रजी भाषेमधून आलेले निबंध, स्फूट, प्रासंगिक लेखनाचे प्रकार मराठीत आणून निबंध आणि अग्रलेख व स्फूटलेखांची पायाभरणी केली. वृत्तपत्र कसे असावे याचा मराठी भाषिकांना धडा घालून दिला. ग्रंथांची परिक्षणे कशी करावीत, सडेतोड विचार कसे व्यक्त करावेत याचा पाठपुरावा एतद्देशीयांना घालून दिला. इंग्रजी, संस्कृत, पारशी, गुजराथी यासारख्या अन्य भाषेद्वारे मराठी भाषेचा विकास केला. एकंदरीत 'दर्पण'चे सामाजिक, धार्मिक, राजकीय बाबींबरोबरच वाङ्मयीन कार्यही

नि:संशय महान आहे. 'दर्पण'च्या रूपाने नियतकालिक वाङ्मय हा वाङ्मयाचा नवा प्रकार मराठीमध्ये रूढ केला. त्यानिमित्ताने भाषांतराचाही प्रयत्न सुरू झाला. इंग्रजी राज्याच्या आगमनाने महाराष्ट्रात जे स्थित्यंतरे घडले त्याची एक महत्त्वाची सांस्कृतिक साक्ष म्हणजे 'दर्पण' होय.

बाळशास्त्र्यांचे आदर्शभूत चारित्र्य, अथांग ज्ञानलालसा, स्वदेशोन्नतीची आत्यंतिक कळकळ, समाजोद्धाराची विशाल दृष्टी, असामान्य विद्वत्ता 'दर्पण'चा अभ्यास करत असताना दिसून आल्यावाचून राहत नाही. बाळशास्त्र्यांसारखा विधायक बाण्याचा पत्रकार, विद्वान विचारवंत, स्वदेशोन्नतीची अत्यंत तळमळ असणारा संपादक लाभावा हेच 'दर्पण'चे महत्त्वाचे वैशिष्ट्य. मराठीतील पहिले वृत्तपत्र असूनही आणि अत्यंत अल्पकाळ टिकूनही 'दर्पण'ने सामाजिक आणि वाङ्मयीनदृष्ट्या मोलाचे कार्य केले यात वादच नाही.

***

# संदर्भ ग्रंथ सूची


१. अत्रे, प्रल्हाद केशव
**मराठी माणसे मराठी मते,**
तृ. आ., गं. पा. परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई – ४

२. कऱ्हाडे, स. दा.
**अर्वाचीन मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी,**
(इ. स. १८१८ ते १९४७), प्र. आ.,
लोकवाङ्मय गृह, मुंबई. १९८१.

३. कानडे, रा. गो.
**मराठी नियतकालिकांचा इतिहास,**
१८३२–१९३७, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस,
मुंबई – २, १९३८.

४. कुलकर्णी, कृ. भी.
**आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती,**
मुंबई. १९५६.

५. कुलकर्णी, वा. ल.
**मराठी ज्ञानप्रसारक इतिहास व वाङ्मयविचार,**
ग. ए. भटकल, पॉप्युलर प्रकाशन,
मुंबई. १९५५.

६. खानोलकर, गं. दे.
**अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक,**
खंड १ ते ४, व्हिनस प्रकाशन,
पुणे, १९६६.

७. खानोलकर, गं. दे.
**एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र,**
साहित्य सहकार संघ,
औरंगाबाद, १९७५.

८. चिपळूणकर कृष्णशास्त्री
**अनेक विद्या मूलतत्त्वसंग्रह,**
मुंबई १९६१
९. जांभेकर, ग. गं. (सं.)
**आचार्य बाळशास्त्री जांभेकर : जीवनवृत्तांत व लेखसंग्रह,**
खंड १ ते ३, लोकशिक्षण
पुणे, १९५०.
१०. जोग, रा. श्री.,
**मराठी वाङ्मयाचा इतिहास,**
खंड ४, द्वि. आ., महाराष्ट्र साहित्य परिषद,
पुणे ३०, १९७३.
११. जोशी, ना. वी.
**पुणे शहराचे वर्णन,**
संपा. गं. दे. खानोलकर, द्वि. आ.,
साहित्य सहकार संघ, मुंबई, १९७१.
१२. जोशी, वि. कृ. व सहस्त्रबुद्धे श्री. म.
**दर्पण संग्रह,**
शं. वा. कुलकर्णी, महाराष्ट्र ग्रंथ भांडार,
मुंबई, १९४६.
१३. नसिराबादकर, ल. रा.
**आचार्य अत्रे : साहित्यदर्शन,**
फडके बुक सेलर्स, कोल्हापूर २, १९७६.
१४. पंडित, भवानी शंकर
**महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे आणि त्यांचा साहित्यावर व संस्कृतीवर झालेला परिणाम,**
पुणे विद्यापीठ, पुणे ७, १९६८.
१५. पोतदार, द. वा.
**मराठी गद्याचा इंग्रजी अवतार,**
तृ. आ. व्हिनस प्रकाशन, पुणे ३०, १९७६.

१६. प्रियोळकर, अ. का.
**रा. ब. दादोबा पांडुरंग आत्मचरित्र - चरित्र,**
केशव भिकाजी ढवळे, श्री समर्थ सदन,
मुंबई - ४, १९५७.

१७. पवार, सुधारक पुंडलीक
**वृत्तपत्र व्यवसाय काल आणि आज,**
(पत्रकारितेवरील लेखांचा संग्रह),
प्रमोद पद्माकर पवार,
नाशिक, १९८६.

१८. पवार, सुधाकर पुंडलीक
**वृत्तपत्र व्यवसायाकडे वाटचाल,**
जयश्री प्रकाशन,
नाशिक, १९६८.

१९. माडगांवकर, गो. ना.
**मुंबईचे वर्णन,**
संपा. न. र. फाटक, द्वि. आ.,
इतिहास संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय,
मुंबई - २, १९६१.

२०. मांडखोलकर, ग. त्र्यं.
**आधुनिक महाराष्ट्राचा वारसा,**
विजय प्रकाशन,
सीताबर्डी, नागपूर - १२.

२१. मालशे, स. गं.
**गतशतक शोधिताना,**
प्रतिभा, पुणे, १९८९.

२२. रानडे, गोविंद मो.
**महाराष्ट्रातील समाजविचार,**
(इ. स. १८१८ ते १८७८),
सुविचार, नागपूर, १९७१.

२३. लेले, रा. के.
**मराठी वृत्तपत्रांचा इतिहास,**
अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
पुणे ३०, १९८४.

२४. वाळिंबे, रा. शं.
**एकोणिसाव्या शतकातील सामाजिक पुनर्घटना,**
भाग १, १८०० ते १८८५,
पुणे, १९६२.

२५. शिंदे, प्रा. कृ.
**मराठी वृत्तपत्रव्यवसाय इतिहास व शास्त्र, १८१८ ते १९७६,**
त्रिदल प्रकाशन, प्रार्थना समाज,
गिरगांव, मुंबई - ४.

२६. शेजवलकर, त्र्यंपक शंकर
**शेजवलकरांचे लेख, भाग २ रा,**
ह. वि. मोटे, मुंबई, १९५९.

२७. सरदार, गं. बा.
**आधुनिक मराठी गद्याची पूर्वपिठीका,**
द्वि. आ., १९५६.

२८. सरदार, गं. बा.
**महाराष्ट्रातील उपेक्षित मानकरी,**
द्वि. आ., द. रा. कानेकर,
सुनंदा प्रकाशन, १९५१.

***

# संदर्भ नियतकालिक सूची

१. कर्नाटकी, श्री. ना.
**प्रोफेसर बाळशास्त्री जांभेकर,**
मनोरंजन, ३९ पु १, १९३३ : ६९-७९.

२. जांभेकर, रामकृष्णभाई
**बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर,**
ज्ञानमित्र, ६-८ (४-५), ९ मे १९१२ : ११७-२०.

३. जांभेकर, रा. शं.
**कै. बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर,**
लोकमित्र, १८-१२ जू. १९०९ : ३०५-३१८.
मुंबई - २, १९३८.

४. प्रियोळकर, अ. का.
**'चले जाव' चळवळीचे द्रष्टे कै. बाळशास्त्री जांभेकर,**
मनोहर, १३-१४९, जू. १९४६ : २६१-६७.

५. मिश्र, प्यारेलालजी
**विलायती वर्तमानपत्राचा इतिहास,**
(मुळ हिंदी लेखाधारे) आनु. रामचंद्र हायग्रीव मनुरकर,
लोकशिक्षण - ओक ३-२, काश १८३६ : ५२-५६,
३-३ मा श १८३६ : ९४-९७.

६. शेजवलकर, त्र्यं. श.
**आचार्य बाळशास्त्री जांभेकर,**
(ग. गं. जाभेकर यांच्या ग्रंथाचे परिक्षण)
नवभारत, मे १९५१.

७. नवलकर, हरिश्चंद्र नारायण
**देशी वर्तमानपत्रे,**
दक्षिणाप्राईज कमिटीने पसंद ठरवून दिलेला निबंध.

८. पौंडवाल, वसंत पुरुषोत्तम
**वर्तमानपत्रे त्यांचा इतिहास व त्यांचे कार्य,**
प्रकाशन व मुद्रक दत्तात्रय गोविंद सडेकर,
धनंजय प्रेस, बेळगांव,
लोकमित्रातून प्रसिद्ध झालेला निबंध.

९. **जुनी मराठी वृत्तपत्रे,**
(धुळे पत्रकार परिषद प्रदर्शनातील जुन्या वृत्तपत्रांची यादी)
१२-१२ मार्च १९४७ : ६३४, ६६१-६४.

१०. **वृत्तपत्रे आणि स्वातंत्र्य,**
ध्रुव, फेब्रुवारी १९४७ : ५५८-९३.

११. **वर्तमानपत्रे,**
समाजजीवन, २-४ का श १८६३ : १५०-५५.

***

# महाराष्ट्राचे आद्य ज्ञानमहर्षी : बाळशास्त्री जांभेकर

## प्रस्तावना

भारतामध्ये इंग्रज सत्ता स्थिरस्थावर झाल्यावर एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दोनचार दशकात स्वकर्तृत्वाने अल्पावधीत लौकीक प्राप्त करणाऱ्या व्यक्तिमध्ये बाळशास्त्री जांभेकर हे अग्रणी होते. कुशाग्र बुध्दिमत्ता, अष्टपैलू पांडित्य, ज्ञानलालसा, राष्ट्रोद्धाराची दृष्टी, स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान याबरोबरच आदर्शभूत चारित्र्य आणि सार्वजनिक कार्याची तळमळ या गुणांच्या बळावरच महाराष्ट्रामध्ये सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीचा पाया घालणारे बाळशास्त्री हे पहिले पुरुष होत. शिक्षण, धर्म, अर्थ, राजकारण, समाजसुधारणा, स्त्री शिक्षण, जातियता शिवाय साहित्य, भाषा, विज्ञान या सर्व विषयांना प्रथम हात घालण्याचे, या समस्यांची चर्चा व मन्वंतरे घडवून आणण्याचे व ते आपल्या परिने सोडवण्याचे कार्य बाळशास्त्र्यांनी केले. म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे आद्य ज्ञानमहर्षी, आद्य पत्रकार, आद्य समाजसुधारक म्हटले जाते. एवढेच नव्हे तर त्यांना 'पश्चिम भारताचे युगप्रवर्तक' आणि 'आधुनिक महाराष्ट्राचे जनक' म्हटले तर चुकीचे ठरु नये. अवघ्या चौतीस वर्षाच्या अत्यल्प आयुमर्यादेत उतुंग कार्य केलेल्या या महान पुरुषाची जीवनगाथा थक्क करुन टाकणारी आहे.

## वेदशास्त्रसंपन्न घराण्यात जन्म

रत्नागिरी जिल्ह्यात खारेपाटणनजिक पोंभुर्ले म्हणून तत्कालीन बावडा संस्थानाच्या अंमलाखालील एक गांव आहे. तेथे जांभेकर यांचे घराणे पूर्वीपासूनच मोठे मान्यवर विद्याचारसंपन्न होऊन गेले. त्या घराण्यातील बहुतेक मंडळी वैदिक, याज्ञिक, पुराणिक, शास्त्री म्हणून प्रसिद्ध होती. या मंडळींनी 'वेदमुर्ती', 'वेदशास्त्रसंपन्न' या तत्कालिन पदव्याही संपादन केल्या होत्या. त्या घराण्यामध्ये स्त्रियाही शिकलेल्या होत्या आणि त्याही पुराण सांगत असत. अशा वेदशास्त्रसंपन्न घराण्यात गंगाधरशास्त्री आणि सगुणाबाई यांच्या पोटी बाळशास्त्री जांभेकरांचा जन्म झाला. घराण्यातील

मंडळी शिकलेली असूनही त्यांच्या जन्माची नोंद कुठेही आढळत नाही. बाळशास्त्र्यांनीही ती कुठे लिहून ठेवली नाही. 'दर्पणसंग्रह' (१९४६) या ग्रंथात वि. कृ. जोशी व श्री. म. सहस्त्रबुध्दे यांनी आणि 'मराठी वृत्तपत्र व्यवसाय इतिहास व शास्त्र' (१९७७) मा. कृ. शिंदे यांनी इ. स. १८१० साल दिले आहे. 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर जीवनवृत्तांत व लेखसंग्रह'(१९५०) ग्रंथात ग. गं. जांभेकर यांनी इ.स. १८१२ ची नोंद केली आहे. दि बॉंबे टाईम्स अँड जनरल ऑफ कॉमर्सच्या २० मे १८४६ च्या अंकात १८१० ची नोंद आढळते.

### शिक्षणप्रवास : पोंभुर्ले ते मुंबई

त्याकाळी पोंभुर्ल्यास शाळेची सोय नसल्यामुळे बाळशास्त्र्यांचे प्राथमिक शिक्षण वडिलांच्या सानिध्यात घरगुती पद्धतीनेच झाले. लहानपणीच बालबोध व मोडी लेखन-वाचन, व्यावहारिक अंकगणित, तोंडचे हिशेब, रामदास, तुकाराम, वामन, मोरोपंतादी प्रसिद्ध मराठी कवींच्या निवडक कविता, रामायण, महाभारत व पौराणिक कथा, बखरी यांचा अभ्यास झाला होता. आठव्या वर्षी व्रतबंध होताच त्यांनी प्रसिद्ध संस्कृत स्तोत्रपाठ घेतले होते. वयाच्या बाराव्या वर्षी अमरकोश, लघुकौमुदी, पंचमहाकाव्यासारखे संस्कृत ग्रंथांचे अध्ययन झाले होते. न्यायशास्त्र व व्याकरणशास्त्र यामध्ये तर त्यांनी चांगलीच प्रगती केली होती.

इ.स. १८१८ साली पेशवाईचा अस्त झाल्यानंतर साऱ्या भारतावर ब्रिटीशांचा एकछत्री अंमल सुरू झाला. नव्या राजवटीस नोकरवर्ग तयार करण्यासाठी २१ ऑगष्ट, १८२२ रोजी मुंबईचा गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याने 'दि बॉंबे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी' नावाची संस्था स्थापन केली. इंग्रजी वळणाच्या चार शाळा सुरू केल्या. छापखाना घालून पुस्तके छापली. शाळेची देखभाल करण्यासाठी त्यावेळचे विद्वान गृहस्थ सदाशिव काशिनाथ छत्रे व जगन्नाथशास्त्री क्रमवंत या दोघांची नेमणूक करण्यात आली. त्यावेळी इंग्रजी शाळेत आपली मुले पाठविण्याचे पालकांना धैर्य होत नसे. शाळेत गेलेली मुले फसविली जाऊन कदाचित बाटतील अशी भिती चालकांना वाटत होती. शिक्षणप्रसाराच्या कामात ही मोठीच अडचण होती. पण छत्रे आणि क्रमवंत यांनी लोकांना शहाणे करुन त्यांचे शिकवण्याकडे मन वळवले. शिवाय त्यांनी बाहेर गावाहून ओळखीच्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी मुंबईत आणले. त्यात बाळशास्त्री जांभेकरही होते. बाळशास्त्र्यांचे वडील गंगाधरशास्त्री

व बापूछत्रे यांचे हितसंबंध असल्यामुळे आणि छत्रेंनी रामचंद्रशास्त्री जानवेकर या गंगाधरशास्त्रींच्या जावयांची शाळा तपासणीस म्हणून नेमणूक केली. त्यामुळे बाळशास्त्रींची बहिणीकडे राहण्याची आयती सोयही झाली.

**बाळशास्त्र्यांची असामान्य धारणशक्ती**

बाळशास्त्री यांची त्यावेळची एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. इ.स. १८२४ च्या सुमारास ते प्रथम मुंबईत आले तेंव्हा ते एका रस्त्यावर उभे असताना दोघा शिपायांची मारामारी झाली. त्यासंबंधीची कोर्टात फिर्याद दाखल झाली. त्याविषयी झालेल्या चौकशीत लहान बाळशास्त्र्यांची साक्ष झाली. त्यावेळी त्यांना इंग्रजीचा गंधदेखील नव्हता. तरीही दोन गोऱ्या शिपायांची इंग्रजीत झालेली बाचाबाची त्यांनी अगदी बरोबर सांगितली. बाळशास्त्र्यांचे बोलणे ऐकून न्यायाधिश थक्क झालेत. बाळशास्त्र्यांच्या स्मरणशक्तीबद्दल आणि बुद्धिमत्तेबद्दल त्यांना भारी कौतुक वाटले. त्यांनी ताबडतोब शिक्षणखात्यातील मुख्य अधिकाऱ्याकडे शिक्षणासाठी शिफारस केली. याप्रमाणे बाळशास्त्र्यांचा इंग्रजी शिक्षणाचा योग जुळून आला.

**बहुभाषात बहुज्ञानशाखात अग्रगण्य**

बाळशास्त्री जांभेकरांना १८२६ मध्ये एकदम सोसायटीच्या शाळेत प्रवेश मिळाला. त्यावेळी जेमतेम ५० विद्यार्थी होते. रॉबर्ट मर्फी नावाचा हुषार आयरिश लष्करी तरुण त्या शाळेचा मुख्याध्यापक होता. या शाळेत मुख्य भर इंग्रजीवर दिला जायचा. इतिहास, भूगोल व शास्त्रज्ञान यांचा थोडाबहुत परिचय होत असे. बाळशास्त्री जात्याच बुद्धिमान व उद्योगी असल्याने सर्व विद्यार्थ्यांत ते अग्रगण्य असत. शिक्षकांचा तर त्यांच्यावर भारी लोभ असे. विद्यार्थी दशेतच ते गणिताचे अध्यापक म्हणून महिना १५ रुपयावर काम करु लागले.

अवघ्या चारच वर्षात बाळशास्त्र्यांचे इंग्रजी शिक्षण संपले. परंतु एवढ्या अल्पावधीतच त्यांनी कितीतरी विषय आत्मसात केले. भाषाज्ञान, गणित, इतिहास, भूगोल यात त्यांनी चांगलेच प्राविण्य मिळविले. आताच्या एखाद्या पदवीधरासदेखील भूषणास्पद होईल इतकी भाषाज्ञानात व इतिहासात त्यांनी प्रगती केली होती. पदार्थविज्ञान, ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र, भू-गर्भशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी आवडत्या विषयांचे क्लिष्ट ग्रंथ वाचूनही त्यामध्ये त्यांनी विशेष यशस्विता संपादन केली.

मराठी, संस्कृत, मोडी व इंग्रजी या भाषांचे तर त्यांचे अध्ययन चांगले होतेच. शिवाय त्यांनी गुजराथी, बंगाली व पारशी भाषांचे ज्ञानही आत्मसात केले होते. वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी बाळशास्त्रींनी सोसायटीचे सेक्रेटरी जर्व्हिस यांच्याकडे नोकरीसाठी फडर्या इंग्रजीमध्ये सुरेख अर्ज केला. त्या अर्जावरुन त्यांना १३ भाषा अवगत होत्या हे दिसून येते.

### नेटिव्ह सेक्रेटरी : मोठी जबाबदारी

बाळशास्त्री अल्पवयीन असल्यामुळे मार्च १८३० पासून रॉबर्ट कॉटनमनी यांनी 'डेप्युटी नेटिव्ह सेक्रेटरी' म्हणून त्यांची दरमहा ५० रु. पगारावर नेमणूक केली. परंतु बाळशास्त्र्यांची कार्यप्रवणता, बौद्धिक सामर्थ्य, आणि शिक्षणविषयक तळमळ–धडपड अनुभवास येताच मार्च १८३२ पासून त्यांना एकदम १००रु. दरमहा पगारावर बापू छत्र्यांच्या जागी पूर्णांषाने 'नेटिव्ह सेक्रेटरी' म्हणून नेमण्यात आले. त्यावेळी १००रु. मासिक वेतन म्हणजे पोक्त वयाच्या एतद्देशीय गृहस्थासही ही मोठीच गोष्ट होती. या शिक्षणसंस्थेत तत्कालीन मुंबईतील अत्युच्च युरोपीयन अधिकारी, निष्णात प्रोफेसर, सर्वश्रेष्ठ पारशी, हिंदू व मुसलमान प्रतिष्ठितांचा समावेश असे. ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे विशीच्याही पूर्वी बाळशास्त्रींना त्यावेळी केवढी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती हे समजते. अध्यापन करत त्यांनी ही जबाबदारी सांभाळली. शिवाय त्यांना भाषांतर समितीच्या उद्योगाकडेही लक्ष द्यावे लागे. जर्व्हिस साहेबांनी 'A Trealise on the objects, advantages and pleasure of knowledge'- by Lord Broughum हया पुस्तकाचे 'विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष' या नावाने भाषांतर करुन १८२९ मध्ये ते छापून काढले. त्यावेळी बाळशास्त्र्यांनी या उपक्रमास मोठा हातभार लावला होता. विद्येचे महत्त्व पटवून देत असताना ते म्हणतात, '' आपल्या जुन्या ज्ञानाचा मुख्य हेतू परमार्थसाधन होता, तर पाश्चात्यांच्या ज्ञानाचा मुख्य हेतू इहलोकीची सेवा आहे. विद्या ही श्रीमंतास भूषण, गरिबास पोटाचे साधन, तरुणास उत्तम उद्योग, वृद्धास विश्रांती आणि सर्वास मोक्षप्राप्तीचा उपाय आहे''.[१]

### अक्कलकोटच्या युवराजाचे शिक्षक

अक्कलकोटचे भोसले हे सातारकर छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचे मांडलिक असून राजपुत्र शहाजी भोसले यांना चांगले शिक्षण देण्याकरिता त्यांनी मुंबई सरकारकडे

एका हुशार माणसाची मागणी केली. असा बुद्धिमान मनुष्य मिळणे त्याकाळी कठीण असल्यामुळे साहजिकच बाळशास्त्रींची दरमहा रु.१२० वर नेमणूक करण्यात आली. परंतु मूळ पदावर येण्याचा हक्क राखूनच १३ डिसेंबर १८३२ रोजी साताऱ्यास श्रीमंत प्रतापसिंहाच्या पदरी त्यांनी नोकरी पत्करली. त्यावेळी दरबाराचे रेसिडेंट कर्नल लॉर्डविक यांनी बाळशास्त्र्यांना श्रीमंतांच्या समक्ष जी स्वकर्तव्याची जाणीव करुन दिली त्याची नोंद महाराजांच्या खास रोजनिशीत पुढीलप्रमाणे केलेली आढळते. ''रेसिडेंटांनी सरकार समक्ष त्यास सांगितले की तुम्ही अक्कलकोटी शहाजीस फक्त विद्याभ्यास सिकवावा. बाकी राजकारणात पडू नये. व तेथील लोक वाईट आहेत. त्यांचे ऐकून इकडील तिकडे व तिकडील इकडे असे काही करु नये व शहाजीस सिकवून त्याचे चित्त फीसीदी लोकाकडे लागू नये आसे करावे''[२].

इंग्रजी अधिकाऱ्यांचा एतद्देशीयांच्या शिक्षणाबाबतचा धूर्तपणा इथे स्पष्ट होतो. बाळशास्त्र्यांचा जातीस्वभाव कोणतेही कार्य अतिशय दक्षतेने करण्याचा असल्यामुळे युवराज शिक्षकाचे मुख्य कर्तव्य त्यांनी समाधानकारक बजावले.

### एल्फिन्स्टन कॉलेजात असिस्टंट प्रोफेसर ते ॲक्टिंग प्रोफेसर

सन १८२७ मध्ये माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन सेवानिवृत्त होऊन मायदेशी गेले. त्यावेळी त्यांच्या नावाने अडीच लाख रुपयांचा फंड जमा करुन मुंबईत एल्फिन्स्टन कॉलेजची स्थापना करुन उच्च शिक्षणाची सोय केली. त्यासाठी इंग्लंडमधून विद्वान प्राध्यापकांना पाचारण करण्यात आले. प्रो. आर्लेबार गणित व प्रो. जॉन हार्कनेस् इंग्रजी वाङ्मय व तत्वज्ञानाचे प्रोफेसर म्हणून रुजू झाले. त्यांच्या मदतीला शिष्यवृत्या देऊन असिस्टंट प्रोफेसर नेमायचे होते. परंतु असे विद्यार्थी मिळणे दुरापास्त होते. बाळशास्त्र्यांची पहिले असिस्टंट प्रोफेसर म्हणून नेमणूक करण्यात आली. यापूर्वी एतद्देशीयांस हा मान मिळालेला नव्हता. बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रामधील पहिले प्रोफेसर होत. त्यावेळी त्यांनी पुरी विशीही ओलांडलेली नव्हती. इतक्या लहान वयात एवढ्या मोठ्या जबाबदारीच्या पदावर त्या जुन्या काळात एका एतद्देशीय माणसाची नेमणूक झाल्याचे हे एकमेव उदाहरण सापडेल. युरोपियन विद्वान प्राध्यापकांच्या सहवासात राहून गणित, ज्योतिषशास्त्र यांच्या दृढ व्यासंगाने बाळशास्त्र्यांनी आपली योग्यता वाढवली. ज्युनिअर कॉलेजच्या प्रमुखपदी त्यांची नेमणूक करण्यात आली.

जांभेकरांच्या अंगी अष्टपैलू विद्वत्व असल्यामुळे वाङ्मय व विज्ञान शाखेबरोबरच विविध विषय शिकविण्यात ते निष्णात होते. युरोपियन बुद्धिमान प्राध्यापकांसमवेत त्यांनी हे कार्य केले. त्यांचे उणेपण कुणालाही दिसून आले नाही. प्रो. आर्लेबार रजेवर गेले असता त्यांच्या जागी ॲक्टिंग प्रोफेसर' म्हणून दोन वर्षे काम पाहिले. अध्यापकाचे काम करत असता कुलाबा येथील वेधशाळेचे चालकत्वही जांभेकरांनी सांभाळले.

**ज्ञानोपासक बाळशास्त्री जांभेकर**

मुंबई बाहेरील जिल्ह्यातून सरकारी मराठी व इंग्रजी शाळांचा कारभार पाहण्यासाठी एल्फिन्स्टन कॉलेजातील प्राध्यापकांना जावे लागे. जांभेकरांनी हे काम अगदी मनापासून केले. आजच्यासारखी दळणवळणाची साधने त्यावेळी नसल्याने विजापूर, धारवाड, बेळगाव, रत्नागिरीसारख्या दुर्गम परिसरात पायी प्रवास करीत हे काम त्यांनी चार वर्षे केले. शिक्षणप्रसार म्हणजे राष्ट्र उभारणीचा पाया आहे, ही त्यांची धारणा होती. जांभेकरांच्या प्रगल्भ बुद्धिमत्तेची आणि अथांग ज्ञानलालसेची छाप इंग्रजांवर पडलेली होती. त्यांचा प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, धडपड-तळमळ यामुळे जांभेकर इंग्रजी अधिकाऱ्यांच्या मनातील आदराचे स्थान होऊन बसले होते. म्हणूनच तर बाळशास्त्र्यांच्या म्हणण्यानुसार बोर्ड ऑफ एज्युकेशनने १८८५ साली 'अभ्यास वर्ग' काढण्याचे ठरविले. भारतातील हे पहिले Teachers Training Centre होते. चांगले शिक्षण देण्यासाठी चांगले शिक्षक निर्माण करणे गरजेचे आहे, अशी बाळशास्त्र्यांची भूमिका होती. अध्यापक वर्गाची स्थापना करताना १८४४ च्या इतिवृत्तात बोर्डाने काढलेले उद्‌गार बाळशास्त्र्यांचा सार्थ गौरव करणारे आहेत. ते म्हणतात, ''आम्ही संकल्पित अध्यापक वर्ग मुंबईतच काढून त्याचे मार्गदर्शक असिस्टंट प्रोफेसर बाळशास्त्री यांजकडे सोपविण्याचे ठरविले....... ह्या योजनेने आम्हास अशी उमेद वाटते की, आमच्या एतद्देशीय प्रोफेसरांच्या अंगी जी थोर बुद्धिमत्ता व नानाविध पात्रता आहे तिला स्वतंत्र क्षेत्र उपलब्ध होऊन आपल्या देशबांधवांच्या मनावर इष्ट ते सुसंस्कार करण्यास त्यांना अधिक सामर्थ्य येईल''[३].

मुंबईसारख्या प्रगत होऊ पहात असलेल्या शहरात विद्यार्थ्यांचे पाऊल भलत्या मार्गात पडू नये, सर्वांनी मिळून अध्ययन करावे म्हणून बाळशास्त्र्यांनी आपल्याच घराजवळचा वाडा भाड्याने घेऊन त्यात विद्यार्थी वसतिगृह चालू केले. महाराष्ट्रातील हे पहिले वसतिगृह होय. कामाच्या प्रचंड व्यापामध्येही त्यांचे विद्यार्थ्यांवर अधिक

लक्ष असे. त्यांच्या हाताखालून गेलेले, त्यांनी मदत केलेले कितीतरी विद्यार्थी पुढे नावारुपाला आले.

### ज्ञानाधिष्ठित ग्रंथनिर्मिती

जांभेकरांचे ग्रंथलेखन हे त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याच्या अनुषंगाने आणि जर्व्हिस साहेबांच्या सहकार्याने विद्यार्थी दशेतच झालेले आहे. त्यांचे आरंभीच 'नितीकथा', 'सारसंग्रह', इंग्लंड देशाची बखर', 'भूगोल विद्या', 'गणित भाग १ व २', 'बालव्याकरण', 'भूगोल विद्येची मूलतत्त्वे', 'समीकरण विषयीची टिप्पणे', 'हिंदुस्थानातील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास', 'हिंदुस्थानचा इतिहास' हे प्रकाशित झालेले ग्रंथ. जांभेकरांनी 'डिफरेन्शियल व इंटीग्रल कॅलक्युलस' या इंग्रजी ग्रंथावर 'शुन्यालब्धी गणित' व 'मूलपरिणती गणित' हे दोन्ही ग्रंथ संस्कृत व मराठी परिभाषा योजून  निर्माण केलेत. खगोलशास्त्रावरील ग्रंथांना इंग्रजीऐवजी संस्कृत अनुरुप संज्ञा वापरल्या. गणित व ज्योतिष हे विषय शिकविण्याचे विविध प्रयोग करुन प्रो. आर्लेबार यांच्या सहाय्याने 'A course of pure and mixed mathematics  Vol. I & II' हा महत्त्वपूर्ण ग्रंथही लिहिला, 'मानसशक्ती विषयीचे शोध' हा ग्रंथ अपूर्णावस्थेत लिहिलेला आढळतो. त्यांनी एक 'इंग्रजी-मराठी धातुकोश' पूर्ण केला होता आणि 'शुन्यालब्धी मूलपरिणती' गणितावर एक विस्तृत ग्रंथ अर्धाअधिक रचला होता. दुर्दैवाने हे दोनही ग्रंथ काळाच्या पोटात गडप झाले. 'पुनर्विवाह प्रकरण' ह्या नावाची पोथीही त्यांनी लिहिली होती. राघोबा जनार्दन, भाऊमहाजन यांना ग्रंथ निर्मितीत त्यांनी मदत केली. 'संध्येचे भाषांतर' त्यांनी हाती घेतले होते. त्यांचा महत्त्वाचा आणि शेवटचा उद्योग म्हणजे 'ज्ञानेश्वरी' ह्या मौलिक ग्रंथाचे प्रकाशन होय. आधुनिक मराठी गद्याच्या प्रारंभी जांभेकरांनी लिहिलेले ग्रंथ अत्यंत मौलिक असे आहेत.

### ज्ञानप्रसार व लोकशिक्षणासाठी 'दर्पण' वृत्तपत्र

बाळशास्त्री जांभेकरांचा विद्वान म्हणून लौकीक झाला होता. त्यांच्या अंगी बहुश्रुतपणा उत्पन्न झाला होता. तसाच त्यांचा स्वदेशाभिमानाचा स्फुल्लिंगही प्रज्वलित झाला होता. त्यामुळे ज्ञानप्रसारासाठी व लोकशिक्षणासाठी वृत्तपत्र काढण्याचा त्यांनी संकल्प केला. वृत्तपत्रांनी पाश्चात्य देशात केलेली कामगिरी, तसेच बंगालमध्ये झालेली प्रगती त्यांना ज्ञात होती. मुंबईमध्येही इंग्रजी, पारसी, गुजराथी वृत्तपत्रे सुरू

झाली होती. बंगाली वृतपत्रांनी समाजसुधारणेची धरलेली कास त्यांना माहीत होती. म्हणूनच ६ जानेवारी १८३२ रोजी त्यांनी 'दर्पण' वृत्तपत्र सुरू केले. दर्पण पत्रात इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषात मजकूर प्रसिद्ध होई. काही महिने ते पाक्षिक होते नंतर ते साप्ताहिक केले. 'लोकस्थिती, धर्मरीती आणि उपयोगी फेरफार घडवून आणणे' हे नियतकालिकाचे कर्तव्य आहे अशी जांभेकरांची धारणा होती. 'स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा, आणि या देशाची समृध्दी व येथील लोकांचे कल्याण या विषयी स्वतंत्रतेने व उघड रीतीने विचार करावयास स्थळ व्हावे' या हेतूनेच 'दर्पण'ची निर्मिती केली होती. पहिल्याच अंकात त्यांनी म्हटले आहे, ''विद्येपासून आणि सरळ बुद्धीपासून जी फळे होतात त्याचे यथार्थ ज्ञान युरोपियन लोकांशी बहुत दिवस सलगीचे संगटन पडल्यामुळे बंगालचे लोकांस झाले आहे. या गोष्टी त्यांचे मनात पक्केपणी ठसून त्याणी स्वदेशीय लोकांचे विद्याभ्यासाकरितां प्रयत्न केले, आणि ते सफल झाले. तेथे विद्या वाढण्यास आणि सरळ बुद्धी होण्यास मुख्यत्वे कारणे दोन, एक सर्व विद्यालय म्हणजे सर्व विद्यांची शाळा, आणि दुसरे तेथे जी बहुत एतद्देशीय वर्तमानपत्रे छापून प्रसिद्ध होतात ती. बरे असेच उपाय येथे केले तर अशी फळे न होतील कीं काय''[४].

नियतकालिक हे ज्ञानप्रसाराचे अमोघ साधन आहे याची पक्की जाणीव बाळशास्त्र्यांना असल्यामुळे दर्पणमध्ये शिक्षणविषयक विचाराला प्राधान्य होते. लोकांच्यामधील न्यूनगंड नाहीसा करून, शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्यांना शिक्षणाभिमुख करण्याचा प्रयत्न दर्पणने केला. 'विद्या हे बळ आहे' हे लॉर्ड बेकनचे उद्‌गारच आपल्या लेखाला शीर्षक देऊन शिक्षण विषयाची मांडणी केली. पाश्चात्य देशांच्या प्रगतीच्या मुळाशी शिक्षण आहे आणि आपल्या अधोगतीच्या मुळाशी अज्ञान आहे हे त्यांनी विविध उदाहरणांनी पटवून दिले. ''पूर्वकाळचे महाबुद्ध ऋषीजन हे अरण्यवास पत्करून विद्यासंपन्न होत आणि विद्यादान करीत. त्यांनी आपल्या देशात अपूर्व ज्ञानभांडारे भरून ठेवली आहेत. म्हणून विद्याभिलाशी व्हा. विद्याभ्यास करा. लोकांना प्रशिक्षण द्या. सरकार व प्रजा, धनी-चाकर, आई-बाप व पुत्र यामध्ये प्रेमभाव निर्माण व्हावा, स्वदेशाभिमान, आणि स्वधर्माभिमान लोकांच्या मनात उपजावा असा प्रयत्न करा. हेच आपले ऋषीवंशाचे कर्तव्य. गुरू दसपट ज्ञानी असेल तर तो एकपट ज्ञान शिष्यास देऊ शकेल. शंभरपट ज्ञानी असेल तर तो दसपट

ज्ञान देईल. म्हणून जास्तीत जास्त विद्यासंपन्न व्हा.'' आजच्या शिक्षकांनी मुखोद्‌गत करून ठेवण्यासारखा हा उपदेश आहे.

दर्पणमध्ये हिंदुस्थानातील शैक्षणिक चळवळीची इत्यंभूत माहिती दिली. बाळशास्त्रांनी मुलींच्या शिक्षणासाठीही आग्रह धरला. शिक्षणाच्या आड आलेल्या इंग्रजांच्या धोरणावर ताशेरेही ओढले. एकंदरीत 'दर्पण' आणि नंतर सुरू केलेल्या 'दिग्दर्शन' या नियतकालिकांची निर्मिती बाळशास्त्री जांभेकरांनी ज्ञानप्रसार व लोकशिक्षण यासाठीच केली होती असे म्हणावे लागेल.

### प्रबोधनाचे खंदे पुरस्कर्ते

बाळशास्त्री जांभेकरांचा काळ हा युनिव्हर्सिटी स्थापनेच्या पूर्वीचा, जेंव्हा शालोपयोगी पुस्तकेही उपलब्ध नव्हती तेव्हाचा. आगगाड्या, तारायंत्र व फोटोग्राफी हिंदुस्थानात येण्यापूर्वीचा काळ होता हे लक्षात ठेवले पाहिजे. बाळशास्त्र्यांच्या आयुष्याचा आरंभच समाजाचा मूलभूत व आद्य प्रश्न जो शिक्षण, त्याच्या प्रवर्तक संस्थेपासून झाला. पाश्चात्य संकट राजकीय व लष्करी उपायांनी उखडून टाकता येणार नाही, प्रथम आपणास पाश्चात्य संस्कृती, तिच्या शास्त्रीय अंगोपांगासहित जाणून घेतली पाहिजे असे जांभेकरांना वाटत होते. आपल्या देशाची स्थिती त्याकाळी अभिमानाच्या गोष्टी बोलण्याची नसून मागे पडलेल्या गोष्टी भरुन काढण्याची होती. शास्त्राचे व जगाबद्दलचे अज्ञान हे आपल्या राष्ट्राचे दोन प्रमुख दोष काळाने वाढत आले होते. ते नाहिसे करण्यासाठी प्रथम शिक्षणप्रणाली सुधारणे, परदेशात जाऊन तेथील चांगल्या गोष्टी शिकून या देशातील लोकांना शहाणे करणे हा मार्ग त्याकाळी चोखाळण्याचा होता. तो मार्ग स्वत:च्या चरित्राने बाळशास्त्री यांनी दाखवून दिला.

बाळशास्त्री हे प्रबोधनाचे खंदे पुरस्कर्ते होते. १८४५ मध्ये राघोबा जनार्दन सारख्या उत्साही मित्राला उत्तेजन देऊन त्यांनी 'बॉंबे नेटिव्ह जनरल लायब्ररी'ची स्थापना केली. मुंबईतील हेच एतद्देशीयांचे पहिले सार्वजनिक ग्रंथालय. बाळशास्त्र्यांच्या लोकशिक्षणाचा आणखी एक उद्योग म्हणजे 'नेटिव्ह इंप्रुव्हमेंट सोसायटी'ची स्थापना. पुढे बाळशास्त्र्यांच्या शिष्यांनी 'स्टुडंन्टस् लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी' नावाचे जे प्रसिद्ध ज्ञानप्रसारक मंडळ स्थापून लोकशिक्षणाचे व लोकसुधारणेचे कित्येक वर्षे काम केले ते मंडळ म्हणजे बाळशास्त्र्यांच्या पूर्वोक्त संस्थेचेच अपत्य होय.

## जस्टीस ऑफ द पीस

बाळशास्त्री जांभेकरांचे सार्वजनिक कार्य, व्यक्तिमत्व, विद्वत्ता व चारित्र्य सर्वमान्य असल्याने सार्वजनिक सभांचे नेतृत्व त्यांच्याकडेच असे. इंग्रजी, मराठी, संस्कृतमध्ये ते अस्खलीत भाषण करत असत. जांभेकरांनी सरकारला शिक्षणकार्यात सर्वांगीण सहकार्य केल्यामुळे जनतेच्या हरएक महत्त्वाच्या प्रश्नावर इंग्रज लोक त्यांचे मत अधिकृत मानीत असत. इंग्रजधार्जिणे म्हणून त्यांच्यावर आगपाखडही झाली. इंग्रजांच्या सहवासात राहूनच ज्ञान-विज्ञानाची कास धरुन प्रगती करता येईल असा त्यांचा कयास होता. सरकारचे सर्वच काही बरोबर अशी त्यांनी भूमिका घेतली नाही. दोषी अधिकाऱ्यांवर, अयोग्य निर्णयावर त्यांनी योग्य आवाज उठविला. त्यांनी सरकारी कामातील दोषही दाखवले. बाळशास्त्री जांभेकरांचं विद्वत्त्व, कर्तृत्त्व याची जाणीव इंग्रज सरकारला होती. वयाच्या अठ्ठावीसाव्या वर्षी 'जस्टीस ऑफ द पीस' हा बहुमान देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

## शैक्षणिक कार्याचे श्रेष्ठत्त्व

एकोणिसाव्या शतकात शिक्षण, वाङ्मय, शास्त्रज्ञान, भारतीय पुराणेतिहास संशोधन व सार्वजनिक सामाजिक कार्य ह्या विविध क्षेत्रातून केवळ मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्र, गुजराथ व कर्नाटक ह्या प्रांतात ज्यांनी नावलौकिक मिळविला, त्यापैकी बहुतेकांवर जांभेकरांच्या शिक्षणाचा व आदर्शाचा परिणाम झाला. त्यामध्ये दादोबा पांडुरंग, भाऊ महाजन, गोविंद नारायण माडगांवकर, नौरोजी फर्दुनजी, रा.सा. भोगीलाल, प्राणवल्लभदास, नारायण दिनानाथजी, विनायक वासुदेवजी, रा.बा.नाना मोरोजी, डॉ. भाऊ दाजी, डॉ.आत्माराम पांडुरंग, रा.बा. प्रो.केरो लक्ष्मण छत्रे, रा.बा. राम बाळकृष्णाजी, प्रो. दादाभाई नौरोजी या तरुण पिढीवर बाळशास्त्र्यांच्या अगाध पांडित्याची व अध्यापनपटुत्वाची छाप पडली होती.

बाळशास्त्री जांभेकरांनी आरंभी शिक्षण क्षेत्रात प्रचंड कामगिरी केली. अल्पवयापासून त्यांना प्रचंड दगदग व कष्ट सहन करावे लागले. परिणामी ते अल्पायुषी ठरले. १७ मे १८४६ मध्ये वयाच्या चौतिसाव्या वर्षी त्यांचे अकाली निधन झाले. त्यांच्या अकाली निधनामुळे संबंध हिंदुस्थानाची मोठी हानी झाली यात शंकाच नाही. त्यांच्या निधनाबद्दल त्यावेळच्या बोर्ड ऑफ एज्युकेशनने असे नमूद

केले आहे की, ''या थोर व प्रतिभावान व्यक्तीच्या निधनाने हिंदुस्थातील शिक्षणकार्याची कधीही भरुन न येईल अशी हानी झाली आहे. त्यांची विद्वत्ता, कौशल्य व कर्तृत्व याविषयी बोर्डाला फार आदर वाटतो हे नमूद करणे जरुर आहे. या प्रांतातच नव्हे तर इतर प्रांतातही इतकी बुद्धिमत्ता व इतका कार्याचा व्याप केलेली एतद्देशीय व्यक्ती अजून झालेली नाही ......''[५] इंग्रजी अधिकाऱ्यांनी बाळशास्त्रींविषयींच्या अभिप्रायातून त्यांचे शैक्षणिक कार्यातील श्रेष्ठत्त्व अधोरेखित होते.

भारताचे पितामह म्हणून ज्यांचा आपण गौरवाने उल्लेख करतो ते डॉ. दादाभाई नौरोजी आपले गुरु बाळशास्त्री जांभेकरांविषयी सत्तर वर्षानंतर ११ मे १९०९ रोजी लिहिलेल्या पत्रात म्हणतात,''आपले गुरु म्हणून काय तो मी त्यास ओळखतो आणि खरोखरीच ते अतिशय बुद्धिमान, चतुर, सालस व सूज्ञ गुरू होते. आपल्या शिष्यांवर त्यांचे प्रेम असून त्यांच्याविषयी त्यांना कळकळ होती. आम्हांस त्यांच्या अष्टपैलू विद्वत्तेइतकाच त्यांच्या एकंदर चारित्र्यासंबंधी थोर आदर व कौतुक वाटे. त्यांच्या अकाली निधनाने त्यांच्या छात्र वर्गास अत्यंत दुःख झाले, आणि त्यामुळे आमच्या संस्थेचीच नव्हे, तर सर्व देशाची मोठी हानी झाली.''[५]

डॉ. दादाभाई नौरोजींचा बाळशास्त्र्यांच्या व्यक्तिमत्वाविषयीचा आदर व अभिप्राय म्हणजे बाळशास्त्र्यांच्या हाताखाली शिकलेल्या सर्व तरुण पिढीचा आदर व अभिप्राय होय यात शंकाच नाही.

**समारोप**

एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या-तिसऱ्या दशकात ब्रिटीश सत्ता स्थिरस्तावर झाल्यावर महाराष्ट्रामध्ये सर्व परिस्थितीचा धैर्याने आणि व्यापकदृष्टिने विचार करुन समाजाला शिक्षणाचे महत्त्व सांगून जागृत करणारा, आणि मार्ग दाखवणारा, स्वदेशोन्नतीच्या विविध क्षेत्रात तळमळीने अखंड परिश्रम करणारा बुद्धिमान आणि अष्टपैलू पांडित्य असणारा पहिलाच पुरुष म्हणजे बाळशास्त्री जांभेकर. उत्तम शिक्षक, व्यासंगी प्रोफेसर, बहुआयामी लेखक, अव्वल पत्रकार, अग्रणी समाजसुधारक याबरोबरच महाराष्ट्राचे आद्य ज्ञानमहर्षी म्हणून त्यांचे कार्य अत्यंत मौलिक आहे.

(आरती मासिक, सावंतवाडी, मे, २०११ - प्रसिद्ध)

***

**संदर्भ**

१. त्र्यं.शं.शेजवलकर, शेजवलकर लेख संग्रह, पृ.३१३

२. ग.गं.जांभेकर (सं.) आचार्य बाळशास्त्री जांभेकर: जीवनवृत्त व लेखसंग्रह, खंड १, लोकशिक्षण कार्यालय, पुणे, १९४०, पृ. ११७

३. तत्रैव, पृ. १२३

४. वि.कृ.जोशी, दर्पण संग्रह, महाराष्ट्र ग्रंथ भांडार,मुंबई पृ. ३

५. तत्रैव, पृ. २९

६. ग.गं. जांभेकर (सं.) आचार्य बाळशास्त्री जांभेकर: जीवनवृत्त व लेखसंग्रह, खंड १, लोकशिक्षण कार्यालय, पुणे, १९४०, पृ. ७०, १३७

# स्वातंत्र्याचे अग्रणी : बाळशास्त्री जांभेकर

## प्रस्तावना

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये शिक्षण, ग्रंथ प्रसार, सामाजिक सुधारणा, राजकीय वैचारिक प्रबोधन, परिवर्तन इत्यादी चळवळीमध्ये उत्तुंग कार्य केलेल्या महाराष्ट्रातील महान व्यक्तींचे आपणास नेहमीच स्मरण होत असते. त्यातही न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, लोकमान्य टिळक, आगरकर, महात्मा फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतल्याशिवाय महाराष्ट्राचा नव्हे तर देशाचा दिवस उजडत नाही. परंतु या प्रभावळीमध्ये अग्रणी असलेल्या आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचे स्मरण मात्र आपणास क्वचितच होत असते. त्यातही ६ जानेवारी रोजी पत्रकारदिनी 'दर्पण आणि जांभेकर' यांच्या फक्त आठवणी उगळल्या जातात. परंतु मराठीतील आद्य पत्रकार म्हणून पत्रकारितेपुरतेच जांभेकरांचे कार्य सिमीत नाही. महाराष्ट्रातील तत्कालिन समस्यांची जाणीव करुन देणारा द्रष्टा विचारवंत, बहुआयामी लेखक, इतिहास संशोधक, आद्य शिक्षण तज्ज्ञ, आद्य समाजसुधारक, एवढेच नव्हे तर आधुनिक महाराष्ट्राचे जनक आणि पश्चिम भारतातील नवयुगप्रवर्तक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. प्रगाढ विद्वत्त्व आणि पांडित्य असलेला प्रचंड ज्ञानलालसा, राष्ट्रोद्धाराची दृष्टी, स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान, यांबरोबरच आदर्शभूत चारित्र्य, परोपकारी दृष्टी आणि सार्वजनिक कार्याची तळमळ या गुणांच्या बळावर महाराष्ट्रामध्ये सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीचा पाया घालणारे बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रातील प्रथम पुरुष होत.

## जीवन वृतांत

बाळशास्त्री जांभेकरांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील देवगड तालुक्यामध्ये असलेल्या पोंभुर्ले येथे इ.स.१८१२ साली झाला. (काही ठिकाणी इ.स. १८१० हे साल दिलेले आहे)२०११ पासून त्यांची व्दिजन्मशताब्दी सुरु होते.त्यांचे घराणेच विद्याचार संपन्न होते. वडील गंगाधरशास्त्री नावाजलेले व्युत्पन्न पुराणीक होते. त्यांच्या घराण्यात स्त्रियाही शिकलेल्या होत्या. शिक्षणाचा पिढीजात वारसा, सुशील

आणि सुसंस्कारीत घराणे यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व बहुसंपन्न झाले. बालपणीच संस्कृत भाषेशी नाळ जोडल्यामुळे आणि प्रख्यात ग्रंथांच्या अभ्यासामुळे त्यांनी अल्पवयात खूपच प्रगती केली. बाळशास्त्री एकपाठी होते. त्यामुळे त्यांना 'बालबृहस्पती' या नावाने ओळखले जाई. ज्ञानेश्वर तुकारामापासून ते व्यास वाल्मिकींच्या मराठी संस्कृत ग्रंथाचे अध्ययन, गणितापासून बखरीपर्यंत आणि न्यायशास्त्रापासून ते व्याकरणशास्त्रापर्यंत त्यांनी अभ्यासात चांगलीच प्रगती केली होती. पोंभुर्ल्यात शाळा नव्हती तरीही बाळशास्त्र्यांचे हे प्राथमिक शिक्षण घरीच झाले होते.

इ.स. १८२२ मध्ये गव्हर्नर एल्फिन्स्टनने मुंबईत शिक्षणाचा आरंभ केला आणि वयाच्या १२ व्या वर्षी म्हणजे इ.स.१८२४ मध्ये बाळशास्त्री शिक्षणासाठी मुंबईत दाखल झाले. बाळशास्त्री जात्याच बुद्धिमान असल्याने थोड्याच दिवसात त्यांनी इंग्रजीवर प्रभुत्व मिळविले. गणित, भाषाज्ञान, इतिहास यामध्ये त्यांनी चांगलेच प्राविण्य संपादन केले. विविध शास्त्रांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. संस्कृत, मोडी, कानडी, इंग्रजी बरोबरच त्यांनी १३ भाषा अवगत केल्या. त्यांनी शिक्षण संस्थेत शिक्षक, स्कूल सेक्रेटरी, इन्स्पेक्टर ते प्रोफेसर अशी पदे भूषविली. 'जस्टीस ऑफ द पीस' अशी सन्मानाची पदवी त्यांना इंग्रजांनी दिली. त्यांनी विपुल ग्रंथनिर्मिती केली. मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरू केले. त्यानंतर 'दिग्दर्शन' नावाचे मासिकही सुरू केले. नियतकालिकासारख्या माध्यमातून शिक्षणप्रसार, समाजसुधारणा, धर्म, राजकीय, वाङ्मयीन स्वरुपाचे मौलिक कार्य केले. इ.स. १८४६ साली वयाच्या चौतिसाव्या वर्षी तापासारख्या किरकोळ आजाराने त्यांचे निधन झाले.

### आद्य शिक्षण महर्षी

महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा आरंभ इंग्रजांनी केला असला तरी येथील लोकांच्या मनात शिक्षणविषयक बिजारोपण करण्याचे कार्य एतद्देशीय लोकांनीच केले. त्यामध्ये बाळशास्त्री अग्रणी म्हणावे लागतील. इंग्रजी शाळेत शिकून शिक्षकपदी नेमणूक झाल्यावर प्रथम त्यांनी पाठ्यपुस्तके निर्माण करण्याचे काम हाती घेतले. इतिहास, भूगोल, व्याकरण, गणित, छंदशास्त्र, नीतिशास्त्र इत्यादी विषयावर त्यांनी पाठ्यपुस्तके रचली. रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, भू-गर्भशास्त्र, ज्योतिषशास्त्र, मानसशास्त्र या क्लिष्ट ग्रंथाचे वाचन करुन अभ्यासक्रम तयार केला. त्यांना १३ भाषा येत असल्यामुळे

विविध भाषेतील ज्ञान मराठीमध्ये आणण्याचा अत्यंत महत्त्वाचा प्रयत्न प्रथम त्यांनी केला. गणितामध्ये तर ते इंग्रजी प्रोफेसरांपेक्षाही ख्यातकिर्त होते. प्रो. आर्लेबार यांच्या सहाय्याने 'A course of pure and mixed mathematics Vol. I & II' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांनी लिहिला. त्यांनी 'शुन्यालब्धि' हे गणिताचे पुस्तक मराठीमध्ये लिहीले.

इंग्रजी शाळेत इंग्रज शिक्षकांपेक्षाही बाळशास्त्री विद्वान होते. ते अत्यंत तळमळीने व निष्ठेने शिकवत असत.एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये त्यांनी असिस्टंट प्रोफेसर व ॲक्टिंग प्रोफेसर म्हणूनही कार्य केले. महाराष्ट्रतील ते पहिले प्रोफेसर होत. इंग्रजी अधिकारी, प्रोफेसर यांच्याबरोबरीने त्यांनी शिक्षण संस्थेत काम केले. शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी पदाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली. अक्कलकोटच्या युवराजाचे शिक्षक म्हणून साताऱ्यात काम केले. महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचे जाळे विणण्यासाठी त्यांनी रत्नागिरी, बेळगाव, धारवाड, सोलापूर इत्यादी ठिकाणी दौरे काढले. शाळा तपासणीस म्हणून कार्यही केले.

बाळशास्त्री शाळांचे सुपरिटेंडेंट या नात्याने महाराष्ट्रभर दौरा करत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली. उत्तम नागरिक घडवायचे असतील तर शिक्षकही उत्तम असले पाहिजेत. सत्य, नीति, सदाचार या भारतीय गुणांबरोबरच पाश्चात्य ज्ञान आणि उद्योगपरता शिक्षकांना ज्ञात असली पाहिजे. म्हणून त्यांनी सरकारकडे शिक्षक बनविण्याच्या शाळेची शिफारस केली. सरकारने लगेच ती मान्य केली आणि मुंबईमध्ये पहिले नॉर्मल स्कूल (ट्रेनिंग कॉलेज) सुरू केले. त्या स्कूलचे डायरेक्टर म्हणून त्यांचीच नेमणूक झाली. महाराष्ट्रातील ते पहिले ट्रेनिंग कॉलेज होते. १८४४ च्या इतिवृत्तात इंग्रजी शाळेच्या बोर्डाने काढलेले उद्‌गार बाळशास्त्र्यांचे सार्थ गौरव करणारे आहेत. ते म्हणतात, ''आम्ही संकल्पित अध्यापकवर्ग मुंबईतच काढून त्याचे मार्गदर्शित्व असिस्टंट प्रोफेसर बाळशास्त्री याजकडे सोपविण्याचे ठरविले. ह्या योजनेने आम्हास अशी उमेद वाटते की, आमच्या एतद्देशीय प्रोफेसरांच्या अंगी जी थोर बुद्धिमत्ता व नानाविध पात्रता आहे तिला स्वतंत्र क्षेत्र उपलब्ध होऊन आपल्या देशबांधवांच्या मनावर इष्ट ते सुसंस्कार करण्यास त्यांना अधिक सामर्थ्य येईल.''[१]

मुंबईत बाहेरगावाहून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय व्हावी म्हणून बाळशास्त्रींनी राहत्या घराशेजारचा मोठा वाडा भाड्याने घेऊन त्यामध्ये मुलांचे वसतिगृह काढले. मुलींच्या शिक्षणाबाबतीतही ते आग्रही होते. स्त्रिया शिकल्याशिवाय स्त्री–पुरुष समता प्रस्थापित होणार नाही अशी त्यांची ठाम धारणा होती. यावरुन असे स्पष्ट होते की, पहिले शिक्षक, पहिले प्रोफेसर, पहिल्या शिक्षक शाळेचे डायरेक्टर आणि प्रथम वसतिगृह उभारण्याचा मान बाळशास्त्री जांभेकरांना दिला जातो. आद्य पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीबरोबरच त्यांनी धर्म, तत्वज्ञान, इतिहास, व्याकरण, विज्ञान इत्यादी विषयांवर स्वतंत्र ग्रंथ लिहिले. भारतीय ताम्रपटांचे व शिलालेखांचे संशोधन व वाचन करुन अनेक निबंध लिहिले. त्यामुळे त्यांना आद्य इतिहासकार मानले जाते. तथापि आद्य शिक्षण महर्षी म्हणून त्यांच्याकडे विशेषत्वाने पाहिले जाते.

## मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक व आद्यपत्रकार

बाळशास्त्री जांभेकरांनी ज्ञानप्रसारासाठी आणि लोकशिक्षणासाठी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' वृत्तपत्र सुरु केले. वृत्तपत्रांनी पाश्चात्य देशात व बंगालमध्ये केलेली कामगिरी बाळशास्त्रींना ज्ञात होती. परंतु ती जनतेला नव्हती. पत्रसृष्टीच्या नव्या पायंड्याची माहिती त्यांनी पहिल्याच अंकात छापली. 'ज्या देशातून सांप्रतचे शककर्ते एथे आले, त्या देशात ते एथे आल्याचे पूर्वी फार दिवसांपासून या आश्चर्यकारक छापयंत्राची कृत्ये चालू होती, त्यांपासून मनुष्यांचे मनांतील अज्ञानरुप अंधकार जाऊन त्यावर ज्ञानरुप प्रकाश पडला. ज्या ज्या देशामध्ये अशा लेखांचा प्रचार झाला आहे, तेथे तेथे लोकांचे अंतर व्यवहारामध्ये तसेच बाह्यव्यवहारामध्ये शाश्वत हित झाले आहे.''[२] 'दर्पण' मध्ये इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषात मजकूर प्रसिद्ध होई. काही महिने ते पाक्षिक होते नंतर ते साप्ताहिक केले.

बाळशास्त्र्यांकडे काळाच्या पुढे पाहण्याची विशाल दृष्टी होती. सनातनी व सुधारक, विद्वान आणि अज्ञानी, सरकार आणि जनता या सर्वांना बरोबर घेऊन लोकशिक्षणाचे कार्य त्यांनी केले. ज्ञानप्रसार व जनतेची योग्यता वाढवणे हा 'दर्पण'चा हेतू होता. 'विद्या हे बळ आहे' असे सांगून आपले मागासलेपण व पाश्चात्यांचे पुढारलेपण लोकांच्या लक्षात आणून दिले. पाश्चात्य देशातील बदलत्या घडामोडी,

तेथील वैज्ञानिक प्रगती, बदलते लोकजीवन यांची जाणीव करुन दिली. सामाजिक वैग्युण्यावर परखड विचार व्यक्त करुन धर्माबाबतीत उदार व व्यापक विचार मांडला. पाश्चात्य संकट राजकीय व लष्करी उपायानी उखडून टाकता येणार नाही तेंव्हा पाश्चात्य संस्कृती जाणून घेऊन, नव्या गोष्टींचा अंगीकार करुन देशाला प्रगतीपथावर नेऊ असा जनतेमध्ये ठाम विश्वास रुजवला. समाजात अभयता, अस्मिता, स्वाभिमान, आणि स्वदेश, स्वधर्म, स्वभाशा याविषयी प्रेम, आपुलकी निर्माण करण्याच्या दृष्टीने बाळशास्त्र्यांनी अजोड कार्य केले.

'दर्पण' मराठीतील पहिलेच वृत्तपत्र असूनही ते जांभेकरांच्यामुळे निर्भीड होते. त्यांनी सरकारच्या चुका दाखवल्या. टिकाही केली. परखडपणे मतप्रदर्शन केले. सुधारणांचे उपायही सुचवले. अपुऱ्या सोई, अपुरा पैसा, बातमी मिळण्याची साधने अल्प अशा संकटावर मात करुन वाचकांना कमी किंमतीत अंक दिला. विशेष म्हणजे मराठी भाषेला एक विशिष्ट असे वळण लावले. 'दर्पण' बंद होण्याच्या सुमारास म्हणजे १८४० मध्ये त्यांनी 'दिग्दर्शन' नावाचे मासिक काढले. विज्ञानप्रसार हा त्यामागचा हेतू होता, ज्ञानाबरोबरच विज्ञानामध्ये आपण प्रगती करावी या दृष्टीने त्यांनी समाजाला दिग्दर्शन केले. शिक्षक, प्रोफेसर, लेखक, संशोधक, भाषांतरकार व व्यासंगी अभ्यासक हे गुण बाळशास्त्रींच्याकडे असल्यामुळे त्यांची पत्रकारिता बहरली. मराठी भाषेतला हा पहिलाच यशस्वी प्रयोग बाळशास्त्र्यांनी केला; त्यामुळे पुढच्या काळात स्वातंत्र्य व समाजसुधारणेबाबत मराठी वृत्तपत्रसृष्टीने अनमोल कार्य केले.

### आद्य समाजसुधारक

बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांचे अग्रणी होते. प्रथम त्यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षण प्रसारासाठी प्रचंड परिश्रम घेतले. ते समाजातील प्रचलित रुढी-परंपरा, दृष्ट चालीरीती, ढोंगी प्रवृत्ती यासारख्या अनिष्ठ प्रथांवर त्यांनी हल्ला चढवला. आपले मागासलेपण आणि पाश्चात्य लोकांचे पुढारलेपण यातील फरक लोकांच्या लक्षात आणून दिला. अंधश्रद्धा समाजाला ज्ञान-विज्ञानाची जाणीव करुन देणे, जगातील बदलत्या परिस्थितीचे ज्ञान करुन देणे, भोळ्या समजुतीवरील विश्वास घातक आहे हे समजावून सांगणे,

समाजाची नीतिमत्ता सुधारुन त्यांना सुसंस्कारित करुन प्रगतीपथाकडे नेणे हेच त्यांनी आपले जीवित ध्येय मानले. त्यांचे व्याख्यान, ग्रंथलेखन, 'दर्पण' व 'दिग्दर्शन' यातून सामाजिक सुधारणेची तळमळ सिद्ध होते. 'दर्पण' व 'दिग्दर्शन'ची निर्मिती समाज प्रबोधनासाठीच होती.

बाळशास्त्री हे इंग्रजी शिक्षणाचे व पाश्चात्य ज्ञानाचे पुरस्कर्ते होते तसे ते हिंदू संस्कृतीचे व धर्माचे अभिमानी होते. सनातनी आचार विचारांचे मात्र त्यांना वावडे होते. धर्मभावनेला उदार बनवले पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. ख्रिस्ती धर्मप्रसाराचे संकट त्यांना ज्ञात होते. त्यामुळे हिंदू धर्मातून परधर्मात गेलेल्यांना परत शुद्ध करुन आपल्या धर्मात घ्यावे असे त्यांचे ठाम मत होते. श्रीपाद शेषाद्री प्रकरण त्यावेळी खूप गाजले. सतीची चाल बंद व्हावी, विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार आहे, स्त्रियांनी शिक्षण घेतले पाहिजे, विद्याभ्यास केला पाहिजे, एवढेच नव्हे तर स्त्री-पुरुषांना समान हक्क असला पाहिजे या संबंधीचे लेखन त्यांनी 'दर्पण' मध्ये केले. स्त्री शिक्षणाची दिशा ठरवण्याच्या कामी त्यांचे मोठे योगदान आहे.

भारतीय समाज हा जातीभेदाच्या साखळदंडामध्ये जखडून पडला आहे तो मुक्त झाला पाहिजे. जातीप्रथा नष्ट केली पाहिजे असे बाळशास्त्रींनी 'दर्पण' मध्ये लिहिले. जातिभेदाचा प्रश्न, मनुष्याची जात असे मंथन त्यांनी 'दर्पण'मध्ये घडवून आणले. गुलामगिरीसारख्या दृष्ट प्रथेविरुद्ध ते लिहितात, ''आम्ही याप्रसंगी भले आणि समर्थ इंग्रज व या देशाचे लोक यांस मुख्यत्वे लिहितो की, त्यांणी आपले मनुष्यमात्राचे व कल्याणाविषयीची इच्छा, मनुष्यपणा आणि नीति यांही करुन ही गुलामगिरीची नीति चालण्याची जी साधने आहेत ती, आपल्यापासून उपाय होईल तेवढा करुन बंद करावी, जा या गुलामगिरीपासून लोकांची नीति फार भ्रष्ट होत्ये. आणि हजारोंचे घरीबुड आणि दुःखही येतात.''[३]

लोकांना सर्व बाबतीत जागृत करणे, प्रबोधन करणे, प्रगतीचा मार्ग दाखवणे यासाठी बाळशास्त्रींनी आपली हयात खर्ची घातली. त्यांची अष्टपैलू बुद्धिमत्ता, समाजोद्धाराची दृष्टी, स्वदेशोन्नतीची कळकळ आणि काळाच्या मानाने असलेला प्रगल्भ दृष्टिकोन यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक सुधारकांमध्ये ते आद्य ठरतात यामध्ये तिळमात्र शंका नाही.

## चलेजाव चळवळीचे द्रष्टे विचारवंत

बाळशास्त्री जांभेकर राजकीयदृष्ट्या अधिक जागृत होते. आपण पारतंत्र्यात आहोत आणि स्वातंत्र्यासाठी शिक्षण आणि जागृती महत्वाची आहे यांची त्यांना पक्की जाणीव होती. इंग्लंडमध्ये पार्लमेंट आणि जनता यामध्ये झालेला संघर्ष आणि बदल, हिदुस्थानविषयक पार्लमेंटचे धोरण, ब्रिटिश अधिकाऱ्यांचे विचार, सुधारणाविषयक पास होणारे कायदे, एतद्देशीयांना उच्चपदी नेमणूक करण्यासंबंधीचे प्रयत्न अशा चौफेर बाजूंनी बाळशास्त्रींनी 'दर्पण' मधून लेखन केले. जनतेला नेहमी जागरुक ठेवणे हा त्यांचा स्थाईभाव होता. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर जगामध्ये होणारे राजकीय बदल, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही लोकशाहीची प्रभावी मूल्ये यांचे साद-पडसाद 'दर्पण'मध्ये उमटले.

बाळशास्त्र्यांच्या वाचनात इंग्रजी वृत्तपत्रे येत असत. पाश्चात्य विद्वानांच्या गाठी-भेठी होऊन चर्चा होत असे. साहजिकच इंग्लंडमधील राजकीय अस्थिरतेचे-स्थित्यंतराचे दर्शन 'दर्पण'ने घडवले. इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेत बदल झाला तर तो आपल्याकडेही होऊ शकेल. धनिकांची सत्ता जाऊन गोरगरिबांची सत्ता येईल याची जाणीव करुन देण्यासाठी ते लिहितात, ''सांप्रत इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशात बहुसंबंध आहे म्हणोन ज्या गोष्टीपासून तेथे बरे वाईट होईल त्यापासून एथेही काही थोडे बहुत त्याप्रमाणे होईल.''[४]

बाळशास्त्रींनी हा लेख लिहिला आहे तो 'दर्पण' पत्र नुकतेच सुरू झाले होते तेंव्हा. ज्याप्रमाणे इंग्लंडमध्ये घडामोडी घडत होत्या आणि धनिक लोकांची सत्ता जाऊन जनतेचे राज्य येत होते, तशाच स्वरुपाचा बदल हिंदुस्थानात घडून यावा याची जाणीव जनतेला करुन दिली. हे स्वातंत्र्याचे वारे बाळशास्त्र्यांच्या मनात प्रथमत:च रुजले होते. केंव्हा केंव्हा लिखाणातून ते स्पष्टही झाले आहे. अ.का.प्रियोळकर यांनी बाळशास्त्री जांभेकरांच्या राजकीय कार्य कर्तृत्वाविषयी 'चले जाव चळवळीचे द्रष्टे: कै. बाळशास्त्री जांभेकर हा लेख लिहिला. त्याकाळी तो खूपच चर्चिला गेला. त्यामध्ये ते म्हणतात,''नव्या राज्यकर्त्यांच्या अंमलाखाली आपण नव्या विद्या प्राप्त करुन घेऊन जास्त शहाणे होऊ व नव्या सुधारलेल्या पद्धतीप्रमाणे राज्यकारभार हाकण्याची आपल्यामध्ये पात्रता आल्यावर आपणास पारतंत्र्यांत दडपून ठेवण्यास जगांतील कोणतीही शक्ती समर्थ होणार नाही व इंग्रजी लोकांना शेवटी 'चलेजाव' करणे भाग होईल अशी त्यांची खात्री होती.''[५]

खऱ्या अर्थाने हिंदुस्थानामध्ये 'चलेजाव' चळवळीचे पहिले पुरस्कर्ते, स्वातंत्र्याचे प्रथम अग्रणी आणि दृष्टे विचारवंत म्हणून बाळशास्त्र्यांकडेच बोट दाखवावे लागेल. स्वातंत्र्यांचे महत्त्व त्याकाळी प्रथम त्यांना पटावे आणि त्यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत हे आश्चर्य नव्हे काय? त्यांची राजकीय जागरुकता, जाज्वल्य देशाभिमान आणि राष्ट्रोद्धाराची विशाल दृष्टी पाहून हेवा वाटतो.

**समारोप**

एकोणिसाव्या शतकात पहिल्या दोन चार दशकात विद्वत्तेच्या जोरावर कर्तृत्व गाजवणाऱ्या लोकांमध्ये बाळशास्त्री जांभेकर हे अग्रणी होत. कुशाग्र बुद्धिमत्ता, अष्टपैलू पांडित्य, प्रचंड ज्ञानलालसा, राष्ट्रोद्धाराची विशाल दृष्टी, स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान याबरोबर आदर्शभूत चारित्र्य आणि सार्वजनिक कार्याची तळमळ या गुणांच्या बळावर महाराष्ट्रामध्ये सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीचा पाया घालणारे बाळशास्त्री जांभेकर हे प्रथम पुरुष म्हणावे लागतील. म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे आद्य शिक्षणमहर्षी, आद्य समाजसुधारक, चलेजाव चळवळीचे दृष्टे विचारवंत, आद्य पत्रकार, मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक, आद्य इतिहाससंशोधक व सुधारणावाद्यांचे प्रवर्तक म्हणून संबोधले जाते. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधींच्याही अगोदर स्वातंत्र्याच्या हक्काचे प्रतिपादन करणारा अग्रणी व चलेजाव चळवळीचा प्रवक्ता म्हणून त्यांच्याकडे पहावे लागेल.

***

दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका, कोल्हापूर, जाने/फेब्रु., २०११ प्रसिद्ध

**संदर्भ**

१. ग.गं.जांभेकर (सं.)आचार्य बाळशास्त्री जांभेकर: जीवनवृत्त व लेखसंग्रह, खंड १, लोकशिक्षण कार्यालय, पुणे, १९४०, पृ. ११७
२. वि.कृ.जोशी, श्री. म. सहस्त्रबुद्धे (सं) दर्पण संग्रह, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, पृ. ३
३. ग.गं. जांभेकर (सं.) आचार्य बाळशास्त्री जांभेकर: जीवनवृत्त व लेखसंग्रह, खंड १, लोकशिक्षण कार्यालय, पुणे, १९४०, पृ. ६१
४. तत्रैव, पृ. १३
५. अ.का.प्रियोळकर, चलेजाव चळवळीचे द्रष्टे कै बाळशास्त्री जांभेकर, मनोहर, १३-१४९, जुलै १९४६, पृ. २६६

# वृत्तपत्राची बदलती भाषा

जगाच्या कानाकोपऱ्यातून आलेली कोणतीही नाविन्यपूर्ण घटना, वृत्तांत, ज्ञान, मनोरंजन मत आणि विचारप्रसारार्थ इत्यंभूत माहिती नियमितपणे प्रसारित करणाऱ्या माध्यमांना प्रसारमाध्यमे म्हणतात. एकाचवेळी हजारों लोकांशी संज्ञापन साधू शकणारी कोणतीही गोष्ट प्रसारमाध्यमांत अंतर्भूत होते. वृत्तपत्रे, आकाशवाणी आणि दूरदर्शन ही लोकमानसांपर्यंत पोहोचणारी प्रभावी प्रसारमाध्यमे आहेत. वैज्ञानिक प्रगतीमुळे माध्यमविश्वात अभूतपूर्व परिवर्तन होत असून छोटया भ्रमणध्वनीद्वारे ही माध्यमे दर एक मानवाच्या अगदी खिशात पोहोचली आहेत. आकाशवाणी व दूरदर्शन ही माध्यमे अगदी प्रभावी असली तरी त्याचे स्वरुप तात्कालिक असते. ते पुन्हा ऐकता किंवा पाहता येत नाही. आजचे वृत्तपत्र उद्या जरी शिळे झाले तरी त्याला संदर्भमूल्य राहते. त्यामुळे छापील माध्यमांचे सामर्थ्य आणि विश्वासार्हता आजही अबाधित असलेली पहायला मिळते. समाजजीवनातील चौथे शक्तीस्थळ म्हणून वृत्तपत्राकडे पाहिले जाते, ते त्याच भूमिकेमुळे. जगाच्या घडामोडीची माहिती देण्याबरोबरच लोकशिक्षण, लोकजागृती, लोकाभिरुची घडवणे, लोकसंस्कृतीचे संरक्षण करणे आणि समाजातल्या दांभिकतेचे खंडण करुन सत्याची पाठराखण करणे हे वृत्तपत्राचे महत्त्वाचे कार्य आहे. हा व्यवहार करण्यासाठी ज्या भाषेचे उपयोजन संज्ञापन म्हणून जी माध्यमे करत असतात, त्या भाषेचे संवर्धन करण्याची मोठी जबाबदारी वृत्तपत्रावर येऊन पडते. आकाशवाणी आणि दूरदर्शनवरच्या भाषेचे स्वरूप श्राव्य पद्धतीचे असते. पण वृत्तपत्राचे काम घाईगर्दीचे असले तरीही भाषिक उपयोजन अत्यंत जबाबदारीचे कार्य ठरते. अल्पशिक्षीतांपासून कुलगुरुंसारख्या उच्चशिक्षितांपर्यंत, लहानमुलांपासून वृद्धांपर्यंत आणि कामगारापासून प्राध्यापकांपर्यंतचे वाचक वृत्तपत्रे वाचत असतात. सर्वांना समजेल आवडेल आणि रुचेल असे भाषिक उपयोजन करणे वृत्तपत्रांना नैतिकदृष्ट्या बंधनकारक असते.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत आणि महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणांमध्ये वृत्तपत्रांनी केलेले महत्त्वपूर्ण कार्य नजरेआड करता येणार नाही. जनमत संघटित करण्याचे, समाजाला योग्य दिशा दाखवण्याचे कार्य वृत्तपत्रांनी केले. बाळशास्त्री

जांभेकरांचे आद्य वृत्तपत्र 'दर्पण', लोकमान्य टिळकांचा 'केसरी', आगरकरांचा 'सुधारक', शि. म. परांजपेंचा 'काळ', आचार्य अत्रेंचा 'मराठा' अशी मोठी निर्भिड वृत्तपत्रीय परंपरा महाराष्ट्राला आहे. बाळशास्त्री जांभेकरांच्या दर्पणमधील 'विद्या हे बळ आहे', 'हिंदुस्थानातील नाचतमाशे हा गुलामगिरीचा प्रकार आहे'. टिळकांच्या केसरीतील 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' 'तुम्ही आपल्या हाताने जेवणार की नाही?' 'राजद्रोह कशाला म्हणतात?' 'विद्यापीठे म्हणजे हमालखाने नव्हेत' हे मथळे वाचून आजही अंगावर शहारे येतात. प्र.के.आत्रे यांच्या 'मराठा' मधील आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या 'सामना'मधील घणाघाती मथळ्यांचीही आठवण येथे यावी. या कालखंडातील रसरशीत अस्सल मराठी भाषा आणि आजच्या वृत्तपत्राची इंग्रजाळलेली भाषा पाहून वैषम्य वाटते.

वृत्तपत्र माध्यम बदलाची व भाषा बदलाची दोन उदाहरणे येथे जाणीवपूर्वक देत आहे. ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकरांनी मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरू केले. पत्राच्या एका बाजूला इंग्रजी व दुसऱ्या बाजूला शुद्ध मराठी मजकूर छापला जाई. प्रथम ते पाक्षिक होते. ४ मे १८३२ च्या अंकापासून पत्राचे साप्ताहिकात रुपांतर करण्यात आले. २७ एप्रिलच्या अंकात खालील मजकूर छापला होता.

**दर्पण छापण्याचे रीतींत काही फेरफार**

''आम्ही हा कागद वाचणारास कळवितो की, आमचे मनांत 'दर्पण' छापण्याचे रीतींत कांही फेरफार करायचा आहे. दर पंध्रा दिवसांस एकवेळ छापायचे सांप्रतचे रीतीमुळे आजपर्यन्त फार गैरसोई झाली. असे बहुत वेळ घडले की जी एकादी बातमी आम्हास केवळ टांकता येईना, तो गावांत प्रसिद्ध होऊन जुनी होईपर्यन्त आम्हास छापायास अवकाश सापडू नये, किंवा कांही एक लिहायाजोगा विषय आमचे मनांत लिहायाचा असतां त्याचा रस गेल्यामुळे तो आम्हास टाकून द्यावा लागावा, तसेंच केव्हा केव्हा छापायचे विषय इतके जमावे की, त्यांतून कांही तसेच न छापितां महिना महिना राहावे. याकरिता आम्ही शेवटी दर आठवड्यास छापण्याचा बेत केला. पुढले शुक्रवारपासून हा कागद दर आठवड्यास छापिला जाईल. कागद घेणारांस पैका अधिक न पडता ही गोष्ट व्हावी, म्हणोन कागदाचा सांचा बदलण्याचे जरुर पडेल, परंतु आशा धरितो की जो फेरफार योजिला आहे तो वाचणाराचे सोईस पडेल. आमचे

मनांत आहे की पुढे 'दर्पण' इंग्रजी न्युसपेपर छापतात तसे मोठे चिनई कागदावर छापावे आणि तो कागद दुहेरी मोडावा असा की त्याची आठ पृष्टे होतील. तशी पृष्ठे पंध्रा दिवसाचे कागदाची बारा छापली जातील व पुरवणी सारिखा जो पुढले आठवड्यात छापला जाईल त्याची आठ होतील. म्हणोन आतां हें पत्र घेणारांस या कागदाची आठ पृष्ठे मिळतात, ती पुढे वीस मिळतील. ती या कागदापेक्षा किंचित लहान होतील खरी, परंतु आमचे छापणाराचे आदमासावरून त्यांत सांप्रतचे १३ पृष्ठांइतका विषय छापला जाईल.'

खालील मजकूर महाराष्ट्रातील आघाडीचे, सर्वाधिक खपाचे दैनिक लोकसत्तामधील २६ जानेवारी २०११ च्या प्रथम पृष्ठावरील आहे.

**लोकसत्ता आजपासून ई-पेपर रूपात!**

''जमाना फेसबुक आणि ट्विटरचा आहे. मग आपल्या सर्वांचा आवडता 'लोकसत्ता' या जमान्यात मागे कसा राहील? आजपासून 'लोकसत्ता डॉटकॉम' या वेबसाईटवर लोकसत्ता 'ई-पेपर' रूपात म्हणजे तो प्रत्यक्षात छापला जातो त्याच रूपात इंटरनेटवर उपलब्ध होणार आहे. त्यासाठी आपण loksatta.com या वेबसाईटवर जायचे. 'लोकसत्ता'च्या होमपेजवर 'ई-पेपर' असा सचित्र पॉइंटर देण्यात आला आहे. पॉइंटरवर क्लिक केले की, ई-पेपर 'ओपन' होतो. मुखपृष्ठाच्या बाजूला प्रत्येक पानाचे 'थंबनेल' पाहाता येते. त्या 'थंबनेल'वर 'क्लिक' केल्यानंतर 'क्लिक' केलेले पान 'ओपन' होते. हे पान व्यवस्थित पाहण्यासाठी ते 'झूम इन' किंवा 'झूम आऊट' करण्याची सोयही येथे आहे. हे पान किंवा त्यावरच्या बातम्या आपल्याला आवडलेल्या असतील. तर त्या ट्विटर किंवा फेसबुकवर 'शेअर' करायच्या असतील तर तसा पर्यायही तिथे उपलब्ध आहे. आपल्याला ई-पेपरचे ते पान इंटरनेटवर शेअरही करता येऊ शकेल.''

पावणे दोनशे वर्षाच्या काळात माध्यमविश्वात आणि भाषा जगतात झालेला अभूतपूर्व बदल वरिल दोन उताऱ्यातून अधोरेखित होतो.

वर्तमानपत्राच्या बातमीचा मथळा नेमका व स्पष्ट हवा. वाचकांचे लक्ष वेधून घेईल असा मथळा बातमीला देणे आवष्यक असते. त्याची शब्द योजना जेवढी स्पष्ट, नेमकी आणि गोळीबंद तेवढे वाचकांचे लक्ष अधिक खेचले जाईल. अगदी

थोडक्या शब्दात बातमीचा महत्त्वाचा अंश मथळ्यात यावा. शक्यतो चार-पाच शब्दांपेक्षा त्याची लांबी अधिक असू नये. शिवाय मथळा सोप्या भाषेत असावा. मथळ्यामुळेच वाचक बातमी वाचायला प्रवृत्त होतात. परंतु आजच्या वृत्तपत्रांच्या मथळ्यावर नजर टाकली तर इंग्रजीबरोबरच हिंदी भाषेचा वापर केल्याचे जाणवते.

लोकसत्ताच्या १ जानेवारी २०११ चे पहिले पान चक्क वेबसाईटसारखे छापले आहे. 'जादुई' नंबर आयुष्य बदलणार', 'व्हर्च्युअल क्लासरूम', 'मिस मुंबईचा नवा शृंगार!' 'टी.व्ही. होणार थ्रीडी' अशा मथळ्याखाली छोट्या छोट्या बातम्या छापल्या आहेत. मुंबईकर लोकलला 'मिस मुंबई' म्हणून ओळखतात परंतु तमाम मराठी जनतेने त्याचा काय अर्थबोध घ्यायचा? त्याच वृत्तपत्रामधील बातमीचा एक नमुना.

**'तारीख पे तारीखचा सिलसिला संपविण्यासाठी**
**हायकोर्ट - पोलिसांत 'ई-हायवे!'**

अशा मथळ्याची बातमी छापलेली आहे. बातमीत पुढील मजकूर येतो. 'आपल्यापर्यंत सुनावणीचा संदेशच पोहचला नाही हे कारण पुढे करुन 'तारीख पे तारीख' चा कित्ता गिरवला जातो आणि सुनावणी जैसे थे राहते. हायकोर्टाच्या न्यायाधिशांनी चिफ गव्हर्न्मेंट प्लीडर पांडूरंग पोळ यांच्यावर 'ई-हायवे' ची जबाबदारी सोपविण्यात आली असून राज्यभरातील पोलीस ठाण्यांच्या वरिष्ठांचे ई-मेल आयडी उच्च न्यायालयातील ई गव्हर्नन्सच्या प्रोग्रॅममध्ये फीड केले जातील.' प्रस्तुत 'तारीख पे तारीख', सिलसिला सुनावणी जैसे थे' अशी हिंदी रचना कशासाठी? 'ई-हायवे', 'चिफ गव्हर्न्मेंट प्लीडर' प्रोग्रॅम' या इंग्रजी शब्दांचा सामान्य वाचकांनी अर्थ कसा लावायचा?

२ जानेवारी २०११ च्या लोकसत्तामध्ये 'विद्यापीठ, महाविद्यालयात आता बायोमेट्रिक प्रणाली' अशा मथळ्याची बातमी छापली आहे. त्या बाबतीत 'प्राचार्य आपली स्वत:ची प्रतिमा निर्मिती (इमेज बिल्डींग) करण्यासाठी शैक्षणिक कामाकडे दुर्लक्ष करतात' असा मजकूर येतो. प्रतिमा निर्मिती हे शुद्ध मराठीतील शब्द वाचकांना कळत नाहीत का? उगीचच कंसात 'इमेज बिल्डींग' हे इंग्रजी शब्द वापरले आहेत. तसेच हजेरी पुस्तक (मस्टर) शासन निर्णय (जी.आर.) असे कंसात इंग्रजी शब्द वापरुन चक्क मराठी शब्द कळत नाहीत म्हणून इंग्रजी शब्द वापरण्याचा आव

आणला जातो. 'भागविक्रिचा फंडा', 'टेक फंडा ॲनॅलिसिस', 'युनायटेड स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडियाचा असोसिएट चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीबरोबर करार', 'प्रगती ऑफसेटला सलग तिसऱ्यांदा इंटरनॅशनल प्रिंटर ऑफ द इयर ॲवॉर्ड', (७ जाने. ११) अशा मथळयामध्ये मराठी शब्द अक्षरश: शोधावा लागतो. इंग्रजी शब्दात मराठी झाकोळून गेल्याचे दिसून येते.

पुणे, मुंबईसारख्या महानगरामध्ये लोकप्रिय असलेल्या लोकसत्ताने हिंदी, इंग्रजीसारख्या भाषेचे उपयोजन करणे हे एक समजू शकते. परंतु कोल्हापूर, सांगली, सोलापूर, रत्नागिरीसारख्या शहरातून प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांनीही तोच कित्ता गिरवावा हे मात्र विचित्र आहे. कोल्हापूरमधून प्रसिद्ध होणाऱ्या सकाळचे मथळेही इंग्रजाळलेले आहेत.

**कोल्हापूरातून टेक ऑफ पुन्हा लांबणीवर**
**विमानतळ धावपट्टीचे काम अपूर्णच (२० जाने)**

वरील मथळ्यामध्ये 'टेक ऑफ' ऐवजी उड्डाण हा समर्पक शब्द घातला असता तर बातमीचा बाज बिघडला नसता. 'वर्ल्डकप क्रिकेटचे काऊंटडाऊन सुरू', 'राडेबाजीचा व्हायरस संपवायचा कसा?' इथे इंग्रजी शब्दांची पेरणी कशासाठी? 'नदीकाठची गावेही 'डेंजर झोन' मध्ये!' या मथळ्यात डेंजर झोन या इंग्रजी शब्दाला पर्यायी शब्द 'धोक्याची पातळी' चालणार नाही का? बातमी नदीकाठच्या गावाशी म्हणजे ग्रामीण परिसराशी निगडीत असल्याने त्या लोकांच्या भाषेतच मथळा असायला हवा, 'शाहू मॅरेथॉनची धावली सुसाट एक्सप्रेस',

'पी जी डी बी एम' च्या विद्यार्थ्यांची लुट थांबणार
एम. बी. ए. प्रमाणे होणार शुल्क नियंत्रण - ए.आय.सी.सी.ए.चा निर्णय

राष्ट्रीय बायोगॅस योजना गॅसवर. १ फेब्रुवारीच्या अंकात सकाळने राज्यातील पाणलोट विकासासाठी केंद्र शासनाने ३२०० कोटी मंजूर केले या बातमीचा मथळा दिला होता.

३२०,०००,०००,०० रुपये

या मथळ्यातल्या शुन्या मोजण्यासाठी एकम, दहम, शतम, सहस्त्र....... असे करत ३२ हजार कोटी की ३,२०० कोटी असा उच्चशिक्षितांचा संभ्रम होऊ शकतो. मग सामान्य वाचकाचे काय? त्यामानाने

ऐंशी ओलांडली तरी फिरत्या चाकाशी नाते घट्ट
श्रमप्रतिष्ठेची गाथा : निगवेच्या ज्योती कुंभारची कहाणी
काटे टोचल्याशिवाय वाटच तयार होत नाही – सिंधुताई संपकाळ

हे मथळे मराठी भाषेचा अस्सल बाज दर्शवतात. गेल्या दशकात बऱ्याच वृत्तपत्रांनी महाराष्ट्रातील विविध बोली भाषेंना स्थान दिल्याचे दिसून येते. परंतु हल्लीच्या खाऊजा संस्कृतीच्या जमान्यात या बोलीभाषाही वृत्तपत्रात दिसेनाशा झाल्या आहेत. २ फेब्रुवारीच्या नवाकाळमध्ये आलेली

बाबांनो तुमचो पैसो नको
आमका सुखात जगू दया.
जैतापूरच्या प्रकल्पग्रस्तांची कळकळीची विनंती

ही बातमी बोली भाषेच्या अस्सल बाजामुळे काळजाला घरे पाडते. हृदयाला भिडण्याचे सामर्थ्य भाषेमध्ये असते आणि अशाच भाषेचे उपयोजन योग्य ठरते. पुढारी ही या बदलात अपवाद कसा असू शकेल? इतर वृत्तपत्रांचे इंग्रजीचे अनुकरण करायलाच हवे. पुढील मथळे अत्यंत बोलके आहेत.

एस्.टी. चे कंट्रोलिंग ऑपरेशन फेल!
ऑर्डिनरी झाल्या सुपरफास्ट : गर्दीच्या थांब्यावर एस.टी.नाही. (१५ जाने)
बॉलीवुड कलाकारांनी गाजवली थर्टी फर्स्टची रात्र (२ जाने)
किप द पेशन्स, थिंक आऊट ऑफ बॉक्स
सौभाग्यवती मुख्यमंत्र्यांनी घेतला 'कृष्णा'मध्ये तास (२१ जाने)

या इंग्रजाळलेल्या भाषेपेक्षाही मंत्रिमंडळ फेरबदलाची बातमी फक्त 'खांदेपालट!'अशा एकाच शब्दात देऊन बातमीचा सर्व प्रभाव त्यामध्ये दर्शवला होता. 'पाणीपतच्या रणभूमीवर हरहर महादेव!', 'देशीला बंदी, विदेशीची धुंदी!' 'अनाथालयेच अनाथ' अशा संक्षिप्त मराठी भाषेतून प्रभाव गोचर करता येतो. वाचकांना बातमीकडे खेचून घेता येते.

'तरुण भारत' ग्रामीण परिसरात अधिक लोकप्रिय आहे. तो सीमा भागातील असल्याने मराठी भाषाप्रेम इथे जाणीवपूर्वक जोपासले जाते. पण मध्ये मध्ये इंग्रजी शब्दांची पेरणी आहेच. 'कऱ्हाडमध्ये बिबट्याचा एन्काउंटर', 'राज्यातील पक्ष्यांच्या ५० जाती डेंजर झोनमध्ये', पर्यावरण संतुलित समृद्धग्रामचे काऊंटडाऊन सुरू', कोल्हापूरात वाढतेय वाहनांची क्रेझ', 'वेलकम २०११', त्यापेक्षा 'कृष्णेचे पाणी पेटणार', 'पानीपतावर जागल्या मराठी शौर्याच्या स्मृती', अशी मराठी भाषेतील फर्मास शीर्षके आकर्षक वाटतात. डॉग शो ऐवजी 'इमानदारांचा शो' हा मथळा अधिक आकर्षक वाटतो. परंतु 'काँग्रेस कार्यकर्त्यांनी डागली जिल्हा नेतृत्वावर तोफ' या मथळ्यातील डागली म्हणजे काय? बंदुकीतून गोळी झाडतात तशी तोफ झाडतात. मराठी भाषेतील शब्दांचा पुरेपूर अर्थ माहित असल्याशिवाय त्याचा वापर करणेही गैर ठरते.

'लोकमत' मध्येही'आमला ठरला हिट अन रोहित फ्लॉफ', 'राज सस्पेन्स', 'हातकणंगलेत काँग्रेस पुन्हा रिचार्ज', 'विज गेली? चिंता नको सौर अभ्यासिका है ना?, 'एक देश ५० टक्के इडियटांचा', असे हिंदी इंग्रजी शब्द मध्ये मध्ये जाणीवपूर्वक घातले जातात.

सकाळने 'पारधी समाजाचा पोलिसावर हल्ला' अशा मथळ्याखाली बातमी दिली. (१ जाने) तीच बातमी महाराष्ट्र टाईम्सने 'तेल माफियांनी केली पोलिसांची पारध' अशा मथळ्याखाली छापली. 'पारध' म्हणजे काय? महाराष्ट्र टाईम्सने इजिप्तमधल्या संघर्षाचे चित्रण करणारी बातमी काव्यात्मक मथळ्याखाली दिली आहे.

ही जनता अमर आहे .....
जनतेच्या ऐक्यामध्ये
लाव्हयाची लाट आहे
जनतेच्या पायापुढे
प्रकाशाची वाट आहे.

विंदा करंदीकरांच्या कवितेचा वापर करुन हा मथळा व उपमथळा दिला आहे. इजिप्तमधील भरतीयांना ' ए मेरे वनतके लोगो........' अशी सादही दिली.

वृत्तपत्रामध्ये अनेक प्रकारची माहिती विविध सदरातून दिली जाते. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे येणाऱ्या प्रचंड माहितीचे रुपांतर करण्यासाठी विविध सदरांची निर्मिती वृत्तपत्रांना करावी लागते. काळाबरोबर हल्ली सदरांची भाषाही बदलल्याचे दिसते. सकाळमध्ये 'कॉर्नर किक','Today', 'Edumantra', 'Career', Volywoodnama, 'फुल २ धमाल','लॉक किया जाय', 'गॉसिप','वेबविश्व', 'आपेन स्पेस', 'पॉवर पॉईंट', वर्ल्डटूर, अराऊंडवर्ल्ड, बर्निंग इश्यू, फेमनेम, सेलिब्रिटी लाईफ, कल्चर, नेक्स्ट विक, अशा इंग्रजी भाषेचा वापर करुन सदर निर्मिती केल्याचे दिसून येते. स्मार्ट सोबती या पुरवणीमध्ये तर स्पोर्टेक्स,गेली, करिअर options, Quick Quize सेलेब्ज, लाईफ स्टाईल, वर्किंग वुमन, U नो, बिझनेस BEE, सिनेआय, गेम्स झोन, मेल्स फॉरवर्ड SMS आते है वर्ल्ड हेरिटेझ इतका इंग्रजी भाषेचा वापर करुन सदर नामावली केली आहे. सकाळमध्ये मराठी सदरामध्ये संक्षिप्त, कार्यक्रम, दिनमान, शब्दशोध, सुडोकू, मुद्रा, वाचकांचा पत्रव्यवहार, बाजारभाव, झोत, लक्षवेधी, प्रवाह, पंचांग, गावखुणावतय, पडद्यामागच्या गोष्टी, जग काय म्हणतय, सप्तरंग-इतिश्री, साद दे हृदया, छटा, फिरस्ती, सरल-तरल, तुम्ही बदलू शकता, जीवनमानस, जन्मकथा गाण्याची, सारंच बिघडतय, अभिजात विश्वसाहित्य, पुस्तक परिचय, शब्दकोडे, भविष्य,शब्दांगण, इत्यादी सदरे ती इंग्रजीपेक्षाही अधिक भारदस्त वाटतात.

लोकसत्तामध्ये मात्र सदराचा मराठी बाज जाणीवपूर्वक जोपासलेला आहे. क्वचित सदरांना इंग्रजी नावे दिली आहेत. सकाळचा मॉर्निंग वॉक, जस्ट डू इट, फॉरवर्डस, करीअर वृत्तांत, लाईफ शैली अशी थोडीच इंग्रजी भाषेतील सदरे आहेत. वैद्यकभान, ग्रंथविश्व, नवनीत, अभियांत्रिकीवर बोलू काही,अन्वयार्थ, अन्यथा, चतुरंग, न्याहरी, लग्नसंस्कार, चुटकीसरशी, रसआस्वाद, विकसन, दशदिशा, धृवसष्टी, ललित, केल्याने देशाटन, मुसाफिर, जीवनसाथी(लग्नाच्या जाहिराती), लोकरंग-वाढप्याची संस्कृती, तिरीप, औशधज्ञान, मेंदूच्या मनात, जाणिवा, हास्यरंग, हसण्यावारी, पुसतकाचे पान, शब्दाला शब्द, बालरंग, लोकमुद्रा, कातळकला, शेतीवाडी, कार्बनशेती, वृक्षायुर्वेद, ब-ब बळीचा, बाजारपेठ समालोचन, घरबसल्या (आजचे चित्रपट), धनवाणी, सह्याद्रीचे वारे, व्यक्तिवेध, कुजबूज, अविष्कार, शिक्षणविश्व, ग्राहकहित, आसमंत, अशी मराठी भाषेतील सदर नामावली आहे.

सकाळने Today कोल्हापूर केले, पुढारीने आपलं कोल्हापूरचे माय कोल्हापूर केले. छोट्या जाहिरातींना Classified आणि Appointments असे नवे इंग्रजी शब्द वापरले. लोकमतने हॅलो कोल्हापूर केले.

वरील मराठी, इंग्रजी भाषेतील सदरांचा अभ्यास केल्यास जुनी, पारंपरिक माहिती मराठी भाषेतील सदरातून व नवी, आधुनिक माहिती इंग्रजी भाषेतील सदरातून वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा वृत्तपत्रांचा मानस दिसतो. आजचा तरुणवर्ग डोळ्यासमोर ठेऊन ही सदर निर्मिती झाल्याने आजच्या तरुणांच्या तोंडची भाषा इथे आल्याचे स्पष्ट दिसते.

भिमसेन जोशींचे निधन झाले तेंव्हा दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात मथळे झळकले. 'अस्त!', 'स्वरभास्कर अस्तंगत', 'स्वरदैवत अंतर्धान', 'भिमसेनी राग लोपला', 'नादब्रम्हाचा सच्चा उपासक हरपला', 'संगिताचा बादशहा काळाआड', 'स्वरपंढरीचा विठ्ठल', असे भारदस्त मथळे झळकले. राज ठाकरे यांनी नाशिकमध्ये केलेल्या भाषणानंतर 'मौका सभी को मिलता है!' असे हिंदी डॉयलॉगमधील मथळ्यांनी वाचकांचे लक्ष वेधून घेतले. 'कोल्हापूरच्या रस्त्यात कोणी किती ढपला पाडला' ही कोल्हापूरकरांची गुळाच्या रव्याच्या ढपल्याची भाषा मथळारुपाने येताना दिसतेय.

वृत्तपत्रांची भाषा बदलतेय. जशी मराठी, हिंदी बदलतेय तशी इंग्रजीसुद्धा. काही महिन्यांपूर्वी टाईम्स ऑफ इंडियामध्ये 'सिझलिंग सानिया, फिजलिंग आऊट' अशा मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली होती. म्हणजे टेनिसविश्वात चमचम करणारी सानिया मिर्झा फसफसत बाहेर पडली. माध्यमविश्वात आता जुनी पिढी जाऊन नवी पिढी स्थिरस्थावर झाली आहे. ही पिढी फटाफट कॉम्प्युटर हाताळतेय, सटासट इंग्रजी बोलतेय, आणि दणादण बातम्या लिहितेय. त्यांच्या जगतात १+१= ११ बे एके बे करुन आयुष्य जगणाऱ्यांच्या जगात एक अधिक एक दोन होत असतील. पण जे जिंदादिलीने जगतात, काहितरी भन्नाट स्वप्ने घेऊन आनंदाने आपली वाट चालतात त्यांची गणितं पाहिली तर एक अधिक एक नाही, अकरा होतात. कारण दिल और दिमाग, कॉन्फिडन्स ॲन्ड कण्टेण्ट, स्टाईल ॲण्ड स्टेटमेण्ट, ॲप्रोच ॲण्ड ॲटिट्युड, टॅलेण्ट ॲण्ड टेम्परामेंट, (मैत्र, लोकमत, , ७ जाने. २०११) घेऊन जगणारीही आजच्या काळातील मुलं माध्यमविश्वात वावरत आहेत. आजच्या जगाची भाषा ती वापरताहेत.

समाज झपाट्याने बदलत आहे. चित्रपट, टि. व्ही., चॅनेलचा सुकाळ, मोबाईल, इंटरनेट, फेसबुक, ट्युटर यांचा वापर, इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पीक यांचा परिणाम भाषेवर घडत आहे. दळणवळणाच्या साधनात आमूलाग्र परिवर्तन झालेय. टोमॅटो, मिर्ची, सारखी एफ.एम.ची चॅनेल्स छोट्या छोट्या शहरांत सुरू झाली. एकदम फ्रेश,इटस हार्टस, मॉर्निंग मंत्रा, चल सटक यार म्हणणारी आजची मुलं इंग्रजी, हिंदी, मराठी भाषेची सरमिसळ सहजपणे करताहेत. जग अगदी जवळ आलेय. भाषेमध्येही आदान-प्रदान होत असते ते वेगाने घडून येतेय. हिंग्लींश, मिग्लीश चिंग्लिश, अशी मल्टी लँग्वेज जन्माला येतेय. मराठीपेक्षा इंग्रजी बोलणं अधिक मॉडर्न वाटतेय. या सर्वांचा परिणाम माध्यम व्यवस्थेवर होताना दिसतोय. वृत्तपत्र माध्यमाची भाषाही त्याला अपवाद नाही. मराठी भाषेवर हिंदी, इंग्रजीचे आक्रमण होतेय असा गळा आळविण्याचे काही कारण नाही. मराठी भाषा या संक्रमणाच्या काळातही नवेरुप धारण करतेय. ती नव्या रुपात येतेय. त्याचा आपल्याला स्वीकार केलाच पाहिजे. नाही स्वीकार केला तरी ही आपल्या माथ्यावर बसणारच आहे.

जसा समाज तषी भाषा हे साधं गणित आहे. पूर्वि राजकारणामध्येसुद्धा सुसंस्कृत लोक होते. विरोधकावर टिकाटिप्पणी करत असताना वैयक्तिक निंदा-नालस्ती टाळायचे. पण हल्ली राजकारणाची पातळी खालावली आणि वैयक्तिक व्देषाने आणि निंदेने कहरच केला. 'सामना' वृत्तपत्रामधून गो. रा. खैरनार यांच्याविषयी 'गोरा का काळा', आण्णा हजारेंविषयी 'वाकडतोंडया गांधी', शरद पवारांना 'मैद्याचं पोतं', छगन भुजबळांना 'लखोबा लोखंडे', 'झंप्या', नारायण राणेंना ' नारोबा','कारु नारु' सोनिया गांधींना ' गोऱ्या कातडयाची' अशी शेलकी ठाकरी विशेषणे वापरली गेली. त्याला उत्तर म्हणून भूजबळांनी 'टी बाळू' असे उत्तर दिले. भाजपचे प्रदेशाध्यक्ष सुधीर मुनगंटीवार यांनी ' राज ठाकरे यांची मनसे ही शरद पवारांची टेस्टट्यूब बेबी आहे' असे म्हटले. तर शरद पवारांनी विरोधकांना 'तोडपाणी' शब्द वापरल्याने गदारोळ उठला. राज ठाकरे यांनी 'या मल्टीप्लेक्सवाल्यांना फक्त खळळं.... फट्याक! एवढे दोनच आवाज कळतात' असे भाषणात उच्चारले आणि दुसऱ्या दिवषी मल्टीप्लेक्स मराठी चित्रपट दाखवत नाहीत म्हणून फोडली गेली. माध्यमे अशी भाषा उचलून धरतात आणि त्याचा वापर करतात. गुन्हेगारी क्षेत्रातले 'टपका दिया', 'गेम केला', 'एन्काऊंटर', 'पेटी', 'खोका' असे शब्द मथळ्यामधून वावरत असतात.

आज माध्यम जगतात जुनी पिढी जाऊन नवी पिढी येते आहे. आपले बस्तान बसवते आहे. या नव्या पिढीच्या कल्पना भन्नाट आणि भाषाही वैचित्रपूर्ण अशी आहे. इंटरनेट जगातील ई बुक वाचणारी ही मुलं आहेत. फेसबुक आणि ट्युटरवर कब्जा करुन बसलेली मुलं जुन्या धेंडांना 'आम्ही काही वाचतच नाही याला ई-स्टॉप द्या' असं म्हणताहेत. स्वत:चा ती 'ई' वर्ली मुलं असा उल्लेख करत आहेत.

'आणि ग्रंथोपजिवीये विशेषी लोक 'ई' ये

दृष्टादष्ट विजये होवो जी।

या ज्ञानेश्वरांच्या ओवीने झपाटून त्यांनी आर्कुटवर मराठी कविता आणि काव्यांजली या दोन कम्युनिट्या जन्माला घातल्या. आज पन्नास हजार नेटकरी या कम्युनिट्यावर भटकताना दिसतात. रोज शंभरभर कविता जन्माला घालतात. 'ई-नेटाक्षण' हे त्यांनी साप्ताहिक सुरू केलेय. दोन वर्षापासून ते जगभर वावरतेय, वाचले जातेय, छोट्या नेटकऱ्यांसाठी बालनेटाक्षरीही त्यांनी सुरू केलेय. शिवाय 'ई- स्टॉप' हे देखील साहित्यमंथन करते आहे. त्यांनी 'ई- साहित्य डॉट कॉम' वेबसाईट सुरू करुन 'ई-बुक्स' मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन दिली आहेत. विशेष म्हणजे त्यांनी यावर्षी 'ई-साहित्य संमेलनाचा' पहिला आगळा-वेगळा अभिनव उपक्रम केला.

माध्यम क्षेत्रातील ही तरुणाई मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेची तोडमोड करुन नवी मराठी भाषा जन्माला घालतेय. इंटरनेट-आंतरजालाचे 'आंजा' केलेय. धन्यवाद, थँक्सच्या चालीत बसवून त्याला 'धन्यू' किंवा 'धन्स' केलेय. ताईचे तै, बाईचे बै, अल्पाक्षरी रुपे बनवलीत. वीकेंडचे 'विकांत' करुन मराठी पेहराव दिला आहे. डकवायची तशी 'पेस्टवायची', लिंकचं- 'लिंकाळलय', फेसबुक- 'चेहरा पुस्तक' -'चेपु', स्क्रपबुक -'खरडवही', 'फोरम' चे 'खरडफळा', मेसेज - व्यक्तिगत निरोप-व्यनि, टायपिंगचे -टंकणे, पासवर्ड -परवलीचा शब्द तयार करते आहे. एकंदरीत नवी मराठी भाषा जन्मत आहे. आपण त्या भाषेचे स्वागत करायला हवे.

***

(विलिंग्डन महाविद्यालय, सांगली येथे भाषाशास्त्र परिषद. दि. १७ डिसेंबर २०११ रोजी सादर केलेला शोधनिबंध)

**संदर्भ :**


१. दैनिक लोकसत्ता, जाने. – २०११

२. दैनिक सकाळ, जाने. – २०११

३. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, जाने. – २०११

४. दैनिक पुढारी, जाने. – २०११

५. दैनिक तरुण भारत, जाने. – २०११

६. दैनिक लोकमत, जाने. – २०११

७. दैनिक महासत्ता, जाने. – २०११

८. दैनिक सामना, जाने. – २०११

९. दैनिक नवाकाळ, जाने. – २०११


--------

वाय ५६७–(११०५ पु.)अे५*–२.२०२२

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.



## प्रा. (डॉ.) शिवकुमार सोनाळकर

शिक्षण : एम्. ए., एम्. फिल, पीएच. डी.

अध्यापन : श्री शिव-शाहू महाविद्यालय सरूड, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर
प्रोफेसर आणि मराठी विभागप्रमुख , अध्यापन : पदवी ३४ वर्षे, पदव्युत्तर २६ वर्षे

संशोधन : एम्. फिल : दर्पणमधील लेखनाचा सामाजिक अभ्यास
पीएच्. डी. : १९६० नंतरच्या स्त्रियांच्या कथांचा सामाजिक अभ्यास
मायनर प्रोजेक्ट : विज्ञानकथांचा विविधांगी अभ्यास

प्रकाशन : स्त्रियांची कथा : सामाजिकता आणि भाषिकता : ग्रंथ प्रसिध्द
: मराठी विज्ञानसाहित्य : संदर्भग्रंथ, य.च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
: यंमाजी : कथासंग्रह प्रकाशनाधीन.
: भारतीय विज्ञानसाहित्य : द्विखंडात्मक महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ प्रकाशनाधिन

लेखन : महाविद्यालयीन काळापासून विविध नियतकालिक, दिवाळी अंकात २३ कथा प्रसिध्द, साहित्यिकांच्या ५ मुलाखती प्रसिध्द, कविता, प्रासंगिक, स्फूट लेखन प्रसिध्द.

पुरस्कार : मराठी विज्ञान साहित्य पत्रिकेचा यंमाजी या विज्ञानकथेस २०१५ चा पुरस्कार.

संपादन : २५ वर्षे महाविद्यालयाच्या प्रज्ञांजली नियतकालिकाचे संपादन एकूण १०५ पारितोषिके प्राप्त. शिवाजी विद्यापीठामध्ये तीनवेळा प्रथम, महाराष्ट्र व गोवा द्विराज्यात प्रथम

पदाधिकारी : अधिसभा सदस्य- २०१० ते २०१५, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
अध्यक्ष : शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई